कै. ग. ज. आगाशे

यांचे निवडक लेख

कै. ग. ज. आगाशे यांचे निवडक लेख

संपादक :

द. ग. आगाशे

१९५८

मूल्य पांच रुपये

प्रकाशक :
डॉ. वा. ग. आगाशे,
९५ बी प्रभात रोड,
पुणें ४

* *

प्रथमावृत्ति
प्रकाशन-दिन : २१ मार्च १९५८

* *

* *

मुद्रक :
चिं. ग. वझे,
साधना प्रेस,
३७४ शनवार,
पुणें २

१०१/२५

प्रस्तावना

रावसाहेब गणेश जनार्दन आगाशे हे जुन्या पिढींतील एक नामांकित हेडमास्तर होते. विद्वान् व उत्तम शिक्षक व कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांचा फार लौकिक होता. ते जरी शिस्तीचे फार भोक्ते होते, तरी त्यांच्या प्रेमळ वृत्तीमुळें त्यांचे सहकारी शिक्षक व विद्यार्थी यांना त्यांच्याबद्दल फार आदर वाटे. इंग्लिश, मराठी व संस्कृत या तिन्ही भाषांतील वाङ्मयाचा त्यांनीं सखोल अभ्यास केला होता. ते जसे उत्तम लेखक होते, तसेंच ते उत्तम वक्तेहि होते. त्या काळच्या आम्हां तरुण शिक्षकांना रावसाहेब हे आदर्श हेडमास्तर वाटत.

रावसाहेब आगाशे स्वर्गस्थ होऊन आज जवळजवळ चाळीस वर्षें झालीं. त्यांचे लेख व पुस्तकें आतां दुर्मिळ झालीं आहेत. त्यांचे विद्वान् व साहित्य-प्रेमी चिरंजीव तात्यासाहेब यांनीं आपल्या वडिलांचे महत्त्वाचे सर्व लेख मिळवून पुस्तकरूपानें छापले आहेत. हे लेख प्रसिद्ध करण्यास त्यांना पुष्कळ परिश्रम करावे लागले व बराच खर्च करावा लागला. अशा प्रकारें अंशतः तरी पितृऋण फेडण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आहे.

या ४०० पानांच्या ग्रंथाचे मराठी, संस्कृत व इंग्रजी असे तीन विभाग आहेत. पहिला मराठी लेखांचा व पद्यांचा आहे. हा सर्वांत मोठा म्हणजे २८४ पानांचा विभाग आहे. या विभागांत रावसाहेब आगाशे यांनीं सोलापूर येथील साहित्यसभेपुढें दिलेलें 'अभिज्ञान शाकुंतल' हें व्याख्यान प्रथम घेतलें आहे. या व्याख्यानांत त्यांनीं थोड्या वेळांत महाकवि कालिदास याच्या शाकुंतल नाटकाचें अप्रतिम सौंदर्य मोठ्या कौशल्यानें दाखविलें आहे. व्याख्यानाची भाषा साधी, सोपी व गोड आहे. विद्याधर वामन भिडे यांनीं केलेल्या 'राघवीय परिवाह' या काव्यावर रावसाहेबांनीं केलेली टीका दुसऱ्या लेखांत दिली आहे. रावसाहेबांचें हें परीक्षण मार्मिक आहे व तें काळजीपूर्वक केलेलें आहे. रावसाहेबांची टीका विधायक आहे. हें काव्य अपरिचित संस्कृत शब्दांचा फार उपयोग केल्यामुळें फार क्लिष्ट झालें आहे व त्यांत गोडी वाटत नाहीं. ही क्लिष्टता सोप्या मराठी शब्दांचा उपयोग करून कशी दूर करतां आली असती, हें रावसाहेबांनीं कांहीं उदाहरणें घेऊन दाखविलें आहे. तरुण होतकरू लेखकांना रावसाहेब नेहमीं उत्तेजन देत व मार्गदर्शन करीत.

' शास्त्रकलारहस्य ' या व्याख्यानाचा विषय बराच गूढ आहे. अनंताशीं तादात्म्य पावणें हें मानवी जीवनाचें साध्य आहे. हें तादात्म्य पावण्याचे तीन मार्ग आहेत : पहिला तत्त्वज्ञानी व शास्त्रज्ञ यांचा, दुसरा भक्तांचा व तिसरा कलानिष्ठांचा. या तीन मार्गांनीं जीवाचें अनंताशीं तादात्म्य कसें साधलें जातें, हें या व्याख्यानांत दाखविलें आहे. कलावन्तांत त्यांनीं कवींना श्रेष्ठ स्थान दिलें आहे. ' हिन्दी भाषा हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होऊं शकेल काय ? ' हा लेख सध्यांच्या काळीं अवश्य वाचण्याजोगा आहे. चाळीस वर्षांपूर्वीं हिन्दी ही राष्ट्रभाषा व्हावी म्हणून जी चळवळ सुरू झाली होती व जो वाद माजला होता, त्याचा विचार या लेखांत केला आहे. हिन्दी राष्ट्रभाषा होण्यास कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें या लेखांत स्पष्टपणें दाखविलें आहे. ' महाराष्ट्रवाङ्मय ', ' महाराष्ट्रवाङ्मयाचें पर्यालोचन ' व ' महाराष्ट्रसाहित्य ' या तीन लेखांत मराठी वाङ्मयाचा उदय, त्याचा विकास, त्याचे गुणदोष, त्याच्या विकासास अवश्य लागणाऱ्या गोष्टी यांचें विवेचन केलें आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंतचें मराठी साहित्याचें स्वरूप समजण्यास हे लेख अजूनहि फार उपयुक्त वाटतील.

पद्यविभागांत ' बाष्पांजली ' व ' राज्यारोहण ' हीं दोन मोठीं काव्यें आहेत व कांहीं थोड्या स्फुट कविता आहेत. ' बाष्पांजली ' हें काव्य रावसाहेबांनीं आपला द्वितीय पुत्र राजाराम याच्या निधनानें झालेलें तीव्र दुःख व्यक्त करण्याकरितां लिहिलेलें आहे. यांतील करुणरस वाचकांच्या नेत्रांना ओलावतो. या विलापिकेची भाषा ओघवती आहे. सहजता व अकृत्रिमता हे या काव्याचे विशेष गुण आहेत. मराठी काव्यांत या विलापिकेला मानाचें स्थान आहे. हरिभाऊ देव, हरिभाऊ लिमये, हरिभाऊ आपटे, गोविंदराव कानिटकर, न्यायमूर्ति रानडे या थोर व्यक्तींच्या निधनानें झालेलें दुःख रावसाहेबांनीं पद्यांत व्यक्त केलें आहे.

दिल्ली येथें पांचव्या जॉर्ज बादशहाला झालेल्या राज्याभिषेकाचें वर्णन ' राज्यारोहण ' या काव्यांत केलें आहे. इतिहासजमा झालेल्या या समारंभाची कल्पना या काव्यानें फार चांगली येते.

संस्कृत विभागांत पुणें येथील संस्कृत वाग्वर्धिनी सभेपुढें सन १९१८ सालीं संस्कृतमध्यें दिलेलें ' भारतीय प्रज्ञाराज्य ' हें व्याख्यान प्रथम दिलें आहे. या व्याख्यानाशिवाय तीन-चार स्फुट संस्कृत कविता आहेत. प्राचीनकाळीं

भारतांत धर्मशास्त्र, कला, विविध व्यवसाय, तत्त्वज्ञान, साहित्य इत्यादिकांची कशी प्रगति झाली होती व भारतीयांच्या बुद्धीचा विकास कसा झाला होता, हें या व्याख्यानांत दाखविलें आहे. संस्कृत भाषेंत तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, इतिहास, वैद्यक यांसारखीं भौतिक शास्त्रें, विविध कला व व्यवसाय व साहित्य यांजवर अनेक सुंदर, सुबोध व उद्‌बोधक ग्रंथ कसे तयार झाले, हेंहि वक्त्यानें दाखविलें आहे. संस्कृत भाषेचा अभ्यास करून हा जुना ज्ञानसंग्रह आत्मसात् करणें कसें आवश्यक आहे, हेंहि व्याख्यात्यानें सांगितलें आहे. हें व्याख्यान उत्तम संस्कृत भाषेचा एक नमुना आहे. व्याख्यानाचा शेवट सुंदर पद्यांत केला आहे.

तिसरा विभाग ७५ पानांचा आहे. यांत चार इंग्रजी लेख आहेत. यांतील 'Was Rama Polygamous'— राम बहुपत्नीक होता काय ?–हा लेख फार महत्त्वाचा आहे. श्रीयुत चिंतामणराव वैद्य यांनीं आपल्या 'Riddle of the Ramayana' या इंग्रजी ग्रंथांत एका श्लोकाच्या आधारें राम बहुपत्नीक होता, असें अप्रत्यक्ष रीत्या सूचित केलें आहे. रावसाहेब आगाशे यांनीं रामायणांतील व रामायणावरील टीकाकारांच्या ग्रंथांतील अनेक उतारे घेऊन श्री. वैद्य यांचा तर्क कसा चुकीचा आहे, हें सप्रमाण दाखविलें आहे. या लेखावरून रावसाहेबांचा रामायणाचा अभ्यास किती सखोल होता, हें दिसून येतें.

'Ranade The Good' या लेखांत रावसाहेबांनीं रानडे यांच्या मनावर उदात्त भागवत धर्माचा केवढा परिणाम झाला होता व या धर्मप्रेरणेनेंच त्यांनीं आपलें सर्व आयुष्य देशाच्या व देशबांधवांच्या सेवेला कसें लावलें, हें दाखविलें आहे.

रावसाहेबांचे बहुतेक लेख व कविता हीं सुशिक्षित वाचकांना वाचनीय वाटतील व त्यांना तीं गोड वाटतील, यांत शंका नाहीं. रावसाहेब आगाशे यांच्याबद्दल माझ्या अंतःकरणांत जी आदराची भावना वसत आहे, ती या प्रस्तावनेंत व्यक्त करण्याची संधि मला त्यांचे चिरंजीव तात्यासाहेब यांनीं दिली, याजबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

निवास :
डेक्कन जिमखाना, पुणें ४
ता. २८।१।५८.

—म. का. कारखानीस

कै. ग. ज. आगाशे

यांचा

अल्पपरिचय

रत्नागिरी शहराच्या दक्षिणेस एक तर आहे. ती ओलांडली कीं कोळंबें नांवाचें गांव लागतें. हें आगाशे कुलाचें मूळ गांव. यापूर्वी आगाशांचे पूर्वज कोठें रहात असत याची माहिती नाहीं. कोळंब्याहूनच रत्नागिरी, शिरगांव, मांगदरी, कोल्हापूर, गारवडें (ता० पाटण, जि० सातारा) आणि इंदूर वगैरे ठिकाणीं आगाशे आडनांवाचे लोक पसरले आहेत. कोळंबें गांवचा एक भाग 'बाग आगाशे' या नांवानें प्रसिद्ध आहे. आगाशांची बरीच जमीन व सावकारी तेथें होती. या गांवांतील श्रीशंकराच्या (नागेश्वराच्या) देवालयाशीं आगाशे कुलाचा निकट संबंध होता. हें देऊळ अद्यापि उभें आहे.

२. कांहीं गृहकलहामुळें सखारामपंत आगाशे या पुरुषानें सन १७९८ सालीं गांव सोडलें आणि नशीब काढण्यासाठीं ते घाटावर आले. त्यांचें मोडी अक्षर वळणदार होतें. ते घोडयावर बसण्यांत पटाईत होते. वृत्ति साहसी होती. या भांडवलावर सखारामपंतांनीं निजाम सरकारच्या पदरीं घोडेस्वारांच्या पथकांत प्रथम नोकरी पत्करली. कांहीं कालानंतर अकल्पित योगामुळें त्यांची आणि तासगांवचे श्रीमंत पटवर्धन यांची गांठ पडली. त्यांच्याच सूचनेवरून निजामाकडील नोकरी सोडून ते तासगांवकरांच्या पदरीं राहिले. अंगच्या गुणामुळें चढत चढत ते पटवर्धनांच्या पागेवरील मुख्य अधिकारी झाले. गारवडयाचे इनामदार श्रीमंत बाबूराव जोशी, मोकाशी यांनीं आपली मुलगी सखारामपंतांस दिली. कुटुंबास घेऊन मोठ्या इतमामानें पालखी-घोडा घेऊन ते आपल्या घरीं कोळंब्यास गेले, परंतु या वैभवाचा उपभोग त्यांस फार दिवस घेतां आला नाहीं. ते गांवींच आजारी पडून घाटावर परत आले. कुटुंबाच्या आग्रहावरून ते सासुरवाडीं गारवडयास राहिले. त्यांचा आजार बळावला. सासुरवाडीस असतांनाच कांहीं बायका-बायकांच्या कुरबुरीवरून त्यांच्या मानी पत्नीनें पतीस घेऊन माहेरचें घर सोडलें आणि तेथील पाटलाच्या घरीं तें कुटुंब राहण्यास गेलें. तें घर अजून आगाशांच्याकडे आहे. तेथेंच सखारामपंतांस



कै. ग. ज. आगाशे

पितृ - चरणीं समर्पण

देवाज्ञा झाली आणि त्यांची पत्नी दोघां अज्ञान मुलांस पाटलाच्या स्वाधीन करून सती गेली. त्या वृद्ध विश्वासू पाटलानें मुलांस सांभाळून त्यांस लिहिणें-वाचणें व घोड्यावर बसण्यास शिकविलें.

३. सखारामपंतांचे वडील चिरंजीव विनायकराव पटवर्धनांच्या पदरीं राहून वडिलांप्रमाणेंच पागेवरील मुख्य अधिकारी झाले. त्यांनीं यजमानांचा इतका विश्वास संपादन केला होता कीं, ते निवृत्त होऊन गारवड्यास रहावयास गेल्यावर यजमान स्वत: त्यांच्याकडे सल्लामसलतीसाठीं जात.

४. विनायकरावांचे वडील चिरंजीव कृष्णाजीपंत तासगांवास किरकोळ नोकरीवर राहिले, परंतु त्यांचे द्वितीय चिरंजीव राजारामपंत शरिरानें धिप्पाड व बळकट असून महत्त्वाकांक्षी असल्यामुळें वडिलांच्यानंतर त्यांचेंच पागेचें काम पाहूं लागले. त्यांच्या धाडसाच्या गोष्टी तासगांवास पुष्कळ ऐकूं येत. तासगांवास राजारामपंत आगाशांची म्हणून एक वेस दाखवीत. हे फार प्रामाणिक आणि स्वाभिभक्त होते. औरस संतति नाहीं. म्हणून तासगांव संस्थान खालसा झालें. पागेचे हिशेब तयार नव्हते, ते ब्रिटिश सरकारनें मागितल्यावरून राजारामपंतांनीं हजर केले. परंतु तासगांवकरांकडील आपलें येणें ब्रिटिश सरकारकडून वसूल करण्यास या गृहस्थास कमीपणा वाटला. संस्थान खालसा झाल्यावरहि कृष्णाजीपंत व राजारामपंत तासगांवींच राहिले.

विनायकरावांना आणखी तिघे मुलगे होते. त्यांपैकीं वामनराव गारवड्यासच शेती करीत. त्यांच्याहून लहान दोघे गोविंदराव (आबा) आणि जनार्दनपंत (भाऊ) गारवडें सोडून नोकरीसाठीं पुण्यास आले. गोविंदराव–सिंहगडाच्या पायथ्याशीं असलेल्या डोणजेगांवीं जमाबंदी कारकून होते. तें काम संपल्यावर ते स्टँपव्हेण्डर म्हणून पुण्यास राहिले. त्यांच्या पश्चात् त्यांचे चिरंजीव विष्णुपंत तेंच काम करीत असत.

जनार्दनपंत (भाऊ) विनायकरावांचे सर्वांत धाकटे चिरंजीव होत. त्यांनीं सन १८४२ सालीं गारवडें सोडलें. त्यांस पहिली हंगामी नोकरी सन १८४३ सालीं लागली. दोन वर्षांनीं ते मोजणीदार झाले. महाराष्ट्रांतील मोजणीचें काम संपल्यावर त्यांची बदली कर्नाटकांत झाली. मुलानें इतक्या लांब नोकरीसाठीं जावें, हें विनायकरावांस पसंत नव्हतें. वडिलांच्या संतोषाकरितां जनार्दनपंतांनीं कर्नाटकांतील जागा नाकारली. भाऊंना लहानपणापासूनच

संस्कृतचा नाद होता. अमृतानंदस्वामींचा उपदेश घेऊन ते संस्कृत शिकूं लागले. पुढें विष्णुबुवा खाडिलकरांपाशीं संस्कृतचा अभ्यास त्यांनीं केला. संस्कृत भिक्षुकांनीं शिकावें, गृहस्थाच्या मुलास त्याची काय जरूरी, असें विनायकरावांस वाटे. म्हणून भाऊंचा संस्कृतचा अभ्यास वडिलांच्या नकळत चालू होता. त्यांस पुराणें, काव्यें, नाटकें वाचण्याचा नाद अगदीं अखेरपर्यंत होता. त्या काळांत त्यांस बरीशी नोकरी मिळण्यासारखी असूनहि या नादामुळें त्यांनीं सन १८५२ सालीं श्रीक्षेत्र आळंदी येथील श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या देवस्थानाकडील नोकरी पत्करली. त्यांनीं व माझ्या आजीनें (सौ. लक्ष्मीबाईनीं) श्रीज्ञानेश्वरमहाराजांची अनन्यभावानें पुष्कळ वर्षें सेवा केली.

५. अधिक भाद्रपद अमावास्या शके १७७४ (ता. १३ सप्टेंबर सन १८५२) रोजीं माझे वडील (गणपतराव उर्फ बाबासाहेब) यांचा पुणें येथें जन्म झाला. ती० भाऊंच्या वहींत ती० बाबांची कुंडली सांपडली ती येथें देत आहें.



बाबांना एक मोठी बहीण वालूताई नरवणे, एक वडील बंधु त्र्यंबकराव, एक पाठचे बंधु रा. ब. केशवराव व एक लहान बहीण भीमाबाई केळकर होतीं. वालूताईचे एक नातू जनार्दनपंत, एक सून पार्वतीबाई व एक नात सौ. दुर्गाताई आहेत. त्र्यंबकरावांस दोन मुली चंद्राक्का व यमूताई होत्या. चंद्राक्कांचे चिरंजीव श्री. विष्णु वासुदेव पाटणकर, एल्. सी. ई., पेन्शनर इंजिनियर आहेत. यमूताईस अपत्य नव्हतें. त्र्यंबकरावांच्या निधनानंतर सुमारें चार महिन्यांनीं त्यांची पत्नी प्रसूत होऊन पुत्र झाला. हे श्री. विनायकराव (नानासाहेब) सुपरिंटेंडिंग इंजिनियर झाले होते. आतां त्यांचे चिरंजीव

श्रीधरपंत, बी. ए., त्र्यंबकराव, बी. ई. आणि लक्ष्मणराव, एम्. एस्सी., पीएच्. डी., मुलगी बाळूताई व पत्नी सगुणाबाई आहेत. रा. ब. केशवराव डेप्युटी कलेक्टर झाले होते. त्यांच्या चिरंजीवांपैकीं दामोदरपंत (पेन्शनर, ॲग्रिकल्चरल् डिपार्टमेंट), हरिपंत, एम्. ए., एलएल्. बी., बी. टी. (गोपाळ आंग्लो–व्हर्नाक्युलर हायस्कूलचे सुपरिंटेंडेंट) आणि वासुदेवराव, बी. एस्सी. (' नाना-क्लास् ' चे चालक) आहेत.

६. त्र्यंबकराव स्वतः चांगले संस्कृतज्ञ होते. एका संन्यासी पुरुषाचा कांहीं हाडाचा रोग आजीनें (सौ. लक्ष्मीबाईनीं) आपल्या वैद्यकी ज्ञानानें बरा केला होता. समाधि घेण्यापूर्वी अनृणी व्हावें या इच्छेनें स्वामींनीं त्र्यंबकरावांकडून नैषध म्हणवून घेतलें होतें. ती. बाबा लहानपणीं अशक्त असत. आजी त्यांस श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायरीवर औषधें वाटून देत असे. तो पायरीवरील खळगा आगाशे मंडळींस आळंदीचे वृद्ध लोक कौतुकानें दाखवीत. वयाच्या आठव्या वर्षी (वैशाख शु. ५ शके १७८२) ती. बाबांचा व्रतबंध आळंदीस झाला. भाऊंनींच ती. बाबांच्याकडून रघुवंशाच्या द्वितीय सर्गाचे पहिले पंधरा श्लोक, अमरकोश, शब्दरूपावलि आणि समासचक्र म्हणवून घेतलें होतें.

त्यांचें मराठी शिक्षण आळंदी येथेंच झालें. परलोकवासी रा. ब. नारायणभाई दांडेकर सन १८६३ सालीं आळंदीच्या शाळेच्या तपासणीस गेले असतां त्यांनीं ती. बाबांस लोकल फंड एक्झिबिशन् दरमहा रुपये दोन देऊन त्यांस पुण्याच्या सरकारी हायस्कुलांत पाठविण्याचें ठरविलें, परंतु त्याच सुमारास भाऊंना पटकीचा आजार झाला. ती. बाबांना त्यामुळें वेळेवर पुण्यास जातां आलें नाहीं. पुण्याच्या एक्झिबिशनरांच्या जागा भरून गेल्याकारणानें ती. बाबांस पुढील शिक्षणाकरितां सासवडास जाणें भाग पडलें. त्र्यंबकराव ती. बाबांना पोंचविण्यास बरेच दूर गेले, मायापाशामुळें त्यांस घरीं माघारें येववेना. ते रस्त्याच्या कडेसच अश्रु ढाळीत बसले. कोणी ओळखीच्या गृहस्थानें काय झालें म्हणून विचारल्यावर त्र्यंबकराव सद्गदित होऊन म्हणाले, " मी मोठा असून धाकट्या अशक्त भावास शिकायला दूर पाठविलें, काय माझा उपयोग ? "

ती० बाबा सासवडास रा० पुरंदरे मास्तरांकडे राहत असत. मास्तरांच्या घोड्यास नदीवर पाणी पाजण्यास न्यावयाचें, मास्तरीणबाईच्या हाताखालीं वरकाम करावयाचें, पुरंदरे यांच्या मोठ्या वाड्यांत नैवेद्याचें ताट, धुतलेलें

धोतर व पंचा नेऊन ठेवावयाचा, हीं कामें त्यांस करावीं लागत. घोड्याला नदीवर नेतांना ती० बाबा एकदां घोड्यावरून पडून त्यांच्या उजव्या मनगटास लागलें. लिहितांना एक लहान हाड जन्मभर पुढें येत असे. ही सासवडची खूण कायम राहिली. सासवडासच त्यांनीं मराठींत पहिली कविता केली. त्यांचे तेव्हांचे सहाध्यायी कै० मोरो गंगाधर गोखले यांसच फक्त ही कविता माहीत होती. सन १९०३ सालीं ती० बाबा मुंबईस क्युरेटर असतांना रा. गोखले त्यांस काठेवाडांतून भेटण्यास आले तेव्हां ओळखपत्र (व्हिजिटिंग् कार्ड्) म्हणून त्यांनीं ही कविता एका कागदावर पेन्सिलीनें लिहून दिली होती.

७. सासवडास सुमारें दीड वर्ष काढल्यानंतर रा. ब. दांडेकरांनीं ती० बाबांच्या एक्झिबिशनची रक्कम वाढवून तीन रुपये दरमहा केली आणि ती० बाबा पुण्याच्या हायस्कूलमध्यें दाखल झाले. सन १८६६ सालापासून त्यांस संस्कृतची स्कॉलरशिप मिळूं लागली. हायकुस्लांत अभ्यास करीत असतां ते रा० बाबा गोखले यांच्या शाळेंत संस्कृत शिकवीत असत. हातानें स्वयंपाक करावयाचा आणि दोन्ही शाळा सांभाळावयाच्या. सन १८६९ सालीं त्यांस संस्कृतची दरमहा सात रुपयांची स्कॉलरशिप मिळूं लागली. या वर्षाच्या अखेरीस ते मॅट्रिक्युलेशन् परीक्षेंत पास होऊन त्यांना दरमहा पंचवीसची पहिली जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. ते डेक्कन कॉलेजांत जाऊं लागले. याच सुमारास त्यांचा विवाह आळंदीस झाला. माझे आजे महादाजी लक्ष्मण गाडगीळ तेव्हां जावली तालुक्यांत एका खेडेगांवीं सावकारी करीत असत. सन १८७१ सालीं ती० बाबा फर्स्ट इयर आर्ट्स्ची परीक्षा पास झाले आणि त्यांस दरमहा रुपये वीसची सीनियर स्कॉलरशिप मिळूं लागली. त्याच सालीं त्यांस कँडी मराठी स्कॉलरशिपहि मिळाली. सन १८७३ सालीं पुणें वक्तृत्वोत्तेजक सभेंत ‘ हिंदुस्थानचें दारिद्र्य ’ या विषयावर त्यांचें भाषण होऊन त्यांस रुपये साठचें पहिलें बक्षीस मिळालें.

८. घरच्या परिस्थितीमुळें त्यांनीं बी. ए. होण्यापूर्वींच सन १८७४ सालीं पुणें हायस्कूलमध्यें असिस्टंट मास्तरची दरमहा रुपये सत्तरची जागा पत्करली. वर्षअखेर ते बी. ए. झाले. नोकरीच्या प्रारंभींच डॉक्टर आर्नोल्ड यांचें चरित्र त्यांच्या वाचनांत आल्यामुळें आमरण अध्यापन करण्याचाच त्यांनीं निश्चय केला. पुणें हायस्कुलांतील त्यांच्या शिष्यास प्रथमच १८७६ सालीं जगन्नाथ

शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली. सन १८७६ सालअखेर त्यांची बदली ठाण्यास झाली. त्याच सालीं धर्मशास्त्र हा विषय घेऊन त्यांनीं भगवानदास पुरुषोत्तमदास स्कॉलरशिप (रु. ४०० ची) मिळविली. त्या वेळीं मुंबई विश्वविद्यालयामध्यें असलेल्या संस्कृतच्या दोन्ही स्कॉलरशिप्स् त्यांनीं मिळवून आपलें संस्कृत भाषेंतील प्रावीण्य सिद्ध केलें.

९. सन १८७८ सालीं कै० रा० गोपाळ मोरेश्वर साठे आणि ठाण्यांतील प्रमुख रहिवासी रा० ओवळेकर, रा० ओक आणि रा० इनामदार यांच्या सल्ल्यानें त्यांनीं शेठ बैरामजी जीजीभाई यांच्याकडून रुपये पांच हजार आणि गांवांतील पुढाऱ्यांकडून रुपये साडेतीन हजार गोळा केले आणि हल्लीं हायस्कूल असलेली इमारत विकत घेतली. अशा रीतीनें ठाण्यांत हायस्कूल कायम ठेविलें. या त्यांच्या कामगिरीबद्दल तेव्हांचे एज्युकेशनल् इन्स्पेक्टर नामदार कर्कहॅम् यांनीं त्यांची प्रशंसा केली. ते ठाणें हायस्कूलचे हेडमास्तर यापूर्वींच झाले होते. प्रवेशपरीक्षेंत पहिल्याच वर्षीं त्यांच्या विद्यार्थ्यांनीं बासष्ट टक्के यश मिळविलें.

१०. सन १८८० सालीं त्यांची बदली अहमदनगरला झाली. तेथें कांहीं महिने त्यांनीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणूनहि काम केलें. त्यांच्या त्याहि कामाची वाहवा मे. जेकब एज्युकेशनल इन्स्पेक्टरनीं केली.

११. सन १८८५ सालीं त्यांची बदली पुन्हा पुण्याच्या हायस्कुलांत झाली. त्यांनीं तेथें संस्कृत शिकविण्यास प्रारंभ केला आणि लागोपाठ तीन वर्षें (१८८५, १८८६ व १८८७) त्यांच्या विद्यार्थ्यांनीं जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली. ऑक्टोबर १८८८ मध्यें रा० ब० माधवराव कुंटे निवर्तल्यावर ती० बाबा त्यांच्या जागीं हेडमास्तर झाले.त्याच सुमारास पुणें हायस्कूलवर पहिलें गंडांतर आलें होतें, परंतु त्याचें निवारण झालें. या प्रसंगीं देखील त्यांच्या कामाची वाखाणणी डायरेक्टर मे. चॅटफील्ड् यांनीं केली.

१२. सन १८८९ सालीं त्यांची बदली धुळ्यास हेडमास्तर म्हणून झाली. धुळ्याचें हायस्कूल बंद करण्याविषयीं सरकारचे हुकूमहि सुटले होते. कै. रा. ब. गोविंद रामचंद्र गरुड यांचेपाशीं कांहीं मोठ्या सरकारी अमलदारांचा पत्रव्यवहार होता. तो हातांत ठेवून रा. ब. गरुडांनीं आपलें वजन खर्चीं घातलें आणि स्वतः पदरास घस लावून घेऊन खानदेशांत रुपये बावीस हजार हाय-

स्कूलकरितां उभे केले. या रकमेपैकीं रुपये साडेआठ हजार रावबहादुरांनीं स्वतः दिले होते. ती. बाबांनीं ही सारी कामगिरी डायरेक्टरसाहेबांचे नजरेस आणिली आणि त्यांच्या शिफारशीवरून सरकारनें धुळ्याचें हायस्कूल कायम ठेविलें.

१३. हायस्कूलची इमारत बांधण्यापूर्वीच ती. बाबांना पुन्हा ठाण्यास हेड-मास्तर म्हणून पाठविलें. सन १८९० सालीं ठाण्यास असतांनाच त्यांना मुंबई युनिव्हर्सिटीनें अनेक परीक्षांत संस्कृतचे परीक्षक नेमलें होतें. पुत्रधर्मास अनुसरून त्यांनीं आपल्या मातापितरांची काशी-यात्रा घडविण्यासाठीं ठाण्यास असतांनाच फर्लो रजा घेतली होती.

१४. यात्रेहून परत आल्याबरोबर त्यांस पुन्हा धुळ्यास हेडमास्तर म्हणून नेमलें. हायस्कूलकरितां वर्गणी जमविण्याचें बिकट काम त्यांचे मित्र कै. रा. सा. भाऊसाहेब रणसिंग आणि कै. रा. यादवराव निफाडकर, वकील यांनीं अंगावर घेऊन तडीस नेलें होतें. गरुड हायस्कूलची अदमासें एक लाख रुपये किमतीची इमारत तयार झाली. या इमारतींत ती. बाबा सन १९०१ पर्यंत हेडमास्तर म्हणून काम करीत होते. त्यांच्या धुळें हायस्कुलांतील कामाची प्रिन्सिपॉल डॉक्टर सेल्बी, डायरेक्टरसाहेब आणि खुद्द सरकारकडून फार स्तुति करण्यांत आली. आगाशांचा विद्यार्थी म्हटला म्हणजे तो सर्व तऱ्हेनें चांगला असलाच पाहिजे, असें जणुं ठरूनच गेलें.

१५. धुळ्यास असतांना शिमग्यांतील बीभत्स प्रकारांत आपल्या विद्यार्थ्यांनीं भाग घेऊं नये म्हणून त्या दोन दिवसांत ते निरनिराळे शारीरिक खेळ करवीत आणि खेळांतील प्रावीण्याबद्दल बक्षिसें वांटीत असत. या समारंभासाठीं मुद्दाम पदें रचून ते तीं सुस्वर म्हणवून घेत. पुढील साक्या अशा एका समारंभांत त्यांनीं म्हणवून घेतल्या होत्या.

मंगलधामा हरिच्या नामा गाया क्षम जी दिधली।
तीच अमंगल-शब्दोच्चारीं रसना हर हर! रमली।
दुरुक्ति-अघ तोडा। वाणीचें तप जोडा ॥ १ ॥
ब्रह्म-निरूपण पवित्र-पुस्तक-काव्य-सुभाषित-पठना।
विशुद्ध या कर्मा आचरुनी धन्य करा ही रसना।
अमूल्य ही वाणी। वचनामृत-निर्झरिणी ॥ २ ॥

वाणीचें ह्या पूर्वऋषींनीं अमोघ तप आचरिलें।
त्यांचेच तुम्ही वंशज असतां ब्रीद तयांचें त्यजिलें।
आर्य तुम्ही असतां। अनार्यसें कां करितां ? ॥ ३ ॥

१६. सन १९०१ च्या मे महिन्यांत त्यांस पुणें हायस्कूलचे हेडमास्तर नेमलें. तेथून धुळ्यास परत जाऊन ते सन १९०२ मध्यें मुंबईच्या गव्हर्नमेंट सेंट्रल बुक-डेपोचे क्युरेटर म्हणून गेले.

१७. सन १९०४ सालीं त्यांस धारवाडास दक्षिण भागाचे एज्युकॅशनल इन्स्पेक्टर म्हणून आठ महिन्यांकरितां नेमलें. त्यांच्या तेथील कामाचीहि शाळा खात्याच्या वार्षिक अहवालांत फार प्रशंसा केली आहे. तेथें असतां त्यांची प्रकृति बरी नसतांहि त्यांनीं अविश्रांत काम केलें, परंतु त्याचा परिणाम त्यांस जाणवला. त्यांस चौदा महिने रजेवर रहावें लागलें.

१८. सन १९०६ मध्यें ते मुंबईस परत गेले. १९०७ सालीं सरकारनें बुकडेपो बंद केला. ती० बाबांचे वयास पंचावन वर्षेंहि पुरीं झालीं. त्यामुळें ते सरकारी नोकरींतून निवृत्त झाले. परंतु १९०८ सालाचे आरंभीं त्यांनीं डॉ० सेल्बींच्या आग्रहास्तव डेक्कन कॉलेजमध्यें इंग्रजी भाषेचे प्रोफेसर म्हणून काम केलें.

१९. मुंबई युनिव्हर्सिटीनें एम्. ए. च्या परीक्षेसाठीं मराठी वाङ्मय विषय ठेवल्यावर प्रथमच कै. रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांचेबरोबर कांहीं वर्षें आणि कै. हरि नारायण आपटे यांचेबरोबर कांहीं वर्षें ते एम्. ए. च्या परीक्षेंत मराठीचे परीक्षक असत. त्यांस युनिव्हर्सिटीचे फेलोहि नेमलें होतें; परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनीं त्या जागेचा राजीनामा दिला.

२०. सन १९०९ सालीं ती० बाबांस स्टूडंट्स् ॲड्व्हायझरी कमिटीच्या सेक्रेटरीची जागा देऊं केली होती, परंतु मुंबईस रहाण्याची सोयीची जागा नव्हती आणि जागेचा पगार फार थोडा होता म्हणून त्यांनीं ती जागा नाकारली.

२१. सन १९०८ सालापासून आम्ही सर्व जण आमच्या पुण्याच्या सदाशिव पेठेंतील घरीं कायम रहावयास आलों, तेव्हांपासून ती० बाबा डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीच्या मॅनेजिंग कौन्सिलचे आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद म्हणून काम करीत.

२२. त्यांचे एकंदर लेख पुष्कळच आहेत व ते निरनिराळ्या विषयांवर आणि मराठी, संस्कृत व इंग्रजी भाषांतून आहेत. त्यांतील कांहीं लेखांचा समावेश या पुस्तकांत केला आहे. कांहीं लेखांची यादी पुढीलप्रमाणें आहे : (१) सुंदरेची संक्रांत १८८७, (२) सद्गुणमंजरी १८८८, (३) बालशिक्षण १८८९, (४) भोजन वसतिगृहाबद्दल पुण्याच्या हायस्कूलचे हेडमास्तर म्हणून रिपोर्ट १८८९, (५) अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें १८९०, (६) स्कूल् फायनल् परीक्षेबद्दल एक निबंध १८९३, (७) व (८) अर्थशास्त्र-वाचनपाठमाला आणि क्रिटो व फीडो, (९) भिल्ल लोकांच्या रीतिरिवाजांवर रिपोर्ट १९०१, (१०) " हिंदुस्थानांतील प्राचीन आणि माध्यमिक शिक्षण " १९०२. यांखेरीज कित्येक प्रासंगिक कविता, राणा प्रतापसिंहांवर एक खंडकाव्य वगैरे लेखांचें एक मोठें दप्तर आहे. विविधज्ञानविस्तार आणि मनोरंजन मासिकांतून ते पुस्तकपरीक्षणें व कविता पाठवीत. विविधज्ञानविस्तारांत (१) पुष्पकरंडक पु० २०, (२) मराठी भाषेची सांप्रतची स्थिति व तिच्या उत्कर्षाचा इतिहास, पुस्तक २९, (३) नाट्यमाला खंड ३–पुस्तकपरीक्षा, पुस्तक ४३, (४) उत्तरनैषधचरित नाटक–पुस्तकपरीक्षा, पुस्तक ४४, (५) आर्यांच्या सणांचा इतिहास, पु० ५७, (६) गीतांजलि, पु० ४९, (७) " आई ", पु० ३४, पृ० १३, (८) मलबारहिल जलाशयावरून मुंबईचा देखावा, पु० ३४, पृ० २५८, (९) पुरुषोत्तमराव तेलंग, पु० २८, पृ० २५०, (१०) मंगेश जिवाजी तेलंग यांचे स्मृतीस, पु० ४०, पृ० ११, (११) एडवर्ड बादशहा In memoriam, पु० ४१, पृ० ११५, (१२) राष्ट्रगीत, पु० ४२, पृ० ५११, (१३) साहित्यसंमेलनास संदेश, पु० ४४, पृ० २४, (१४) मंगलपंचक, पु० ४४, पृ० ५८, (१५) बालाभिलषित, पु० ४४, पृ० ७८, (१६) कविवर्य रवींद्रनाथ, पु० ४५, पृ० ७०, (१७) चिंगीची आठवण, पु० ४५, पृ० ७०, (१८) एक कोडें–काव्य-मंजूषा, पु० ४५, पृ० ५, (१९) पर्वती, पु० ४५, पृ० ५, (२०) जाति-मत्सर, पु० ४५, पृ० ९, (२१) मूर्तिपूजा मंडळ, पु० ४५, पृ० ९, (२२) पुण्यांतील प्लेग, पु० ४५, पृ० १५, (२३) करुण-गीत, पु० ४६, पृ० २६८, (२४) यंदाचा हिंवाळा, पु० ४६, पृ० १२९, (२५) गोपाळ कृष्ण गोखले, पु० ४६, पृ९ २५१, २५५, (२६) का. र. कीर्तिकर,

पु० ४८, पृ० ७९, हे लेख प्रसिद्ध झालेले आहेत. मनोरंजनांत (१) सावित्री-आख्यान, पु० १७, उ० पृ० ४३२, (२) साहित्य-संमेलन, पु० १८, उ० पृ० १२३, आणि (३) स्नेहलतेची स्मृति, पु० २२, पू० पृ० १२६ हे लेख आले आहेत.

२३. सन १९१७ सालीं इंदूर येथील झालेल्या साहित्य-संमेलनाचे ती० बाबा अध्यक्ष होते. इंदूर येथील मुक्कामांत श्री. होळकर सरकारांनीं त्यांस मुद्दाम बोलावून त्यांची भेट घेतली. परत येतांना ते बडोद्यास गेले होते. तेथें श्री. सयाजीरावमहाराजांनीं त्यांस जेवावयास बोलाविलें होतें.

२४. ती० बाबांचा चेहरा उग्र दिसे. परंतु त्यांच्या कितीतरी शिष्यांनीं त्यांच्या प्रेमळपणाबद्दल आणि शिष्यांचें कल्याण व्हावें म्हणून त्यांस वाटणाऱ्या तळमळीबद्दल आठवणी मजपाशीं सांगितल्या आहेत. त्यांस शिस्त आवडे. परंतु शिस्तीचा अतिरेक त्यांनीं कधीं होऊं दिला नाहीं.

२५. विद्यार्थीदशेंत प्रो० केरूनाना छत्रे, डॉ० कीलहॉर्न आणि जस्टिस बॅटी यांचें प्रेम त्यांनीं संपादन केलें होतें. पुढील आयुष्यांत न्या० रानडे, न्या० तेलंग, सर गंगाधरराव पटवर्धन, राजेसाहेब, मिरज, श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि (यांस त्यांच्या कीर्तनासाठीं ती० बाबांनीं कांहीं आख्यानें रचून दिलीं), श्री. नारायणराव बाबासाहेब इचलकरंजीकर (यांस त्यांचे पुस्तकाचे आरंभींच्या कविता लिहून दिल्या), ले.क. कीर्तिकर, दि.ब. समर्थ, सर बाळासाहेब चौबळ, सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, श्री. बाळासाहेब पानसे, रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी, विनायक कोंडदेव ओक, शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी, शेठ चतुर्भुज मुरारजी (यांचे सांगण्यावरून त्यांनीं कितीतरी संस्कृत स्तोत्रें रचून दिलीं) यांच्याशीं त्यांचे स्नेहसंबंध होते. युरोपियन मंडळीमध्यें मेसर्स कमिन्, कॅकहॅम, पॉगसन्, लक्, आर्थर रेब्स् व सर जेम्स डय़ुबोले हे त्यांचे स्नेही होते. वे. शा. सं. कृष्णशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी हेहि ती० बाबांचे स्नेही होते. त्या दोघांचा संस्कृत पद्यरूप पत्रव्यवहार एका स्वतंत्र फायलींत ठेवलेला असे.

२६. ती. बाबांची प्रकृति धुळ्यास असेतोंपर्यंत चांगली होती. ते पहांटे पांच ते सात मैल फिरून येत. परंतु तेथील उष्ण हवेचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला. सन १९०३ सालीं ते आपल्या स्नेह्यांकडे गेले असतांना त्यांच्या स्नेह्यानें त्यांस आपल्या शेतांतील नव्या तांदुळाचा भात मोठ्या प्रेमानें त्यांस

वाढला. तो भात खाल्ल्याचें निमित्त होऊन त्यांस पोटदुखी सुरू झाली ती अखेरपर्यंत होती.

२७. त्यांचा परिवार म्हणजे आम्ही तिघे मुलगे, दत्तात्रय, राजाराम आणि वामन व पांच मुली गंगूताई, द्वारकाताई, अंबूताई, सुंदराताई आणि कृष्णाताई. गंगूताईस १९०२ सालीं वैधव्य आलें. तिच्या मुलास व मुलीस आजोळींच राहण्याचा प्रसंग आला. मुलगा पुढें बी. ए., एल्एल्. बी. होऊन वाईस वकिली करूं लागला. मुलगीहि सुस्थळीं पडली. द्वारकाताई १९१८ सालीं निधन पावली. तिचे पति १९२४ सालीं निवर्तले. तिचा मुलगा रा. विष्णु रघुनाथ दीक्षित टाइम्स् वगैरे पत्रांचा एजंट म्हणून चांगला धदा करीत आहे. अंबूताई साताऱ्यास इनामदार घराण्यांत दिली होती. परंतु तिला विशेष सुख लागलें नाहीं. तिचे मुलगेहि विशेष शिकले नाहींत आणि त्यांस विशेष धंदाहि करतां आला नाहीं. सुंदराताई म्हणजे सौ. लेडी रमाबाई साठे ही दोन वर्षांपूर्वी निधन पावली. तिचा मुलगा ब्रिगेडियर सखाराम जगन्नाथ साठे. तिच्या मुली दुर्गाताई व इंदूताई सुखानें संसार करीत आहेत. कृष्णाताई (सौ. त्रिवेणी पंडित) सांगलीस आहे. तिचा मुलगा रामचंद्र भिकाजी पंडित बी. ए. संगीतज्ञ आहे. ती० बाबांचे दोघे धाकटे जांवईच सर जगन्नाथ साठे, सी. आय्. ई., आय्. सी. एस्. व प्रोफेसर भिकाजी रामचंद्र पंडित, एम्. एस्सी. जीवनांत यशस्वी झाले. मधला मुलगा राजाराम याचा शालेय व विद्यालयीन शिक्षणक्रम अत्यंत उज्ज्वल होता. त्यावरच वडिलांच्या आशा विसांवल्या होत्या; परंतु १९१५ सालीं तो सीनियर बी. ए. च्या क्लासांत असतांना रोगाचें निदान देखील न होतां त्यास निर्घृण काळानें ओढून नेलें. त्या दुःखानें होरपळलेल्या हृदयांतूनच " बाष्पांजली " स्रवली. मी वडिलांच्या देखत सब्-जज् झालों होतों. धाकटे डॉ. वामनराव ग्रॅन्ट मेडिकल कॉलेजमध्यें शिकत होते.

२८. सन १९१८ च्या डिसेंबर महिन्यापासून ती. बाबा मधून मधून आजारी पडूं लागले. जून १९१९ त त्यांस प्रथम मलेरिया झाला व त्यांतच ॲनीमिया उत्पन्न झाला. मी इस्लामपुराहून आठवड्याची रजा घेऊन आलों होतों. ती. बाबा थकत चालले होते. मीं रजा वाढवली. वामनरावांसहि मुंबईहून बोलावलें होतें. प्रकृति बरी आहे म्हणून वामनराव दुपारीं परत गेले.

वे. शा. सं. गणेशशास्त्री गोडबोले (कै. रामशास्त्री गोडबोले यांचे चिरंजीव) आले होते व ते सुमारें एक तास बोलत बसले होते. ते उठून गेले आणि ती. बाबांचें पोट दुखूं लागलें. मी कटनोज् पॉवडर तयार करून पेला पुढें केला, परंतु हालचाल दिसेना म्हणून मीं हांक मारली. परंतु ओ देण्यास ती. बाबा कोठें होते ! शके १८४१ ची आषाढ शु० १५ (ता. १३ जुलै १९१९) अशी दुर्भाग्याची ठरली.

२९. ती० बाबांचे निवडक लेख प्रसिद्ध करण्याचा माझ्या बंधूंचा (डॉ. वामनरांवाचा) फार आग्रह. त्यांनीं आपले मित्र डॉ. वा. दा. गोखले, एम्. ए., पीएच्. डी., एस्. एन्. डी. टी. कॉलेज, पुणें, येथील संस्कृतचे प्राध्यापक आणि प्रा. गं. बा. सरदार, एम्. ए., त्याच कॉलेजमधील मराठीचे प्राध्यापक, यांजकडून लेखांची निवड करून घेतली. या प्राध्यापक-द्वयांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून त्यांचेवर लादलेलें काम उरकलें. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. यानंतरचें काम करावयाचें तें बंधूंनीं मजकडे सोंपविलें. रा. ब. महादेव काशीनाथ कारखानीस, बी. ए. यांस माझ्या वडिलांचेबद्दल फार आदर वाटतो. ते स्वतः एक रसिक कवि आणि साहित्यिक आहेत. त्यांचा आणि वडिलांचा प्रत्यक्ष परिचय होता. म्हणून प्रस्तावना लिहिण्याविषयीं मीं त्यांस आग्रहाची विनंति केली. त्यांनीं समग्र पुस्तक वाचून आपलें काम तेव्हांच केलें. त्यांचे आभार मानल्यास तो केवळ लौकिक उपचार झाला असें ते मानणार नाहींत अशी आशा आहे. ‘ साधना ’ छापखान्याचे व्यवस्थापक श्री. चिं. ग. वझे यांनीं छपाईचें काम उत्तम करून दिलें आणि कांहीं कालपर्यंत निरुपायानें विलंब लागला तरीहि घाई केली नाहीं, याबद्दल त्यांचाहि मी उतराई आहें.

८९७ आमराई, पुणें ४.
ता. २३ फेब्रुवारी १९५८.

दत्तात्रय गणेश आगाशे

टीप : हें लहानसें चरित्र (१) ती० बाबांच्या हातचें एक त्रोटक टिपण, (२) कै. विनायक कोंडदेव ओक यांनीं बालबोध मासिकांत (पुस्तक ३३ अंक १) लिहिलेलें चरित्र आणि कै. रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं (३) विविध-ज्ञान-विस्तार मासिकांत (पुस्तक ५० अंक ९) लिहिलेला मृत्युलेख यांवरून मुख्यत: लिहिलें आहे.

अनुक्रमणिका

मराठी विभाग :

संस्कृत विभाग :

इंग्रजी विभाग :

मराठी विभाग

अभिज्ञान-शाकुंतल नाटक

सन १८७९ सालीं या नाटकाचे कांहीं अंक मीं विद्यार्थ्यांस शिकविले होते. त्यावर या व्याख्यानासाठीं त्या नाटकाचें पारायण करण्याची पाळी आली; पण चमत्कार हा आहे कीं, मीं कॉलेजांत असतांना विद्यार्थिदशेंत त्याचा अभ्यास केला तेव्हां, व पुढें गुरूच्या नात्यानें मीं तें माझ्या शिष्यांस शिकविलें तेव्हां, या उभय अवस्थांमध्यें त्या नाटकाच्या सौंदर्याचा मला निरनिराळा अनुभव आला. कौमार्यांत ज्या गोष्टी मला समजत नव्हत्या, त्या तारुण्यांत समजूं लागल्या व ज्या गोष्टींचें त्या वेळीं कांहीं महत्त्व वाटत नव्हतें त्या आतां वृद्धापकाळीं पटूं लागल्या. संस्कृत सुभाषितांत एक स्फुट श्लोक आहे, त्यांत या वैचित्र्याचें फार मार्मिक वर्णन आहे. कवि म्हणतो :—

आचार्यात्पादमादत्ते पादं शिष्यः स्वमेधया।
पादं सब्रह्मचारिभ्यः पादः कालेन पच्यते॥

म्हणजे पाठशाळेंत गुरुमुखांतून शिष्य एक चतुर्थांशाचें ग्रहण करतो; एक चतुर्थांश तो आपल्या स्वतःच्या बुद्धीनें त्यांत मिळवितो; आणखी एक चतुर्थांश तो आपल्या सहाध्यायी बांधवांशीं चर्चा करून प्राप्त करून घेतो; व राहिलेला चतुर्थांश कालगतीनें अनुभवानें प्राप्त होतो. सारांश, कन्याविरहासारख्या दुःखाची जाणीव स्वतःची कन्या पतिगृहीं जाऊं लागतांच होते, ती विद्यार्थिदशेंत स्वानुभवानें कळणें अशक्य आहे. म्हणून अशा प्रकारचे कवीचे उद्गार त्या वयांतच हृदयंगम होतात. यामुळें शाकुंतलाचें सौरस्य आज जसें माझ्या मनांत बिंबतें, तसें तें यापूर्वीं बिंबत नव्हतें. पण यांतहि कांहीं नवल नाहीं. कारण “ **प्रतिक्षणं यन्नवतामुपैति, तदेव रूपं रमणीयतायाः** ” असें रमणीयाचें लक्षण एका प्राचीन कवीनें केलें आहे.

असो. आज शाकुंतल नाटक हा माझ्या भाषणाचा विषय आहे. ‘ **काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शाकुंतला** ”–म्हणजे ‘ काव्यांत नाटक सर्वांत रमणीय, व त्यांतहि शाकुंतल सर्वांत रमणीय आहे ’–अशी प्रशंसा या नाटकाची पूर्वींपासून चालत आलेलीच आहे. पण त्यांतले त्यांत विशेष

ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, शेक्सपिअर कवीचा प्रतिस्पर्धी जो शार्मण्य कवि गीटे (Goethe) त्यानें या नाटकाचा केवळ अनुवादच वाचून जी त्याची प्रशंसा केली ती अत्यंत मनोवेधक आहे. गीटे म्हणतो :—

Wd'st thou the young year's blossoms
And the fruits of its decline,
And all by which the soul is
Charmed, enraptured, feasted, fed ?
Wd'st thou the Earth and Heaven itself
In one sole name combine ?
I name thee, O 'Sakuntala',
And all at once is said.

याचा मराठींत अनुवाद असा करतां येईल :--

चित्तीं वांछिसि तूं वसंतकुसुमें शीतर्तुचीं वा फळें
आत्मा मोहित, हृष्ट तुष्टहि तसा हो पुष्ट ज्याच्या बळें
पृथ्वी स्वर्गहि इच्छिशी उभय ते एक्या पदीं बोधिले
घे तूं नाम 'शकुन्तला' मग तुला तें सर्वही लाधलें.

अशी स्तुतिपरमावधि ज्या नाटकाची झाली आहे, त्याच्या सरसतेचें थोडेंसें दिङ्दर्शन करण्याचें आज मीं योजिलें आहे. ही सरसता मी आपल्यापुढें शब्दरूपी चित्रपट मांडून करणार आहें. पण हे चित्रपट आपल्या अंतःश्चक्षूं-पुढें उलगडण्यापूर्वीं आपण सांप्रतची परिस्थिति व सांप्रतचें हिंदुस्थान पार विसरून जाऊन तीन हजार वर्षांपूर्वींच्या आर्यावर्तांत संक्रमण केलें पाहिजे, व त्या काळच्या आर्यांच्या समाजाची स्थिति मनांत आणिली पाहिजे. आज मी जे चित्रपट शब्दांनीं रंगविणार आहें त्यांचा आधीं अनुक्रम सांगतों. दोन अंक खेरीज करून बाकीच्या सर्व अंकांतील संविधानक तपोवनांत घडलेलें आहे. म्हणून अगोदर तपोवनाचा चित्रपट दाखवून अनुक्रमानें शकुंतलेच्या सख्या, शकुंतला, दुष्यंत आणि ऋषि, यांच्या भूमिका कवीनें कशा सजविल्या आहेत तें सांगून, अनुषंगानें त्या काळच्या समाजस्थितीचेंहि यथाप्रसंग दिग्दर्शन करतों.

सांप्रतकाळीं 'राखून ठेविलेलीं जंगलें' (Reserved Forests) असे शब्द आपण ऐकतों. हीं जंगलें इमारती लांकडांचे वाढीकरितां राखलेलीं असतात. पण दुष्यंताचे काळीं ऋषिजनांना तपश्चर्या करण्याकरितां निवांत स्थळें असावींत म्हणून तशीं कांहीं वनें राखून ठेवलेलीं असत, असें दिसतें. ह्या तपोवनांचीं विशिष्ट लक्षणें कवीनें स्थळप्रसंगीं सांगितलेलीं आहेत. प्रथम अंकांतच राजा मृगयेच्या नादानें तपोवनांत प्रवेश करतो, तेव्हां त्याला काय दृष्टीस पडतें ?

नीवाराः शुकगर्भकोटरमुखभ्रष्टास्तरूणामधः
प्रस्निग्धाः क्वचिदिङ्गुदीफलभिदः सूच्यन्त एवोपलाः ।
विश्वासोपगमादभिन्नगतयः शब्दं सहन्ते मृगाः
तोयाधारपथाश्च वल्कलशिखानिष्यन्दरेखाङ्किताः ॥

म्हणजे, १ झाडांखालीं पडलेले नीवारांचे कण, २ हिंगणबेटें फोडल्यानें तेलकट झालेले दगड, ३ मनुष्याचे शब्दास न भिणारीं श्वापदें, व ४ पाण्याचे झऱ्यापासून फुटणाऱ्या वाटेवर वल्कलाचे शेवटांतून गळत गेलेल्या पाण्याच्या धारा, या लक्षणांवरून राजास तपोवनाची ओळख पटते. पण तपोवनाच्या या चित्रपटाचें पूरण राजाच्याच मुखानें सहाव्या अंकांत झालेलें आहे. शकुंतलेचा विनाकारण प्रत्यादेश केला अशी खात्री वाटून अनुतप्त हृदयाचें कसें तरी सांत्वन करण्याकरितां शकुंतलेचें चित्र पुढें घेऊन त्या चित्राची पूर्ति करण्याचा तो विचार करतो आहे, तेव्हां तो म्हणतो :--

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः ।
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम् ॥

या श्लोकांत कण्वऋषीच्या तपोवनाचीं विशिष्ट लक्षणें सांगितलीं आहेत. यांत, १ जिच्या वाळवंटावर हंसमिथुनें बसलीं आहेत अशी मालिनी नदी, २ तिच्या आसपास हिमालयाचा पायथा व त्यावर हरिणांचे थवे, ३ झाडांच्या फांद्यांवर वाळत टाकलेल्या वल्कलांचे सावलींत बसलेल्या काळविटाचे शिंगावर आपलें अंग खाजविणारी हरिणी, हीं पहिल्या चित्रांत काढावयाचीं राहिलीं, तीं आतां काढून चित्र पुरें करतों, असें राजा म्हणतो.

आतां या तपोवनांत तपश्चर्या करणाऱ्या ऋषिजनांना कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग लागूं नये, याबद्दल त्या काळीं राजे लोक फार खबरदारी घेत असत, असें दिसतें. कारण स्वतः दुष्यन्ताचेच मुखांतून अशा प्रकारचे उद्गार जागोजागीं निघाले आहेत. '**तपोवनवासिनामुपरोधो माभूत्**' असें म्हणून तपोवनाचे बाहेरच रथ उभा करण्यास राजा सारथ्यास आज्ञा करितो. तसेंच ऋष्याश्रमाची मर्यादा राखण्याकरितां, विनीत वेषानें प्रवेश करावयाचा म्हणून धनुष्य आणि अंगावरचे अलंकारहि काढून ठेवतो. पुढें राजाचा शोध करीत जेव्हां पौरजन येतात तेव्हां राजा म्हणतो–'**अहो धिक् पौरा अस्मदन्वेषिणस्तपोवनमुपरुन्धन्ति**' असें म्हणून तो परत जावयास निघतो; व '**आश्रमपीडा यथा न भवति तथा यतिष्यामहे**' असें म्हणून जावयास उठतो. पण आश्रमांत राहणाऱ्यांस स्वतःपासून पीडा होऊं नये एवढीच खबरदारी घेऊन राजाचें कार्य झालें असें तो मानीत नाहीं. कारण पुढें पांचव्या अंकांत शकुंतलेला बरोबर घेऊन जेव्हां कण्व-ऋषिचे शिष्य येतात, तेव्हां राजा स्वतःच्या मनास प्रश्न करितो :—

किं तावद् व्रतिनामुपोढतपसां विघ्नैस्तपो दूषितं
धर्मारण्यचरेषु केनचिदुत प्राणिष्वसच्चेष्टितम्
आहोस्वित्प्रसवो ममापचरितैर्विष्टम्भितो वीरुधा-
मित्यारूढबहुप्रतर्कमपरिच्छेदाकुलं मे मनः ॥

कण्वशिष्य जेव्हां दरबारांत आले तेव्हां तपश्चर्येचा कोणीं भंग केला, किंवा धर्मारण्यांत राहणाऱ्या प्राण्यांना कोणीं उपसर्ग लाविला, किंवा राजाच्या दुराचरणामुळें लतादिकांची वाढ खुंटली कीं काय झालें तरी काय, असे नानाप्रकारचे संशय राजाचे मनांत येऊन तो गोंधळून जातो. तपोवनांत राहणाऱ्या ऋषिजनांस पीडा होऊं नये एवढेंच नाहीं पण तेथील तरुलतादि-कांस उपद्रव झाला असतां त्याबद्दलची जबाबदारी राजाचे माथ्यावर आहे अशी जाणीव त्याच्या मनांत वास करते. राजाच्या कर्तव्याविषयींची ही कल्पना किती उदात्त आहे, हें सांगणें नलगे.

तपोवनांतील आश्रम शांतीचें केवळ माहेरघरच असत, असेंहि उद्गार जागोजागीं आहेत. पहिल्याच अंकांत शुभाची सूचना करणारा बाहु स्फुरण

पावूं लागतांच राजा म्हणतो, '**शान्तमिदमाश्रमपदम्।**' पुढें सातव्या अंकांत '**स्वर्गादधिकतरं निर्वृतिस्थानम्**' अशा शब्दांनीं मरीचि ऋषीच्या आश्रमाचा तो निर्देश करतो. आतां तपोवनाचें रक्षण आणि त्यांत राहणाऱ्या ऋषीजनांचे सुस्थितीसंबंधानें राजास इतकी कळकळ कां वाटत होती, असा प्रश्न सहज उद्भवेल. त्यासहि कवीनें उत्तर देऊन ठेवलेंच आहे.

भवनेषु रसाधिकेषु पूर्वं, क्षितिरक्षार्थमुशन्ति ये निवासम्।
नियतैकयतिव्रतानि पश्चात्तरुमूलानि गृहीभवन्ति तेषाम्॥

पूर्ववयांत पृथ्वीचे पालनाकरितां सर्व सुखसाधनांनीं भरलेल्या अशा प्रासादांत राहण्याची जे इच्छा करितात, तेच त्याच्या परिणतावस्थेंत यतिव्रताची दीक्षा घेण्याचे नियमानें झाडाच्या बुडाशींच पर्णकुटिका करून राहतात! अर्थात् गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम झाल्यानंतर चतुर्थाश्रमाचा स्वीकार जरी करीत नसले, तरी संन्यस्त वृत्तीनें राहून परलोकप्रयाणाची सज्जता त्या काळचे राजे लोक करीत असत. सांप्रतकाळची सामान्य जनतेची सुद्धां आमरण विषयलोलुपता पाहिली असतां राजांच्या या निवृत्तिरूप ध्येयाचें अत्यंत कौतुक वाटतें.

असो. हा तपोवनाचा चित्रपट शकुंतलेच्या व तिच्या मैत्रिणींच्या पृष्ठभागीं ठेवून अनुक्रमें त्यांचें विश्रंभचेष्टित व त्यांची सहजसरलता याचें थोडेंसें अवलोकन करूं.

पहिल्या अंकांतच लता-वृक्षांस पाणी घालीत असतां शकुंतला केसर वृक्षास पाणी घालण्यास गेली असतां प्रियंवदा तेथेंच–म्हणजे त्या वृक्षाजवळ–उभी रहा म्हणून तिला सांगते; व म्हणते, "**त्वयोपगतया लतासनाथ इव केसरवृक्षः प्रतिभाति**" म्हणजे तूं जवळ असतां या केसर वृक्षाजवळ लताच उभी आहे असें दिसतें. यावर "म्हणूनच प्रियंवदा अथवा गोडबोली असें तुला म्हणतात" म्हणून शकुंतला तीस उत्तर देते. पुढें क्रमाक्रमानें त्या वनज्योत्स्ना नांवाच्या नवमालिकेजवळ शकुंतला येऊन पोंचली. तेव्हां प्रियंवदा अनसूयेस म्हणते: "**जानासि किं शकुंतला वनज्योत्स्नामतिमात्रं पश्यति–**" म्हणजे शकुंतला वनज्योत्स्नेकडे इतकी न्याहाळून कां

पहाते हें तुझे ध्यानांत आलें का? यावर अनसूयेनें नकारार्थी उत्तर दिल्यावर प्रियंवदा तिला समजून सांगते,

"यथा वनज्योत्स्नानुरूपेण पादपेन संगता, अपि नामैवमहमप्यात्मनोऽनुरूपं वरं लभेयेति।"

म्हणजे वनज्योत्स्नेस जसा योग्य वृक्ष आश्रयास मिळाला, तसा मलाहि योग्य वर मिळेल काय?–असा शकुंतलेचा मनोरथ आहे. यावर हा तुझा स्वतःचाच मनोरथ असें शकुंतला उत्तर देतें. पुढें शकुंतलेच्या मुखाभोंवतीं भ्रमर जेव्हां घिरट्या घालूं लागला आणि त्याला घालवून देण्याकरितां शकुन्तला सख्यांस जेव्हां हांक मारूं लागली तेव्हां त्या दोघीहि, "**दुष्यन्तमाक्रन्द, राजरक्षितानि तपोवनानि नाम**" म्हणजे "दुष्यन्तास हाक मार, कारण तपोवनाचें रक्षण राजा करीत असतो" असें त्या म्हणतात. पुढें आश्रमांत राजानें प्रवेश केल्यानंतर व कुशल प्रश्नादि झाल्यानंतर दोघी सख्या म्हणतात: "**हला शकुन्तले यद्यत्राद्य तातः सन्निहितो भवेत्**" म्हणजे आज बाबा जर तेथें असते तर–" पुढें त्या कांहीं बोलणार तों शकुंतला विचारते: "**ततः किं भवेत्**" म्हणजे हजर असते तर काय झालें असतें? त्यावर त्या उत्तर करतात: "**इमं जीवितसर्वस्वेनापि अतिथिविशेषं कृतार्थं करिष्यति**" म्हणजे "आज बाबा हजर असते तर अशा थोर पाहुण्यांना आपल्या जिवाची अत्यंत प्रियवस्तु देऊन त्यांनीं कृतार्थ केलें असतें." अर्थात् शकुन्तलेला ह्या विनोदाचें मर्म समजलें व "तुम्ही आपल्या मनचेंच बोलतां–मी तुमचें बोलणें ऐकणारच नाहीं–" असें शकुंतला म्हणते. पुढें शकुन्तलेच्या जन्माचें वृत्त अनसूयेनें सांगितल्यावर, व राजानें शकुंतला अविवाहितच राहील काय असा प्रश्न केल्यावर, प्रियंवदा म्हणते: "**गुरोः पुनरस्या अनुरूपवरप्रदाने संकल्पः**" म्हणजे "योग्य वर मिळाल्यास इला देऊन टाकण्याचा गुरूंचा विचार आहे" हे तिचे शब्द ऐकतांच शकुंतला रागावून अनसूयेस म्हणते: "मी निघून जातें व ही प्रियंवदा भलभलते बडबडते आहे म्हणून गौतमी आत्याबाईस सांगतें" असें म्हणून ती जावयास निघते, तों–'दोन झाडांस मी तुझेबद्दल पाणी घातलें आहे तें माझें उसनें फेड आणि मग जा'–असें म्हणून तिचा हात धरून ती तिला

आडविते. सारांश, राजाचा व शकुन्तलेचा अधिक परिचय व्हावा व त्यांची भेट व्हावी, हें मैत्रीच्या नात्यानें तिच्या मनांत होतें.

चौथ्या अंकांत कवीनें करुणरसाची परिसीमा केली आहे. त्यांत या मैत्रिणींच्या निष्कपट प्रेमाचीहि परमावधि केली आहे. दुष्यन्तानें वचन दिल्याप्रमाणें कोणीहि माणूस शकुन्तलेस नेण्यास आला नाहीं यामुळें ती चिंतातुर बसलेली आहे असें पाहून प्रियंवदा म्हणते, '**अनसूये, पश्य तावत् वामहस्तोपहितवदनालिखितेव प्रियसखी। भर्तृगतया चिन्तयात्मानमपि नैषा विभावयति।**' म्हणजे डाव्या हातावर आपलें तोंड ठेवून चित्राप्रमाणें तटस्थ आपली प्रियसखी बसली आहे. तिला आपल्या स्वतःचेंसुद्धां भान नाहीं. इतक्यांत दुर्वास ऋषींची स्वारी तेथें येऊन शकुन्तलेस शाप देऊन निघून जाते. आणि प्रियंवदेनें आर्जवानें ऋषीकडून उच्छाप जेव्हां मागून घेतला तेव्हां अनसूया तिला म्हणते: "**द्वयोरेव ननु नौ मुख एष वृत्तान्तस्तिष्ठतु रक्षितव्या खलु प्रकृतिपेलवा प्रियसखी।**" म्हणजे ही गोष्ट तिसऱ्या कोणाला समजूं देऊं नको, कारण आपली जिवलग मैत्रीण स्वभावतःच फार कोमळ आहे व तिला त्रास होतां कामा नये. त्यावर प्रियंवदा जें उत्तर करते तें कवीच्या उपमाचातुर्यास अत्यंत शोभण्यासारखें आहे, प्रियंवदा म्हणते: '**को नामोष्णोदकेन नवमालिकां सिञ्चति**' म्हणजे 'नवमालिका लतेला ऊन्ह पाणी कोण घालील?' या अलंकारांत शकुन्तला नवमालिकेसारखी नाजूक आहे आणि मालिका उष्णोदकानें जशी करपून जाते, तशी शकुन्तला या अप्रिय वार्तेनें सुकून जाईल, असें सुचविलें आहे. पण पुढें प्रियंवदेनें उच्छापाची गोष्ट जेव्हां सांगितली तेव्हां '**शक्यमिदानीमाश्वसितुम्**' म्हणजे "आतां धैर्य धरणें शक्य आहे" असें अनसूया म्हणते. राजानें इतकीं वचनें देऊनहि पुढें कोणीं पाठविलें नाहीं म्हणून अनसूयेस काळजी वाटूं लागून राजाचे संबंधानें तिचें मन कलुष होऊं लागतें व १ "**तेन राज्ञा शकुन्तलायामनार्यमाचरितम्।**' २ '**असत्यसन्धे जने शून्यहृदया सखी पदं कारिता।**' ३ '**एतावत्कालस्य लेखमात्रमपि न विसृजति।**' ४ '**इत्थंगते अस्माभिः किं करणीयम्।**' म्हणजे (१) त्या राजानें शकुन्तलेशीं नीच प्रकारची वागणूक केली; (२) साधी भोळी आमची सखी त्या असत्य भाषण करणाऱ्या पुरुषावर विश्वसून बसली; (३)

इतका काळ लोटला तरी नुसतें पत्र सुद्धां पाठवीत नाहीं; (४) अशा स्थितींत आम्हीं काय करावें? पुढें प्रियंवदा एक दिवस शकुंतलेला झोंप चांगली लागली किंवा नाहीं हें विचारण्याकरितां (सुखशयनपृच्छिका) गेली असतां शकुंतलेला पतिगृहीं पाठविण्याचा कण्वऋषींचा बेत झालेला तिला समजला. तेव्हां अनसूया म्हणते : '**उत्कण्ठासाधारणं परितोषमनुभवामि।**' "या वार्तेनें मला संतोष वाटतो, पण चिंताहि वाटते." त्यावर प्रियंवदा म्हणते, '**सखि आवां तावदुत्कण्ठां विनोदयिष्यावः। सा तपस्विनी निर्वृता भवतु**'–"गडे, आपण कशी तरी चिंता घालविण्याचा उपाय करूं पण ती बिचारी शकुंतला सुखांत राहो." पुढें निघण्याचे अगोदर त्या मैत्रिणी तिच्या अंगावर अलंकार घालण्यास आरंभ करतात तेव्हां तर "हें माझ्या मैत्रिणींच्या हातचें शेवटचेंच मंडन" असें म्हणून शकुंतला रडूं लागतांच, "अशा मंगलकालीं रडणें योग्य नाहीं" असें त्या दोघी तिला म्हणतात. पुढें निघतेवेळेस लता, मृग इत्यादिकांचा निरोप घेतांना "वनज्योत्स्ना तुमच्या दोघींच्या हातीं सोंपविली आहे" असें जेव्हां शकुंतला म्हणते, तेव्हां त्या दोघी मैत्रिणींस हुंदका येऊन "आणि आम्हांस कोणाच्या हातीं निरवितेस?" असें त्या म्हणतात, आणि शकुंतला चालूं लागल्यावर त्या तिच्याकडे पाहत राहतात व ती झाडाच्या आड दिसेनाशी झाली तेव्हां त्यांस वाईट वाटतें. व आश्रमांत परत येतांना त्या कण्व ऋषींस म्हणतात, "**तात शकुंतलाविरहितं शून्यमिव तपोवनं कथं प्रविशामः।**" म्हणजे–"शकुंतलेवांचून तपोवन शून्य भासत आहे, त्यांत आम्हीं कसा प्रवेश करावा?" सारांश, सख्ख्या बहिणींप्रमाणें यांचें प्रेम शकुंतलेवर होतें व तीहि तितकेंच प्रेम त्यांवर करीत असे. भगिनी-प्रेमाचें आणि त्यांच्या वयास शोभणाऱ्या विनोदाचें हें स्वभावचित्र आपल्या डोळ्यापुढें कवीनें उभें केलेलें आहे. त्यास उद्देशूनच मीं एका प्रसंगीं या मैत्रिणी व उत्तररामचरितांतील तमसा आणि मुरला या दोन्ही भूमिकांसंबंधानें–

> **तमसा मुरला प्रियंवदा अनसूया, कवणासि वा कदा।**
> **हरिती न? निसर्ग-सत्यता हृदया आकळि हीच धन्यता॥**

असे उद्गार काढले होते.

आतां आपण या नाटकांतील प्रधान पात्राकडे म्हणजे नायिकेकडे वळूं. या चित्रपटांत कवीचें लोकोत्तर कौशल्य त्याच्याच शब्दांनीं मी सांगणार आहें. पण त्यांतील खरें मर्म ध्यानांत यावें व एकंदरींत या भूमिकेचा नखशिखान्त उठाव आपल्या डोळ्यांसमोर उभा रहावा म्हणून, (१) तिचें रूप, (२) शालिन्य, (३) प्रेमळपणा, (४) सात्त्विक संताप, (५) पतीवर दृढानुराग, (६) मर्यादशीलता इत्यादि क्रमानें आपणांस दाखविणार आहें. यावरून चित्रकाराच्या चित्राप्रमाणें आपल्यापुढें तिच्या बहिरंगाची मूर्ति तर उभी राहीलच; पण चित्रकलेंत जें साधत नाहीं म्हणजे अंतरंगाची छाया जी चित्रकारास दाखवावयास येत नाहीं, तीहि कवीनें फार मार्मिकतेनें दाखविली आहे हें ध्यानांत येईल.

शकुंतलेची जन्मकथा पहिल्या अंकांतच आली आहे. मेनका नांवाची अत्यंत सुंदर अप्सरा विश्वामित्राच्या तपश्चर्येचा भंग करण्याकरितां इंद्रानें पाठविली होती व तिचे पोटीं शकुंतला जन्मली होती. मातेचे स्वरूपाचेंच प्रतिबिंब शकुंतलेंत उतरलें होतें म्हणून शकुंतलेस पाहतांक्षणींच " **इदं किलाव्याजमनोहरं वपुः** " म्हणजे 'स्वभावतःच सुंदर हें शरीर' असे उद्गार दुष्यंताचे मुखांतून निघाले. पुढें अप्सरेपासून हिचा जन्म झाला असें जेव्हां दुष्यंतास समजलें तेव्हां " **न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात्।** " म्हणजे " जिचा प्रकाश चंचल आहे अशी ज्योति किंवा तेज पृथ्वीपासून उदय पावत नाहीं " असें राजा म्हणतो. पुढें दुसऱ्या अंकांत तिच्या प्रत्यंगाचें वर्णन करण्याचे भरीस न पडतां संक्षेपानें तिच्या स्वरूपाची कल्पना विदूषकास व्हावी म्हणून तो म्हणतोः—

चित्रे निवेश्य परिकल्पितसत्त्वयोगा।
रूपोच्चयेन मनसा विधिना कृता नु॥

म्हणजे " रूपाची परिसीमा करावयाची असा मनाशीं संकल्प करून मग तसें चित्र बनवून मग तिच्यांत प्राणप्रतिष्ठा ब्रह्मदेवानें केली काय?"–असें तो म्हणतो. पुढें सहाव्या अंकांत तिचें चित्र पुढें घेऊन तें न्याहाळून पाहात असतां तो म्हणतो, " **तथापि तस्या लावण्यं रेखया किंचिदन्वितम्।** " म्हणजे मूळाची प्रतिकृति करतांना तिच्या लावण्याची छाया रेघोट्यांनीं फारच

थोडी साधते " म्हणजे चित्रकलेनें तिच्या स्वरूपाची यथोचित कल्पना अशक्य आहे. ह्या संक्षिप्त वर्णनावरून चित्रकलेलाहि व्यक्त करण्यास अशक्य असें तिचें स्वरूप आहे असें सांगितल्यावरून शकुन्तलेचें लावण्य अप्रतिम होतें, असें कवीनें सुचविलें आहे. अशा रीतीनें बहिरंगाची आनिर्वाच्यता कवीच्या शब्दांनींच दाखवून मी आतां शकुन्तलेच्या अंतरंगाकडे वळतों.

शकुन्तलेच्या अंगीं अत्यंत शालिन्य होतें. शकुन्तलेची आणि राजाची गांठ पडण्याचा योग जेव्हां तिच्या सख्यांनीं घडवून आणला आणि राजा जेव्हां प्रणयालाप करूं लागला, तेव्हां '**न माननीयेष्वात्मानमपराधयिष्ये**'– "ज्यांस मीं बहुमान द्यावा त्यांना आवडणार नाहीं असें मी करणार नाहीं." असें म्हणून जेव्हां ती जाऊं लागते आणि राजा तिचा हात धरून तिला परतवितो तेव्हां '**पौरव रक्ष अविनयं। मदनसंततापि न खलु आत्मनः प्रभवामि**'– "पौरवा ! अविनय करूं नको.–मदनानें जरी मी पीडित आहें तरी माझ्यावर माझी सत्ता नाहीं." गुरुजन रागावणार नाहींत अशी राजानें समजूत घातल्यावरहि '**भूयोऽपि सखीजनमनुमानयिष्ये**' म्हणजे "पुन्हा सख्यांची अनुमति घेतें" असें ती म्हणते. राजाचें सान्निध्य असतांनाहि तिची वागणूक अत्यंत मर्यादशील होती. कारण तिच्या चित्तवृत्तीचें सूक्ष्म निरीक्षण करीत असतां तो म्हणतो : '**वाचं न मिश्रयति मद्वचोभिः।**' म्हणजे मी बोलत असतां ती माझ्याशीं बोलत नाहीं." '**न तिष्ठति मदाननसंमुखी सा।**' तसेंच "माझ्यासमोर बसत नाहीं." एवढेंच नाहीं तर '**अभिमुखे मयि संहृतमीक्षितम्**' म्हणजे "मी समोर आलों तर ती आपली दृष्टि दुसरीकडे फिरविते"–ह्या व अशाच तऱ्हेच्या बारीकसारीक उद्गारांवरून तिच्या मर्यादशीलतेची आपणांस बरोबर कल्पना करतां येते.

आतां आपण तिचा स्वभाव कसा होता हें पाहूं. तिचें अंतःकरण फार प्रेमळ होतें–'नवमालिका–कुसुमापेक्षांहि तूं नाजूक असून तुला पित्यानें या झाडांस पाणी घालावयास लाविलें आहे. तेव्हां तुझेपेक्षां हीं झाडें पित्याला अधिक प्रिय आहेत'–असें जेव्हां अनसूया म्हणाली, तेव्हां '**न केवलं तातनियोगः अस्ति मे सोदरस्नेहोऽपि एतेषु**' म्हणजे "ही केवळ वडिलांची आज्ञा नव्हे पण माझ्या सख्ख्या भावंडांप्रमाणें यांजवर माझें प्रेम आहे" असें शकुन्तला म्हणते. नवमालिकेला पाणी घालावयास विसरलीस असें जेव्हां

अनसूया म्हणाली, तेव्हां '**तदा आत्मानमपि विस्मरिष्यामि**' म्हणजे "मी आपल्या स्वतःलाच विसरेन" असें ती उत्तर करिते. चौथ्या अंकांत शकुन्तला जेव्हां पतिगृहास जावयास निघते, तेव्हां तिच्या मैत्रिणी, तिनें भावंडांप्रमाणें जोपासना केलेले आश्रमांतील वृक्ष व लता व तिच्या खेळगड्यांप्रमाणें आश्रमांत राहणारे मृग यांचा सहवास आतां तुटणार, असें वाटून जे तिनें प्रेमोद्गार काढले आहेत, ते वाचतांना वाचकाच्या व रंगभूमीवर त्या देखाव्याचे अभिनय पाहणाऱ्यांच्या अंतःकरणास सद्गदित करतात व त्यांच्या डोळ्यांवाटे प्रेमाश्रु वाहूं लागतात यांत नवल नाहीं. वनलतांनीं व तरूंनीं दिलेलीं आभरणें जेव्हां तिच्या सख्या चढवूं लागल्या तेव्हां '**इदमपि मे बहु मन्तव्यम्**' म्हणजे "या मण्डनाचेंहि मला फार कौतुक आहे कारण मैत्रिणींच्या हातचें मण्डन मला आजपासून दुर्लभ होणार आहे." असें म्हणून ती डोळ्यांस पाणी आणते. पुढें कण्व ऋषींनीं उपदेश व आशीर्वाद दिल्यावर जेव्हां ती आश्रमाबाहेर पडते, तेव्हां '**आर्यपुत्रदर्शनोत्सुकाया अपि आश्रमपदं परित्यजन्त्या दुःखेन मे चरणौ पुरतः प्रवर्तेते।**' म्हणजे "पतीस भेटण्याविषयीं जरी मी उत्सुक आहें तरी माझें पाऊल मोठ्या कष्टानें पुढें पडतें" असें ती आपल्या मैत्रिणींस म्हणते; व आश्रमांतून बाहेर पडल्यावर "**लताभगिनीं वनज्योत्स्नां तावदामन्त्रयिष्ये।**" म्हणजे "वनज्योत्स्ना नांवाच्या भगिनीप्रमाणें मानलेल्या, माझ्या लतेचा मी निरोप घेतें" असें म्हणून वनज्योत्स्नेजवळ जाऊन त्या लतेस उद्देशून ती म्हणते, '**अद्यप्रभृति दूरवर्तिनी खलु ते भविष्यामि।**'–"आजपासून मी तुझेपासून दूर राहणार." असें म्हणून त्या लतेला ती आपल्या मैत्रिणींच्या हातीं निक्षेप म्हणून सोंपविते. पुढें वाटेंत तिला तपोवनांतील हरिणी भेटते. तेव्हां ती सुखरूप प्रसवली म्हणजे मला आनंदाचें वर्तमान सांगण्यास कोणी तरी पाठविण्याविषयीं ती कण्वऋषींस विनंती करते. इतक्यांत आईचे पश्चात् तिनें वाढविलेला हरिणबालक तिच्या पायांत घुटमळूं लागला, तेव्हां त्यास उद्देशून ती म्हणते, '**अचिरप्रसूतया जनन्या विना वर्धित एव। इदानीं मया विरहितं त्वां तातश्चिन्तयिष्यति।**'–"तुला जन्म दिल्यावर थोड्याच काळांत तुझी आई मेली. तिजवांचून मीं तुला वाढविलें. आतां मी निघून गेलें तरी बाबा तुझा सांभाळ करतील." पुढें नदी जवळ आल्यावर शिष्टाचाराप्रमाणें

शकुन्तलेला निरोप दिला आणि तिच्या सख्यांसहि परत फिरण्याची ऋषींनीं आज्ञा केली. तेव्हां "**तात इत एव किं प्रियंवदामिश्राः सख्यो निवर्तिष्यन्ते।**" म्हणजे, "बाबा परत जात आहेत, तशा प्रियंवदादिक माझ्या मैत्रिणीहि येथून परत जाणार काय?"–असें ती विचारिते; व '**कथमिदानीं तातस्याङ्कात्परिभ्रष्टा मलयतटोन्मूलिता चन्दनलतेव देशान्तरे जीवितं धारयिष्ये**'– म्हणजे "मलयतटावरून उपटून पडलेल्या चंदनलतेप्रमाणें बाबांच्या मांडीवरून पदच्युत झालेली मी परदेशांत जीव कसा धरूं?" असें म्हणते व आपल्या दोघीहि मैत्रिणींना एकदम आलिंगन देण्यास सांगते व माझ्याकरितां तपानें आधींच कृश झालेल्या शरीरास काळजीनें ताप देऊं नका, असें कण्व ऋषींस विनविते. सारांश, ज्या ठिकाणीं तिचें बालपण इतक्या गोड सहवासांत गेलें, जेथें सत्त्वप्रधान ऋषिसमागमानें तिच्या स्वभावास सात्त्विकतेचें व पावित्र्याचें वळण लागलें, जेथें गौतमी-सारख्या प्रेमळ आत्याबाईच्या देखरेखीखालीं तिला जन्म देणाऱ्या आईचा विसर पडला, जेथें वनलता व आश्रममृगहि तिचे खेळगडी झाले, त्या सर्वांना टाकून जाण्याचा प्रसंग तिला आला असतां प्रथमच माहेराहून सासरीं जाणाऱ्या मुलीप्रमाणें तिच्या मनाची अवस्था झाली व कवीनें हेंच चित्र आपल्या डोळ्यापुढें मूर्तिमंत उभें केलें आहे.

पण शकुन्तलेच्या चित्रपटाचा हा प्रभातकाळचा शांत व मधुर असा एक भाग मात्र मीं दाखविला. माध्यान्हकाळचें उग्र स्वरूप अझून पाहावयाचेंच आहे, त्यांत तिच्या आनुवंशिक क्षात्रतेजाची छाया आपणांस दृष्टीस पडणार आहे. ही छाया स्पष्टपणें उमटण्याकरितां ह्या चित्रपटाचे पृष्ठभागीं राजाचा दरबार आहे व या दरबारांतच शकुन्तलेच्या सात्त्विक कोपाचे उद्गार श्रोत्यांस थरथरावून सोडतात; इतकेंच नाहीं, पण स्मृतिमूढ झालेल्या राजाचे मनांत अनुशयाचे अंकुर फोडतात.

राजाची खात्री पटेल असें कांहीं तरी प्रतिवचन दे, असें शारद्वतानें सांगितल्यावर शकुन्तला आपल्याशींच पुटपुटते कीं, तशा प्रकारच्या अनु-रागाची ही स्थिति झाली तर आठवण तरी देऊन काय उपयोग? असें म्हणून पूर्वप्रेमामुळें राजाला "आर्यपुत्र" या शब्दांनीं संबोधिते. परंतु विवाहाचाच संशय उत्पन्न झाला आहे हें पाहून ती राजाला 'पौरव' –म्हणजे

विवाहापूर्वी पहिल्या अंकांत राजानें जें आपलें नांव सांगितलें होतें त्या नांवानें संबोधिते, व 'आर्यपुत्र' म्हणून पतीचा निर्देश करण्याचा जो समुदाचार त्याचा परित्याग करते. या शब्दप्रयोगांतच तिच्या पुण्यप्रकोपाची सूचना आहे; व पुढें 'स्त्रिया स्वभावतःच कपटी असतात' असें जेव्हां राजा म्हणतो, तेव्हां मात्र तिच्या अंगाची नखशिखान्त आग होते व पौरव हाहि शब्द न योजतां अनार्य अशा कठोर शब्दानें राजास संबोधून '**आत्मनो हृदयानुमानेन प्रेक्षसे।**' म्हणजे "आपण जसे आहोंत तसेंच सर्व जग आहे असें अनुमान करतोस" आणि '**क इदानीमन्यो धर्मकंचुकप्रवेशिनस्तृणच्छन्नकूपोपमस्य तवानुकृतिं प्रतिपत्स्यते।**' म्हणजे "धर्माचें पांघरूण घेणाऱ्या गवताखालीं झांकलेल्या विहिरीसारख्या तुझ्या वागणुकीचें अनुकरण कोण करील?" या वाग्रूप शरानें राजाचे काळजास घरच पाडलें, आणि राजा आपल्याशींच म्हणतो : 'हिच्या ह्या कोपानें माझे मनांत तळमळ उत्पन्न झाली आहे व हा कोप वरवरचा नसून खरोखर अंतःकरणापासून आहे असें वाटतें; कारण, हिचे डोळे अतिशय लाल झाले असून पूर्वी केलेल्या प्रणयाचें मला स्मरण होत नाहीं असें पाहिल्यावरून हिनें भिवया इतक्या चढविल्या कीं, आपल्या रागाच्या भरांत मदनाच्या धनुष्याचे तिनें तुकडे तुकडे करून टाकले.' शकुन्तलेच्या या कोपयुक्त वचनानें राजाचे मनांत जरी डळमळ झाली तरी 'ही गोष्ट आठवत नाहींच' असा जबाब राजानें दिल्यावर ती म्हणते–'**सुष्ठु तावदत्र स्वच्छन्दचारिणी कृतास्मि याहमस्य पुरुवंशप्रत्ययेन मुखमधोर्हृदयास्थितविषस्य हस्ताभ्यासमुपगता**'– "बरें तर, आतां वाटेल तसें वागण्यास मोकळी झालें. पौरव कुळाच्या थोर कीर्तीवर भरंवसा ठेवून पोटांत विष असून तोंडांत मात्र मध असणाऱ्याच्या हातीं सांपडलें' असें म्हणून ती तोंड पदराआड करून रडते. इतकें झाल्यावर जेव्हां सर्व शिष्य व गौतमी परत जावयास निघतात तेव्हां ती त्यांच्या मागें जातांना म्हणते, '**कथमनेन कितवेन विप्रलब्धास्मि।**' "या लबाड पुरुषनें कशी मला फसविली!" असा तिला जरी सात्त्विक कोप आला होता तरी प्राचीन हिंदु स्त्रियांची पतीवरची निष्ठा कमी झालेली नव्हती. सीता देवीचा रामचंद्रानें परित्याग केल्यावरहि ती रामाविषयीं म्हणते '**न कामचारस्त्वयि शंकनीयः। ममैव जन्मान्तरपातकानां**

विपाकविस्फूर्जथुरप्रसह्यः' म्हणजे रामचंद्रानें त्याच्या मर्जीस वाटेल तसें आचरण केलें असें न म्हणतां माझ्याच जन्मान्तरींच्या पातकांचें हें फळ आहे, असें सीतादेवी म्हणते. तसेंच सातव्या अंकांत जेव्हां दुष्यन्ताची आणि शकुन्तलेची भेट मरीचि ऋषीच्या आश्रमांत होते तेव्हां शकुन्तला म्हणते, 'परित्यक्तमत्सरेण अनुकम्पितास्मि दैवेन।' म्हणजे दैव प्रतिकूल होतें. व पुढें पूर्ण पश्चात्ताप होऊन राजा जेव्हां तिच्या पायां पडतो तेव्हां ती म्हणते, 'नूनं मे सुचरितप्रतिबन्धकं पुराकृतं तेषु दिवसेषु परिणाम-मुखमासीद्येन सानुक्रोशोऽप्यार्यपुत्रो मयि विरसः संवृत्तः।' म्हणजे "माझें प्राक्तन कर्म फळास येण्याचा काळ होता, त्यामुळें आपण जरी सदय आहां तरी तेव्हां माझ्याविषयीं निःस्नेह झालां."

प्रत्यादेशाचे समयीं जरी तिनें पतीशीं निष्ठुर भाषण केलें तरी तिच्या अंतर्यामांतली पतीविषयीं अनुरक्ति लेशमात्र ढळली नव्हती. म्हणून पति-वियोग झाल्यानंतर विरहिणी स्त्रियांस उचित असे कडकडीत नियम ती पाळीत होती. सातव्या अंकांत मरीचि ऋषीच्या आश्रमांत शकुन्तला दुष्यन्ताचे दृष्टीस पडते तेव्हां दुष्यन्त म्हणतोः—

'वसने परिधूसरे वसाना। नियमक्षाममुखी धृतैकवेणी।
अतिनिष्करुणस्य शुद्धशीला। मम दीर्घं विरहव्रतं बिभर्ति॥

शकुन्तलेची विरहतपश्चर्या आचरण करणारी मूर्ति दुरून दृष्टीस पडतांच दुष्यन्ताचे तोंडांतून अत्यंत अनुतापाचे सूचक असे हे उद्गार अंतःकरणास विव्हल करणारे आहेत. या श्लोकांत पतिविरह झाल्यानंतर तेंच म्हणजे पतिसन्निधानीं असतांच जें वस्त्र परिधान केलें होतें त्याचेंच परिधान म्हणजे त्याला प्रक्षालन वगैरे संस्कार न झाल्यामुळें तें मलिन झालेलें; तसेंच त्याच वेळची वेणी; म्हणजे कचकलापाला सुद्धां संस्कार करावयाचा नाहीं; अर्थात् कोणत्याहि प्रकारचें प्रसाधन करावयाचें नाहीं असा कडकडीत नियम; व अर्थात् सुग्रास अथवा पौष्टिक अन्न सुद्धां वर्ज्य करून शरीराचें शोषण–असें तें कडकडीत विरहव्रत पाहून दुष्यन्त आपल्यास 'अतिनिष्करुण' असें पद लावून घेऊन शकुन्तलेस 'शुद्धशीला' असें विशेषण देऊन आपल्या तामस आणि शकुन्तलेच्या सात्त्विक चरिताचा निर्देश करतो आणि दोघांच्या

आचरणांतील विरोध या श्लोकांत स्पष्ट उमटतो. दुष्यन्ताची भूमिका करणारा नट जर सहृदय असेल तर मूळ पुस्तकांत तसा स्पष्ट निर्देश नसला तरी आपल्या डोळ्यांत दोन बाष्पबिंदु आल्याचा अभिनय निःसंशय करील.

शकुन्तलेच्या भूमिकेसंबंधानें आतां एकाच गोष्टीचा उल्लेख करावयाचा राहिला. गुरुजनांशीं तिचें आज्ञाधारकत्व अत्यंत प्रशंसनीय होय. राजाचें मन वळत नाहीं असें पाहिल्यावर गौतमी आणि कण्वशिष्य परत जावयास निघतात त्या वेळेस शकुन्तला यांचे पाठीमागून चालूं लागते. तेव्हां '**स्वातंत्र्यमवलम्बसे**' असें जेव्हां शार्ङ्गरव तिला म्हणतो तेव्हां ती भयानें कांपूं लागते. माहेरच्या माणसांपैकीं वडील माणसांच्या आज्ञेचें उल्लंघन केसमात्रहि होऊं नये अशी तिची अंतःकरणप्रवृत्ति होती, हें यावरून स्पष्ट दिसतें. माहेरच्या माणसांशीं मर्यादातिक्रम न होऊं देण्याविषयीं ती जशी जपत असे, तसेंच पतीशींहि तिची वागणूक अत्यंत शालीनतेची होती. मरीचि ऋषीच्या दर्शनाकरितां येण्याविषयीं जेव्हां दुष्यन्तानें आपली इच्छा दर्शविली, तेव्हां '**जिह्रेमि आर्यपुत्रेण सह गन्तुम्**' म्हणजे "आपल्या सहवर्तमान जाण्याची मला लाज वाटते' असें ती म्हणते. यावर उत्सवसमयीं पतीसह भार्येनें गुरुजनांपुढें जाणें उचित आहे, अशी जेव्हां दुष्यन्तानें तिची समजूत घातली, तेव्हां ती त्याचे बरोबर मरीचि ऋषीच्या वंदनास गेली.

ही स्त्रियांची मर्यादशीलता अझून पुष्कळ कुटुंबांत दृष्टीस पडत आहे, व पाश्चात्यांच्या सहवासांत या रूढीचें अतिक्रमण जरी सध्यां होत आहे तरी ही रूढि कालिदासाचे कालीं तरी प्रचलित होती असें दिसतें! ती प्रशंसनीय नाहीं असें जे म्हणतील ते म्हणोत–मला तर ती अत्यंत चित्ताकर्षक वाटते.

या प्राचीन मर्यादशीलतेचेंच आणखी एक निदर्शन याच अंकांत दृष्टीस पडतें. भरतानें जेव्हां आपल्या आईस–हा कोण गे?–असा प्रश्न विचारला तेव्हां '**वत्स ते भागधेयानि पृच्छ**' असें शकुन्तला उत्तर देते. म्हणजे पतीचें नांव न घेण्याची जी मर्यादा आपल्या लोकांत अझून आहे तिचाच हा उल्लेख आहे. पाश्चात्य संस्कृतींत वाढलेल्या स्त्रियांनीं स्पष्ट नामानिर्देशच केला असता.

असो. स्त्रियांच्या भूमिकेचा हा चित्रपट मिटविण्यापूर्वीं प्राचीन समाजघटनेंत स्त्रियांचा दर्जा कशा प्रकारचा होता, हें क्षणभर पाहूं. या संबंधांतहि

बहुतेक अंशीं सद्यःस्थितीचें तत्कालीन स्थितीशीं साम्यच आहे. काश्यपानें "**शुश्रूषस्व गुरून्**" इत्यादि श्लोकांत शकुन्तलेस जो उपदेश केला आहे, त्यांत त्या काळच्या सुगृहिणीचें स्वरूप वर्णिलें आहे. त्यांत (१) वडील माणसांची सेवा; (२) सवतीशीं मैत्रिणीप्रमाणें वागणूक; (३) नवऱ्यानें अप्रिय वागणूक केली असतांहि त्यास अनुकूलता; (४) नोकरचाकरांशीं औदार्यबुद्धि आणि (५) भाग्य प्राप्त झालें असतांहि विनय; हे सुगृहिणीचे गुण आहेत असें वर्णन आहे. दुष्यन्तास निरोप पाठविला आहे त्यांत '**सामान्यप्रतिपत्तिपूर्वकमियं दारेषु दृश्या त्वया।**' म्हणजे इतर स्त्रियांप्रमाणेंच हिच्याशीं वागणूक करावी; "याहून अधिक चांगला अनुभव येणें हें दैवाचे आधीन आहे व त्याविषयीं माहेरच्या मनुष्यांनीं कांहीं बोलूं नये" असें सांगून पाठविलें. 'सभर्तृक स्त्री कितीहि साध्वी असली, पण ती जर माहेरींच राहिली तर लोक तिला अन्यप्रकारें लेखतात. म्हणून स्त्री नवऱ्याला प्रिय असो वा अप्रिय असो, तिनें नवऱ्याचे घरींच राहिलें पाहिजे.' तसेंच '**पतिगृहे तव दास्यमपि क्षमम्**' म्हणजे "पतीच्या घरीं गुलामगिरी देखील योग्य आहे" असें कण्वशिष्य तिला सांगतो. असें जरी आहे तरी पुढें शकुन्तला मरीचि ऋषीच्या दर्शनास जाते तेव्हां ते तिला आशीर्वाद देतांना म्हणतात–'**भर्तर्यपेततमसि प्रभुता तवैव**' म्हणजे भर्त्याच्या मनांतलें किल्मिष निघून गेल्यावर त्याचेवर तुझीच सत्ता आहे. व असा संबंध असण्यास कारण तेच सांगतात : '**छाया न मूर्च्छति मलोपहतप्रसादे। शुद्धे तु दर्पणतले सुलभावकाशा ॥**' म्हणजे "मळलेल्या आरशांत प्रतिबिंब पडत नाहीं, पण काच जर स्वच्छ असेल तर त्यांत छायेचा अथवा प्रतिबिंबाचा प्रवेश सहज पडतो." सारांश, पतीचें मन कांहीं कारणानें कलुषित झालें असेल तरच मात्र पत्नीची सत्ता त्यावर चालत नाहीं, एरव्हीं तिची सत्ता त्यावर आहेच आहे.

स्त्रियांविषयीं केवळ समबुद्धीच होती, असें नसून त्यांच्याविषयीं पुरुषांचे मनांत आदर होता, असेंहि ह्या नाटकांतील एका हृदयंगम प्रसंगावरून मानण्यास जागा आहे. भरताचें (१) आकारसादृश्य, (२) त्याच्या अलौकिक बालचेष्टा, व (३) अपराजिता वनस्पतीची अविकार्यता, ह्या अनेक खाणाखुणांनीं परस्परांचे मनांतील शंकांचें निरसन झाल्यावर दोघांची जेव्हां ओळख पटते,

तेव्हां क्षणमात्र विलंब न करितां राजा शकुन्तलेच्या पायांवर डोकें ठेवतो. पश्चात्तापाच्या तीव्रतेमुळें त्याचें अंतःकरण अत्यंत विव्हळ झालें होतें हें तर खरेंच, पण सर्वस्वीं चूक आपलेकडे आहे अशी खात्री झाली तरी पत्नीच्या पायां पडण्याइतकें दाक्षिण्य आणि इतकी सरलता chivalry चे गोडवे गाणारांपैकीं कितीकांचे अंगीं सांपडेल बरें ? पत्नीच्या पायां पडण्याइतकें दाक्षिण्य त्या कालीं रूढच असावें असेंहि पण वाटतें. कारण दुष्यन्ताच्या या कृतींत कांहीं असामान्यता असती, तर "अगबाई ! हें काय भलतेंच !" अशा प्रकारचे कांहीं उद्गार शकुन्तलेच्या तोंडांतून निघाले असते. पण तसें कांहीं न म्हणतां "उत्तिष्ठत्वार्यपुत्रः" इतकेच शब्द ती बोलते. सारांश, कृताप-राधाची क्षमा मागतांना बायकोच्याहि पायां पडण्यांत कांहीं हलकेपणा आहे, अशी त्या काळीं समजूत होतीसें दिसत नाहीं.

असो. एवढा वेळ नायिकेचें निरीक्षण केल्यावर आतां आपल्यापुढें नायक जो राजा दुष्यन्त त्याचा चित्रपट मी उकलणार आहें. हाहि कवीनें फार कौशल्यानें रंगविला आहे. ह्यांत आपल्या आधुनिक दृष्टीनें एक मोठें वैगुण्य आहे असें वाटतें. परंतु या वैगुण्याविषयीं विचार करतांनाहि त्या काळच्या परिस्थितीकडे आपण नजर पुरविली पाहिजे. अनेक बायका करण्याची त्या वेळेस रूढीच होती. म्हणून या चित्रपटांतील सर्वथा प्रसंसनीय अशीं जीं अंगें आहेत त्यांचा विचार केला पाहिजे; व तसें करूनहि ज्या दोषाचें मीं सूचन केलें आहे, तो खरोखरीच दोष आहे अशी आपली समजूत झाल्यास, "**एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः।**" म्हणजे "**शशिकिरणिं शशीचा अंकही लुप्त होतो। गुणगणिं मनुजाचा दोष झांकूनि जातो।**" या न्यायानें या दोषाकडेहि आपण मेहेरनजरच कराल असें वाटतें.

अंकाचे क्रमानेंच या भूमिकेचेंहि आपण निरीक्षण करूं लागलों, तर पहिल्याच अंकांत राजसत्तेच्या सदुपयोगाविषयीं एक उक्ति आपल्या दृष्टीस पडते : राजाचे हातीं जें शस्त्र आहे त्याचा उपयोग जे दुःखित असतील त्यांचे संरक्षणाकडे राजा दुष्यन्त करीत होता; पण त्या शस्त्रानें निरपराधी मनुष्यास उपसर्ग लागत नसे. "**आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि।**"

राजेलोकांच्या कर्तव्यांत ऋषिजनांचें धर्माचरण अबाधित चालावें अशा-विषयीं दक्षता असावी असा प्राचीन धर्म असे. त्यास अनुसरून दुष्यन्तहि वागत असे. म्हणून प्रथमांकांत मृगयेच्या नादांत राजानें जेव्हां कण्व ऋषीच्या आश्रमांत प्रवेश केला, तेव्हां कण्वशिष्य राजास म्हणतो, "**रम्यास्तपोधनानां प्रतिहतविघ्नाः क्रियाः समवलोक्य । ज्ञास्यसि कियद् भुजो मे रक्षति मौर्वीकिणाङ्क इति ।**" म्हणजे-तपाचें आचरण करणाऱ्यांच्या धार्मिक क्रिया निर्विघ्न चालल्या आहेत हें पाहिलें असतां धनुष्याच्या दोरीनें घट्टा पडलेल्या आपल्या बाहूनें किती संरक्षण होत आहे हें आपल्यास समजेल. अर्थात् ऋषींची तपश्चर्या अप्रतिहत चालण्यांत राजे लोकांस धन्यता वाटत असे. या ऋषिसंरक्षणाचा मोबदला म्हणून राजांस ऋषींच्या तपश्चर्येच्या पुण्याचा अंश लाभतो अशी भावना होती. म्हणून–

"**रक्षायोगादयमपि तपः प्रत्यहं सञ्चिनोति ।**"

ऋषिरक्षणामुळें हा राजा प्रतिदिवशीं तपश्चर्याच करीत आहे, असे कण्व-ऋषीच्या शिष्याचे तोंडांतून उद्गार निघाले आहेत; व म्हणूनच दुष्यन्तराजाला या श्लोकाच्या पुढील चरणांत–"**पुण्यः शब्दो मुनिरिति मुहुः केवलं राजपूर्वः ।**" म्हणजे या राजालाहि मुनि असेंच विशेषण 'राजा' ह्या उप-पदाशीं जोडून म्हणजे राज-मुनि अथवा राजर्षि असें प्रायः लावण्यांत येतें.

ऋषींची सेवा अशा प्रकारें राजे लोक करीत असत, याचें कारणहि कवीनें दर्शविलें आहेः--"**शमप्रधानेषु तपोधनेषु । गूढं हि दाहात्मकमस्ति तेजः ॥**" म्हणजे तपस्वी लोकांचे अंगीं मुख्यत्वें शम हा गुण जरी असतो, तरी दाह करून टाकण्यासारखें तेज त्यांच्या अंगीं गुप्तपणें राहत असतें. शिवाय त्यांच्या रक्षणाचा मोबदलाहि राजास मिळतो. कारण, "**यदुत्तिष्ठति वर्णेभ्यो नृपाणां क्षयि तद्धनम् । तपःषड्भागमक्षय्यं ददत्यारण्यका हि नः ।**" म्हणजे-इतर प्रजेकडून राजास जें धन मिळतें तें नाशवंत असतें, परंतु क्षय न पावणारें जें तपोरूप धन तें ऋषींकडून राजास मिळतें. धर्मक्रिया अबाधित चालण्यांतच राजेलोकांस धन्यता वाटत असे; व पांचव्या अंकांत "आपण राज्य करीत असतां धर्मक्रियेला विघ्न कोठून येणार ?" असे कण्व-शिष्याचे तोंडून उद्गार निघतांच "**अर्थवान् खलु मे राजशब्दः ।**" म्हणजे राजा ही संज्ञा तुमचें संरक्षण झाल्यानेंच योग्य होय, असें राजा म्हणतो.

राजाच्या अधिकाराच्या एका अंगाचाच एवढा वेळ विचार झाला. परंतु, राजेपणाची जबाबदारी फार मोठी आहे, ही जाणीव राजास होती. कारण पांचव्या अंकांत

" प्रजाः प्रजाः स्वा इव तन्त्रयित्वा
निषेवते श्रान्तमना विविक्तम्। "

--म्हणजे आपल्या औरस संततीप्रमाणेंच प्रजेचें नियमन करून मनास थकवा आल्यामुळें एकांतांत विश्रांति घेण्याकरितां राजा जात आहे, तोंच कण्वशिष्य आल्याची वर्दी त्यास मिळते; म्हणून तो यज्ञशाळेकडे निरुपायानें थकवा आला असतांहि जातो, व आपल्याशींच म्हणतो--

" राज्ञां तु चरितार्थता दुःखोत्तरैव "।

--म्हणजे राजांना आपल्या जीविताचें साफल्य वाटणें फार कठीण आहे; व आपल्या हातांत छत्री घेऊन चालणाऱ्यास जसे छत्री धरण्याचे श्रम होतात तशीच राजाची स्थिति असते. शेक्सपियर कवीनेंहि " Uneasy lies the head that wears a crown " असें म्हटलें आहे. पण राजाचे कर्तव्याची दुष्यन्ताची कल्पना पांचव्या हेन्रीपेक्षां फारच उदात्त होती.

प्रजेपैकीं प्रत्येक मनुष्य सुखी असावा हें कवीच्या उक्तीप्रमाणें राजांचें ध्येय असावेंसें वाटतें. कारण पांचव्या अंकाचे आरंभींच वैतालिक जे दोन श्लोक म्हणतात, त्यांपैकीं दुसरा श्लोक फार महत्त्वाचा आहे. त्यांत सामान्यतः राजकार्य म्हणून जें समजण्यांत येतें त्याचा तर उल्लेख आहेच, पण त्याहूनहि उच्च राजकर्तव्याचें ध्येय शेवटल्या चरणांत सांगितलें आहे :--

नियमयसि कुमार्गप्रस्थितानात्तदण्डः
प्रशमयसि विवादं कल्पसे रक्षणाय।

या दोन चरणांत फौजदारी व दिवाणी कामें, व प्रजेचें संरक्षण म्हणजे शांति राखणें, हें सामान्य कर्तव्य सांगितलेंच; पण--

अतनुषु विभवेषु ज्ञातयः सन्तु नाम।
त्वयि तु परिसमाप्तं बन्धुकृत्यं प्रजानाम्॥

—म्हणजे संपत्ति पदरीं असतां सोयरे भोंवतीं जमतात हें खरें आहे; पण राजा सर्व प्रजेचा सोयरा आहे. याच अर्थाचा उल्लेख पुढें सहाव्या अंकांत आला

आहे. धनमित्र नांवाचा सावकार तारूं बुडालें त्यांत मेला म्हणून अमात्याकडून जेव्हां लिहून आलें, तेव्हां—

" येन येन विज्युयेत प्रजाः स्निग्धेन बन्धुना ।
स स पापादृते तासां दुष्यन्त इति घुष्यताम् । "

—म्हणजे प्रजेपैकीं ज्या कोणाचा एखादा आप्त मरेल त्याची त्याच्या पातकाखेरीज बाकीची जबाबदारी मी घेईन, असा जाहीरनामा प्रसिद्ध करावा, असा हुकूम राजानें सोडला. यावरून प्रजेपैकीं कोणावरहि आताच्या मरणासारखी आपत्ति आली तर तिचाहि परिहार करण्याचें राजानें आपल्या शिरावर घेतलें होतें; एवढेंच नाहीं, तर प्रजेपैकीं कोणीहि मनुष्य कांहीं पातक करीत असला तर त्या पातकाचें फल राजास भोगावें लागतें, अशीच दुष्यन्ताची कल्पना असावीसें वाटतें. सहाव्या अंकाचे शेवटीं मातलि जेव्हां प्रवेश करितो, तेव्हां " कोणीं न दिसणाऱ्या प्राण्यानें मला गच्चीवर चढवून ठेविलें आहे " असें जेव्हां विदूषक ओरडतो, तेव्हां माझ्या देखील घरांत भुतें संचार करतात काय, असा प्रश्न करून राजा म्हणतो--

अहन्यहन्यात्मन एव तावद्
ज्ञातुं प्रमादस्खलितं न शक्यम् ।
जनेषु कः केन पथा प्रयाती·
त्यशेषतो वेदितुमस्ति शक्तिः ।

—म्हणजे प्रतिदिवशीं आपल्याच हातून जे प्रमाद घडतात तेच जर आपल्यास समजत नाहींत, तर प्रजेपैकीं कोण कोणत्या मार्गानें जातो, तें जाणण्याची शक्ति आहे काय, असा दुष्यन्त आपणांसच प्रश्न करितो. व अर्थात् अशा अज्ञात पातकांमुळें माझ्याहि वाड्यांत भुतांचा संचार होऊं लागला असावा.

दुष्यन्त स्वकर्तव्याविषयीं जसा दक्ष होता, तसाच त्याचा पराक्रमहि फार मोठा होता. कारण दुसऱ्या अंकांत कण्वशिष्य म्हणतो—

आशंसन्ते समितिषु सुरा बद्धवैरा हि दैत्यै-
रस्याधिज्ये धनुषि विजयं पौरुहूते च वज्रे ।

—म्हणजे दैत्याशीं युद्ध चालू असतां देव इन्द्राच्या वज्राची आणि या राजाच्या धनुष्याची आशा धरून बसतात.

सातव्या अंकांत इंद्राचें साहाय्य करून इंद्रसारथि मातलि यासह राजा जेव्हां परत येत आहे, तेव्हां इंद्रानें आपल्या अर्ध्या आसनावर राजास बसवून घेतलें, आणि इंद्राचा पुत्र जयंत साभिलाष पाहत असतां त्याकडे नुसतें पाहून आपल्या गळ्यांतील मंदारपुष्पांची माला दुष्यन्ताचे गळ्यांत घातली; असें राजा स्वमुखानें मातलीस सांगत आहे, व मातलिहि "**कल्पलतांशुकेषु दिवौकसस्त्वच्चरितं लिखन्ति।**" म्हणजे देवहि तुझें चरित कल्पलतेपासून केलेल्या वस्त्रावर लिहितात, असें म्हणतो. सारांश, दुष्यन्त मोठा पराक्रमी व तेजस्वी राजा होता.

अशा राजाचा सहजासहजीं कण्वऋषीच्या आश्रमांत प्रवेश होतो, आणि मेनकेपासून उत्पन्न झालेली विश्वामित्राची कन्या शकुन्तला ऐन तारुण्याचे भरांत असतां तिची व राजाची दृष्टादृष्ट होते, व यौवनोचित मनोविकार दोघांचेहि ठिकाणीं उत्पन्न होतात. पण या विकाराला वश होण्यापूर्वी उभयतांच्या चित्तवृत्तींत कसकसें रूपांतर होत जातें, याचें चित्र कवीनें फार फार बहारीचें वठविलें आहे. शकुंतलेला पाहून अंतःकरणांत तिचे प्राप्तीचा अभिलाष जरी उत्पन्न झाला, तरी कोणात्याहि प्रकारचे अविनयाची कल्पनाहि त्याचे मनास शिवली नाहीं. गांधर्वविवाहानें पाणिग्रहण करावयाचें होतें, तरी आधीं ही कोणत्या वर्णाची आहे याचा शोध तो करूं लागला.

'**अपि नाम कुलपतेरियमसवर्णक्षेत्रसम्भवा स्यात्।**' — कण्वऋषीची ही अन्यवर्णाचे स्त्रीपासून उत्पन्न झालेली कन्या असेल तर बरें होईल, असें त्याच्या मनांत येतें; व तो हाच विचार करीत असतां— "**असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा। यदार्यमस्यामभिलाषि मे मनः॥**" म्हणजे माझें थोर मन ज्या अर्थी हिचा अभिलाष धरितें त्याअर्थी ही क्षत्रियानें वरण्यास योग्य असलीच पाहिजे, असा तो तर्क करितो. पुढें जेव्हां शकुंतलेच्या जन्माची कथा तिच्या मैत्रिणींच्या तोंडून त्यानें ऐकिली तेव्हां "**सर्वथा अप्सरःसम्भवा**—" आहे असें समजतांच, मग "**लब्धावकाशो मे मनोरथः!**" म्हणजे माझा मनोरथ सिद्धीस जाण्यास आतां जागा आहे, असें तो म्हणतो. पुढें हिला देऊन टाकण्याचा वडिलांचा विचार आहे असें समजतांच "**भव हृदय साभिलाषं सम्प्रति संदेहनिर्णयो जातः।**" म्हणजे हे मना! आतां तूं तिच्या प्राप्तीची आशा धर; कारण, जो संदेह होता,

तो आतां फिटला, असें तो आपल्या मनाशीं म्हणतो. परंतु लग्नाच्या या गोष्टी निघाल्यावर शकुंतला रागानें जाऊं लागली, तेव्हां मागून जाऊन तिचा हात धरावा अशी मनांत बळकट प्रेरणा होऊं लागली असतांहि " **अनुस्यास्यन् मुनितनयां सहसा विनयेन वारितप्रसरः** " राजा विनयानें आत्मसंयमन करून जागचे जागींच बसतो. दोन झाडांना पाणी शकुंतलेनें घालावयाचें राहिलें होतें, तें घालून जा, असें प्रियंवदेनें सांगितल्यावर या ऋणांतून शकुंतलेस मोकळी करण्याकरितां राजा आपल्या हातांतील आंगठी देण्यास तयार होतो, तेव्हां " मला जा किंवा रहा असें सांगणारी तूं कोण ? " असें म्हणून शकुंतला जेव्हां न जातां तेथेंच घुटमळते, तेव्हां तिच्या मनाची ती स्थिति पाहून तो म्हणतो " **किं नु खलु यथा वयमस्यां एवमियमस्मान्प्रति स्यात्** ॥ " म्हणजे माझें मन जसें हिच्या ठिकाणीं आसक्त झालें आहे तसेंच हिचेंहि माझ्या ठिकाणीं आसक्त झालें असेल काय ? माझा मनोरथहि सिद्धीस जाण्याचा संभव दिसतो; कारण–

वाचं न मिश्रयति यद्यपि मे वचोभिः
कर्णं ददात्यभिमुखं मयि भाषमाणे ।
कामं न तिष्ठति मदाननसम्मुखी सा
भूयिष्ठमन्यविषया न तु दृष्टिरस्याः ॥

—जरी ती समक्ष माझ्याशीं बोलत नाहीं, तरी मी बोलत असतां मजकडे तोंड फिरवून, कान देऊन, मी बोलतों तें ऐकते. माझ्या तोंडासमोर जरी ती उभी राहत नाहीं तरी तिची दृष्टि बहुधा दुसरीकडे जात नाहीं. सारांश– " **कामं प्रिया न सुलभा मनस्तु तद्भावदर्शनाश्वासि ।** " अशा प्रकारें शकुंतलेच्या ठिकाणीं जरी त्याचें मन अत्यंत आसक्त झालें होतें, तरी धर्ममर्यादेचें अतिक्रमण करणें त्याच्या स्वप्नींहि आलें नव्हतें, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कारण दुसऱ्या अंकांत " **भो वयस्य ते तापसकन्यका अभ्यर्थनीया दृश्यते ।** " असें जेव्हां विदूषक म्हणतो, तेव्हां, " **न परिहार्ये वस्तुनि पौरवाणां मनः प्रवर्तते ।** " म्हणजे त्याज्य वस्तूवर पौरवांचें मन कधींहि जात नाहीं, असें राजा त्यास उत्तर देतो. पुढें तिसऱ्या अंकांत शकुंतलेची प्रकृति अस्वस्थशी त्याचे दृष्टीस पडते, तेव्हां " **किमयमातपदोषः स्यादुत यथा मे मनसि**

वर्तते । " म्हणजे हा काय उन्हाळ्याचा दोष असेल अथवा माझ्या मनांत जसें येतें तसाच हा प्रकार असेल? अशी शंका त्याचे मनांत येतें. पुढें तुला काय होतें तें सांग, असा जेव्हां तिच्या सख्या शकुंतलेला आग्रह करितात, तेव्हां राजा आपल्याशींच म्हणतो "**अत्रान्तरे श्रवणकातरतां गतोऽस्मि ।** " म्हणजे आतां ही काय सांगेल याचें मला भय वाटतें. पुढें राजर्षींचें दर्शन झालें त्यापासून याचेविषयीं अभिलाष उत्पन्न झाल्यामुळें माझी अशी अवस्था झाली आहे असें शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडतांच "**श्रुतं श्रोतव्यम्**" म्हणजे जें ऐकावयाचें होतें तें ऐकलें, असे उद्गार त्याच्या तोंडून निघतात. पुढें शकुंतलेचा प्रणयलेख कानीं पडल्याबरोबर राजा झाडाच्या आड बसलेला पुढें येतो व आपल्या स्वतःच्याहि अभिलाषाची कबुली देतो; आणि स्वजनाला पश्चात्ताप न होईल अशी वागणूक करण्याविषयीं अनसूया जेव्हां सुचविते, तेव्हां "**परिग्रहबहुत्वेऽपि द्वे प्रतिष्ठे कुलस्य मे । समुद्रवसना चोर्वी सखी च युवयोरियम् ।** " म्हणजे " यद्यपि मला पुष्कळ बायका आहेत तथापि त्यांत ही तुमची सखी व समुद्रवलयांकित पृथ्वी या दोनच माझ्या कुळाच्या आधार आहेत " असें सांगतो. राजा जवळ आल्यावर सख्या कांहीं तरी निमित्तानें निघून जातात, हें पाहून दोघींपैकीं कोणी तरी मजजवळ रहा असें शकुंतला म्हणते; तेव्हां, सर्व पृथ्वीचें पालन करणारा तुझें जवळ आहे ना ? असें सांगून त्या चालत्या होतात ! तेव्हां, 'तुला वारा घालूं का ? तुझे पाय दाबूं का ?' अशी विनवणी राजा करतो. तेव्हां वडील माणसांस पसंत नसेल ती गोष्ट मी करणार नाहीं, असें म्हणून ती निघून जाण्याचा प्रयत्न करिते. तेव्हां राजा तिला बळेंच माघारी फिरवतो. तेव्हां अविनय करूं नका, असें शकुंतला राजास निक्षून सांगते. तेव्हां वडील माणसाचें भय बाळगण्याचें कारण नाहीं, कारण कण्वमुनि धर्मज्ञ आहेत व ते तुला दोष लावणार नाहींत; पुष्कळ राजर्षींच्या मुली गांधर्व विवाहानें परिणीत झालेल्या असून त्यांचें मातापितरांनीं अभिनन्दनच केलें आहे. इतकी सूचना राजा करीत आहे, तोच ऐनवेळीं शकुंतलेच्या समाचाराकरितां गौतमीचा प्रवेश होतो, व "**चक्रवाकवधूः आमन्त्रयस्व सहचरं उपस्थिता रजनी**" म्हणजे 'चक्रवाक् पक्षिणी ! तुझ्या सहचराचा निरोप घे, कारण रात्रीचा म्हणजे तुमच्या वियोगाचा समय आला,' अशी सांकेतिक सूचना पडद्यांतून होते; आणि राजा लतामंडपांत लपून बसतो.

गौतमीबरोबर निघून जातांना लतापंडपास उद्देशून शकुंतला पुनर्दर्शनाचा संकेत करते व अशा रीतीनें भरताचार्यांच्या संप्रदायाचें पालन होतें.

तिसऱ्या अंकापर्यंत शृंगाररसाचें शुद्ध व मनोहर स्वरूप पटवून त्या रसाशीं संलग्न जें वात्सल्य त्याची परिसीमा चौथ्या अंकांत केली आहे. ह्या अंकांत वात्सल्याचा उठाव इतका उत्तम साधला आहे कीं, कोणी प्राचीन सहृदय पंडितानें "**काव्येषु नाटकं रम्यं तत्र रम्यं शकुंतला। तत्रापि च चतुर्थोऽङ्कः।**" असें म्हटलें आहे. वात्सल्याचा हा जो पट कवीनें रंगविला आहे. त्यामुळें पहिल्या तीन अंकांतील शृंगार ह्या वैलक्षण्यानें अधिकच खुलतो; व पहिल्या तीन अंकाच्या आणि शेवटच्या तीन अंकांच्या मध्यभागीं हा वात्सल्यपट आल्याकारणानें या नाटकाचे जणू दोन भागच होतात. पहिल्या तीन अंकांत शृंगाररसाची उत्तरोत्तर होणारी वृद्धि दाखवून पांचव्या अंकापासून अनुताप व त्यामुळें होणारी चित्तशुद्धि दाखवून शेवटल्या अंकांत वियोगरूपी मेघपटल पश्चात्तापानें वितळून जाऊन पुनश्च पतिपत्नीसमागमाचें गोड फल कवीनें वाचकांस अर्पण केलें आहे. ह्या गोड फलाचाहि आस्वाद अधिक गोड लागण्याकरितां अनुतप्त दुःखाचे आंचेंतून तें परिपक्व केलें आहे. असो.

'पांचव्या अंकांत अनुतापाचा पहिला अंकुर दृष्टीस पडतो' असें आम्हीं म्हटलें आहे, पण या अंकांत नायक आणि नायिका या उभयतांच्या स्वभावांतील कांहीं विशिष्ट गुण दृष्टीस पडतात, तिकडे आपण थोडा वेळ नजर पुरवूं.

दुष्यन्त राजा कामी होता, तथापि वाममार्गानें येन केन प्रकारेण आपली कामवासना पूर्ण करून घेणारा कामांध नव्हता. किंवा वाटेल त्या स्त्रीकडे पापदृष्टीनें पाहणारा नव्हता. शकुंतला कण्वशिष्यांसह राजदरबारांत हजर झाली तेव्हां "**मध्ये तपोधनानां किसलयमिव पाण्डुपत्राणाम्**" म्हणजे पिकलेल्या पानांमध्यें नवीन दल जसें दिसावें तशी ही स्त्री आहे असें आपणच म्हणतो; पण "**दर्शनीया पुनरस्या आकृतिर्लक्ष्यते**" म्हणजे ह्या स्त्रीची आकृति पाहण्यासारखी अथवा रमणीय आहे असें जेव्हां प्रतिहारी म्हणते, तेव्हां "**भवतु। अनिर्वर्णनीयं परकलत्रम्।**" म्हणजे "असो! परस्त्रीकडे निरखून पाहूं नये" असेंच तो म्हणतो. यांत त्याची अधर्मभीरुता व्यक्त होते. दरबारांत शकुंतलेच्या पाणिग्रहणासंबंधें वादविवाद चालू असतां

राजानें जी सहिष्णुता प्रकट केली ती अत्यंत विस्मयकारक आणि सर्वथा अनुकरणीय आहे. या कामांत कण्वशिष्यांच्या दृष्टीनें आरोपित राजाच होता हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. दुर्वास ऋषीच्या शापामुळें राजास गांधर्वविवाह केल्याचें भानच राहिलें नव्हतें. यामुळें सहधर्माचरणाकरितां हिचा स्वीकार करावा असें शाङ्र्गरवानें म्हटल्याबरोबर तो बुचकळ्यांत पडला व " **किमिदमुपन्यस्तम्** ।" म्हणजे हें काय प्रकरण उपस्थित होत आहे ? असे राजाचे तोंडून उद्गार निघाले. तेव्हां व्यवहार आपण उत्तम प्रकारें जाणतच आहांत, म्हणून ही आपल्यास प्रिय असो वा अप्रिय असो, आपण हिचा अंगीकार करावा, असें जेव्हां शाङ्र्गरव आग्रहपूर्वक सुचवितो तेव्हां " **किमत्रभवती मया परिणीतपूर्वा** " म्हणजे या बाईशीं मीं पूर्वी विवाह केला आहे काय ? असें तो विचारतो. हा प्रश्न आल्याबरोबर शाङ्र्गरव रागानें उसळतो. कारण शकुंतलेला अशा रीतीनें फसविण्याचाच हा प्रयत्न आहे, असें त्यास साहजिकपणेंच वाटतें व केल्या कर्माचा द्वेष मनांत उद्‌भवल्यामुळें राजानें धर्मास विमुख व्हावें काय ? असा खडखडीत प्रश्न तो राजास करितो. त्यावर— " **कुतोऽयमसत्कल्पनाप्रश्नः ।** " म्हणजे " अशी भलतीच कल्पना करून आपण हा प्रश्न कसा करितां ? असें राजा त्यास उत्तर देतो, व धर्माचरणापासून च्युत होण्याची ही कल्पनाच खोटी आहे असेंहि सुचवितो. हें उत्तर ऐकून शाङ्र्गरव अधिकच चवताळतो आणि ऐश्वर्यानें मत्त झालेल्या पुरुषाचे ठिकाणीं असे विकार फार वृद्धिंगत होतात, असें म्हणतो. राजा हें उत्तर निमूटपणें ऐकून घेतो आणि शकुंतलेकडे न्याहाळून पाहिल्यावर व तिची दरबारापुढील वागणूक (Demeanour) पाहून तो घोंटाळ्यांत पडतो आणि विचारांत निमग्न होतो. अशा रीतीनें दरबारांत प्राप्त झालेल्या स्त्रीरत्नाचा मीं पूर्वी स्वीकार केला होता कीं नाहीं अशाविषयीं माझें मन दोलायमान होत आहे व प्रभातकाळीं आंत बर्फ पडल्यामुळें भ्रमराला जसा कुंदपुष्पाचा आस्वाद घेववत नाहीं किंवा त्यागहि करवत नाहीं तशी माझ्या मनाची स्थिति झाली आहे, असें तो आपल्याशींच म्हणतो व स्तब्ध राहतो. राजा कांहींच बोलत नाहींसें पाहून, मौन कां धरलें आहे, असा त्यास शारद्वत प्रश्न करितो. तेव्हां राजा म्हणाला ' विचार करून पाहिल्यावरहि या स्त्रीचा स्वीकार केल्याचें मला स्मरत नाहीं, आणि त्यामुळें ह्या गरोदर स्त्रीचा अंगीकार करून

आपल्याकडे क्षेत्रित्वाचा दोष येईल या भीतीनें मला काय करावें हें सुचत नाहीं. ' राजाचे हे शब्द ऐकल्याबरोबर शाङ्र्गरवाच्या पायाची आग मस्तकास जाऊन पोंचते; आणि चोरलेल्या वस्तूचें दानच चोरास देऊन त्याजकडून त्याचा प्रतिग्रह करून घेण्यासारखें आचरण ज्या मुनींकडून घडत आहे, त्याचे वचनाचा अवमान तुम्ही करतां, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे, असें तो म्हणतो. चोराची उपमा भर दरबारांत आपल्या तोंडावर दिली असतांहि राजाची शांति ढळत नाहीं. यानंतर शकुंतला कांहीं खूण पटण्यासारखें दाखविण्यास तयार होते तेव्हां " **उदारः कल्पः** " म्हणजे उत्तम तोड असें राजा प्रत्युत्तर करितो. खुणेची आंगठी हातांतून शचीतीर्थावर पडून गेली असें जेव्हां तिच्या लक्षांत येतें, तेव्हां " **इदं तत्प्रत्युत्पन्नमतिस्त्रैणमिति यदुच्यते** " म्हणजे ' स्त्रियांचा विशिष्ट स्वभाव म्हणजे प्रसंगीं स्फूर्ति होणें तें हेंच ' असे कटु शब्द त्याचे तोंडांतून निघतात. पुढें मृगशावकानें शकुंतलेच्या हातून पाणी प्याल्याची गोष्ट शकुंतला सांगते. तेव्हां अशा मतलबी बायकांच्या गोड शब्दांनीं विषयलंपट पुरुष मात्र फसतात, असें राजा म्हणतो. हे शब्द साहजिकपणें गौतमीसारख्या वृद्ध व निष्कपट तापसी स्त्रियेस दुःसह होतात व ती मोठ्या अदबीनें म्हणते—

" **महाभाग नार्हस्येवं मन्त्रयितुम्। तपोवनसंवर्धितोऽनभिज्ञोऽयं जनः कैतवस्य।** " म्हणजे–' महाराज ! असा विचार आपण मनांत आणूं नये. तपोवनांत वाढलेल्या या मुलीस कपट कसें तें माहीत नाहीं. ' यावर उत्तर देतांना, स्त्रियांच्या हुशारीचा दाखला देतांना कोकिला आपलीं पिल्लें दुसऱ्या पक्ष्याच्या मादीकडून वाढवितात ही गोष्ट राजा सांगतो. पण ही गोष्ट सांगतांनाहि तो स्त्रियांचें कपट असा शब्द न योजतां पटुत्व असेंच म्हणतो. या श्लोकावर उत्तर देतांनाच शकुंतलेचें क्षात्रतेज भडकलें व ' अनार्य ' अशा शब्दानें दुष्यंतास तिनें संबोधिलें. या वेळची शकुंतलेची मूर्ति, व तिचा सात्त्विक स्वभाव पाहून पूर्वींच डळमळीत झालेल्या चित्तांत संदेहाचा प्रादुर्भाव झाला, व " **अकैतव इवास्याः कोपो लक्ष्यते** " म्हणजे—' हा कोप कावेबाजपणाचा नसून खरोखर अंतर्यामींचा आहे ' असें तो आपल्या मनाशीं म्हणतो. व शकुंतलेनें जरी अनार्य या शब्दानें संबोधिलें होतें तरी तो तिला " भद्रे " या शालीनतावाचक शब्दानेंच संबोधितो, व ही गोष्ट मला आठवत नाहीं,

असें म्हणतो. हें राजाचें बोलणें ऐकल्यावर शकुंतला तोंडावर पदर घेऊन रडूं लागते, तेव्हां शार्ङ्गरव तिला रागें भरतो, आणि म्हणतो "**अज्ञातहृदयेष्वेवं वैरीभवति सौहृदम्** " म्हणजे ज्यांचें हृदय आपणांस ठाऊक नाहीं अशांशीं स्नेह केला असतां तो वैरास कारण होतो. हे त्याचे शब्द ऐकतांच "**किमत्र-भवतीप्रत्ययादेवास्मान्सम्भृतदोषाक्षरैः क्षिणुथ।** " म्हणजे या बाईच्या एकटीच्या शब्दावर विश्वास ठेवून तुम्ही एकावर एक आरोप मजवर आणतां? असें तो विचारतो. यावर शार्ङ्गरव राजास टोंचेल असेंच उत्तर देतो. लबाडी अशी जन्मांत ज्यास ठाऊक नाहीं त्याचें बोलणें बेभरंवशाचें, व लोकांस फसविणें हीच विद्या जे शिकतात त्यांचें मात्र वचन खुशाल प्रमाण! असो. हा कोरडा अर्थात् राजावरच त्यानें ओढला. त्यावर राजा म्हणतो, 'बरें, आपण प्रामाणिक, आम्हीं आपलें सगळें म्हणणें मान्य केलें; तरी या बाईस फसवून आम्हांस काय मिळवावयाचें?' त्यावर, आपणांस विनिपात अथवा नरकवास याची इच्छा आहे, असें शार्ङ्गरवानें म्हटल्याबरोबर विनिपाताची पौरव इच्छा करतील ह्या गोष्टीवर भरंवसाच बसत नाहीं, असें राजा म्हणतो. पुढें कण्वशिष्य शकुंतलेस "**पतिगृहे तव दास्यमपि क्षमम्।**" असें म्हणून जेव्हां जाऊं लागले, तेव्हां राजा म्हणतो "**वशिनां हि पर-परिग्रहसंश्लेषपराङ्मुखी वृत्तिः।** " म्हणजे आत्मसंयम ज्यांनीं केला आहे त्यांचें मन परस्त्रीवर कधींच जात नाहीं. यावर शार्ङ्गरवानें प्रश्न केला कीं, दुसऱ्या कांहीं संबंधानें पूर्वींच्या आचरणाचें विस्मरण झालें असेल तर तुमची अधर्मभीरुता कोठून राहणार? यावर राजाचें उत्तर अत्यंत मनन करण्या-सारखें आहे. राजा म्हणतो मला विस्मृति पडली असेल, किंवा ही स्त्री खोटें बोलते, अशी दोन प्रकारें संशय घेण्यास जागा आहे; यामुळें, पहिल्या कल्पनेप्रमाणें मीं स्वस्त्रीचा त्याग केला हा दोष मजकडे येईल. ही स्त्री खोटें बोलते असें मानिलें तर मीं परस्त्रीला स्पर्श केल्याचा दोष मला लागेल; तर यामध्यें तारतम्यानें विचार करून आपणच सांगावें. परंतु राजाच्या या प्रश्नास कांहींच उत्तर न देतां तो सर्व मंडळीसह निघून गेला. या शेवटल्या प्रश्नावरून राजाची न्यायबुद्धि पूर्णपणें व्यक्त होते. अधर्म आपले हातून घडूं नये म्हणून त्याचे चित्तांत सारखी तळमळ लागून राहिली होती. "**स्मरिष्यति त्वां न स बोधितोऽपि सन्**" ह्या दुर्वास ऋषींच्या

शापामुळें त्याचा स्मृतिभ्रंश झाला होता. व त्यांत प्रत्यभिज्ञान अथवा ओळख पटण्याची खूण म्हणून जी आंगठी राजानें शकुंतलेच्या हातांत घातली होती ती शचीतीर्थावर हरवली होती. ह्या अंगठीच्या हरवण्यावरच सर्व संविधानकाची रचना झाली आहे, व ती धीवरास सांपडल्याबरोबर सर्व पूर्ववृत्त राजास आठवलें. हें न्यायाचें काम राजास इतकें त्रासदायक झालें कीं, दरबार खलास झाल्यावर राजा आपल्या निजण्याच्या महालांतच गेला. आपण इंग्रजींत not proven म्हणून ज्या खटल्याला म्हणतों, पण फिर्यादी ह्याच्या एकंदर वागणुकीवरून न्यायाधीशाचे मनाची खात्री झाली असतांहि खटला शाबीत नाहीं असें न्यायाधीशास वाटतें, तशीच दुष्यंताचे मनाची स्थिति झाली होती. कारण ह्या अंकाचे शेवटीं "**कामं प्रत्यादिष्टां स्मरामि न परिग्रहं मुनेस्तनयाम्। बलवत्तु दूयमानं प्रत्याययतीव मे हृदयम्॥**" म्हणजे मीं मुनिकन्येला धिक्कारून घालवून दिली खरी, तिचें पाणिग्रहण केल्याचें मला स्मरत नाहीं; तथापि माझ्या अंतःकरणास जी हुरहुर लागली आहे, तीवरून तिचें म्हणणें खरें असावें असें वाटतें.

यानंतर धीवराचा प्रवेश होऊन आंगठी जेव्हां सांपडते तेव्हां त्यास पूर्वींच्या सर्व वृत्तान्ताची आठवण होऊन पश्चात्ताप होतो. त्या पश्चात्तापाची तीव्रता कंचुकीच्या तोंडून कवीनें वर्णन केली आहे.

रम्यं द्वेष्टि, यथा पुरा प्रकृतिभिर्न प्रत्यहं सेव्यते
शय्याप्रान्तविवर्तनैर्विगमयत्युन्निद्र एव क्षपाः।
दाक्षिण्येन ददाति वाचमुचितामन्तःपुरेभ्यो यदा
गोत्रेषु स्खलितस्तदा भवति च व्रीडाविलक्षश्चिरम्॥

—रमणीय वस्तु डोळ्यापुढें नको; पूर्वींप्रमाणें मंत्रिमंडळाकडून राज्यकारभाराची सुनावणी होत नाहीं. बिछान्याच्या टोंकावर इकडून तिकडे वळतां वळतां रात्रीची रात्र झोंपेशिवाय जाते. अंतःपुरांतील स्त्रियांशीं भाषण करितांना शालीनतेमुळें योग्य उत्तरें देतो, पण भलतीला भलत्याच नांवानें हांक मारतो व मग आपल्याच चुकीची लाज वाटून उदासीन होतो! तसेंच या पश्चात्तापाच्या भरांत राजानें या वर्षीं वसन्तोत्सवासहि मनाई केली होती, इतकेंच नाहीं, तर लतावृक्षांनीं व पक्ष्यांनींहि राजाज्ञेचें पालन केलें

होतें. आंब्याला मोहोर फुटला असतांहि फळ धरत नाहीं, कुरबकाची कळी उमलत नाहीं, शिशिर ऋतु संपून गेला असतांहि कोकिलांचा कंठ अजून फुटत नाहीं. या पश्चात्तापानें त्याच्या मनांत अत्यंत तळमळ वाटते, व तो आपल्या मनाचीच निर्भर्त्सना करितो.

प्रथमं सारंगाक्ष्या प्रियया प्रतिबोध्यमानमपि सुप्तम्। अनुशय-दुःखायेदं हतहृदयं सम्प्रति विबुद्धम्।

—हें माझें करंटें मन प्रियेनें पहिल्यानें जागें केलें असतांहि निजलें आणि पश्चात्तापानें दुःख भोगण्याकरितां आतां जागें झालें आहे. कांहीं कोठेंच करमेना म्हणून बागेंत हिंडतां हिंडतां तो माधवी मंडपांत येतो व कसें तरी चित्ताचें रंजन करावें म्हणून स्वतः हातानें काढलेलें शकुंतलेचें चित्र आणा-वयास चतुरिका दासीस सांगतो व आपण मणिशिलासनावर बसून शकुंतले-विषयीं विविध गोष्टींची आठवण करितो. व शाङ्र्गरवानें 'आमचे मागें येऊं नको,' असें दरडावून सांगितलें तेव्हां "**मुहुर्दृष्टिं बाष्पप्रकरकलुषा-मर्पितवती। मयि क्रूरे यत्तत्सविषमिव शल्यं दहति माम्।**"—डोळ्यांत पाणी आणून तिनें मजकडे जें वारंवार पाहिलें तें विषानें माखलेल्या शल्याप्रमाणें माझ्या हृदयास टोंचत आहे, असें तो म्हणतो. शकुंतलेची आतां भेट होणें दुष्कर आहे असें त्यास वाटतें आणि आकाशांत संचार करणाऱ्या कोणीं सत्त्वानें तिला नेली असावी असा विदूषकाचा तर्क राजास दुःसह होतो. त्या पतिव्रतेस स्पर्श करण्याचें साहस कोण करणार आहे, मेनका शकुंतलेची आई असें मीं ऐकिलें आहे व तिच्या कोणीं मैत्रिणीनें तिला नेली असावी, असें राजा म्हणतो. शकुंतलेला पतिदेवता असें उपपद या वाक्यांत राजानें लाविलें व अशा पतिव्रतेला स्पर्श करण्याचें कोणाचे अंगीं सामर्थ्य आहे? मेनकेची सखी सानुमती राजाच्या ह्या विप्रलंभोक्ति अदृश्य रूपानें ऐकत होती. राजाचे हे शब्द ऐकून अर्थातच तिला फार आनंद झाला; व "**सम्मोहः खलु विस्मयनीयः न प्रतिबोधः।**" म्हणजे इतकें प्रेम जर पूर्वीचें होतें तर त्याचा विसर कसा पडला याचेंच आश्चर्य वाटतें. राजाला तिची पुनः आठवण झाली याचें कांहीं नवल नाहीं. तिचे आईबाप तिला पुनः पाठवून देतील असें सांगून विदूषक राजाचें समाधान करूं पाहतो, पण तिची पुनः भेट होणेंच शक्य नाहीं, असें राजास वाटून तो म्हणतो—

स्वप्नो नु माया नु मतिभ्रमो नु
क्लिष्टं नु तावत्फलमेव पुण्यम् ।
असन्निवृत्यै तदतीतमेव
मनोरथानामतटप्रपातः ॥

—शकुंतला तर गेलीच असें वाटून तो दुःखानें विव्हल होतो आणि शकुंतलेच्या हातांतल्या नाममुद्रेच्या आंगठीकडे पाहून तिला शकुंतलेच्या करांगुलींत स्थान मिळालें असतां तीहि आपल्याप्रमाणेंच अधन्य आहे असें म्हणतो. इतक्यांत ती शकुंतलेच्या हातांत कशी आली असा विदूषक प्रश्न करितो. हा प्रश्न ऐकतांच ती आंगठी शकुंतलेच्या हातांत घालण्याचा प्रसंग मूर्तिमंत त्याच्या डोळ्यांपुढें उभा राहतो व मुद्रेवरचें एकेक अक्षर प्रतिदिवशीं वाचतां वाचतां शेवटलें अक्षर येतें न येतें तोंच माझ्याकडील माणसें तुला न्यावयास येतील या वचनाची त्यास आठवण होऊन तें वचन आपण विस्मृतीमुळें पाळलें नाहीं असें तो म्हणतो. हें वचन जर पाळण्यांत आलें असतें तर किती बहार होती ! असें सानुमती आपल्याशींच म्हणते. त्या आंगठीच्या कमनशिबाचीच कहाणी राजा आपल्याशीं सांगत आहे, व विनाकारण मीं तुझा त्याग केला, त्यामुळें मला आतां पश्चात्ताप होत आहे, करितां मजवर दया कर व मला दर्शन दे, असें शकुंतलेस संबोधून म्हणत आहे. इतक्यांत चित्राची पाटी हातांत घेऊन चतुरिका दासी येते व ती हातांत घेऊन जें जें चित्रांत न्यून होतें तें तें पूर्ण करण्यास राजा लागतो व राजाचें हें चेष्टित पाहून–"**सदृशमेतत्पश्चात्तापगुरोः स्नेहस्यानवलेपस्य च ।**' म्हणजे, "पश्चात्तापामुळें वृद्धि पावलेल्या स्नेहास व शुद्धचरितास हें अनुरूपच आहे." चित्रदर्शनामुळें पश्चात्तापाचें पर्यवसान करुणरसांत होत चाललें, तोंच अमात्याचें पत्र राजाचे हातांत पडतें व अनपत्यतेच्या कारणानें धनमित्राचें धन राजाचे तिजोरींत जमा व्हावयाचें–असा मजकूर वाचतांच– "**कष्टं खल्वनपत्यता**" असे शब्द त्याच्या तोंडून निघतात; आणि धनमित्राच्या स्त्रियांपैकीं कोणी गरोदर असल्यास शोध करावा असें तो म्हणतो. त्यास एका बायकोचा पुंसवनसंस्कार झाल्याची खबर आहे, असें प्रतीहारी सांगते. असें असेल तर गर्भाकडे बापाच्या मिळकतीचा वारसा असणें योग्य आहे असें दिवाणास कळविण्या-

विषयीं तो आज्ञा करतो व या विचारतरंगांत असतांच, माझ्याहि राज्याची अशीच स्थिति होणार, हा विचार मनांत येऊन "**धिङ्मामुपस्थित-श्रेयोऽवमानिनम्**" म्हणजे शकुंतलारूप श्रेय घरीं चालून आलें असतां मीं तिला झिटकारलें याबद्दल मलाच धिक्कार असो, असें तो म्हणतो. हा जो विषाद त्याचे मनास होतो, तेंच त्याचे पश्चात्तापाचें पूर्वस्वरूप होय. या अत्यंत विषण्ण मनःस्थितींतच 'स्वर्गलोकीं माझे पितर माझ्या पश्चात् त्यांना कोणी तिलांजलि देण्यास नसल्याकारणानें त्यांच्या डोळ्यांतून जे अश्रु येतील ते धुऊन जें उदक अवशेष राहील तेंच प्राशन करतील' असे अत्यंत करुण उद्गार त्याचे मुखांतून निघतात, व त्यास मूर्च्छा येते ! ही मूर्च्छा येतांच तत्क्षणींच शकुंतलेला राजाचे समोर आणून उभी करावी असें सानुमतीच्या मनांत येतें. पण देवच अभीष्ट घडवून आणणार आहेत, अशा इंद्राच्या मातुःश्रीच्या तोंडच्या शब्दांची तिला आठवण होते, व तोंपर्यंत वाट पाहणेंच बरें असें ती म्हणते व निघून जाते. शकुंतलेचें स्मरण होऊन राजास मूर्च्छा येते, येथपर्यंत पश्चात्तापाची मजल गेलेली दाखवून राजाचें समाश्वासन पुनः होण्याकरितां मातलीच्या प्रवेशाची योजना कवीनें केली आहे, व विदूषकाशीं मातलीनें जें वर्तन केलें त्याचें कारण राजाची मूर्च्छा नष्ट व्हावी हेंच होतें, असें मातलि राजास सांगतो. पश्चात्तापाची पराकाष्ठा येथपर्यंत दाखविल्या-नंतर सातव्या अंकांत उभयतांच्या समागमाचा मधुर प्रसंग कवीनें वर्णिला आहे. यांत केवळ पत्नीच्या पुनःसमागमाचाच सुयोग न दाखवितां अपत्य-स्नेहाचें रमणीय चित्र कवीनें रेखाटलें आहे. सहाव्या अंकांत अनपत्यतेमुळें राजा अत्यंत दुःखी झाल्याचें वर्णन केलें आहे. त्या दुःखाचें परिमार्जन तर सातव्या अंकांत होतेंच आहे, पण त्यांतल्या त्यांत पुत्रसमागमाच्या अनपेक्षि-तत्वामुळें दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें आहे. तिसऱ्या अंकांतील शृंगार-रसाचे परिपोषणानंतर शकुंतलेच्या वियोगानें कण्वऋषींस व तिच्या मैत्रिणींस जसें अत्यंत दुःख होऊन करुण रसाचा उमाळा चौथ्या अंकांत फुटतो, तसाच शकुंतलेच्या प्रत्यादेशानंतर पश्चात्तापाचें पर्यवसान संतत्यभावाचे दुःखांत होऊन सातव्या अंकांत भरताचें वीरपुत्रोचित चेष्टित पाहून "**किं नु बालेऽस्मिनौरस इव पुत्रे स्निह्यति मे मनः ।**" असे उद्गार राजाचे तोंडून निघतात. पण न जाणो '**अनपत्यता मां वत्सलयति ।**' म्हणजे

मला संतति नाहीं यामुळें हा वात्सल्याचा विकार माझ्या मनांत उत्पन्न होत असेल, अशी तो आपली समजूत करून घेतो. पुढें तपस्विनीच्या हातांतून खेळणें घेण्याकरितां हात पसरितांना भरताच्या तळहातावर चक्रवर्तित्वाचीं सामुद्रिक लक्षणें राजाचे दृष्टीस पडतात. त्या मुलाचा खोडकर स्वभाव पाहून राजाला अधिकच मोह पडतो व

आलक्ष्यदन्तमुकुलाननिमित्तहासै-
रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन्।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो
धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति॥

हे वात्सल्यरसाच्या परमावधीचे उद्गार राजाचे मुखांतून निघतात. हे उद्गार वाचूनच श्लेगेल नांवाच्या सुप्रसिद्ध शार्मण्य कवीच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या व त्यानें कालिदासाचा धन्यवाद केला. पुढें "हे ऋषिपुत्रा! ऋष्याश्रमाच्या विरुद्ध वर्तन कां बरें करतोस?" असें राजा भरतास म्हणतो, तोंच हा ऋषिपुत्र नव्हे असें तपस्विनी सांगते, तेव्हां व त्यास आवरण्याकरितां राजा त्याचे शरीरास स्पर्श करितो तेव्हां माझ्या शरीरास याचा स्पर्श इतकें सुख देत आहे, तर ज्याचा हा औरस पुत्र असेल त्यास किती बरें सुख वाटत असेल, असें राजा म्हणतो. ते दोघे जवळ जवळ उभे राहिलेले असतां दोघांच्या आकृतींत इतकें साम्य दृष्टीस पडतांच व त्यांतहि राजानें आवरून धरतांच भरत सुटून जाण्याचा प्रयत्न न करतां निमूट उभा राहिलेला पाहून या तपस्विनीस आश्चर्य वाटतें. पुढें हा जर ऋषिपुत्र नसेल तर हा कोणत्या कुलाचा आहे, असा प्रश्न केल्यावर पुरुवंशाचेंच हें संतान आहे, असें तपस्विनी सांगते. त्यावरून हा पौरववंशांतील असल्यामुळें आकारसादृश्य असेल असें समजून त्या काळीं क्षत्रिय वानप्रस्थाश्रम करीत असत त्याप्रमाणें – कोणा तरी वानप्रस्थ राजवंशाचें हें संतान असावें असा तो तर्क करितो. पण जर हा मनुष्यजातीचा असेल तर या देवलोकापैकीं तपोवनांत याचा प्रवेश कसा व्हावा, याचें त्यास गूढ पडतें. पण ह्या मुलाची आई अप्सरःसंबंधाची आहे व त्यामुळें तिचीप्र सूति याच आश्रमांत झाली, हें ऐकल्याबरोबर पुरुवंश आणि अप्सरःसंबंध हीं दोन

आशाजनक प्रमाणें सांपडल्यावर अर्थातच हा आपलाच पुत्र असावा असें त्याच्या मनांत येऊं लागतें. म्हणून ही कोणत्या राजर्षींची पत्नी असावी, असा तो प्रश्न करतो. ह्या प्रश्नास तपस्विनीनें जें उत्तर दिलें, तें राजास मर्मभेदकच वाटलें. ती म्हणाली, धर्मपत्नीचा त्याग करणाऱ्या त्या राजाचें नांव उच्चारावें असें तरी कोणास वाटेल ? हें उत्तर ऐकल्यावर ही सर्व गोष्ट आपल्यास लागू पडते व निदान या मुलाच्या आईचें नांव तरी विचारावें असें त्याच्या मनांत येतें. परंतु त्याची अधर्मभीरुता आणि शालीनता त्यास असा प्रश्न करूं देत नाहीं. आणि " **अनार्यः परदारव्यवहारः।** " म्हणजे परस्त्रीविषयीं अशी पूसतपास करणें हें आर्य मनुष्यास शोभत नाहीं, असें अंतःकरणांत वाटून तो निमूट बसतो. इतक्यांत हातांत मातीचा मोर घेऊन एक तपस्विनी येते, व मुलास म्हणते हे " सर्वदमना ! **शकुन्त-लावण्य** पहा " म्हणजे हा मोर किती छान आहे पहा ? पण " शकुंत-लावण्य " या समस्त पदांतील पहिल्या चार अक्षरांवरून आपली आई शकुंतला आली असें त्या मुलास वाटून, कोठें आहे माझी आई ? असा तो प्रश्न करितो. तेव्हां नांवाच्या सारखेपणानें हा मुलगा फसला असें त्या दोघी म्हणतात. व ' शकुंत–लावण्य ' याच्या अर्थाची फोड करून त्या सांगतात, तेव्हां अर्थात् या मुलाच्या आईचें नांव शकुंतला असावें असें राजाचे मनांत येतें. पण सारखीं नांवें पुष्कळ असतात. तेव्हां नांवाच्या सारखे-पणाच्या उच्चारानेंच मृगजलाप्रमाणें मला दुःख मात्र होईल, असे राजाचे आपल्या मनाशींच तर्क-वितर्क चालत आहेत, तोंच त्या मुलाचे हातांत राखीसारखी मनगटांत जी मनगटी बांधली होती, ती पडल्याचें एका तपस्विनीच्या ध्यानांत आलें, व ती कोठें पडली असें मनांत येतें न येतें तोंच, " सिंहाचे छाव्याशीं खेळतांना याचे मनगटांतून ती पडली असावी " असें म्हणून राजा ती उचलण्यास हात घालीत आहे असें पहातांच त्या तपस्विनी घाबरून आपण तीस हात लावूं नये असें सांगत आहेत ; तोंच राजानें ती उचलली. तेव्हां त्या आश्चर्यानें एकमेकींकडे पाहूं लागल्या. हें पाहून मला उचलूं नका, असें तुम्हीं कां म्हणतां, असा राजानें प्रश्न केला तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, ही अपराजिता नांवाची वनस्पति मारीच ऋषींनीं जातकर्म-

समयीं या मुलाचे हातांत बांधिली; ती भुईवर पडली असतां आई, बाप किंवा स्वतः मुलगा यांशिवाय दुसऱ्यानें उचलूं नये, उचलली असतां सर्प होऊन ती दंश करिते, व असा अनुभव पुष्कळ वेळां आला आहे. हे शब्द ऐकतांच राजाची हा आपलाच मुलगा आहे अशी पक्की खात्री होऊन त्यानें आनंदानें पुत्रास आलिंगिलें. हें पाहून तापसी शकुंतलेला हें वर्तमान कळविण्याकरितां आश्रमांत जावयास निघाल्या. तेव्हां "मला सोडा, मीहि आईकडे जातों" असें तो राजास म्हणूं लागला. या वेळेस सर्वदमनाच्या बालस्वभावाची जी वागणूक कवीनें दाखविली आहे, ती फारच हृदयंगम आहे. "आपण दोघेहि तुझ्या आईचें अभिनंदन करावयास जाऊं" असें राजानें म्हटल्याबरोबर "माझा पिता दुष्यन्त आहे, तुम्ही नव्हे" असें मुलगा म्हणाला; व या विवादावरून राजाची निखालस खात्री होऊन शंकेस जागाच उरली नाहीं. इतक्यांत शकुंतला येते. मलिन वस्त्र नेसलेली, उपवासानें गाल खोल गेलेले आणि विरह झाल्या दिवसापासून केशप्रसाधन न केलेलें—अशी तिची मूर्ति पाहून ही शुद्ध-शील पत्नी माझ्या दीर्घ विरहाचें व्रतच करीत आहे, असे त्याच्या तोंडांतून उद्गार निघतात. आणि तो तिला म्हणतो, "प्रिये, मी तुझ्याशीं निष्ठुर-पणानें वागलों, पण आतां तुलाच माझी ओळख पटण्याचा योग येऊन शेवट गोड झाला!" राजाचे तोंडचे हे शब्द ऐकतांच शकुंतलेचीहि चित्तवृत्ति उचंबळून जाते, व देवानें पतिसमागमाचा हा योग घडवून आणला असें म्हणून ती आपल्या मनास धीर देत आहे. तोंच राजा पुन्हा म्हणतो: "माझ्या मनाला जो मोह झाला होता तो पूर्वस्मृतीनें पार नाहींसा झाल्यामुळें, ग्रहण सुटल्यामुळें रोहिणीचा आणि चंद्राचा जसा पुन्हा समागम होतो तशी सुदैवानें माझ्यासमोर तूं उभी राहिली आहेस," असें राजा म्हणत आहे, तोंच शकुंतला राजाचा जयजयकार करूं लागली. पण अंतःकरणास गहिंवर आल्याकारणानें तिचे डोळे भरून येतात व अर्धेमुर्धे शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडतात न पडतात, तोंच राजा तिला म्हणतो—"प्रसाधनहि ज्यास नियमामुळें घडलें नाहीं असें हें तुझें मुख मला आज दृष्टीस पडलें आहे. यामुळें कंठ सद्गदित झाला असतांहि 'जय' असा जो शब्द या मुखांतून निघाला त्यांतच मी धन्यता मानतों. चिरविरहानंतर सुदैवानें अनपेक्षित रीतीनें पतिपत्नीच्या समागमानें अन्योन्यांच्या प्रेमास भरतें येऊन तीं एकमेकांशीं प्रणयसंलाप करूं

लागत आहेत तोंच बालस्वभावाच्या सहजजिज्ञासेनें प्रेरित होऊन सर्वदमन "आई! हा कोण गे?" असा प्रश्न करतो, व या प्रश्नास प्राचीन आर्य-स्त्रियांस किंवा आधुनिक कालांतहि प्राचीन परंपरेस अनुसरून वागणाऱ्या कुलीन स्त्रियांस शोभणारें असेंच उत्तर ती देते. "हा तुझा पिता" अशा तऱ्हेचें शिष्टसंप्रदायास अनुचित व उत्तानार्थ उत्तर न देतां "बाळा, तूं आपल्या भागधेयास विचार" असें मधुर व मनोहर उत्तर देते. शकुंतलेच्या विरहानें झालेल्या पश्चात्तापाचें परिमार्जन करण्याकरितां व तिच्या पुनर्दर्शनानें झालेल्या आनंदाचे भरांत "तुझा धिक्कार मीं केला यासंबंधानें तुझ्या मनांत जें वाईट वाटलें असेल तें विसर. त्या वेळेस माझ्या मनास अत्यंत संमोह झाला होता. आंधळा मनुष्य गळ्यांत फुलांची माळ घातली असतां ती सर्पच आहे असें समजून ती जशी फेंकून देतो तशीच तमोगुणप्रधान मनुष्यांची चांगल्याविषयीं सुद्धां प्रवृत्ति अशीच असते." असें म्हणून शकुंतलेच्या पायांवर डोकें ठेवतो. हा प्रसंग वाचतांना सुद्धां गहिंवर येतो; मग प्रत्यक्ष प्रयोगरूपानें रंगभूमीवर आल्यानें तो प्रेक्षकांचे अंतःकरणाची खळबळ उडवून देतो, यांत नवल काय आहे? स्त्रीजातीसंबंधानें आपल्या लोकांत दाक्षिण्याचा अभाव आहे, असा पाश्चात्यांचा आपल्यावर एक आक्षेप आहे. पण मीं आतां वर्णिलेल्या दृश्य प्रसंगाचा प्रेक्षकांचे चित्तावर ढळढळीत परिणाम झाल्याचें उदाहरण माझ्या अनुभवांत आहे. एके प्रसंगीं शाकुंतलाचे शेवटच्या तीन अंकांचा प्रयोग मीं शाळेंतल्या विद्यार्थ्यांकडून करविला. त्या वेळेस त्या जिल्ह्याचे कलेक्टरसाहेब तो प्रयोग पाहण्याकरितां मुद्दाम आले होते. शकुंतलेच्या पायांवर डोकें ठेवून तिची क्षमा मागण्याचा हा प्रसंग त्यांनीं जेव्हां पाहिला, तेव्हां स्त्रीजातीविषयीं आमच्या लोकांत प्रशंसनीय दाक्षिण्य होतें व अजूनहि आहे, अशी त्यांची खातरी झाली. व साहेबांनीं तेथल्या तेथेंच मुलांस खाऊ देण्याकरितां २० रुपये मजजवळ दिले. असो. शकुंतला दुष्यंतास पायांवरून उठविते व माझी आठवण कशी झाली म्हणून विचारते. तेव्हां, मागें तुझ्या डोळ्यांतील अश्रु तुझ्या अधरोष्ठावर टपटप गळत होते तेव्हां मीं अज्ञानामुळें त्यांची उपेक्षा केली; आतां तुझ्या पापणीला चिकटलेला अश्रु पुसून टाकून माझ्या दुःखाचें परिमार्जन केल्यावर सांगेन, असें म्हणून चिरविरहानंतर झालेल्या समागमामुळें जे आनंदाश्रु

तिचे डोळ्यांत आले होते, ते तो पुसतो. हे अश्रु पुसतांना राजाच्या हातांतील आंगठी तिच्या दृष्टीस पडते. ही आंगठी सांपडल्यामुळेंच मला तुझी आठवण झाली असें राजा तिला सांगतो, व ती पुनः आपल्या बोटांत घालण्यास तिला विनवितो. परंतु, माझा आतां त्या आंगठीवर भरंवसा नाहीं असें ती म्हणते. इतक्यांत मातलि येतो व मारीच ऋषीच्या दर्शनाकरितां त्रिवर्गानें जाण्याविषयीं सुचवितो. तेव्हां पतिसहवर्तमान वडील माणसांपुढें जाण्यास मला लाज वाटते, असें शकुंतला म्हणते. पण आनंदाचे प्रसंगीं असें करणें उचित आहे अशी राजा तिची समजूत करितो. पत्नीच्या पायां पडून, तिची क्षमा मागून, तिचे डोळ्यांचें पाणी पुसून तिचें जरी समाधान झालें होतें, तरी आपल्या हातून अधर्माचरण घडलें आहे, ही राजाचे मनांतली हुरहूर अजून मिटली नव्हती. ती त्याला शल्यासारखी बोंचत होती, म्हणून मारीच ऋषीस त्यानें झालेली हकीगत सांगितली व कण्वऋषीचा मीं मोठा अपराध केला आहे असें त्यानें निवेदन केलें. तेव्हां दुर्वास ऋषीच्या शापामुळें मोह उत्पन्न झाला, एरव्हीं असा प्रकार होणें अशक्यच होतें, असें राजाचें समाधान मारीच ऋषीनें केलें. सारांश, राजाच्या न्यायानिष्ठेच्या धवल यशावर हा जो कलंक येणार होता तोहि पुसून टाकण्याकरितां दुर्वास ऋषीच्या शापाचें संविधानक योजून नायकाच्या धीरोदात्त चरिताचें यथार्थ चित्र कवीनें वाचकांपुढें ठेवलें आहे. अशा न्यायप्रियतेचीं उदाहरणें ज्या युगांत डोळ्यांसमोर होतीं, तें युग व त्या काळचे लोकहि धन्यच म्हणावे, याहून अधिक काय!

आजच्या विषयाचा एक भाग आतां अवशिष्ट राहिला आहे. त्याकडे आतां मी वळतों. तपोवनाचें रक्षण करणें व त्यांतील तपस्वी जनांच्या संकटांचा परिहार करणें हें राजाचें कर्तव्यच होतें, हें मीं सुचाविलेंच आहे. पण या ऋषिजनांविषयीं प्राचीन राजांची भावना काय होती, याचें दिग्दर्शन कवीनें प्रसंगोपात्त केलें आहे.

(१) ऋषींच्या अंगीं त्यांच्या तपःसामर्थ्यामुळें कांहीं अलौकिक सिद्धि प्राप्त झालेल्या असतात, व त्यामुळें त्यांचें क्षेम त्यांच्या स्वाधीन असतें. "**स्वाधीनकुशलाः सिद्धिमन्तः**" असे पांचव्या अंकांत दुष्यन्ताचे उद्गार आहेत. चौथ्या अंकांत वनलतावृक्षांनीं विविध आभरणें शकुंतलेला पतिगृहीं जातांना दिल्याचा चमत्कार वर्णिला आहे.

(२) त्यांच्या अत्यंत खडतर तपश्चर्येचें अद्‌भुत वर्णन सातव्या अंकांत आहे. मारीच ऋषीच्या आश्रमाचे जवळ जेव्हां विमान येऊन पोंचलें, तेव्हां दुरून त्या ऋषीच्या मूर्तीकडे मातलीनें बोट दाखवून त्या ऋषीच्या तपःक्लेशांचें वर्णन केलें आहे. तें वाचलें म्हणजे आपल्यासारख्या प्राकृत व संसारी मनुष्यास तें केवळ कल्पनासृष्टींतील चित्रण वाटणें साहजिक आहे. अर्धें शरीर वारुळांत बुजून गेलेलें, छातीवर सर्पांच्या काती पडल्या आहेत, व गळ्याभोंवतीं वाळलेल्या वेलांच्या कड्यांचा फांस बसलेला आहे, जटेचा भार खांद्यावर रुळत आहे व त्यांत पांखरांनीं आपलीं घरटीं केलीं आहेत व अशा स्थितींत झाडांच्या खोडाप्रमाणें अचल राहून सूर्यबिंबाकडे स्थिर दृष्टि लावून बसलेली ऋषिमूर्ति मातलीनें बोटानें दाखविली आहे. अंगावर वारूळ चढत आहे, वेलींचीं कडीं शरीराभोंतीं वेष्टन करीत आहेत व पक्ष्यांचीं घरटीं जटेमध्यें होत आहेत, अशा स्थितींत अन्नपाणी, निद्रा वगैरे जीवितास आवश्यक असणाऱ्या साधनांवांचून जीविताचें धारण करणें हेंच अशक्य कोटींतील वर्णन वाटतें. पण ' व्यवसायात्मिका बुद्धि ' होऊन इच्छाशक्तीचें बल वाढून शरीरक्षणाचे साधनाचीहि आवश्यकता न भासण्यासारखें शम-दमादि साधनांनीं सामर्थ्य प्राप्त होत असल्याची कवींची तरी भावना असावी असें वाटतें. व ही भावना पूर्वकालापासून चालत आलेली आहे. श्रीशंकराचार्यांच्या " योगतारावलीं "तील एका श्लोकांत हेंच ध्येय वर्णिलें आहे. तो श्लोक येणेंप्रमाणें:—

सिद्धिं तथाविधमनोविलयां समाधौ ।
श्रीशैलश्रृङ्गकुहरेषु कदोपलप्स्ये ॥
गात्रं यदा मम लताः परिवेष्टयन्ति ।
कर्णे यदा विरचयन्ति खगाश्च नीडान् ॥

याच्याच पुढच्या श्लोकांत निवृत्तिधर्माचरणाचें जें अद्‌भुत वर्णन आहे, तें वाचलें असतां आतांच वर्णिलेल्या शरीरक्लेशाचें कांहींच वाटत नाहीं. मारीच ऋषीच्या तपोवनांत कल्पवृक्षांच्या राई असूनहि तेथील ऋषिजन केवळ वातभक्षण करूनच जीविताचें धारण करितात. सुवर्णकमलांच्या रजःकणांनीं पिंगट झालेल्या जलानेंच अर्घ्यप्रदानादिक धर्मकार्यें करतात. सांप्रत-

काळीं आफ्रिका, कालिफोर्निया, वगैरे प्रदेशांत सोन्याचे कण गोळा करण्याचा जे उद्योग चालू आहे, तसें न करितां आपलीं धर्मकृत्येंच करण्यांत हे ऋषि गढून गेलेले आहेत. बसावयास रत्नाच्या शिला आहेत व सुरलोकांतल्या युवती इतस्ततः यथेच्छ संचार करीत असतांहि त्यांची चित्तवृत्ति ढळत नाहीं. सारांश, कामनिक संकल्प करून ज्या सिद्धीची प्राप्ति व्हावी म्हणून इतर मुनि तपश्चर्या करतात, त्या सर्व सिद्धि प्राप्त असूनहि हे ऋषि तप करीत आहेत; अर्थात् याहि सिद्धीच्या पलीकडे जें कांहीं साध्य आहे, त्याकडे यांचें मन वेधलें आहे. अर्थात् खरा मोक्ष परब्रह्मीं लीन झाल्यानेंच मिळणारा आहे व ती स्थिति जीवशिवैक्य झाल्यानें म्हणजे सर्व संगांपासून मुक्त झाल्यानें व निर्वासन झाल्यानेंच प्राप्त होणारी आहे, अशी कवीची भावना असावी असें वाटतें. अशा भावनेचेच सूचक आणखी दोन श्लोक पांचव्या अंकांत आहेत. त्यांतहि, स्थितप्रज्ञाचें जें लक्षण भगवद्गीतेंत केलें आहे, त्याचेंच साम्य दृष्टीस पडतें. शार्ङ्गरव आणि शारद्वत हे जेव्हां शकुंतलेला बरोबर घेऊन राजवाड्यांत येतात, तेव्हां तो वाडा गजबजून गेलेला पाहतांच "ह्या घरास जणूं काय आगच लागली आहे असें वाटतें," असें शार्ङ्गरव म्हणतो. त्यावर—

> " **अभ्यक्तमिव स्नातः शुचिरशुचिमिव प्रबुद्ध इव सुप्तम् ।**
> **बद्धमिव स्वैरगतिर्जनमिह सुखसंगिनमवैमि ॥** "

—म्हणजे स्नान केलेला मनुष्य अभ्यंग केलेल्याकडे, पवित्र मनुष्य असंगलाकडे, जागा झालेला निजलेल्याकडे स्वैर संचार करणारा मनुष्य बंदिवासांतल्या मनुष्याकडे, ज्या दृष्टीनें पाहतो, त्याप्रमाणें सुखांत आसक्त झालेल्या मनुष्यांकडे मी पाहत आहें, असें शारद्वत उत्तर देतो. सारांश, ऐहिक सुखाची लालसा हाच पाश व हा तोडणें हाच परमार्थ, असा शारद्वताचा कटाक्ष दिसतो. हें निवृत्तिधर्माचें ध्येय हजारों वर्षें आपल्या देशांत रूढ झालेलें आहे व याचेंच चित्र कवीनें ऋषिभूमिका रंगवितांना काढलेलें आहे. ह्या चित्राचा उठाव कल्पनाशक्तीनेंच केलेला आहे असें जरी मानलें तरी केवळ प्रपंचांत अहर्निश चाललेली धडपड व विशेषतः भौतिक सुखाच्या मार्गेंच लागलेल्या राष्ट्रांची सुखसंपत्तीकरितां चाललेली चढाओढ व मत्सर हीं पाहिलीं असतां

कल्पनासाम्राज्यांतील या चित्राचें अंतश्चक्षूनें निरीक्षण केलें असतांहि मनास विश्रांति वाटते व घटकाभर या चित्राकडे मन निश्चल केलें असतां तें तेथेंच रमतें.

असो. येथपर्यंत या चित्रपटाचें प्रदर्शन करून शेवटल्या भरतवाक्यांतील तात्पर्य सांगून मी आपलें भाषण पुरें करितों. नाट्यशास्त्राचे नियमाप्रमाणें नाटकाचे प्रारंभीं मंगलाचरण आणि आशीर्वाद असावा, व तसेंच शेवटींहि कांहीं आशीर्वाद मुख्य पात्रांच्या तोंडून वदवावा, या नियमास अनुसरून राजानें प्रकृतींच्या हिताकरितां प्रवृत्त व्हावें व विद्वान् लोकांचे हिताकरितां वाग्देवीनें प्रवृत्त व्हावें, आणि सर्व शक्तिमान् शंकर हा मला पुनर्जन्माचे पाशापासून मुक्त करो, अशी कवीनें परमेश्वराची प्रार्थना केली आहे. ह्याच गोड प्रार्थनेचा उच्चार करून मीहि आपली रजा घेतों.

शाकुन्तल-नाट्य-सुधा-स्वादें वैदेश्य रसिक लोभविले ।
तो धन्य, जयें कविकुल तैसें हें भरतवर्ष शोभविलें ॥ १ ॥
त्यांतील सुधाबिंदू म्यां वाक्पुटिं धरुनि आज ओगरिले ।
होइन कृतार्थ जरि ते रसिकीं कविगौरवार्थ आदरिले ॥ २ ॥

[सोलापूरच्या साहित्यसभेंत नोव्हेंबर १९१७ मध्यें दिलेलें व्याख्यान.]

* * *

राघवीय परीवाह

(पुस्तकपरीक्षा)

इंग्रजी विद्येशीं ज्यांचा परिचय झाला आहे, ते महाराष्ट्र वाङ्मयाचा तिरस्कार करितात, असा एक आक्षेप कांहीं वर्षांपूर्वी करण्यांत येत असे. तसेंच इंग्रजी शिकलेले लोक प्रायः इंग्रजीच्या द्वारेंच सर्व व्यवहार करितात, त्यामुळें मातृभाषेची सेवा त्यांचे हातून कांहींच होत नाहीं, असाहि आक्षेप करण्यांत येत असे. हे दोन्हीहि आक्षेप निराधार होऊं पहात आहेत, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. अलीकडील आमचे बहुतेक महाराष्ट्र ग्रंथकार थोड्याबहुत प्रमाणानें आंग्लविद्याविभूषित आहेत. कांहीं कांहीं तर पदवीधर आहेत. हें अत्यंत संतोषकारक आहे. आंग्लविद्येच्या अध्ययनानें पहिल्या-पहिल्यानें जरी स्वभाषेविषयीं अनास्था वाटली, तरी परिणामीं आंग्लविद्येच्या संसर्गानें स्वभाषेचा परिपोषच होत जाईल, असा आमचा भरंवसा होता; व तीच गोष्ट सांप्रत प्रत्ययास येत आहे. बंगाल्यांत, पंजाबांत, मद्रासेस, हाच प्रकार दृष्टीस पडत आहे. व मातृभाषेचे मोठमोठे वाली आंग्लविद्याविभूषित आहेत, इतकेंच नाहीं, तर त्या त्या भाषेच्या वाङ्मयांत ज्यांनीं पुष्कळ भर घातली आहे, ते बहुतेक आंग्लविद्याप्रवीण आहेत.

२. असो. आज आम्हांला हे विचार सुचण्याचें कारण हें आहे कीं, आम्हीं या लेखाच्या मथळ्यावर ज्या पुस्तकाच्या नांवाचा निर्देश केला आहे, तें पुस्तक ग्रंथकर्त्यानें अत्यंत आग्रहानें परीक्षणाकरितां आम्हांकडे पाठविलें आहे. ग्रंथकर्त्यांच्या या विनंतीस मान देऊन आम्ही त्या परीक्षणास प्रवृत्त होत आहों, व या कामीं कदाचित् कांहीं अधिक आगळें लिहिण्याचा प्रसंग आला, तर मशारनिल्हे ग्रंथकार त्याबद्दल विषाद मानणार नाहींत अशी आशा आहे. उलट पक्षीं, कांहीं पक्षपात केल्यासारखा भास होईल तर त्यावर आमचें इतकेंच उत्तर आहे कीं, होतकरू ग्रंथकारास तीक्ष्ण वाक्प्रहारानें हताश व हतोत्साह न करितां गोड शब्दांनींच त्याचे दोष दाखवावे, व असें केल्यानें खरी वाङ्मयाची अभिवृद्धि होणार आहे, अशी आमची समजूत आहे. यावरून स्पष्ट दोषांची आम्ही उपेक्षा करूं, असें मात्र कोणीं समजूं नये.

३. राघवीय परीवाहाचे कर्ते रा. रा. विद्याधर वामन भिडे, बी. ए., महाराष्ट्र वाचकांचे परिचयाचे आहेत. ह्यांचा संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांत चांगला अभिनिवेश असून त्यांचे कांहीं गद्यग्रंथ आज पुष्कळ वर्षें प्रसिद्ध आहेत. त्यांची " काव्यकुसुमावली " नुकतीच प्रसिद्ध झाली आहे, व तीवर अनुकूल व प्रतिकूल टीकाहि झाली आहे, असें समजतें. परंतु प्रस्तुत टीकाकारानें ते लेख मुळींच पाहिले नाहींत; यामुळें कोणत्याहि पूर्वग्रहानें प्रस्तुत लेखकाचें मन दूषित झालेलें नाहीं. सारांश, " राघवीय परीवाह" हा भिडे यांच्या काव्यरचनानैपुण्याचें प्रथम फलच आहे, असें समजून हा लेख लिहिण्याचें आम्हीं योजिलें आहे.

४. या काव्यास " राघवीय परीवाह " हें नांव कां दिलें, हें समजणें कठिण आहे. या नांवावरून यांत श्रीरामचरित्र गुंफलें आहे, असा बोध एकाएकीं होत नाहीं. काव्याची जी वस्तु किंवा विषय तिचें दिग्दर्शन सुलभ रीतीनें होईल अशी योजना होणें इष्ट आहे. काव्यकुसुमावलींत गंगावतरणप्रसंगाला जशी " सौमतेयसमुद्धार " ही संज्ञा दिली आहे, तशीच श्रीरामकथेला " राघवीय परीवाह " ही संज्ञा कवींनीं दिली असावी असें वाटतें. पण अशी क्लिष्ट संज्ञा दूषणीय आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रस्तुत काव्य आम्हीं दोन वेळ वाचून पाहिलें. पहिल्या वाचनासच ह्या-विषयीं आमचा अनुकूल ग्रह झाला, हें आम्ही निष्प्रांजलपणें कबूल करितों. ह्यांतील दोषहि दाखवावे अशी ग्रंथकर्त्यांची इच्छा असल्यामुळें आम्हीं तें बुद्धिपुरःसर पुन्हा हातीं घेतलें. या काव्यांतील मुख्य गुण व दोष यांचाच उल्लेख आम्हीं या लेखांत करण्याचें योजिलें आहे.

५. काव्याच्या दृष्टीनें प्रस्तुत कृति चांगली उतरली आहे असें सकृद्दर्शनींच आम्हांस वाटलें, असें वर सांगितलेंच आहे. या चांगुलपणाचे पोटांत कोणकोणत्या गुणांचा समावेश आमच्या मतें झाला आहे, याचें थोडें तरी दिग्दर्शन करणें अवश्य आहे.

६. रस हा काव्याचा आत्मा आहे ही गोष्ट निर्विवाद आहे, व सरसता हा या काव्यांत मुख्य गुण आहे, असा आमचा अभिप्राय आहे. हा रसपरि-पोष कसा होत गेला आहे, हें प्रत्येक प्रसंगाचे अनुरोधानें सांगत गेलें असतां फार विस्तार होईल, म्हणून कांहीं विशेष आल्हादकारक असे जे प्रसंग

आम्हांस दिसले, त्यांचाच मात्र निर्देश येथें करितों. येथें वाचकांस एक सूचना करणें अवश्य आहे, ती ही कीं, जीं जीं रमणीय स्थळें म्हणून आम्ही दाखविणार आहों त्या त्या स्थळीं त्या त्या भाषालंकारामुळें विशेष शोभा आली आहे; व जरी अलंकारांच्या योजनेच्या सदराखालीं पुनः क्वचित् त्यांचा निर्देश करणें जरूर पडलें, तरी सरस प्रसंगांचें परिगणन करितांना हीं स्थळें गाळतां येत नाहींत.

प्रथम सर्गांत रामजन्माचें वर्णन आहे. कथेच्या प्रस्तावनेंत (श्लोक ३) कवीनें "भवार्तिसन्तापशमार्थ हे कृती" असा या काव्यरचनेचा उद्देश सांगितला आहे व तोच उद्देश १० व्या सर्गाच्या शेवटल्या श्लोकांत "शम सर्ग त्यासि वितरो दशम" अशा प्रार्थनारूपानें प्रकट केला आहे. "न विधीन्धनीं हृदय हें करपो" अशी वाग्देवीची प्रार्थना केली आहे, व ती हृदयास भेदणारी आहे. आम्हीहि पण कवीचे मनोरथ सफल व्हावे, असा कवीच्या अर्जास दुजोरा देतों.

श्रीरामाचे जन्मकालीं दृष्टीस पडलेलीं सुचिन्हें, सुतजन्मामुळें दशरथास व त्याच्या समस्त प्रजेस झालेला आनंद व त्या आनंदाचे भरांत केलेला महोत्सव, तदनंतर त्या शिशूंचा शिक्षाक्रम व त्यांचें परस्पर प्रेम, विशेषतः राम आणि लक्ष्मण यांची केवळ निरुपम अन्योन्यप्रीति, हीं सर्व वर्णनें मनोहर उतरलीं आहेत. यांतील उतारे विस्तारभयास्तव आम्ही येथें देत नाहीं.

रा. भिडे यांची कविता क्लिष्ट असते, असा समज आहे, व तो निराधार आहे, असें म्हणण्यास आम्हीहि तयार नाहीं. तरी कांहीं ठिकाणीं गंगेच्या ओघाप्रमाणें यांची कविताहि शांत व प्रसन्न भासते. शिवधनुष्य सज्ज करून सीता हस्तगत करावी या लालसेनें आस्थानमण्डपांत सर्व मोठमोठे राजे जमले आहेत व सीता आपल्या सखींच्या परिवारासह त्या वीरांचें निरीक्षण करीत आहे. इतक्यांत तिची दृष्टि रामाकडे जाते व ती आपल्या सखीस म्हणते :—

तो राम मात्र गमतो पति योग्य हीतें !

याप्रमाणें सकृद्दर्शनीं जरी रामावर तिचें मन आसक्त झालें होतें, तरी शिवधनुष्य सज्ज करण्याचा पण बापानें केला आहे, याची आठवण होतांच ती म्हणते :—

कोठें गिरीशधनु हें खलु वज्रसार
कोठें युवा मृदुल कोमल हा कुमार ।
ह्याच्या करें गुण कसा धनुतें जडेल
माळा कशी मम तदीय गळां पडेल ॥ ४३ ॥
तातें कसा कठिण हा पण घोर केला
लाभेल राम नचि या पति कन्यकेला ।
ऐसा सखीस कळवी क्षितिजा स्वखेद
मुग्धा न ती समजली मणिकाचभेद ॥ ४४ ॥ २

विश्वामित्राची आज्ञा होतांच राम—

टेकोनि भूमिवरि एक सुधन्वकोटी
भूमीकडे मग दुजीस सलील लोटी ।
वामें करें रघुपती मग शिंजिनीतें
जोडावया करि उपक्रम ह्या दुजीतें ॥ ५१ ॥
श्रीकण्ठचापजडिता मग ती खणाणे
घंटावली; नृपसभातल तो दणाणे ।
वामें करें दडपितां धनु तें तडाडे
तें लस्तकावरि उदंड रवें कडाडे ॥ ५२ ॥ ३

* * *

टाळ्या पिटोनि जन तेथ सुरम्य घोष
तेव्हां करी; अमित हो सकळांसि तोष ।
तो काम, ती रति; सुयोग घडोनि आला
ऐसें वदे जन समस्त मनांत धाला ॥ ६१ ॥ ३
रामापरीच भुजविक्रमशालि राम
रामापरी खचित रामचि नीतिधाम ।
सीतेपरी मधुर (रुचिर) कान्ति दुजी न, सीता
सौजन्यसार कमनीयगुणा विनीता ॥ ७२ ॥ ३

प्रस्तुत काव्य रामचरिताचा पूर्वार्ध आहे, व यांत दहा सर्ग आहेत. पांचव्या सर्गांत कैकेयीचें " वरपूरण " आहे व हा सर्ग ह्या काव्याचा गाभा असून अत्यंत सरस वठला आहे. विद्याधरपंतांनीं या काव्यांत छन्दोवैचित्र्य

पुष्कळ साधलें आहे, तथापि या पांचव्या सर्गांत " सवाई " छंदानें फारच बहार केली आहे. हा छंद वर्णानुप्रासादि चमत्कृति करण्यास अनुकूल असून प्रत्येक चरणांत २३ अक्षरें असल्यामुळें संबंध वाक्य घालतां येतें. यामुळें, इतर अल्पाक्षर छन्दांप्रमाणें वाक्याचे खंड यांत पडत नाहींत व अर्थाची हानि होत नाहीं. शिवाय हा छन्द गाण्यास अनुकूल असल्यामुळें वाचणारा नादलुब्ध होऊन त्याला वाचतांना क्लेश न होतां उलटा आनंदच होतो. भिडयांच्या या काव्यांत " अर्थान्तरन्यास", " अनन्वय", " उपमा", " स्वभावोक्ति", इत्यादि अलंकार ओतप्रोत भरले आहेत; पण त्यांतले त्यांत या सर्गांतील हे अलंकार अर्थपूर्णत्वामुळें हृदयांत एकदम खोंचतात.

मन्थरेच्या दुष्ट मंत्रामुळें बहकून जाऊन कैकेयी त्रागा करण्यास प्रवृत्त झाली. ती धरणीवर निश्चल पडल्याचें वर्तमान दशरथास समजतांच तो तिचे अंतःपुरांत आला. तेव्हां—

पतिस विलोकुनि आपटले करपाद तिणें तलिं हो क्षितिच्या
वळवियले रुधिराभ तिणें निज नेत्र मुखावरि भूपतिच्या।
पुनरपि ती पडली मग निश्चल कोपयुता वसुधेवरती
मिटुनि दृशा, तिज यापरि पाहुनि विस्मित होय तदा नृपती ॥ ३ ॥
तिजजवळीं द्रुत जाऊनि तन्मुख सौम्य करें कुरवाळुनियां
तिज पुसलें नृवरें ' कवणें तुज कोपविलें भय सोडुनियां ? '।
नृपकर ती वदली झिडकारुनि ' तूंचि असे मज कोपविलें,
मज म्हणसी दयिता, परि सत्य न तूं मजला नृपते ! कथिलें ' ॥ ४ ॥
वदुनि असे वच ती पडली भुविं निश्चल मूकहि होउनियां
मिटुनि दृशा प्रलयानिल भीषण निश्वसितें वरि काढुनियां।
नृपवर तीस पुसे " गमलें वद कोपद काय तुझ्या मतिला "
फिरफिरुनी कुरवाळुनियां; परि शब्द न ती वदली पतिला ॥ ५ ॥

पुढें कैकयीनें वरप्रदानाच्या प्रसंगाची आठवण दिल्यावर—

दशरथ तीस म्हणे " स्मरती मज जे वर म्यां तुजला दिधले
वरपरिपूरण जाण करीनाचि; मोडिति शब्द कधीं न भले।
त्रिभुवनिं वस्तु असे न खरोखर दुर्लभ जें तुझिया पतितें
प्रिय तव कांहिं असो, तुज देइन, मागाचि जें तव ये मतितें " ॥ १० ॥

पुढें तिनें रामास १४ वर्षें अरण्यवास आणि भरतास राज्यपद मागिल्यावर—

परिसुनि हें प्रमदोक्त महीपति तो खचला, श्रमला, भ्रमला
थरथरला, जणुं घोर भयंकर तो पविपात तया गमला ! ।
मुख गलितच्छवि हो, बधिरा श्रुति भूपतिची अरसा रसना,
अतितर हो चकितांतर चिंतुनि तो पुढच्या तनयव्यसना ॥ १२ ॥

पुढें तिची समजूत करण्याचा दशरथानें पुष्कळ प्रयत्न केला, परंतु—

बघुनि पती वरपूर्तिपराङ्मुख केकयराजसुता कदली
जशि हलते पवनें हलली तशि कोपभरें, मग ती वदली
" वचना तुवां दिधलें मज आहविं तें अजि मोघ करूं बघशी !
उचित न हें तुज सत्य करी वच, नातरि नारकिं तूं पडशी " ॥ २० ॥
वचन असें अतिमात्र भयंकर हें परिसोनि तिचें नृपती
पुनरपि तीस वदे मृदु भाषण तच्चरणांस करोनि नती ।
नृपगण वंदिति यच्चरणाप्रति तो अबला-चरणांस धरी
शिर अपुलें अकिरीटक तत्पदलग्न महीपतिनाथ करी ॥ २१ ॥

कैकेयीच्या पायावर डोकें ठेवून दशरथ तिला म्हणतो—

" तव भरताप्रति अर्धहि मामक देइन राज्य अशंकमनें
सकलहि राज्य तयासि समर्पिन इच्छिति हें जर तूं कमने ! ।
भरत जसा तव पुत्र तसा मम तद्धित गोड असे मजला,
परि मम राम असो मज सन्निध हें विनवी सखि ! मी तुजला " ॥२४॥
दशरथभाषण गद्गदकण्ठज वाहवि दृग्जलसंततिला
परि वळवूं न शके पविकर्कशदुष्टविचारयुता मतिला ।
धरिल शिलाफलिका कशि मार्दव ठेवुनि संभृत वन्हिवरी
शिजवियली जलपूर्ण घटामधिं घालुनि वत्सर पांच जरी ? ॥ २६ ॥

कैकेयीची या वेळेची निष्ठुरता कवीनें फार मार्मिकतेनें वर्णिली आहे—

" अनलहि होइल शीतल, निश्चल वायुहि, धर्म करील कृपा,
हरिहि अमत्सर होइल तो, परि सोडिन मी नचि सर्ग नृपा ! ।

* * *

पुनरपि तो वदला तिज यापरि ठेवुनि मस्तक तच्चरणीं
" मम असु जातिल मत्तनयासह, हर्ष कसा तुज मन्मरणीं ? ।
वचन तुझें अतिदारुण जाळुनि गात्र मदीय असूंस हरी
मजवरि कोप नको दयिते ! करुं, दाव दया मज अल्प तरी ॥ २९ ॥

* * *

नृपगण वंदिति पादयुगा मम, हत रिपू मज कांपति ते,
परि मज कोणि सहाय नसे अजि ! गांजिसि गे तव कां पतितें ?

* * *

शरण नसे मज देव, न दैत्य, न पार्थिव एकहि या समयीं,
हतबल मी, हतवीर्य, हतोत्सव; काय गती मम या समयीं ?

परंतु कैकेयीचा एकच निर्धार, आणि तो कांहीं केल्या ढळेना. तिनें एकच उत्तर दिलें :—

" मज पुढती तव रोदन निष्फल, कुत्सित भाषण वा नमन,
वरयुग पूरविं आज, अतां, मम जाण फिरेल कधीं न मन. "

यानंतर निरुपाय होऊन दशरथानें रामास बोलावून आणिलें, आणि—

नृप वदला मग त्यास " चतुर्दश वत्सर तूं वनवास करीं,
भरत चढो युवराजपदावरि, खेद न तूं हृदयांत धरीं

* * *

अतितरदारुण हें वदणें मम कां विधिनें लिहिलें निटिलीं ?
धरुनि जटा वनिं नेसुनि वल्कल वास करोनि रहा जटिलीं
मम असु तूं अससीच बहिर्गत; त्वद्गमनोत्तर जातिल ते
मम तनुला त्यजुनी, सुमनें जशिं वातविकंपित जाति लते ॥ ४६ ॥

* * *

सुख विनयादि गुणें तुजपासुनि सेवुनियां इतुके दिनही
विनिमय मी वन देत असें पय सेवुनि दे विष जेविं अही ।
मजसि पिता अभिधा उचिता नाचि, राक्षस मी, तुजला अहित
उचित मला दिसतो अधमाधम वास शरीरिगणासहित " ॥ ४८ ॥

पितृवच हें परिसूनि अनाकुल राम तया वदला विनयें
" करिन तुझें वच, राहिन मी वनिं, मन्मनिं भीति मुळींच नये।
पितृसुखकाम असे जन हा, युवराजपदोत्सवकाम न हा,
वनवसती मज होइल दुःखद ही धरि मी तव कां मन ? हा ! " ॥ ४९ ॥

यानंतर रामानें कौसल्येस सर्व वृत्त निवेदून, तिचें सांत्वन करून, सीतेला व लक्ष्मणाला बरोबर घेऊन वनास जाण्याचा निश्चय केला. येथपर्यंत सवाई वृत्तांत रचना करून ८१ श्लोकांनंतर पुनः एकवार वृत्तांत बहारीचा बदल केला आहे. त्या वृत्ताची अक्षररचनाच अशा वनवासप्रसंगास उचित आहे व प्रत्येक चरणांत औदासीन्याची आणि शोकाची छटा असल्याचा स्पष्ट भास होतो. त्याचा एकच मासला येथें देतों :—

स्वानुगांसवें रथांत राम बैसला पथांत
प्राजिता रथा सुमंत्र पाठ ज्यास अश्वतंत्र।
मागुनीहि तो सुराय पोंचवावयास जाय
पौर चालले सदार दुःख त्यांस हो अपार ॥ ८३ ॥

पुनः ८८।८९ श्लोकांत वृत्तान्तर केलें आहे व त्यांत सुंदर अलंकार गुंफला आहे :—

न एकही पौर जया न दुःख हो
न दुःख तें वाहवि बाष्प जें न हो !
न बाष्प तें जें न अनूपिता मही
करी, अवस्था मज वर्णवे न ही ॥ ८९ ॥

सर्गाचे शेवटीं, करुणरसपरिपाक करण्याची केवळ मूसच अशा हरिणी वृत्ताची योजना केली आहे.

मग परतला खिन्नें चित्तें गृहास महीपती
शरण न दिसे तेव्हां कोणी यमाविण त्याप्रती।
पुरजन पुढें गेला रामासवें विपिनाकडे,
अविरत महीपृष्ठा त्यांचे सपंक करी रडें ॥ ९३ ॥

सर्ग ६ यांत रामाच्या वनगमनाचें वर्णन आहे. यांत अयोध्येच्या पौरांस रामविवासनामुळें जें दुःसह दुःख झालें, त्याचें चित्र कवीनें रेखाटलें आहे. यांत वत्सलरसाचा परिपोष फार मनोहर वठला आहे. हा सर्ग वाचतांना

वाचकांस रामगमनप्रसंगाचा प्रत्यक्ष भास झाल्यासारखा वाटतो, व रामविरहाचा साक्षात् अनुभव आपण घेत आहों, असें क्षणभर वाटतें. या सर्गातील कांहीं चटकदार प्रसंग मासल्यासाठीं येथें देतोंः—

" रामाच्चिया मागुनि सर्व गेले
साकेतवासी गुणलुब्ध केले ।
सरोजगन्धाढ्य समीरणातें
न सोडिती भृंग अहो ! कदा ते ॥ ३ ॥
साकेतवासी विपिनास रामा–
मागूनि साऱ्यांहि उदश्रु रामा ।
सोडूनि गेल्या पुर रामवाटे,
तयांस पुत्रापरि राम वाटे ॥ ४ ॥
निजार्भकाक्रोश मना न आणी।
तयास बोले मधुरा न वाणी ।
उगे तयाला जननी करीना,
पानार्थ ती त्यास उरा धरीना ॥ ५ ॥

रामाच्या नैसर्गिक गुणांवर पौर इतके लुब्ध झाले होते कीं, ते रामाबरोबर वनास जाण्यास सिद्ध झाले.

रामासवें घोर अरण्यवासा
करूं; धरूं कर्कश वल्कवासा ।
करूनियां मंदिर पर्णशाला
राहूं पुरी वस्त्र गृहें कशाला ? ॥ १७ ॥
वनांत सेवूं फल कंद मूल
रामासवें; देतिल ते न शूल ।
समान त्याचें अमुचेंहि भोग्य,
त्यांवाचुनि जें जगणें अयोग्य ॥ १८ ॥
पक्षी निजा सोडुनि चङ्क्रमातें
अनोकहाग्रीं बसले पहा ते ।
रोमन्थ हेही न पशू करीती,
काडी तृणाची न मुखीं धरीती ॥ १९ ॥

न वायु वाहे, न महीरुहांचें
हाले पहा एकहि पर्ण साचें ।
मूलानुबन्धें धरिती धरेतें
आम्हांसवें नातरि तेहि येते ॥ २० ॥

* *

रामापरी राम मनोऽभिराम
रामापरी रामचि नीतिधाम ।
रामापरी राम गुणी न अन्य,
धन्य प्रसू किन्तु न आजि धन्य ॥ २२ ॥

* *

अरे सुमन्त्रा ! रथ थांबवावा
तुवां वना राम न रम्य न्यावा ।
दे आमुचा राम अगा ! अम्हांतें
नेतोस कोठें वद गा तयातें ॥ २५ ॥
नेऊं नको राम वनास लांब,
दे आमुचा सुंदर राम, थांब ।
नेऊं नको वाहुनि त्यास दूर,
आम्हांसि दे राम कुमार शूर ॥ २६ ॥

पौरांचा असा आक्रोश ऐकून रामानें सुमन्त्रास रथ थांबविण्यास सांगितलें आणि पौरांचें समाधान करण्याकरितां तो त्यांस म्हणाला:—

वना न या, जा परतोनि गेहा,
सुखें रहा, हीच असे ममेहा ।

* *

मोडूं शके मी नचि तातशब्द
जातील सौख्यें मनुसंख्य अब्द ।
येईन मी सत्वर; बाष्पतोय
ढाळूं नका तें अविषह्य होय ।

* *

जें प्रेम रामीं भवदीय होतें
मत्सोदरींही भरतीं असो तें ॥

सातव्या सर्गात वनांतून मार्ग आक्रमण करीत असतां झालेलीं मुनींची दर्शनें, गुहाची भेट व सुमन्त्रास दिलेला निरोप वगैरे स्थळें बरींच चित्तवेधक आहेत, त्यांपैकीं शेवटल्या प्रसंगांतील रामाची पित्राज्ञाधारकता, शान्ति, नम्रता आणि लक्ष्मणाची रामावर निरुपम भक्ति हीं विशेष हृदयंगम आहेत—

भो सुमन्त्र ! परतोनि जा पुरा;
भृत्यभाव तव जाहला पुरा

* *

अर्पुनी प्रिय पित्यासि मन्नती
क्षेम सांग अमुचें तयाप्रती !

* *

वन्य वास करितों अशङ्कधी
कीं कुलासि न कलंक यो कधीं ।

* *

पार्श्ववर्ति मम तो सहोदर
हा असे, मज वनीं न हो दर ।

* *

वन्यवास मम संपल्यावरी
जाण येइन फिरोनि मी घरीं ।
आशि तावक वनांत रक्षणा
आमुच्या क्षम असे विचक्षणा ॥ ४५ ॥

याच प्रसंगांत लक्ष्मणाची उक्तिहि त्याच्या भ्रातृधर्मास साजेशीच आहे—

प्रेष्ठ सोदर मदीय ज्या स्थलीं
त्या स्थलीं मज मिळे सुखावली ।
पूज्य राम मज देवदेव हा
त्यांसवें स्थिति मला सुखावहा ॥ ५७ ॥

सीतेचीहि ह्या प्रसंगींची शान्ति वर्णनीय आहे; ती निरोप देतांना सुमंत्रास म्हणते—

स्वस्ति ते परत जा, नको रडों
शोकसागरिं वृथा नको पडों ॥ ६६ ॥
अर्पुनी गुरुजनांसि मन्नती,
शंसुनी कुशलिता तयांप्रती ।

* *

युष्मदीयाचि कृपा अम्हांप्रती
सेववी विविधभोगसंतती ।
नंदनोपम करी इथें वना;
दे न काय गुरुची कृपा जना ? ॥ ६८ ॥

रामकथेच्या ओघांत भरतभेटीचा प्रसंग म्हणजे एक करुणरसाचा गंभीर प्रवाहच आहे व आजपर्यंत रामचरितामृतांत ज्या कवींनीं अवगाहन केलें आहे, त्यांनीं आपल्या काव्यप्रातिभेची परमावधि हा प्रसंग वर्णितांना केली आहे. विद्याधरपंतांनींहि ह्या प्रसंगीं आपलें काव्यरचनानैपुण्य उत्तम प्रकारें प्रगट केलें आहे. तुझ्याकरितां कैकेयीनें हें राज्य मिळविलें आहे, असें भाषण वसिष्ठ गुरुजींच्या तोंडून ऐकल्यावर—

भरत त्यास वदला " न इथें क्षण
करिन वास, मज तो असुलक्षण ।
पुर अराम पितृकाननसें असे,
वन सराम मज सुंदर सद्मसें ॥ २३ ॥
नमुनि रामपद होइन मी कृती,
धरुनि रामहि मनीं मधुराकृती ।
मजसि रामचि, तदन्य न ठाउका,
मजसि दाविल तदन्य न भावुका ॥ २४ ॥

* *

मजसि तोचि गमतो प्रिय संतत,
प्रिय सखा मजसि तो अधिदैवत ।
प्रिय पिता मजसि राम, गुरूहि तो,
विभव तोचि मज संतत दावितो ॥ २७ ॥

जनक तोच जननी गुरु तो मला,
सुख निरञ्जनहि देइल तो भला।
मज तदंघ्रिरज दैवतसें गमे,
न इतरत्र मन मामक हें रमे ॥ २८ ॥

रामदर्शनाविषयीं आतुर होऊन रामाचा शोध करीत करीत तो चित्रकूटास आला. तेथें त्यानें दुरून राम, सीता आणि लक्ष्मण यांस पाहिलें. या त्रिमूर्ति त्याच्या दृष्टीस पडल्या त्या वेळचें त्यांचें ठाण, त्यांचा वेष याचें चित्र एक एका श्लोकांत कवीनें मोठ्या कुशलतेनें रेखाटलें:आहे व हें वर्णन वाचतांना या पृष्ठावर या त्रिमूर्तीचें रंगीत चित्र देण्याची कवीनें तजवीज केली असती, तर फार बहार झाली असती, असें सहज मनांत येतें. पुढील आवृत्तींत ही उणीव भरून निघेल, अशी आमची उमेद आहे.

अजिन पांघरुनि, वल्कल नेसुनी,
भसितलिप्ततनु दिव्य जणों मुनी।
उपलखंड बसला समधिष्ठुनी
रघुपति रुचिर मूर्ति न याहुनी ॥ ५२ ॥
जवळि तेथ बसली वसुधासुता
पतिमुखार्पितदृशा शमसंयुता।
चरणसंवहन ती पतिचें करी
कमलकोमलतलीं अपुल्या करीं ॥ ५३ ॥
अनुज लक्ष्मण सचाप तया स्थलीं
क्षितितलावरि बसे विहिताञ्जली।
रुचिर मूर्ति न अशा भुवनामधीं
मनुज एकवटल्या बघतो कधीं ॥ ५४ ॥

याप्रमाणें रामास पाहिल्यावर —

रघुवरास दृढ घालुनिया मिठी,
भरत लावुनि तदीय मुखीं दिठी।
प्रमदनिर्भर मनें रडला तदा,
हरपल्या सकळही भरतापदा ॥ ५७ ॥

* *

स्वगत तो भरत भाषण यापरी
रघुवरास कवटाळुनिया करी।
भरतभक्तिपरि भक्ति न भूवरी,
कवण मात मम हे न म्हणे खरी ॥ ५९ ॥
" प्रिय सखा मजसि राघव भेटला
अधिक ज्याहुनि न राज्य गमे मला।
चिर अदृष्ट दिसला मज राम हा,
खचित धन्यतम मी भुवनीं अहा! ॥ ६० ॥
त्रिदिववास मनुजा न खरोखरी
मधुर राम सहवास मिळे तरी।
मजपरी इतर धन्य न मानव,
मजसि रामपरिरंभणवैभव. " ॥ ६१ ॥

मग रामानें कुशलप्रश्न विचारल्यावर, भरतानें दशरथनिधनाचें वृत्त निवेदन केलें. नंतर रामानें यथाविधि दशरथाचें अन्त्येष्टिकर्म केल्यावर भरत रामास म्हणाला—

असासि अग्रज म्हणोनि महापदा
उचित तूं अनुज मी न विशारदा!।
अधिकृतास अधिकार सुभोग्य हो,
वृषल वेदपठणास अयोग्य हो! ॥ ८२ ॥
तव पदावरि बसों तरि मी कसा?
बुध अशा सतत निंदिति साहसा।
तुजपुढें उचित किंकर मी खरा
नमवुनी स्वशिर जोडुनिया करा ॥ ८३ ॥

यावर रामानें उत्तर दिलें—

" बघुनि भक्ति तव मद्विषया खरी
हृदय मामक उदण्ड सुखा वरी! ॥ ८८ ॥
परि मला न पितृशासन मोडवे,
तनययोग्य सरणीहि न सोडवे।

मज वनीं वसति, राज्यधुरा तुला,
दशरथें मनुसमा दिधली मुला ! ॥ ८९ ॥
तव मनीषित न हें करवे मला,
विनति हेहि तव होइल निष्फला ।
जनकशब्द मज मान्य असे जसा
तुजहि मान्य, न अमान्य, असो तसा ॥ ९० ॥
मनुमितें निघुनि जातिल वत्सरें,
न कळतां अवधि हा पलवत् सरे ।
म्हणुनि धीर भरता ! न तुझा गळो,
भय तुझ्या न हृदया लव आतळो ॥ ९१ ॥

* *

धरिं न राग अपुल्या जननीवरी,
तिजसि आचरण योग्य सुता करीं ।
पुरविले वर तिचे जनकें अगा !
प्रकटि ती निरभिलाष तुला जगा ॥ ३ ॥

यावर—

भरत त्यास वदला मग " पादुका
मजसि दे करुत त्या जनभावुका ॥ ९६ ॥

* *

मजसि राखितिल सत्पथिं त्या सदा,
प्रकृतिलाहि चिर होतिल सौख्यदा ॥ ९७ ॥
तव पदावरि त्या बसवीन मी,
प्रतिनिधित्वचि असो मज मी, शमी ।
तव निवर्तन अपेक्षित मी समा
मनुमिता, न अधिका, शुचिविक्रमा ! ॥ ९८ ॥
धरिन मी मुनिजनादृत वल्कलें,
करिन वास वनिं, सेविन मी फलें ।
प्रतिनिधीच तव राज्य करीन मी,
नृपतिं तूं खाचित, मी नचि संयमी ॥ ९९ ॥

मनुमिता उलटतां परि ह्या समा
परतला न दिसलास रघूत्तमा ! ।
तर शिरेन आभिदीप्त हुताशनीं,
समज हें खचित तूं अपुल्या मनीं ” ॥१००॥

येथपर्यंत ह्या करुणरसांत अवगाहन केल्यानंतर भरतास व वाचकांसहि पुढील आक्रमण मंदच होणार. म्हणून कवीच्या मधुर व प्रसन्न शब्दांनीं मन्दाक्रान्ता वृत्तांतच ह्या सर्गाचा उपसंहार करूं.

नन्दिग्रामीं मग भरत तो एकला शीघ्र आला
माता पत्नी त्यजुनि मुनिसा वल्कलें तेथ ल्याला
तेथें त्यानें प्रतिनिधिपणें पाहिलीं राज्यतंत्रें,
त्यातें योग्या नृपतिसरणी दावियेली सुमंत्रें ॥ १०९ ॥

पुढील म्हणजे नवव्या सर्गांत अगस्त्यादि मुनींचें दर्शन, पञ्चवटीनिवास, जटायुसंलाप, हेमन्तऋतुवर्णन, ताटकाविटंबन व खरनाश हे प्रसंग आहेत. यांत पञ्चवटीचें व हेमन्ताचें वर्णन बरेंच सरस आहे. या दोन्ही वर्णनांत संस्कृत शब्दांचा भरणा बराच आहे, तथापि सृष्टिवर्णनाचे मासले म्हणून त्यांतील कांहीं भाग वाचकांस सादर करितों.

मग राम त्या घटभवा विचारुनी,
अनुजांगनासह निघोनि तेथुनी ।
करि वास पञ्चवटसंघसुंदर
स्थलिं नन्दनाप्रतिहि जें त्रपाकर ॥ ३० ॥
स्थल रम्य हें खगकदंबकूजितें
गमलें तिघांस हरिणीविलोकितें ।
स्थगिताम्बरान्तर उदग्र येथले
तरु भव्य सुंदर तयांस वाटले ॥ ३१ ॥
तरुपत्रकम्पजसमुत्थमर्मर
गमला तिघांसि तिथला मनोहर ।
अनिलोद्धतोच्चलितकीचकोद्भव
श्रवणांस तोषकर जाहला रव ॥ ३२ ॥

आतां हेमन्तवर्णनाचा नमुना पहा—

तिलसेवना, हसनिकामुखा, घृता,
रमणीय जो करितसे समागता ।
ऋतु तो अतां क्षितिवरी प्रवर्तला,
सरला ऋतु स्खलितवीर्य मागला ॥ ४३ ॥

* *

तरुपत्र संपुट चिताम्बुसुंदर,
तुहिनव्रजोपहतकान्तिभास्कर ।
ऋतु हा हरिन्मणिसवर्णशाद्वल
परिपक्कशालिविलसन्महीतल ॥ ४५ ॥

वरील अवतरणांवरून विद्याधरपंतांच्या प्रस्तुत काव्याची योग्यता वाचकांचे ध्यानांत आलीच असेल. परंतु आरंभीं सुचविल्याप्रमाणें त्यांच्या या काव्यांत अनेक स्थलीं उपमा, अर्थान्तरन्यास आणि अनन्वय या अलंकारांनीं लहान लहान वाक्यांना सुभाषितांची योग्यता आली आहे; व या अल्पशा वाक्यांनीं मागील वाक्यांतील अर्थ खुलून तो वाचकाचे हृदयांत ठसतो. अशा वाक्यांचे थोडे मासले येथें देतों. हीं कांहीं कालानें सुभाषितांप्रमाणें लोकांच्या तोंडीं बसलीं तर आम्हांला त्यांत नवल घाटणार नाहीं.

(१) सरत्न लोहाभरणास हांसती (१–३)
(२) सुखेंचि कालास तनुत्व येतसे (१–४८)
(३) यदा नर प्राज्य सुखासि लाहतो
तदंश अन्यासहि देउं पाहतो (१–५१)
(४) गुणमंडितत्व करि पात्र मानवा
अभिवादना, सतत आदरा, स्तवा (३।८८)
(५) कलुषित जें मन मत्सरें नसे
प्रमुदित वीर्य बघोनि होतसे (४–५८)
(६) सुख सुतभव्य जसें जननीप्रति
दे सुख वस्तु न अन्य तसें (५–११)
(७) कवि म्हणतात सुपुत्र तयासचि
पित्रनुशासन जो करिता (५–४५)

(८) दृढतमसंतमसोत्तर ज्यापरि
दीप धरी अधिका रुचितें (५-६७)
(९) पतिभजनप्रवणा रमणी इह कोण
न गा! वळवी पतिला? (५-७०)
(१०) अवार्य होतात मनोविकार
तेव्हां गळे हो! सदसद्विचार (६-३०)
(११) अगर्ह्य वा गर्ह्य न कोपविद्ध
जाणों शके मानव हेंचि सिद्ध (६-३१)
(१२) विलापवाणी परिसोनि शस्त्री
होतोचि धैर्यस्खलनें अहो स्त्री। (६-३२)
(१३) आरक्तता जो उदयासि वाहे
अस्तासिही तो रवि रक्त राहे (६-५०)
(१४) निश्चय स्थिर वसे यदन्तरीं
त्यासि येइल सहिष्णुता खरी॥ (७-२८)
(१५) वस्तु सुंदर सदैव सुंदर (७-२९)
(१६) शब्दभंग भयदायि यन्मना
तोचि होय महनीय सज्जना। (७-३५)
(१७) पाहिली न, लिहिली न, ऐकिली
पातकावलि अशी न कल्पिली। (७।६२)
(१८) खलधीस धर्म वळवी न वा भय,
न दया, प्रसंग न, विवेक वा नय (९-१६)
(१९) नर कोण साधुसहवास लाभतां
सुख अंतरीं अनुभवी न तत्त्वता (९-३९)
(२०) असतां सशर्कर सुलभ्य गोरस
नर तक्रपानिं न करील मानस (९-५७)
(२१) अतिउष्णही सलिल नैव पेटवी
सदनासि हें वचन बोलती कवी॥ (९-५९)

विद्याधरपंतांनीं संस्कृत आणि महाराष्ट्र या दोन्ही भाषांतील वाङ्मयाचा उत्तम अभ्यास केला आहे आणि या दोन्ही वाङ्मयांतील माधुर्याच्या

आस्वदाचा संस्कार त्यांच्या वाणीस झाला असल्याचीं ठळक उदाहरणें प्रस्तुत काव्यांत ठिकठिकाणीं दृष्टीस पडतात. दुसऱ्या सर्गांत विश्वामित्रास दशरथ राजाचा प्रश्न :—

शाधि मां, कथय संचितकर्मन्!
किं तवाभिलषितं स्थिरशर्मन्?।
पात्रभूतमिह पश्यसि भृत्यं,
ब्रूहि किं स कुरुतां तव कृत्यम् ॥ ८

दशरथाचा निरोप घेतांना विश्वामित्रानें दिलेला आशीर्वाद :—

रामयानमिदमास्ति सदन्ते;
साधयामि; भवतात्कुशलं ते

तसेंच सर्ग ४ यांतील परशुरामाचा रामास निरोप :—

भवतु शुभं तव वीर! याम्यहं
तव बलमस्तु सदा सुखावहम्।
विसृज जनच्छलघोरपातकम्।
हृदि वचनं च निधेहि मामकम् ॥ ४। ६६

हे श्लोक एखाद्या संस्कृत काव्यांतहि शोभतील; व विश्वामित्र आणि परशुराम यांच्यासारख्या तपोधनांच्या तोंडीं हीं संस्कृत पद्यें फार उचित आणि रमणीय आहेत. परंतु सर्ग ७ श्लोक ७० ह्यांत रामानें सुमंतास संस्कृतांतच निरोप दिला आहे, तो प्राकृतांत अधिक शोभला असता.

महाराष्ट्र वाङ्मयाच्या दृढ परिचयाचीं दोन सुंदर उदाहरणें यापुढें देतों :- दशरथपुत्रांच्या विद्याग्रहणाचा समारोप कवीनें केला आहे तो असा :—

ते चापीं गुणखंडण प्रकटिती, चापल्य बाणासनीं
चिंता अध्ययनीं, सदैव गुरुच्या ईर्ष्याहि संलोभनीं।
गीतामाजि सरागता, प्रकृतिही क्रूरा द्विषन्मंडलीं
यन्त्रादी दृढबन्ध पद्यरचनेमध्यें, मुलें चांगलीं ॥ १।८५

खरनाशप्रकरणांत रामाचें हस्तलाघव कवीनें पुढें लिहिल्याप्रमाणें वर्णिलें आहे.

इषुधीमधोनि सुटला, गुणावरी
चढला, तिथोनि उठला कदा तरी ?
शर यातुदेहिं घुसला तरी कदा ?
पडला कदा भुविं कळे न हें तदा ॥ ९।७१

विद्याधरपंत छन्दःशास्त्रांत पारंगत आहेत, हें त्यांनीं साधलेल्या वृत्त-वैचित्र्यावरून स्पष्ट आहे. प्रस्तुत काव्यांत श्लोकसंख्या ८६९ असून, एकंदर २६ निरनिराळ्या छंदांची त्यांनीं योजना केली आहे. या २६ वृत्तांपैकीं फार कठिण अशीं १० वृत्तें या काव्यांत दृष्टीस पडतात. या वृत्तवैचित्र्यांत यति-भङ्गादि दोष नाहींत, ही गोष्ट अत्यंत समाधानाची आहे.

छान्दोभङ्गादि दोष जसे नाहींत, तसेंच व्याकरणदृष्टीनेंहि दोष फारच विरळ आहेत. क्वचित् या दोषांचेंहि वैकल्पिक न्यायानें मण्डण करण्यासारखें आहे, हेंहि आम्ही कबूल करितों.

येथपर्यंत आमचें काम आम्हांस, वाचकांस व ग्रन्थकर्त्यास प्रिय असेंच होतें. गुणप्रशंसा चन्द्रप्रकाशाप्रमाणें सर्वांसच आल्हादकारक असते. परंतु दोषदर्शनाची गोष्ट तशी नाहीं. न्यायाधीश कितीहि न्यायी व दयार्द्र अंतः-करणाचा असला तरी त्याच्यापुढें पिंजऱ्यांत उभा राहणाऱ्या आरोपितास तो यमासारखाच भासतो. विद्याधरपंत विद्वान् आहेत व होतकरू–नव्हे चांगले सराईत व नामांकित–कवि आहेत. त्यांचे दोष दाखविण्यांत आम्ही त्यांचा पक्षपातच करीत आहों. व 'राघवीय परीवाहा'चा उत्तरार्ध व आणखी त्यांच्या लेखणींतून उतरणारीं काव्यें प्रस्तुत काव्याहूनहि सरस उतरावीं अशी आमची मनापासून इच्छा असल्यामुळें, आम्हांला स्वतःला अप्रिय अशा या दोष-दर्शनाच्या कामास आम्ही प्रवृत्त होत आहों, एवढें सांगणें पुरें आहे.

विद्याधरपंतांच्या कवितेंतील मुख्य दोष क्लिष्टता होय. ही क्लिष्टता त्यांच्या काव्यांत येणाऱ्या संस्कृत शब्दांच्या भरण्यामुळें बहुधा उत्पन्न झालेली असते. क्वचित् प्रसंगीं त्यांची कल्पना ढगाच्या आड लपलेल्या ताऱ्याप्रमाणें अस्पष्ट व अंधुक अशी भासते, व ती अशी भासण्याचें कारण कवीनें ती कल्पना व्यक्त करण्यास जितके परिश्रम घ्यावयास पाहिजे होते तितके घेतले नाहींत, असेंच आम्हांस वाटतें. या प्रकाराचीं कांहीं उदाहरणें खालीं देतों.

मेष जाय हरिकुंजसकाश
मेळवील तरि तो **तनुनाश** २।१६

जी गोष्ट आपल्यापाशीं नाहीं, पण जी हवीशी वाटते, ती आपण मेळवितों किंवा मिळवितों. पण मृत्यु कोणासहि हवासा नाहीं. तो टळत नाहीं ही गोष्ट खरी, पण तो सर्वांस नकोसाच आहे. मुक्तीसारखा मृत्यु नाहीं व तो मिळविण्याचा यत्न कोणी करीत नाहीं, म्हणून चौथा चरण आम्ही पुढें लिहिल्याप्रमाणें योजूं—

"त्या अवश्य घडतो तनुनाश"

दुसरें उदाहरणः—

जों लोकबान्धव नसे गगनीं उदेला
तों दावितात उडु, **मानुनि न,** प्रभेला ३-५५

'मानुनि' यास कर्ता कोण? **मानुनि न** या चार अक्षरांच्या ऐवजीं "आपुलिया" असें वाचलें तर अर्थाचा किंवा छंदाचा भंग न होतां दुर्बोधता जाईल.

तिसरें उदाहरण—

त्यक्तवेल न कधींहि सागर
पाहिजे, जरि झटे निशाकर ७-१८

या चतुर्थ चरणाचे ठिकाणीं पुढें सुचविलेला चतुर्थ चरण अधिक सुबोध होईल असें आम्हांस वाटतेः "सुप्रसन्न जरि हो निशाकर ॥"

नीतिमत्त्व तुज **बाढ** शोभवी
प्रायशःस्खलितजन्म मानवीं ७-२६

या श्लोकार्धांत "बाढ" या शब्दाचे ऐवजीं "फार", "थोर", "पूर्ण" ह्यांपैकीं एखादा शब्द घातला किंवा "तुज बाढ" याऐवजीं 'तुजलागिं' असा पाठ घातला तर बाढ हा अरूढ व अप्रसिद्ध संस्कृत शब्द टाळतां येईल. तसेंच "प्रायशःस्खलितजन्म" या ८ अक्षरीं समासघटित शब्दांऐवजीं "जें दिसे विरल अन्य" अशीं सोपीं आठ अक्षरें घातलीं असतां अर्थहानि होणार नाहीं.

आतां संस्कृत शब्दांची प्रचुरता या दोषांकडे वळूं. हा दोष थोड्याआधिक प्रमाणानें सर्व सर्गांत दृष्टीस पडतो. तथापि नगरें, भूप्रदेश, नद्या, सभामण्डप इत्यादिकांचे वर्णनांत विशेषतः नजरेस येतो. क्वचित्प्रसंगीं तर आपण संस्कृत काव्यच वाचीत आहों कीं काय, असा वाचकांस भास झाल्यास नवल नाहीं. कारण कांहीं ठिकाणीं विसर्ग, अनुस्वार, इत्यादि विभक्तीचीं विकरणें मात्र नाहींत. त्यांखेरीज सर्व रचना पूर्णपणें संस्कृतमय आहे. याचीं ठळक ठळक उदाहरणें येथें देतों.

भ्रमिष्णुकिंजल्कहतालिसंतति –
सहस्रपत्रोत्करतोरणांप्रति १-४०
घनत्वरुद्धार्यमदीधितिव्रजा
सहस्रपत्रोत्करगुम्फिता स्रजा १-४१
ध्वजाग्रविस्तारितकौशिकाम्बर –
प्रकम्पजन्य ध्वनिही मनोहर १-४२
आस्थानमंडप उभारविला विशाल
भूपें उपस्करणशोभितदीर्घशाल ।
प्रालम्बमानपृथुमौक्तिकरत्नमाल
कौशेयवस्त्रपिहितार्कमरीचि जाल ॥ ३-२४
रत्नाढ्यहाटकमहासनसंस्थितांनीं
भूकन्यकापरिणयोत्सुकमानसांनीं ।
राजन्यधर्मसमवायविभूषितांनीं
ती शोभली जनकराजसभा नृपांनीं ॥ ३-३१
जनौघ तो शोकविनष्टशक्ति
निर्दिष्टकाकुत्स्थगुणौघभक्ति
कुमारकांमागुनि चालिला हो !
भूमी तदीयास्रुजलाविला हो ॥ ६-१५
स्नानक्रियाध्वस्तशरीरसंगा
सान्निध्यमात्रार्पितपापभंगा
पानप्रसंगोद्धृतरोगनीरा
ऱ्हादिनी सस्यसमृद्धतीरा ॥ ६-७७

दिग्दंतिशुंडाहततुंगभंग
लब्धाप्सरोवृन्दसदंगसंग ।
वृन्दारकस्नानपवित्र नीर
पाहोनि हर्षे रघुवंशवीर ॥ ६-७८
रुद्धभास्कर दीधिती, विटप्राग्रचुंबितखान्तर
जान्हवीजलधौतमूल, असंख्यविष्किरकोटर ६-७९

प्रत्येक सर्गांत केवळ संस्कृत शब्द जे आले आहेत, त्यांचें परिगणन करूं लागल्यास कित्येक पानें भरतील व वाचकांस तें कंटाळवाणेंहि होईल. म्हणून तसें करण्याचे भरीस न पडतां केवळ अप्रसिद्ध संस्कृत शब्द व कांहीं संस्कृत-रचनाविशेष मात्र येथें दाखवितों.

किल (१।८) तूर्णं (१-३३) नृपोद्ध (१-५०) विष्टर (२-३) विधिवदर्च्य (२-४) नव्यैं (२-६) स्थिरतपःस्ववदात (२-९) अतिमात्र (२-१४) अतिवेल (२-१५) नैव (२-१७) पुष्पवद्रुचिर (२-४५) मुनीन (२-७३) खळधीन (२-७९) किंतु (२-८०) निरीती (२-८८) बाढगर्व (३-२३) बाढ (३-२७) भूपवार (३-४९) भृश (३-६२) कपीतन (४-२२) अर्यीं (४-७२) अपत्यवन (५-१५) अंग (६-४०) परःशता (६-६४) उच्छ्रायि धेनुमतल्लिका (६-७०).

वर दिलेल्या शब्दांशिवाय दहाव्या सर्गांत पुष्कळ अप्रसिद्ध शब्द आले आहेत. परंतु ज्या अर्थीं कवीनें एका टीपेंत त्या शब्दांबद्दल क्षमा मागितली आहे, त्या अर्थीं आम्ही त्याबद्दल विशेष उल्लेख करीत नाहीं. तथापि जी " नियन्त्रणा " कवीनें त्या सर्गांत स्वतःस लावून घेतली आहे, ती लावून घेतली नसती तर बरें झालें असतें, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. कोणतीहि नियन्त्रणा काव्याच्या स्वैरगतीस निरोध करणारीच होय; व आनंदजनकता हें काव्याचें फल असें जर आपण मानिलें, तर त्या आनंदजनकतेच्या आड ही नियंत्रणा आलीच पाहिजे. इंग्लिश भाषेंत Blank Verse म्हणजे यमकरहित जी पद्यरचना आहे, तींत अर्थहानि न करितां पद्याचा ओघ पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें अप्रतिबन्ध चालतो व त्यामुळें अर्थ लक्षांत येण्यास अडचण न पडतां त्या शब्दाच्या व अर्थाच्या ओघाचे अनुरोधानें वाचकाचें मनहि त्या पद्यप्रवाहांतून सहजगतीनें पोहत जातें. तसाच प्रकार

जर मराठींत रूढ होईल तर यमकांकरितां केलीं जाणारी ओढाताण टळेल व तितकी दुर्बोधताहि कमी होईल. पण ती वेळ अजून जरी दूर असली तरी अनुष्टुप् छंदांत नवीन नियन्त्रणा लावून घेण्याचें कारण नव्हतें. असो.

अप्रसिद्ध शब्दांचे उपयोगापासून जशी क्लिष्टता उत्पन्न होते, तशीच अप्रासिद्ध प्रयोगाचे उपयोगानें काव्यांत दुर्बोधता उत्पन्न होते. अशा क्लिष्ट प्रयोगाचीं दोन-तीन उदाहरणें प्रस्तुत काव्यांत आहेत. तीं येणेंप्रमाणें :–

ज्येष्ठ त्यांत गुरुपूर्व मरीच = मारीच.

दीर्घमध्य सुबहु = सुबाहु.

ऋतु हे यदादि मग मन्त = हेमन्त ऋतु.

याचप्रमाणें क्वचित्प्रसंगीं ज्या अर्थीं जीं विशेषणें रूढ झालेलीं नाहींत, त्या अर्थीं त्या विशेषणांचा उपयोग केला आहे. उदाहरण,

पाव मंगल सदैव **विशाल** (२–३७)

देवो तुला सुरपती कुशला **विशाला** (३–५)

विशाल मंगल अथवा कुशल असा प्रयोग प्रायः रूढ नाहीं. वरील दोन्ही ठिकाणीं केवळ यमकांकरितांच तो योजावा लागला असेल. तथापि त्याची गणना दोषांतच करणें भाग आहे.

तसेंच क्वचित् स्थलीं रूढ झालेल्या उपसर्गरहित संस्कृत नामाचा उपयोग केलेला आहे. 'यस्' या संस्कृत धातूला प्रायः "आ", "प्र" ह्यांपैकीं एखादा उपसर्ग असतो आणि या उपसृष्ट धातूपासून "आयास", "प्रयास" अशीं नामें होतात; परंतु उपसर्गरहित नुसता "यास" अशा नामाचा प्रयोग बहुधा आढळत नाहीं.

कांहीं ठिकाणीं कवीचा अभिप्रेत अर्थ ध्यानांत येत नाहीं. उदाहरण, "होतो मतंगज रसालक तोलनाला पर्याप्त" (३।११) या वाक्यांत "तोलनाला" या पदाचा अर्थ कळत नाहीं. "तोलन" म्हणजे नुसतें "उचलणें" असा असेल तर अर्थाचा पोष होत नाहीं. कारण, मोठ्या हत्तीला ऊंस उचलण्याइतकें सामर्थ्य आहे, असें म्हणण्यांत त्या हत्तीचें गौरव कांहींच नाहीं. "तोलन" म्हणजे "मुळासकट उपटून काढणें" असा जर अभिप्रेत अर्थ असेल, तर तो अर्थ या शब्दाचा होईल किंवा नाहीं, ही शंका आहे.

अप्रसिद्ध संस्कृत शब्द किंवा अपप्रयोग हे जसे दोष आहेत, तसेच काव्यांत कविसमयास विरुद्ध असे केवळ प्राकृत शब्दहि दोषात्मकच गणले जातात. "सुतासि व्यालि" (१-८), "हुडकीन" (२-२७), "सताविती" (४-३१), थांबवावया" (४-६०) हे शब्द या काव्याच्या एकंदर भारदस्त रचनेला फार हलकेसे लागतात.

कांहीं शब्द अप्रसिद्ध अर्थीं योजलेसे दिसतात. उदाहरण, "रते प्रसू पाहुनिया कुमार" या ओळींत "रमे" या अर्थीं "रते" याचा उपयोग केला आहे असें वाटतें. "रत" या शब्दाला सामान्यतः एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. त्यामुळें केवळ "सुख किंवा हर्ष वाटणें" या अर्थीं या शब्दाचा उपयोग करूं नये हें बरें.

शब्ददोष दाखविण्याचे प्रसंगांत अनपेक्षित आणि म्हणूनच निरर्थक शब्दांचेंहि उद्घाटन करणें ओघानेंच आलें. कांहीं ठिकाणीं असे शब्द आहेत व ते बहुधा अपरिहार्य असे दिसतात; तथापि ते दोषरूपच आहेत. उदाहरणार्थ, "समन्वयें पूजियली सुषाष्टिका" (१-३१) या ओळींत 'सु' हें अक्षर नको आहे. हें केवळ पादपूरणार्थीं आहे. ह्या ओळीचे ऐवजीं पुढें दिलेला पाठभेद केला तर चालेल असें वाटतें : "क्षेमार्थ अर्ची मग भूप षाष्टिका।"

कोठें कोठें ग्राम्य शब्दांचा उपयोग आढळतो. क्वचित् सबंध चरण ग्राम्योक्तीच्या कोटींत घालणें भाग पडतें : "पुत्रमोह जर षण्ढ करील केंवि भूप जनकष्ट हरील।" (२-२४) या श्लोकार्धांत "षण्ढ" शब्द कानाला झोंबतो. या चरणांत 'जर षंढ' हे शब्द काढून "हतवीर्य" असा एकच शब्द घातला तर थोडी सुधारणा होईल असें वाटतें. "सुरतोत्सवासि मम उत्सुका मती" हें वाक्य फारच उत्तान आहे. याऐवजीं "अनुरक्त मी तुजवरी स्पृहावती" अशा अर्थाचा चरण योजिला तर बरें होईल.

कवींचें निरंकुशत्व म्हणून ज्यास म्हणतात, अशीं स्थळें विरळ आहेत. "कोणी" याबद्दल कुणी वगैरे शब्द अलीकडे रूढ होत चालले आहेत. पण अशा सामान्य अतिक्रमापेक्षां अधिक निरंकुशत्व दोन-तीनच ठिकाणीं आमच्या नजरेस आलें. "गेलीं सांडोनि तीर्थे" (७-९१) "कुच दाखवी करुनि त्यासि ऊघडे (९-५४) "भूमीतलीं पशुकदंब" (३-६७)

व्याकरणाचे दृष्टीनें पाहिलें असतां या काव्याची भाषा अत्यंत शुद्ध आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तिसऱ्या सर्गांत मात्र एका श्लोकांत अप्रसिद्ध अशीं कर्मणि प्रयोगाचीं चार उदाहरणें आलीं आहेत. तीं व्याकरणाचे नियमाप्रमाणें समर्थन करण्यासारखीं असलीं तरी रूढीला अनुसरून नसल्या-कारणानें कानाला कशींशींच लागतात. या उदाहरणांचें साधक-बाधक प्रमाणांनीं महाराष्ट्रभाषाभिज्ञांनीं यथायोग्य परीक्षण करावें म्हणून आम्ही तो सबंध श्लोक येथें देतों:—

" यांहींच मी प्रशमिताध्वरविघ्न केलों
अंतासि मी अपुलिया विधिच्याहि नेलों ।
यांहींच मी मम मनीषित पाववीलों
यांहींच शमसुखोच्चय दाखवीलों " ॥ (३।८)

पांचव्या सर्गांत ५८ व्या श्लोकांत " चवदा " (गोड, सुखदायक) या शब्दाचा उपयोग केला आहे. हा " धेड–गुजरी " शब्द आहे व मोरोपंतांचे काव्यांत असे अपशब्द जरी असले तरी होतां होईल तों ते टाळावे, हा उत्तम मार्ग आहे.

येथपर्यंत आम्हीं या काव्याचें परीक्षण केलें. व यांतील दोष जरी आम्हीं विस्तारानें दाखविले आहेत, तरी हें काव्य एकंदरींत विचार करितां सरस वठलें आहे, असें आमचें ठाम मत आहे. रसाचा परिपोष, छंदःशुद्धि, व्याकरणशुद्धि, इत्यादि गुणांमुळें सर्वांगांनीं हें काव्य फार आदरणीय झालें आहे, याविषयीं शंका नाहीं. " धावतः स्खलनं न दोषाय भवति " अथवा " धावेल तो पडेल " या न्यायानें या काव्यांत जरी दोष आहेत, तरी दोषां-पेक्षां यांत गुणांचें आधिक्य आहे. व चन्द्रकिरणांत अंक जसा बुजून जातो, तसे या ' गुणसंनिपातां ' त दोषहि बुजून जाण्यासारखे नसले तरी दोषांच्या सान्निध्यानें त्या त्या गुणाला अधिक उज्ज्वलता आली आहे, असें आम्हांस वाटतें. शिवाय जे दोष आम्हीं वर दाखविले आहेत, तेहि केवळ अक्षम्य आहेत, अशांतला मुळींच प्रकार नाहीं. ते सर्व दोष दुसऱ्या आवृत्तींत काढून टाकण्यासारखे आहेत.

या लेखाच्या एकंदर झोकावरून आम्ही विद्याधरपंतांचा बुद्धिपुरःसर पक्षपात करीत आहों, असा वाचकांचा कदाचित् समज होईल. परंतु शब्द-सृष्टीचें विधातृत्व ज्यांच्या भाग्यास आलें आहे असे कवि प्राकृत जनांपेक्षां " लोकोत्तर " असतात, अशी आमची समजूत आहे व अशा " लोकोत्तर " पुरुषांचीं मनें " कुसुमापेक्षांहि मृदु " असतात. परदुःखाच्या संवेदनानें ज्यांचीं मनें इतकीं तळमळूं लागतात कीं, त्या दुःखाचें मूर्त स्वरूप रेखाटून वाचकांचे मनांतहि त्या दुःखाचें संक्रमण करण्याचें सामर्थ्य असतें, अशा कोमल अंतःकरणांवर कठोर आघात करून तीं नीरस शुष्क करून त्यांतून सतत पाझरणारे काव्यरसाचे बिन्दु आटवून टाकणें हें महापातक आहे, असें आमच्या बुद्धीस वाटतें. हे काव्यनिर्झर सतत पाझरूं द्यावे, होतां होईल तों त्या निर्झरांस बंधारा घालून त्यांतून वाहणाऱ्या अमृताचा संचय होईल असें करावें. आणि या अमृतरसांत जर कांहीं परिस्थितीमुळें गढूळपणाचा किंवा शेवाळाचा अंश येत असेल तर तेवढा वर्ज्य करून निव्वळ स्वादु रस असेल त्याचेंच सेवन करावें. परंतु गढूळपणा आहे म्हणून इतस्ततः आघात करून झराच कोरडा पाडूं नये असें आमचें मत आहे. होतकरू लेखकास उत्साह उत्पन्न होऊन अंगीकृत कार्य शेवटास नेण्यास उत्तेजन वाटावें, अशा उद्देशानेंच टीकालेख लिहिणें श्रेयस्कर आहे, अशी आमची भावना असल्यामुळें कठोर शब्द वापरून ग्रंथकारास निरुत्साह करण्यापेक्षां गोड शब्दांनीं त्याचे गुणाचें अभिनन्दन करून दोष काढण्याचा मार्ग सौम्य उपायानें त्यास दाखविणें आम्हांस प्रशस्त वाटलें. हें काव्य प्रथम जेव्हां वाचलें तेव्हां त्याचे मुखपृष्ठावर आम्हीं आपलें मत लिहून ठेविलें. त्यांत सारांशानें आमचा अभिप्राय प्रकट असल्यामुळें तो श्लोक येथें देऊन आम्ही हा लेख पुरा करितों.

" राघवीयपरिवाह " पाहिला
मिष्ट काव्यरस त्यांत चाखिला ।
आंत गोड, कठिन त्वचा वरी,
या कृतीस पनसोपमा बरी ॥

* * *

शास्त्र - कला - रहस्य

काव्याच्या स्वरूपाविषयीं अनेक प्रकारचे विचार संस्कृत व इंग्लिश ग्रंथांत दृष्टीस पडतात. मीं जी विचारसरणी आपल्यापुढें मांडण्याचें योजिलें आहे, ती विचारसरणी कांहीं वर्षांपूर्वी एका इंग्रजी मासिकांत माझे वाचनांत आली, व ती कांहींशी अपूर्व वाटून मीं तिचें टिपण करून ठेविलें. ही विचारसरणी मनन करण्यासारखी आहे. तिची रूपरेषा कायम ठेवून मीं तिची उठावणी मात्र संस्कृत, मराठी आणि इंग्रजी काव्यांचे आधारानें केली आहे. ही विचारसरणी श्रोत्यांस व वाचकांस पटली तर मला संतोषच आहे. न पटल्यास मला विषाद वाटण्याचें कारण नाहीं. एवढें सांगून मी आजच्या विषयाकडे वळतों.

या विश्वाच्या रचनेंत अनेक परस्परविरोधी अशीं द्वंद्वें भरलीं आहेत. या द्वंद्वांचे कलहावर सर्व सृष्टीचा गाडा चालत आहे. हीं द्वंद्वें जरी परस्परांचे विरुद्ध आहेत, तरी त्या दोहींचेंहि अस्तित्व जर नष्ट होईल, तर कांहींच कार्य होणार नाहीं. अशा या विरोधी द्वंद्वांपैकींच **अहं** आणि **अनहं** हें एक द्वंद्व आहे. या दोन्ही शब्दांचा जो प्रचलित अर्थ आहे, त्याहून कांहीं निराळ्या अर्थानें मी आजच्या माझ्या भाषणांत त्यांचा अर्थ करणार आहें. म्हणून **अहं** आणि **अनहं** या दोन शब्दांची थोडी अधिक फोड करणें अवश्य आहे.

लहान मुलास कळूं लागतांच त्यास पहिल्यानें **मी** व **माझें** या भावनेची जाणीव उत्पन्न होते. हें खेळणें **माझें**, ही आई **माझी**, हें घर **माझें**, असें तो म्हणूं लागतो. हीच भावना दृढ होत जातां जातां तो प्रपंच करूं लागतो. या **अहंभावनेचा** अंमल दिवसेंदिवस इतका कडक होऊं लागतो कीं, स्वार्थाशिवाय दुसरें कांहीं एक त्यास दिसेनासें होतें. ज्यास आपण परमार्थ असें म्हणतों त्याचे आड हीच स्वार्थबुद्धि येत असते. ही स्वार्थबुद्धि ज्या प्रमाणानें सुटत जाते, त्या प्रमाणानें प्रत्येक मनुष्याचे हातून परोपकार होत असतो. हें माझें कुटुंब, हें माझें घर, हें माझें गांव, हा माझा जिल्हा, हा माझा इलाखा, हा माझा देश,—अशी या भावनेच्या वाढीची परंपरा असते; व ज्यास आपण स्वदेशाभिमान असें म्हणतों, त्यांत या स्वार्थी भावनेची

परिसमाप्ति होते. परंतु वेदान्ताच्या दृष्टीनें "हें अवघें विश्वचि माझें घर" ही परमार्थाची शेवटली पायरी आहे. या पायरीवर चढून जाण्याचें ज्यांचें भाग्य असेल, ते महात्मे वंदनीय आहेतच. पण आजच्या माझ्या भाषणांत या प्रकारच्या विश्वकुटुंबित्वाच्या भावनेशीं शास्त्रें आणि कला यांचा संबंध जोडून दाखवावयाचा आहे. शास्त्राध्ययन आणि विदग्ध-कलापरिशीलन या कार्यांतहि अहंबाह्य विश्वांत गढून जाण्याचें साधन आहे, हें मला दाखवावयाचें आहे.

मानवी बुद्धि मर्यादित आहे, व सान्त आहे. ती अनंताचें आकलन करण्यास सर्वथा असमर्थ आहे. तथापि अनंतापासूनच तिची उत्पत्ति झाली आहे; व तिचा ती अंश असल्यामुळें या अनंताशीं साक्षात्कार करून घेण्याकडे तिची प्रवृत्ति असते. या प्रयत्नांत यश कमीअधिक येणें हा प्रकार निराळा; पण तसा प्रयत्न सतत चालत असतो सारांश, अनंताशीं तादात्म्य होणें हेंच नरजीवित आहे. अशा प्रकारचें तादात्म्य प्राप्त करून घेण्याचे प्रायः तीन मार्ग आहेतः— १ तत्त्वज्ञानी आणि शास्त्रज्ञ यांचा मार्ग; २ भक्त आणि धर्मज्ञ यांचा मार्ग; ३ कलानिष्ठांचा मार्ग.

तत्त्वज्ञानी आणि शास्त्रज्ञ तर्कसाधनानें अनंताशीं ऐक्य करण्याचा प्रयत्न करीत असतात; सत्य शोधून काढण्याचा त्यांचा उद्देश असतो. व अहं व अहंव्यतिरिक्त जें आहे त्याचें ऐक्य, अथवा ज्ञाता व ज्ञेय यांचें ऐक्य, हेंच अंतिम सत्य होय. आत्म्याची जिज्ञासा अनंताशीं ऐक्य झाल्यानेंच–अनंताचें ज्ञान झाल्यानेंच–तृप्त होणारी आहे.

भक्त आणि धर्मज्ञ हे–षड्गुणैश्वर्यसंपन्न एक परमेश्वर मात्र आहे अशी भावना धरून–त्याच्याशीं तादात्म्य किंवा ऐक्य संपादन करण्याचा प्रयत्न करितात. आपण पामर आहोंत, आपण व्यंग आहोंत, परमेश्वर मात्र परिपूर्ण–सर्वशक्ति–सर्वज्ञ आहे, व आपल्यांत जें न्यून आहे तें त्याच्याशीं तादात्म्य करून त्या योगानें पूर्णावस्थेस पोंचण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. सर्वसमर्थ ईश्वर आपल्यास प्राप्त व्हावा अशी ते इच्छा करितात व त्याची ते भक्ति करितात. म्हणून परमेश्वर प्रेममय आहे असें धर्म सांगतो. व त्याचे ठिकाणीं आत्यंतिकी अनुरक्ति असेंच भक्तीचें लक्षण धर्मग्रंथ सांगतात.

तत्त्वज्ञानी आणि शास्त्रज्ञ तर्काचे साधनानें ज्या सत्यस्वरूपाची उपासना करितात, व भक्त व धर्मज्ञ ज्या षड्गुणैश्वर्यसंपन्नाची भक्तीनें आराधना करितात, त्यालाच कलानिष्ठ लोक आपल्या प्रतिभेनें भजतात. परमेश्वर सर्व सौंदर्याचा निधि आहे अशी कवींची भावना असते. सान्तांत अनन्तत्व हेंच सौंदर्य होय, असें **कँट** यानें सौंदर्याचें लक्षण केलें आहे. आपल्या कृतिकालीं जो आनंदाचा अनुभव आपणांला आला असतो, तोच आपल्या कृतीचें निरीक्षण अथवा श्रवण करणारांस प्राप्त व्हावा, असा कलानिष्ठांचा उद्देश असतो. म्हणून त्यांच्या अंतर्यामांतील भावना व्यक्त करण्यांत त्यांनीं सर्वस्वीं आपली कृति सुंदर होईल याविषयीं जपावें लागतें.

अनंताशीं तादात्म्य करण्याचें साधन शास्त्राध्ययनांत आणि कलापरिशीलनांत असतें, हा आजचा विषय आहे. तेव्हां तें कसें होतें, हें आपण आतां पाहूं.

आपण जेव्हां चिंतन किंवा ध्यान करितों, त्या वेळेस मन निर्विषय असावें लागतें. श्रीज्ञानेश्वर म्हणतात :—

विषयांचा विसर पडे । इंद्रियांची कसमस मोडे ।
मनाची घडी घडे । हृदयामाजी ॥ ८८८।६
ऐसें ऐक्य हें सहजें ॥

ह्याच एकाग्रतेचे संबंधानें ते पांचव्या अध्यायांत म्हणतात :—

मग पांचभौतिक संचलें । जव्हां शरीर असे निदेलें ।
तेथें मनचि राहाटे एकलें । स्वप्नीं जेवीं ॥ ५।५३
इंद्रियांचा गांवीं नेणिजे । ऐसा व्यापार जो निपजे ।
तो केवळ गा म्हणिजे । मानसाचा ॥ ५॥५५
मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें ॥ ५।६०

ह्याप्रमाणें इंद्रियांच्या विषयांपासून मन निवृत्त झालें म्हणजे मनाची जी स्थिति होते ती श्रीज्ञानेश्वरच वर्णन करितात:—

जैसें समुद्रीं लवण न पडे । तंव वेगळें अल्प आवडे ।
मग होय सिंधुची एवढें । मिळे तेव्हां ॥ ५।३५

तसें संकल्पौनी काढिलें । जयाचें मनाचि चैतन्य जालें ।
तेणें एकदेशियें परि व्यापिलें । लोकत्रय ॥ ५।३६

या श्रीज्ञानेश्वरांच्या ओव्यांवरून हें ध्यानांत येईल कीं, आपलें मन जेव्हां एकाग्र होतें, तेव्हां आपल्या स्वतःच्या बाहेर अखिल विश्वांत जें चैतन्य भरून राहिलें आहे, त्या चैतन्यांत आपलें मन बुडून जात असतें. ह्या **स्व**व्यतिरिक्त बाह्य विश्वांतील चैतन्यासच मी " **अनहं** " अशी संज्ञा देत आहें. या **अनहं-रूप** चैतन्यांत मग्न झाल्यानंतर विषयांचा विसर पडून, इंद्रियांची तगमग मोडून, मनाची घडी हृदयांत बसते व ही अवस्था प्राप्त झाली म्हणजे जें सुख होतें, तें केवळ अनिर्वचनीय असतें. या मानसिक सुखास साहित्यशास्त्रांत ब्रह्मानंदाची उपमा दिली आहे.

या सुखाचा थोडाफार अनुभव सर्व साक्षर मनुष्यांस झालेला असतो. अंकगणितांतील एखादें अवघड उदाहरण आपण आपच्याच क्लृप्तीनें सोड-विलें असतां मनास किती आनंद वाटतो, हें सर्व विद्यार्थ्यांस माहीत असतें. तें एक उदाहरण सोडविलें असतां अव्यक्त चैतन्याच्या एका सूक्ष्म अणूवर तरी आपण जय मिळविला, असें मनास वाटूं लागतें. अशा रीतीची एक-तानता प्राप्त करून घेण्यासहि पुष्कळ परिश्रम लागतात. व जसजशी ही एका-ग्रताशक्ति वाढत जाते, तसतसा बाह्यविश्वरूपी चैतन्यावर आपला ताबा अधिक अधिक बसूं लागतो व देहाचें भान समाधिकालांत तरी नष्ट होऊं लागतें. अशी चित्ताची एकाग्रता झाल्याशिवाय कोणत्याहि शास्त्रांत किंवा विदग्धकलेंत वाखाणण्यासारखी प्रगति होत नाहीं. अर्किमेडीस यानें ४७ वा सिद्धान्त सोडविला तेव्हां तो न्हाणीघरांतून नागवाच बाहेर आल्याची गोष्ट सुप्रसिद्ध आहे. एकदां सैराक्यूज शहराला रोमन लोकांनीं वेढा घातला असतां याच शास्त्रज्ञानें रोमन जहाजांवर सूर्यकिरणांचे योगानें आगीचा वर्षाव सतत चालू राहील अशी कांहीं कांचेची रचना करून दिली व आपण पुन्हां आपल्या शास्त्रव्यवसायांत गढून गेला. इकडे शत्रूनें कांहीं फितुरी लोकांच्या मदतीनें दुसऱ्याच एका मार्गानें शहरांत प्रवेश केला.

रोमन शिपाई विजयानें फुशारलेले इकडे तिकडे फिरूं लागले. या शिपायां-पैकीं एक शिपाई गांवांत भटकत असतां ज्या शास्त्रज्ञानें सहा महिने रोमन

लोकांचा आपल्या ज्ञानानें अटकाव केला होता, त्यास त्या शिपायानें अमुक रस्ता कोठें जातो असा प्रश्न केला. परंतु हे शास्त्रज्ञ त्या वेळेस आपल्याच समाधींत होते. "ब्रह्मानंदीं लागली टाळी, कोण देहातें सांभाळी" अशी त्यांची स्थिति होती. त्यांनीं त्या शिपायाचा प्रश्नच ऐकला नाहीं. शिपाईबुवा विजयमदानें धुंद झालेले; त्यांनीं तत्क्षणींच आपल्या तरवारीच्या एका घावानें शास्त्रज्ञाचें शिरकमळ उडविलें. रोमन सेनाधिपति गांवांत शिरतांच त्यानें या शास्त्रज्ञाची बहुमानानें गांठ घ्यावी म्हणून चौकशी केली. व आपल्याच एका अडाणमूठ शिपायानें त्या शास्त्रज्ञाचें डोकें उडविल्याची बातमी जेव्हां त्याला समजली, तेव्हां या शिपायास शासन करून त्या शास्त्रज्ञाचा देह ज्या ठिकाणीं पडला तेथें त्याची त्यानें एक कबर बांधविली. पण इतक्या जुन्या काळची गोष्ट कशास पाहिजे ? सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ व शोधक एडिसन यांचें नांव सर्व सुशिक्षितांस माहीत आहे. हे देवळांत जाऊन धार्मिक विधिपूर्वक आपलें लग्न लावून आले, व परत आल्यावर नित्यक्रमाप्रमाणें आपल्या शास्त्रीय कार्यालयांत शिरले. बरोबर नवपरिणीत वधू होती. पण कार्यालयांत त्यांचेशिवाय इतरांस जाण्याची परवानगी नव्हती. बायको तीन दिवस बाहेर बसून राहिली, तिची त्यांस मुळींसुद्धां आठवण झाली नाहीं. अशा प्रकारची अव्यक्त चैतन्यांत बुडी मारण्याची कला ज्यांस साधेल, त्यांसच शास्त्रांत काय किंवा कलेंत काय असामान्य प्राविण्य येणारच.

अशा निरुपम समाधिसुखाला कांहीं मर्यादा आहे काय, याचा आपण आतां थोडा विचार करूं.

भौतिकशास्त्रवेत्ते काय किंवा तत्त्वज्ञ काय हे सर्व कार्यकारणभाव शोधून अनुमानें बसवीत असतात. परंतु मूर्त आणि अमूर्त हीं दोन्ही या सृष्टींत अनंत आहेत. या दोन्ही प्रकारांचें पूर्णपणें आकलन करण्याचें सामर्थ्य मनुष्याचे बुद्धीस नाहीं. म्हणूनच —

"यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह"

असें उपनिषदांत म्हटलें आहे. आपण सर्व सान्त आहों, पण विश्व अनंत आहे, विश्वाचे पोटांत आम्ही आहों, पण विश्व आमचे पोटांत कसें मावणार ? तथापि या अनंताशीं आपलें साधर्म्य आहे, त्यामुळें त्याशीं एकवटून जाण्याचें आपल्यास साधन आहे, ही गोष्ट पाश्चात्य शास्त्रज्ञांसहि संमत होत चालला

आहे. केवळ आधिभौतिक शास्त्रांच्या दृढाभ्यासानें अहंव्यतिरिक्त जें चैतन्य या सृष्टींत भरलें आहे, त्याचा साक्षात्कार अहंरूपी जीवात्म्याच्या चिदंशास होतो, अशी साक्ष Sir Oliver Lodge यांचेसारख्या शास्त्रज्ञाचे ग्रंथावरून पटते. फार दूर कशाला? आपल्या या भरतभूमीस ललामभूत झालेले जगद्विख्यात **सर जगदीश बोस** यांचाहि अनुभव अशाच प्रकारचा आहे, असें दिग्दर्शन त्यांच्या एका नुकत्याच झालेल्या भाषणांत दृष्टीस पडतें. **सर जगदीश बोस** यांनीं आपल्या शास्त्रीय शोधशाळेचा प्रवेशसमारंभ गेल्या महिन्यांत केला. त्या वेळेस त्यांनीं जें प्रास्ताविक भाषण केलें, त्यांत ते म्हणतात—

"In the pursuit of my investigations I was unconsciously led into the border region of physics and physiology, and was amazed to find boundary lines vanishing and points of contact emerge between the realms of the living and non-living. Inorganic matter was found anything but inert; it also was a thrill under the action of multitudinous forces that played on it. A universal reaction seemed to bring together metal, plant and animal under a common law. They all exhibited essentially the same phenomena of fatigue and depression, together with possibilities of recovery and exaltation, yet also that of permanent irresponsiveness which is associated with death. I was filled with awe at this stupendous generation."

"माझे शोध चालू असतां जड पदार्थविज्ञानशास्त्र (Physics) आणि इंद्रियविज्ञानशास्त्र या दोन शास्त्रांच्या सरहद्दीवरील प्रांतांत नकळत मी झुकलों, आणि या दोन शास्त्रांच्या मर्यादेच्या रेषा नाहींशा होत जाऊन अचेतन आणि सचेतन या उभय सृष्ट प्रकारांत कांहीं बाबतींत अत्यंत संलग्नता किंवा निकट संबंध आहे, हें पाहून मला अचंबा वाटला. निरिंद्रिय वस्तूंसहि चैतन्य असतें, व त्यांचेवर अनेक आघात होतात. त्यांचे योगानें त्यांवरहि एक प्रकारचें स्फुरण होत असतें. खनिज आणि उद्भिज्ज पदार्थ तसेंच प्राणी, ह्या सर्वांस एक सर्वसाधारण नियम लागू असून सर्वविश्वव्यापी अशा शक्तीनें

तीं सर्व एका सूत्रांत बद्ध झालीं आहेत. क्लान्ति, निरुत्साह, तसेंच त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य व संवेदनशून्यता अथवा मरण या सर्व अवस्थांचें स्वरूप या तिन्ही कोटींमध्यें तत्त्वतः सारखेंच असतें. या अचाट निगमनानें माझ्या मनांत सात्त्विक भीति (awe) उत्पन्न झाली."

मुंबईस **सर जगदीश बोस** यांचें युनिव्हर्सिटींत जें व्याख्यान झालें, त्यांत ते म्हणतात :—

"The barriers which separated kindred phenomena in the plant and animal are now thrown down. Thus community throughout the great ocean of life is seen to outweigh apparent dissimilarity. Diversity is swallowed up in unity. In realising this is our sense of the final mystery of things deepened or lessened ? Is our sense of wonder diminished when we realise in the infinite expanse of life that is silent and voiceless the foreshadowings of more wonderful complexities ?

"उद्भिज्ज आणि प्राणी या दोन कोटींमध्यें ज्या सदृश अवस्था आहेत, त्यांची तटबंदी आतां ढांसळली आहे. बाह्यतः जी असदृशता आहे, हिच्याहून भूतमात्रांत संवेदनासाम्यच अधिक प्रमाणांत आहे, असें आपल्या प्रतीतीस येत आहे. अनेकत्व अथवा भेदभाव ऐक्यांत लुप्त होत आहे. ही प्रतीति घडल्यामुळें सृष्टींतील गूढ रहस्याविषयीं आपली जाणीव दृढतर होते किंवा कमी होते ? या अफाट भूतसमुद्रांत याहूनहि अधिक चमत्कार भरलेले आहेत, असें आपल्या प्रतीतीस आलें असतां आपलें सृष्टिरहस्याविषयींचें आश्चर्य कमी होईल काय ?"

अशाच अर्थाचीं अनेक अवतरणें रसायन, ज्योतिष वगैरे शास्त्रांच्या आचार्यांचे ग्रंथांतून पुष्कळ देतां येतील. परंतु हें अगदीं ताजें व आपल्यास साभिमान कौतुक करण्यासारखें म्हणून आपल्या स्वदेशास भूषण झालेल्या शास्त्रज्ञांच्या विचारांचें मीं अवतरण दिलें आहे.

असो. शास्त्रीय व्यासंगांत होणाऱ्या एकाग्रतेमुळें आपल्याव्यतिरिक्त बाह्य सृष्टींत जें चैतन्य भरलें आहे, त्याचा साक्षात्कार होऊन त्यांत मन लय पावतें, ही जशी शास्त्रीय व्यासंगाची, तशीच विदग्ध कलांच्या परिशीलनाचीहि गोष्ट आहे.

विदग्ध कलांमध्यें प्रायः वास्तुशिल्प (Architecture), प्रातिमाशिल्प, (Sculpture), चित्रकर्म (Painting), गायन (Music), आणि काव्य (Poetry) यांचा समावेश होतो. या सर्वांपैकीं पहिली पायरी म्हणजे वास्तुशिल्प होय. या कलेंत अमूर्त असें जें ध्येय असतें, त्याची व्यंजना दगड, विटा, माती अशा जड ओबडधोबड घटकद्रव्यांपासून करावयाची असते, त्यामुळें शिल्पकाराच्या अंतरंगांत जें सौंदर्याचें ध्येय असतें, तें तितक्या नाजूकपणानें व सूक्ष्मतेनें व्यक्त होत नाहीं.

वास्तुकलेच्या वरची पायरी म्हणजे Sculpture होय. पण या कलेंत दगडांत सचेतनाच्या भावाचें संक्रमण होत असतें. दगडावर अशी कांहीं कृति केलेली असते कीं, तो दगड जणूं कांहीं बोलतो आहे किंवा हंसतो आहे, किंवा मनुष्यप्राण्याच्या इतर भावनांचें संवेदन जणूं कांहीं त्यास होत आहे, असा भास होतो. तथापि आत्मस्वरूपाचें निदर्शक म्हणून डोळ्यांत जें पाणी चमकत असतें, त्याची लकेर प्रतिमाशिल्पकलेंत उठणें शक्य नाहीं. ही झांक स्पष्ट उमटविण्याचें सामर्थ्य चित्रकलेंत आहे.

चित्रकलेचीं घटकद्रव्यें अर्थात् अधिक नाजूक–अधिक सूक्ष्म अशीं असतात. कापड, कागद व रंग हीं द्रव्यें दगडापेक्षां पातळ असल्याकारणानें या कलेंत अंतर्गत भावना व्यक्त करण्याचें सामर्थ्य अधिक असतें. तथापि चित्रकलेंत सुद्धां एका क्षणिक भावनेचें मात्र प्रतिबिंब उठतें. अमूर्त आणि अनंत जें तत्त्व आहे, त्याचा जडाशीं आणि साकाराशीं संयोग झालेला असतो. चित्रकार एक गुलाबाचें फूल रंगवीत आहे, अशी आपण कल्पना करूं. तो वरचेवर रेषा काढतो–पुन्हा पुसतो–रंग पातळ किंवा दाट करून घेतो. ही त्याचीं कामें चाललीं असतां परमेश्वरसृष्टींतील गुलाबाचें फूल त्याच्या अंतश्चक्षूंपुढें असतें व त्याचें प्रतिबिंब उमटविण्याचा तो प्रयत्न करीत असतो.

गायनकलेचा विषय सर्वस्वीं संवेदनात्मक आहे. तो अदृश्य, अमूर्त आणि आध्यात्मिक आहे. अंतःकरणांतील अत्यंत गूढ वृत्तीचाहि ठसा श्रोत्यांच्या श्रवणपुटावर उठविण्याचें या कलेंत सामर्थ्य आहे. गायनकलेचें उपकरण नाद अथवा स्वर आहे, व शब्दांचा कार्यभाग झाल्यावरच खऱ्या गाण्यास आरंभ होतो. उदाहरणार्थ, "निजरूपीं जगदाकृति भासा"–ही चीज गातांना पहिलीं नऊ अक्षरें जलद म्हटलीं जाऊन गाण्यांतील आरोहावरोहाची मजा "भा"

आणि " सा " या दोन अक्षरांनंतर घेतल्या जाणाऱ्या तानांवरच होते. शब्दांचे योगानें अंतःकरणांतील भावनेची नुसती सूचना मात्र होते. परंतु गायनाचे द्वारें तिचा प्रत्यक्ष अनुभव प्राप्त होतो. तिचें अंतरंगास संवेदन होतें. यामुळेंच गायनकलेला अचाट मोहनशक्ति प्राप्त झाली आहे.

एवढा वेळ केलेल्या विवेचनावरून हें ध्यानांत आलेंच असेल कीं, वास्तुशिल्प, प्रतिमाशिल्प, चित्रकला, गायन हीं एकांगी आणि अपूर्णच आहेत. सर्वांगांनीं परिपूर्ण अशा कलेंत सर्व परस्पर विरोधी भावनांचें संमिश्रण आणि एकीकरण झालें पाहिजे. गायनकलेपासून होणारें चित्तवृत्तीचें संवेदन आणि वास्तुशिल्प, प्रतिमाशिल्प आणि चित्रकला यांपासून उमटणारें प्रतिबिंब, या दोहोंचाहि समावेश एकाच कलेंत झाला पाहिजे, म्हणजे ती कला परिपूर्ण असें आपल्यास म्हणतां येईल. सर्वांगांनीं परिपूर्ण अशी एक काव्यकला मात्र होय. याची अल्पशी प्रतीति होण्याकरितां मी कांहीं उदाहरणें देणार आहें. पण तसें करण्यापूर्वीं काव्यरचनेच्या व्यवसायांत चित्ताची एकाग्रता कशी होते, हें उदाहरणानें दाखवितों.

कविकुलगुरु कालिदास ऊर्वशीचें वर्णन करतांना म्हणतात :—

चित्रे निवेश्य परिकल्पितसत्त्वरूपा।
रूपोच्चयेन मनसा विधिना कृता नु॥

या श्लोकांत प्रतिमा करणाऱ्या शिल्पकाराच्या व्यवसायाचें यथार्थ निरूपण त्यांनीं केलें आहे. ह्या व्यवसायांत उत्तरोत्तर होणारी कार्यपरंपरा कवीनें मोठ्या चातुर्यानें एका श्लोकार्धांत वर्णिली आहे. मूर्तिकाराला अमुक भावना दाखविणारी अमुक प्रकारची मूर्ति घडवावयाची–असा संकल्प मनांत प्रथम करावा लागतो; त्यानंतर तो आपल्या मनांतले मनांत त्यां मूर्तीचें एक चित्र बनवितो; व मग पाषाणाचा आपल्या मनांतल्या चित्राप्रमाणें आकार घडवितो. चित्रकाराचीहि कार्यप्रणाली अशाच प्रकारची असते. तो वारंवार कुंचलीनें आकार फिरवितो व रंगाची योजना करतांनाहि तो वरचेवर पूर्वीं केलेल्या कामाची सफाई करीत राहतो. त्या वेळेस त्याचे मनांत जी भावना असते, तिला अनुरूप असा चित्राचा उठाव करावयाचा असतो. पण त्याचें जें ध्येय असतें, तें त्याच्या अंतरंगांत प्रतिबिंबरूपानें असतें, व अंतरंगांतील त्या

चित्राची बरोबर आकृति उठविण्याचा त्याचा प्रयत्न असतो. कवीसहि आपल्या व्यवसायांत हाच क्रम धरावा लागतो. चित्रकाराला वर्णचित्र काढावयाचें असतें, तर कवीला शब्दचित्र निर्माण करावयाचें असतें. चित्रकार रेषा काढतो, त्या पुसून पुन्हा नव्या काढतो. तसाच प्रकार कवीलाहि करावा लागतो. नवीन कल्पना जशा सुचतील तशा घालीत असतो. कोठें अलंकार नवे घालतो, किंवा ते जेथें अधिक शोभतील, त्या ठिकाणीं त्यांची योजना करितो. शब्द तर वारंवार बदलीत असतो. चितारी जसा दहापांच रेषा मारून एखाद्या आकृतीची स्थूल रूपरेखा दाखवितो, त्याप्रमाणें कवीहि दोन-चार ओळींतच अभिप्रेत शब्दचित्राची उठावणी करितो. याला उदाहरणा-करितां आपण शाकुंतलांतील ६ व्या अंकांतील पुढील श्लोक घेऊं.

कार्या सैकतलीनहंसमिथुना स्रोतोवहा मालिनी
पादास्तामभितो निषण्णहरिणा गौरीगुरोः पावनाः
शाखालम्बितवल्कलस्य च तरोर्निर्मातुमिच्छाम्यधः
शृङ्गे कृष्णमृगस्य वामनयनं कण्डूयमानां मृगीम् ॥

या श्लोकात तपोवनाच्या विशिष्ट लक्षणांची रूपरेखा अवघ्या चार ओळीं-तच दाखविली आहे. तपोवनांत नदीचें वालुकामय तीर दाखवून, त्यांत हंसमिथुनें बसलेलीं पाहिजेत; त्या नदीच्या जवळच पर्वताचा पायथा असून त्यावर हरिण बसलेले दाखविले पाहिजेत; झाडांच्या फांद्यांवर वल्कलें वाळत घातलेलीं असलीं पाहिजेत; व त्या वल्कलांच्या सावलींत हरिणी काळविटाचे शिंगावर आपलें अंग घांशीत आहे, असेंहि दाखविलें पाहिजे तपोवनाचीं हीं मुख्य चार-पांच विशिष्ट लक्षणें दाखविलीं म्हणजे तपोवन वाचकांचे डोळ्यांसमोर मूर्तिमंत उभें राहतें.

काव्यकलेंत इतर कलांपेक्षांहि एकाग्रतेची आवश्यकता आहे; व ह्या एका-ग्रतेचें पूर्ण स्वरूप या कलेंत अनुभवास येतें. एकाग्रतेच्या प्रभावाचा उत्कर्ष या कलेंतच प्रत्यक्ष अनुभवास येतो. शाकुंतल नाटकांतच सहाव्या अंकांत **दुष्यंत** स्वतः काढलेली **शकुंतलेची** तसबीर पुढें घेऊन सस्नेह तिचें अवलोकन करीत बसला असतां व साक्षात् तीच मूर्तिमंत पुढें उभी आहे असें त्यास वाटत असतां, हें चित्र आहे म्हणून **विदूषकानें** त्यास सांगितलें. तेव्हां राजा त्यास म्हणतो :—

" किमनुष्ठितं पौरोभाग्यम् ?
दर्शनसुखमनुभवतः साक्षादिव तन्मयेन हृदयेन।
स्मृतिकारिणा त्वया मे पुनरपि चित्रीकृता कान्ता ॥ "

या पद्यांत प्रणिधानाचें पूर्ण स्वरूप कवीनें दाखविलें आहे. चित्राकडे पाहत असतां त्याची चित्तवृत्ति इतकी गुंग होऊन गेली कीं, हें चित्र आहे हें देखील त्यास भान राहिलें नाहीं. व असें देहभान विसरण्याचें कारण हृदयाची तन्मयता. सारांश, तन्मयतेमुळें चित्राची त्याच्यापुढें साक्षात् सजीव मूर्ति बनली व विदूषकानें पौरोभाग्य केल्याबरोबर सजीव मूर्तीचें पुनः चित्र बनविलें. म्हणजे तन्मयतेच्या अनुभवानें निर्जीव वस्तु सजीव झाली व तन्मयतेचा भंग झाल्याबरोबर सजीव भासलेली मूर्ति पुनः निर्जीव झाली. हा सर्व प्रभाव एकतानतेचा होय. ही एकतानता ज्या प्रमाणानें होईल, त्या प्रमाणांत तिचें फल दृष्टीस पडतें.

श्याम मोरे आखनमें बसरोरी!
लोक कहे कजरोरी।

या हिंदी चिजेंत एक गोपी म्हणते कीं, कृष्ण माझ्या डोळ्यांत इतका बसला आहे कीं, मीं डोळ्यांत काजळ घातलें आहे, असें लोक म्हणतात. या पदांत ही एकतानतेची परमावधि कवीनें दाखविली आहे.

कवीच्या कल्पनेच्या बरोबर वाचकांसहि भरारी मारतां आली तर त्यांसहि कवीप्रमाणेंच निरतिशय आनंद होतो; व खरें सहृदयत्व हेंच आहे. कवि आपण देहभान जसें विसरतो तसाच तो वाचकांस किंवा श्रोत्यांसहि विसरावयाला ज्या प्रमाणानें लावील, त्या प्रमाणानेंच त्याचीहि योग्यता ठरत असते. अर्थात् कवि जर अहंभावांतून निघून अनहंभावांत बुड्या मारूं लागला तर वाचकहि तितका वेळ अहंभाव विसरतातच. कवि जें चित्र रेखाटतो तें पाहिल्याबरोबर ज्या मूर्तीचें तें चित्र असेल ती मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यांपुढें असल्याचा भास वाचकांस झाला पाहिजे; व कवि स्वकर्मांत कुशल असला तर तसा होतोहि. एका कवीनें लेखन करणाऱ्या स्त्रीचें वर्णन केलें आहे. तो म्हणतो :—

यद् भ्रूलते तरलिते यदुदङ्गुलीकः
पाणिः पुरो यदपि चक्षुरलब्धलक्ष्यम् ।
उन्मुद्रिताधरदलं च यदास्यमस्याः
तत्काव्यकर्मणि निषक्तमवैमि चेतः ॥

चंचल भ्रूलता, बोटें वर धरलीं आहेत असा हात पुढें, व शून्यदृष्टि, तोंड अर्धेंमुर्धें उघडलेलें असून वर केलेलें–या लक्षणांवरून ती स्त्री कांहीं काव्यरचना करीत असावी, असा भास सहजच होतो.

विलासमसृणोल्लसन्मुसललोलदोःकन्दली
परस्परपरिस्खलद्वलयनिःस्वनोद्बन्धुराः ।
लसन्ति कलहुंकृतिप्रसभकम्पितोरःस्थल–
त्रुटद्गमकसंकुलाः कलमकण्डनीगीतयः ॥

या दोन-तीन उदाहरणांवरून हें ध्यानांत आलें असेलच कीं, कवीची काव्यरचनाकालीं वृत्तीची जी एकतानता होते, तीच तो वाचकांचीहि करितो. तो स्वतः जसें देहभान विसरतो, तसेंच तो वाचकांसहि देहभान विसरविण्यास लावतो. तो स्वतः **अहंभावनेंतून** निघून **अनहंभावाचा** आस्वाद घेतो; तसेंच तो वाचकांसहि करावयास लावतो. शिल्पकलांनीं प्रतीतीस येणारें स्थूल विश्वच दाखविण्यास काव्य समर्थ असतें; एवढेंच नव्हे, पण अंतर्यामांतील गूढ भावनांचाहि साक्षात्कार करून देण्याची शक्ति काव्यांत आहे. कार्लाइल म्हणतात :—

" Is it not reckoned still a merit, proof of what we call a poetic nature, that we recognise how every object has a divine beauty in it; how every object still verily is a window through which we may look into infinitude itself ? "

शेली म्हणतो :—

" Poetry lifts the veil from the hidden *beauty* of the world....The great secret of morals is *love* or a going out of our nature and an identification of ourselves with the beautiful which exists in thought, action or person not our own. "

कँट म्हणतो :—

" Beauty is the infinite in the finite."

ह्या सौंदर्याचीं, या **अनहंभाव**स्थितीचीं काव्यांतून पुष्कळ उदाहरणें देतां येतील. पण या प्रसंगीं मी अर्वाचीन कविकृतींतील दोनच उतारे येथें देतों. 'अभिनवकाव्यमाले'च्या तिसऱ्या भागांत **वसंत** कवीचा, "ताजमहाल पाहिल्यावर"चा, एक सुंदर चुटका आहे. त्यांत मीं एवढा वेळ वर्णिलेल्या काव्यकलेच्या विशिष्ट गुणाचें फार बहारीचें उदाहरण आहे.

ताजमहाल पाहिल्यावर

मानवधर्मा विसरविती। दिव्यगुणांतें चमकविती ॥
शिल्पकलेच्या या रीती। सौंदर्याच्या या स्फूर्ती ॥
मनांत असती। जनांत दिसती। स्वर्गीं वसती।
स्वर्ग आणिती भूवरती। दिव्यपदा भू चढवीती ॥ १ ॥
इहलोकाचा बंध तुटे। पार्थिवतेचा रंग विटे ॥
व्यंगपणाचा दोष फिटे। सान्ताचा परिवेष सुटे ॥
अनन्त उमले। अव्यक्त खुले। अज्ञात कळे।
परिचित वस्तुक्रम उलटे। नवें विश्व नव सत्य उठे ॥ २ ॥
सौंदर्याच्या या मूर्ती। प्रसन्न काव्यें जीं रचिती ॥
चित्रें रंगीं रंगविती। सत्याचीं रूपें असती ॥
मूळ स्फूर्ती। एक प्रकृति। निर्गुण वृत्ती।
सदानंदलहरी चित्तीं। उठती त्यांची ही व्यक्ती ॥ ३ ॥
सर्व सृष्टिमधिं जें फिरतें। ब्रह्मकटाहीं जें घुमतें ॥
सर्गीं जें जन्मा येतें। प्रलयीं विलया जें जातें ॥
निर्गुण हसतें। सगुण विसलतें। असतें नसतें।
नाचे सारें तें येथें। पाहे त्यासच तें दिसतें ॥ ४ ॥
अमूर्त रूपा हें आलें। नव्हतें असतें तें झालें ॥
मनांत संकल्पीं उठलें। जनांत कृतिरूपीं वठलें ॥
हें प्रेमाचें। हें प्रीतीचें। परस्परांचें।
देणें येथें हो दिधलें। कुणीं म्हणावें तें फिटलें ॥ ५ ॥

दुसरा एक मासला वाचून माझें हें भाषण मी पुरें करितों. गणपतराव बापुराव शिंदे या कवींनीं "मित्रोदय" या नांवाचा एक लहानसा चुटका लिहिला आहे, त्यांतही "From Nature upto Nature's God" –म्हणजे सृष्टिवर्णनापासून सृष्टिकर्त्याची ओळख करून देणें–अशी जी एक काव्यकलेची कल्पना आहे तिचें स्वरूप वर्णिलें आहे.

मित्रोदय

प्रभातकालीं उदयगिरीवरि अरुण-राग-रक्तिमा ।
फांकली, प्रेमपत्रिकेसमा ॥
लाहुनि सुषमा सृष्टि जाहली मित्रागमनोत्सुका ।
सारुनी रात्रीची जवनिका ॥
करावया तों जनप्रबोधन दिनकर विश्वांगणीं ।
प्रकटला अखिल जगाचा धनी ॥
वनीं उपवनीं फुलें फुलति तशि कमलें निर्मल सरीं ।
विकसली हृत्कलिका अंतरीं ॥
अज्ञानतमीं जो भावभृंग कोंडला ।
सन्मित्रोदयिं तो बंधमुक्त जाहला ! ।
तच्चरणीं जडुनी गुंगाया लागला ।
प्रसन्नचित्तें प्रेमें हर्षें रुंजि घालितो सदा ।
तयाच्या गातो स्तवितो पदा ॥ १ ॥
प्रेमाचा संचरे सुशीतल मंदानिल गौरवें ।
घेउनी सद्गुण-सौरभ सवें ॥
वृत्तिवल्लरी डोलति वर्षति परोपकृतिचीं फुलें !
धरुनि संकल्प-तरू-मधु-फळें ॥
विचाररूपी विहंग उडती आकाशाऽकाशीं वर ।
देउनी सत्पक्षावर भर ॥
अंतरीं वाहतो भक्तीचा निर्झर ।
प्रतिबिंब त्यामधें ईशाचें सुंदर !
बघतांक्षणिं आत्मा होय हर्षनिर्भर ! ।

मांगल्याचें पावित्र्याचें दिव्य तेज चहुंकडे ।
पसरलें–अंतर्दृष्टीपुढें ॥ २ ॥

या कवीच्या भावनेप्रमाणें मांगल्याचें व पावित्र्याचें ध्येय यद्यपि सर्वच कवि आमच्यापुढें ठेवीत नाहींत, तथापि काव्यरचना करितांना जें तादात्म्य होतें, तें समाधिसुखाच्याच जातीचें असतें. "प्रज्ञानवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता–" असें साहित्याचार्यांनीं प्रतिभेचें (imagination) लक्षण केलें आहे. ही नवीन नवीन स्फूर्ति–हा आकस्मिक प्रत्यवभास–कवीस कोठून प्राप्त होतो, हा प्रश्न आहे. तो देहभान विसरतो, पण त्याची बुद्धि चिंतनसमयीं कोठें लीन होते ? " मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें " असें श्रीज्ञानेश्वर सांगतात. आणखी ते असेंहि म्हणतात कीं,—

" ज्याचें मनचि चैतन्य जाहलें ।
तेणें एकदेशीयें परी व्यापिलें । लोकत्रय ॥ "

म्हणजे कलानिष्ठ मनुष्य आणि कवि जरी तात्पुरता कांहीं एका विशिष्ट विषयाचें ध्यान करीत असला, तरी तेवढ्या काळपर्यंत त्याचें मन चैतन्यरूप होतें व तें लोकत्रय व्यापितें.

कवीला लोकत्रयांत संचार करतां येतो, ही समजूत सर्व लोकांत आहे. याविषयींची एक गोष्ट **पंडित हरप्रसादशास्त्री** यांच्या **वाल्मीकिविजयाच्या** मराठी अनुवादाचे प्रस्तावनेंत मीं दिली आहे, ती या प्रसंगीं थोडक्यांत सांगतों :—

परमेश्वरानें एकदां सर्व मनुष्यजातीस एकत्र बोलावून ज्यास जें हवें तें दिलें. राजे लोकांनीं देश मागितले; सरदारांनीं किल्ले मागितले; व्यापाऱ्यांनीं रहदारीचे रस्ते मागितले; शेतकऱ्यांनीं शेतें मागितलीं; पारध्यांनीं शिकारीकरितां जंगलें मागितलीं; कोळ्यांनीं समुद्रकांठ, नद्या, तलाव मागितले. याप्रमाणें सर्व भूप्रदेश वांटण्यांत आला. सर्व लोक जेव्हां मागावयास आले, तेव्हां कवि आपल्या वर्ण्य विषयाच्या चिंतनांत गुंग झालेला होता. तो आपली समाधि विसर्जन करून देवाजवळ आला, तेव्हां त्याला देण्यास कांहींच उरलें नव्हतें. तेव्हां तो हिरमुष्टी झाला. हें पाहून देवानें त्यास वर दिला कीं, " बाबा तुला भूलोकांत देण्यासारखें कांहीं नाहीं, म्हणून तूं खजील होऊं नको. तुला

स्वर्गाचें द्वार हमेष खुलें आहे. तूं वाटेल तेव्हां स्वर्गांत येऊन संचार कर." हें ऐकून कवि अर्थात् खुष झाला. स्वर्गांत संचार करण्याच्या कवीच्या हक्काचे एकदोन प्रसंग मीं आतांच वाचून दाखविले. आणखी एक प्रसंग माझ्या भाषणाच्या समारोपांत मी वाचणार आहे.

गाण्यास **नादब्रह्म** ह्या नांवानें आपण वाखाणितों. 'वाग्ब्रह्मेत्युपासीत' असें उपनिषदाचें अनुशासन आहे. सर्वच वाङ्मयाविषयीं अशी जर भावना ठेवावयाची, तर काव्यरचनेंत जी एकतानता होते, तीस ब्रह्मानंदाचा आस्वाद म्हटलें असतां कांहीं बाध नाहीं.

असो. शास्त्राध्ययनांत **सर जगदीश बोस** यांच्या व्याख्यानांवरून—

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्त्विकम् ॥ भ. गी. १८।२०

या सात्त्विक ज्ञानाची प्राप्ति होते हें मीं सांगितलेंच. याच्या पुढची पायरी म्हणजे "सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ईक्षते।" भ. गी. ६।२९ योगाभ्यासानें व तपश्चर्येनें अतींद्रिय ज्ञानप्राप्ति झाली, जीव आणि शिव या दोहोंच्याहि ऐक्याची प्रतीति झाली–म्हणजे

सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरङ्गः क्व च न तरङ्गो न सामुद्रः ॥

अशी अंतःकरणांत सद्भक्तियुक्त स्फूर्ति होते. शास्त्राभ्यास करणाराची जशी आपल्या विषयांत तन्मयता होते, तशीच तन्मयता कवीचीहि वर्ण्य विषयांत होते; व बाह्य चैतन्यरूप समुद्रांत त्याच्या बुद्धीनें एखादें लहानसें वर्तुळ पडतें. या वर्तुळाची दृढाभ्यासानें मर्यादा अथवा परिघ वाढत गेला म्हणजे तीं दोन्ही वर्तुळें समानकेंद्र बनण्याचा संभव आहे. फिलिप् जेम्स बेली नांवाचा एक इंग्लिश कवि होऊन गेला. त्यानें १ Love of Self, २ Love of our Fellows आणि ३ Love of God–म्हणजे १ स्वार्थ, २ परार्थ, आणि ३ परमार्थ अथवा १ स्वप्रीति, २ भूतप्रीति, आणि ईश्वरप्रीति, अशीं तीन समान वर्तुळें वर्णन केलीं आहेत. सर्वत्र प्रीतीचेंच साम्राज्य आहे. आणि प्रेम हीच रज्जु सर्व विश्वास आधार आहे, असें त्यानें वर्णन केलें आहे. **वाल्मीकि-विजया**मध्यें जें अत्यंत मधुर सर्व जगास मोहक असें **ऋभू**चें गाणें वर्णिलें

आहे, त्यांत प्रेमच ओतप्रोत भरलें होतें. हें गाणें ऐकूनच **वाल्या** कोळ्याचे मनाची हिंसेपासून परावृत्ति झाली व तो **वाल्मीकि** कवि बनला. **वाल्मीकि रामायणाचा** मुख्य संदेश प्रेमरूपच होय, असें **हरप्रसादशास्त्री** यांनीं वर्णन केलें आहे

जेम्स बेली म्हणतात :—

Love is the happy privilege of the mind,
Love is the reason of all living things,
Trinity there seems of principles,
Which represent and and rule created life—
The love of self, our fellows and our God.
In all throughout one common feeling reigns
Each doth maintain, and is maintained by the other.
All are compatible—all needful, one
To life,—to virtue one, and one to bliss :
Which thus together make, the power, the end,
And the perfection of created Being.
From these three principles doth every deed,
Desire and will and reasoning, good or bad, come,
To those they all determine—sum and scheme :
The three are one in centre and in round
Wrapping the world of life as do the skies
Our world.

आतां हें माझें भाषण तुम्हांस कंटाळवाणें झालें असेल. म्हणून कवीच्या खऱ्या अधिकाराचें एक वर्णन 'केशवसुता' चें वाचून दाखवून मी आपली रजा घेतों.

आम्ही कोण ?

आम्ही कोण म्हणून काय पुससी ?–आम्ही असूं लाडके
देवाचे, दिधलें असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वीं या प्रतिभाबलें विचरतों चोहींकडे लीलया;
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके ! १

सारेही बडिवार येथील पहा ! आम्हांपुढें ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया–
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करामाजि या
फोलें पाखडितां तुम्ही निवडतों तें सत्त्व आम्ही निकें ! ! २
शून्यामाजी वसाहति वसविल्या कोणीं सुरांच्या बरें ?
स्वर्गाची समता धरेस झटती आणावया कोण ते ?
ते आम्हीच सुधा कृतीमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे !
ते आम्हीच, शरण्य मंगल तुम्हां ज्यापासुनी लाभतें ! ३
आम्हांला वगळा–गतप्रभ झणीं होतील तारांगणें;
आम्हांला वगळा-विकेल कवडीमोलावरी हें जिणें !

श्रीभगवद्गीतेंत वाङ्मयतपाचें वर्णन केलें आहे. श्रीज्ञानेश्वरांनीं भगवद्गीतेचा वाग्यज्ञ नांवानें उल्लेख केला आहे. काव्यांत अध्यात्मज्ञान आणि तत्त्वज्ञानार्थदर्शनहि असतें; म्हणून वाग्यज्ञापैकीं काव्य हें सामगानच होय, असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें.

[सोलापूर येथें रिपन हॉलमध्यें, ता. २१ फेब्रुवारी १९१८ रोजीं, साहित्यसभेपुढें दिलेलें व्याख्यान.]

* * *

हिंदी भाषा सर्व हिंदुस्थानची राष्ट्रभाषा होऊं शकेल काय ?

गतवर्षीं मार्च महिन्यांत इंदूर येथें **महाराष्ट्र साहित्य संमेलन** भरलें होतें. तसेंच यंदां तेथें **हिंदी साहित्य संमेलन** होणार आहे, हें ऐकून आम्हांस फार संतोष वाटतो. महाराष्ट्र साहित्य संमेलन इंदूरकरांनीं फार उल्हासानें पार पाडलें. त्याहून अधिक उल्हासानें हें हिंदी संमेलनहि पार पडेल, असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. मध्य हिंदुस्थानांत हिंदी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे, त्या मानानें या संमेलनास सामान्य जनतेची सहानुभूति अधिक मिळेल, ह्यांतहि आम्हां महाराष्ट्रीयांस असंतोष वाटण्याचें कारण नाहीं. मराठी व हिंदी ह्या बहिणीबहिणीच आहेत व आपल्या स्वतःच्याच घरीं हिंदीचें कौतुक व्हावें हें न्यायास अनुसरूनच आहे. पण या संमेलनांत, हिंदी भाषा ही राष्ट्रभाषा व्हावी, असा एक ठराव येण्याचें घाटत आहे. व या विषयाची चर्चा वर्तमानपत्रांतून जारीनें चालू आहे हिंदीचे अभिमानी आपली बाजू जोरानें पुढें मांडीत आहेत, व मराठीचे अभिमानी तितक्याच आवेशानें वरील ठरावाचा निषेध करीत आहेत. आपले मित्र व मराठी भाषेचे कट्टे व बहुश्रुत उपासक रा. वासुदेव गोविंद आपटे ह्यांनीं 'मल्लारि-मार्तंड-विजयां'तून हिंदी राष्ट्रभाषा करण्याच्या विरूद्ध बाजू फार मार्मिकतेनें व समबुद्धीनें हिंदी जनतेपुढें मांडिली आहे. आपट्यांच्या या चारहि लेखांत या प्रश्नाचा सर्वांगांनीं खल केला आहे व हिंदी भाषेच्या उत्तरोत्तर उत्कर्षाची ते आमच्याप्रमाणेंच इच्छा करीत आहेत. तथापि त्यांचे लेखांसंबंधानें थोडा-फार गैरसमज होत चालल्याचीं चिन्हें दृष्टीस पडत आहेत. अशा प्रकारचा गैरसमज करून घेण्यास वस्तुतः कांहीं कारण दिसत नाहीं. उभय पक्षांचे विचारसरणींत कांहीं दोष आहेत, असें आम्हांस वाटतें हिंदी भाषा राष्ट्रभाषा करूं इच्छिणारांना आपल्या सत्संकल्पाची अव्यवहार्यता ध्यानांत येत नाहीं, व अशा प्रकारचा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला तरी इतर भाषांचा ऱ्हास होईल, अशी भीति बाळगण्याचेंहि कारण दिसत नाहीं.

भाषेचा प्रचार कसा होतो ह्याकडे ज्यांनीं लक्ष दिलें असेल, ते हिंदी भाषा राष्ट्रभाषा करावी, असा ठराव पुढें आणणारच नाहींत, असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानांत **ब्रिटिश** सार्वभौम राजसत्ता स्थापित झाली, त्यामुळेंच देशाच्या सर्व प्रांतांत इंग्लिश भाषेचा प्रचार झाला. **मुसलमानी** अमदानींत जेथें जेथें त्यांचीं राज्यें स्थापन झालीं, तेथें तेथें फारसी व उर्दू भाषा प्रचारांत आल्या. खुद्द मध्य हिंदुस्थानांतहि **ग्वालेर, इंदूर, धार, देवास** वगैरे संस्थानें मराठ्यांनीं स्थापिलीं, त्यामुळें मध्यहिंदुस्थानास मूळची परकी जी मराठी भाषा, तिचा तेथें बराच प्रचार झाला. राज्यकर्त्यांची भाषा, व तीहि सार्वत्रिक झाल्याकारणानें इंग्रजी भाषा प्रांताप्रांतांचे दरम्यान दळणवळणास साधन झाली. इंग्रजी भाषा अशा प्रकारें सार्वत्रिक व्यवहारास जरी उपयोगी पडत आहे, तरी देशी भाषा उत्तरोत्तर उन्नतावस्थेस पोंचत आहेत. इंग्रजीमुळें या भाषांची हानि न होतां उलट तिच्या अफाट व विविध वाङ्मयाचे अभ्यासानें देशी भाषांच्या अभिवृद्धीस सहाय्य होत आहे. पण इंग्रजी भाषेच्या सार्वत्रिक प्रचारास जीं कारणें साधनीभूत होतीं, त्याचा हिंदी भाषेच्या सद्यःस्थितींत सर्वस्वीं अभाव आहे. हिंदी भाषेला राजाश्रय नाहीं; तिचें वाङ्मयहि सध्यां तरी अत्यंत संकुचित आहे. यामुळें हिंदी भाषेला इंग्रजी भाषेचें स्थान मिळणें केवळ अशक्य आहे.

इंग्रजी भाषेला सार्वत्रिकतेचें स्वरूप पात्र होण्यास ब्रिटिशांची राजसत्ता हें तर कारण आहेच, पण ब्रिटिश लोकांचा व्यापारी पसारा हेंहि आणखी एक कारण आहे. जेथें इंग्रजांची राजसत्ता नाहीं, तेथें सुद्धां व्यापाराकरितां त्यांची भाषा शिकणें व्यापारी लोकांस जरूर पडतें. खुद्द युरोप खंडांत ज्या अनेक देशभाषा आहेत, त्यांमध्यें प्रचाराचे मानानें इंग्रजी भाषेचा फ्रेंच व जर्मन या दोन भाषांच्या खालोखाल दर्जा आहे. फ्रेंच भाषेला युरोपांतील Lingua Franca अथवा सर्वसामान्य भाषा म्हणण्याचा परिपाठ आहे. पण त्या भाषेला तें स्थान मिळण्यास कारणें, वर सांगितलीं त्यांहून, फार निराळीं आहेत. फ्रेंच भाषा राजसत्तेच्या जोरावर पुढें आली नाहीं, किंवा फ्रेंच लोकांच्या व्यापारी धाडसामुळेंहि तिला तिचें सांप्रतचें स्थान प्राप्त झालेलें नाहीं. तिच्यांतील प्रगल्भ व मधुर वाङ्मयामुळेंच फ्रेंच भाषा सर्वत्र लोकादरास पात्र झाली. फ्रेंच भाषेंत अठराव्या शतकापासून निरनिराळ्या

विषयांवर जे अत्युत्तम ग्रंथ निर्माण होत गेले, त्यांच्या माधुर्यानें व सोपपत्तिकतेनें इतर देशांतील लोकांस इतका चटका लाविला कीं, इतर देशचे लोक मूळ फ्रेंच वाचण्याच्या हौसेनें फ्रेंच भाषा शिकूं लागले, व जर्मन भाषेचीहि तीच स्थिति आहे. शास्त्रीय विषयांवर व विशेषतः संस्कृत वगैरे पौरस्त्य भाषांवर जर्मन भाषेंत इतके उत्तम ग्रंथ झाले आहेत कीं, सर्व देशांतील पहिल्या प्रतीचे विद्वान् लोक जर्मन भाषेचा बुद्धिपुरःसर अभ्यास करितात. हिंदी भाषेच्या अभिमान्यांना ती भाषा सर्वत्र प्रचलित व्हावी अशी जर इच्छा असेल, तर त्यांनीं आधीं आपल्या भाषेला फ्रेंच भाषेचें प्रागल्भ्य प्राप्त करून द्यावें व मग त्यांनीं आपली सदिच्छा तृप्त करून घेण्याची अपेक्षा करावी.

सध्यां महाराष्ट्रांत जें थोडें बहुत हिंदी ऐकूं येतें, तें इकडे येऊन राहिलेल्या थोड्या व्यापारी मंडळीचे तोंडून किंवा **परदेशी, पुरभय्ये** वगैरे नोकरी करून पोट भरणाऱ्या तद्देशीय माणसांच्या सहवासांत ऐकूं येतें. पण हें हिंदी अगदींच हलक्या प्रकारचें असतें. परलोकवासी महात्मा **दयानंद,** तसेंच **आर्यसमाजाचे उपदेशक** किंवा **पंडित दीनदयाळ शर्मा** यांच्यासारखी श्रोत्यांचें चित्त हालवून सोडणारी भाषा महाराष्ट्रीयांस किंवा इतर प्रांतांतील लोकांस येण्यास त्या भाषेचा सांगोपांग अभ्यासच केला पाहिजे. हिंदी भाषा समजण्यास सोपी आहे, हाच तिचा विशेष गुण आहे; व या गुणावरच जर तिची राष्ट्रभाषेच्या स्थानीं योजना करणें असेल, तर इतर प्रांतांतील लोकांसहि हिंदी भाषा शिकलीच पाहिजे. नाहीं तर सर्व व्यवहार एकांगीच होईल. हिंदी ज्यांची स्वभाषा आहे, त्यांचें बोलणें आम्हां दाक्षिणात्यांस समजेल; पण आम्हां दाक्षिणात्यांचें बोलणें मध्य हिंदुस्थानांतील लोकांस समजण्यासारखें हिंदी आम्हांस चांगला अभ्यास केल्याशिवाय कधींहि बोलतां यावयाचें नाहीं. **हल्लीं देशांत राष्ट्रीयत्वाची भावना जागृत झाल्यापासूनच एकराष्ट्रभाषेची आम्हांस आवश्यकता वाटूं लागली आहे, व तीहि विशेषतः राजकीय, सामाजिक व औद्योगिक चळवळ करणाऱ्या पुढारी लोकांस जाणवत आहे.** आपले विचार लोकांस व्याख्यानद्वारा समजून सांगावे व आपल्या वाक्पांडित्यानें लोकांचीं मनें वश करून घ्यावीं, असें विशेषेंकरून त्यांस मात्र वाटत आहे. तरी

असे जे पुढारी असतील त्यांनीं हिंदी भाषेचें ज्ञान करून घेतलें तर पुरें होईल.

हिंदी राष्ट्रभाषा करावी, असें म्हणणारांचे मनांत हाच हेतु असावा, असें आम्हांस वाटतें. सध्यां प्रांताप्रांतांतून निरनिराळ्या देशभाषांचा अभ्यास होत आहे, तो बंद करून हिंदी भाषेचाच अभ्यास सार्वत्रिक करावा, असें हिंदी भाषेचे कट्टे अभिमानीहि म्हणणार नाहींत, असा आम्हांस भरंवसा आहे. कारण **ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे.** खुद्द ग्रेट ब्रिटनमध्यें इंग्रजी भाषा जरी सर्व व्यवहारांत रूढ आहे, तरी Gaelic, Scotch वगैरे भाषा त्यांच्या प्रांतांत चालू आहेतच. सरकारी दप्तरांत व न्यायमंदिरांतून जरी इंग्रजी भाषेचाच अंमल आहे, तरी मूळच्या जन्मभाषा मुळींच मृतप्राय झालेल्या नाहींत. **आल्सेस** आणि **लॉरेन** या परगण्यांत जर्मन सरकारनें फ्रेंच भाषेच्या उच्चाटनाचे आटोकाट प्रयत्न केले, तरी त्या प्रांतांतील लोकांचे खाजगी व्यवहारांत **फ्रेंच** भाषा अजून चालूच आहे. सारांश, जन्मभाषेवर मातेप्रमाणें मनुष्याचें जें प्रेम असतें, तें बाह्य बलात्कारानें कधींहि नाश पावत नाहीं. यामुळें हिंदी भाषा राष्ट्रभाषा करावी, असा जरी आमच्या तद्देशीय बांधवांनीं ठराव केला, तरी तो परिणामीं फोलच ठरणार आहे; आणि तसा ठराव झाल्यानें देशी भाषांचा ऱ्हास होईल, अशी जी कित्येकांस भीति वाटते तीहि निराधार आहे, असा आमचा समज आहे. विचारशील इंग्रज सरकार अशा एकदेशीय ठरावाला कधींहि मान्यता देणार नाहीं, अशी आमची पूर्ण खात्री आहे. नुसती मोडी लिपि बंद करण्याचा प्रयत्न सर-कारनें केला, त्यासीहि महाराष्ट्र-जनतेकडून तीव्र विरोध झाला; व सरकारनें तो ठराव बहुधा रद्द केल्यासारखाच आहे, हें आतां सर्वांस माहीत झालें आहे.

बहिणींबहिणींमध्यें एक जर अधिक तोऱ्यानें वागूं लागली तर इतर बहिणींस तें खपत नाहीं व त्या तिचा मत्सर करूं लागतात; याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणून **मुस्लिम लीग**च्या ठरावाचें जें उदाहरण रा. आपटे यांनीं दिलें आहे तें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आपला हिंदुस्थान देश म्हणजे विस्ताराचे व लोकसंख्येचे मानानें एक खंडच आहे, व युरोपांत जशा निर-निराळ्या भाषा प्रचलित आहेत, तशा हिंदुस्थानांत वेगवेगळ्या भाषा प्रचारांत राहाव्या, हें योग्यच आहे. **फ्रेंच** भाषा आपल्या अंतःसामर्थ्यानें

लोकादरास पात्र होऊन गाजावाजा न करितां आपोआप राष्ट्रीय भाषेच्या स्थानीं रूढ झाली; तसाच कांहीं अलौकिक प्रभाव दाखवून हिंदी भाषा भरतवर्षाची **भारती** झाली, तर त्यांत सर्वांस संतोषच आहे. समाजांतील एकाच कुटुंबानें मी सर्वांत श्रेष्ठ आहें व माझीच अग्रपूजा सर्वांनीं करावी, असें म्हटलें तर तें सर्व कुटुंब उपहासास पात्र होतें. अशी सूचना इतर कुटुंबांनीं सर्वानुमतें केली तर गोष्ट निराळी. प्रत्येक प्रांताच्या पुढाऱ्यांनीं एकमतानें असा ठराव करणें वेगळें, व ज्याचा त्यानेंच आपला टेंभा मिरविणें हें वेगळें.

टीप : या लेखाच्या सुरुवातीस उल्लेखिलेला रा. आपटे यांचा लेख 'मल्लारी-मार्तंड-विजया' च्या २१ मार्च १९१८ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला आहे.

* * *

महाराष्ट्र वाङ्मय

सर भालचंद्र आणि सभ्य गृहस्थ हो —

आज महाराष्ट्र ग्रंथ-संग्रहालयाची वार्षिक सभा आहे. आपण महाराष्ट्र भाषेचा अभिमान बाळगतां व ती आपली मातृभाषा म्हणून तिजवर प्रेम करितां, तर अशा प्रसंगीं महाराष्ट्र वाङ्मयाचा जन्म व त्याचा उत्तरोत्तर होत गेलेला अभ्युदय हाच विषय भाषणास उचित आहे, असें समजून मी त्या विषयावर चार शब्द बोलण्याची परवानगी मागतों.

महाराष्ट्र वाङ्मयाचा इतिहास फार मनोवेधक आहे, असें मीं म्हटलें तर कित्येकांस फार नवल वाटेल; पण तसें नवल वाटण्याचें कारण नाहीं. डोंगरांत चारी बाजूंनीं खडक असून मध्येंच एखाद्या जागेंत सहजगत्या एखाद्या जोमदार झाडाचें बीं पांखराच्या चोंचींतून पडतें व थोडी जागा सांपडली म्हणजे तें तेथें रुजून कांहीं वर्षांनीं तें झाड जोरास लागतें. त्याच्या पाळ्यामुळ्या खोल खोल जाऊन त्या योगानें तो खडक दुभंग होतो व आपल्या आपणच त्या वाढीस लागलेल्या झाडास हवी तितकी जागा सांपडत जाते. कांहीं काळानें त्यास खांद्या फुटून पानांनीं भरगच्च शोभा येते. त्यावर पांखरें राहूं लागतात व त्या पांखरांच्या गोड शब्दांनीं आसपासचा प्रदेश दुमदुमून जातो व जवळून जाणाऱ्या-येणाऱ्या वाटसरांस त्याच्या गर्द सावलींत थोडा वेळ विसांवा घेण्यास सांपडतो. तसाच प्रकार कांहीं अंशीं महाराष्ट्र वाङ्मयाचे इतिहासांत दृष्टीस पडतो. ऐन डोंगराचे कपारींत दाट सावलीचें झाड पाहिल्यानें जें कौतुक मनास वाटतें, तेंच कौतुक मराठी भाषेचा उदय आणि तिचा सांप्रतचा विस्तार पाहून मनास वाटतें.

मराठी भाषेचा जन्म नक्की कधीं झाला, हें सांगतां येण्यासारखें नाहीं. तिची सख्खी आई महाराष्ट्री असावी असें वाटतें. महाराष्ट्रीचें सर्व प्राकृत भाषांत श्रेष्ठत्व आचार्य दण्डी यांनीं **काव्यादर्शांत** दर्शविलें आहे. दण्डी म्हणतात :—

> **महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः।**
> **सागरः सूक्तिरत्नानां सेतुबन्धादि यन्मयम् ॥**

नाटकादि मिश्र काव्यांत स्त्रियांचीं भाषणें या महाराष्ट्रींत असत. तथापि कांहीं काळानें या **महाराष्ट्रींत** पुष्कळ सरस काव्यें निर्माण झालीं, त्यांपैकीं

पुष्कळ सध्यां उपलब्ध नाहींत. **महाराष्ट्री**ला सांप्रतचें नामरूप कधीं मिळालें, हें सांगतां येण्यासारखें आहे. एकनाथी भागवतांत पहिल्या अध्यायांत नमन करितांना **नाथांनीं** म्हटलें आहे : —

आतां वंदूं प्राकृत कवीश्वर । **निवृत्ति** प्रमुख **ज्ञानेश्वर** ।
नामदेव चांगदेव वटेश्वर ज्यांचें भाग्य थोर । गुरुकृपा ॥ ११९ ॥

यावरून **निवृत्ति** व **ज्ञानेश्वर** यांचे कालीं मराठी भाषेला सांप्रतचें मराठी हें नामरूप मिळालें. तो काल म्हणजे सुमारें इसवी सन १३०० ची अखेर इतका आपण धरिला असतां फारशी चूक होणार नाहीं. जन्मतः संकटांतच, व पुढें ही महाराष्ट्र भाषा संकटांतच राहिली, असें म्हटलें तरी चालेल. त्या वेळेस सन्मान्य ग्रंथरचना करण्याची भाषा संस्कृत अशी समजूत असल्यामुळेंच **श्रीज्ञानेश्वर** महाराजांनीं मुद्दाम मराठीचें गौरव केलें आहे असें वाटतें. ज्ञानेश्वरीच्या ६ अध्यायांत **ज्ञानेश्वर** महाराजांनीं म्हटलें आहे-

हां हो नवल नोहे **देशीं** । **मराठी** बोलिजे तरी ऐशी ।
वाणें उमटता हे आकाशीं । साहित्य रंगाचें ॥ १३३ ॥
कैसें उन्मेख चांदिणें तार । आणि भावार्थ पडे गार ।
हेचि श्लोकार्थकुमुदिनी फार । साविया होती ॥ १३४ ॥
चाडाचि निचाड करी । ऐसी मनोरथी थोरी ।
तेणे निवडलें अंतरी । तेथ डोल आला ॥ १३५ ॥

पुढें अठराव्या अध्यायाचे शेवटीं —

आणि तोचि हा मी आतां । श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां ।
आणिला श्रवणपथा । **मऱ्हाटिया** ॥ १७०९ ॥
यालागी आम्हां प्राकृतां । **देशिकारे** बन्धें गीता ।
म्हणणें हें अनुचिता । कारण नोहे ॥ १७२१ ॥
आतां आयती गीता जगीं । मी सांगे **मऱ्हाटिया** भंगीं ।
येथ कें विस्मया लागीं । ठाव आहे ॥ १७३० ॥
याकारणें मियां । श्रीगीतार्थ **मऱ्हाटिया** ।
केला लोकां यया । दिठीचा विषो ॥ १७३६ ॥
परी **मऱ्हाटें** बोलरंगें । कवळितां पै गीतांगें ।
तैं गातयाचे निपांगे । काढयता नोहे ॥१७३७॥

तो मी एक सर्व मुका । बोलोनि **मऱ्हाटिया** भाखा ।
करी डोळेवरी लोका । घेवो ये जैसे ॥ १७८० ॥

आतांप्रमाणें त्या वेळेसहि संस्कृत भाषेचे अभिमानी मराठीला हेटाळीत; तथापि **ज्ञानेश्वरांनीं** मुद्दाम **भावार्थदीपिका** देशी भाषेंत रचली. मराठीच्या विषयीं ही तिरस्कारबुद्धि **श्रीएकनाथांपर्यंत** तर खास होती; म्हणून त्यांनीं भागवताच्या प्रथमाध्यायांत म्हटलें आहे :

संकृत ग्रंथकर्ते ते महाकवि । मा प्राकृतिं काय उणीवी ।
नवी जुनी म्हणावी । कैसें कधीं सुवर्ण सुमनें ॥ १२१ ॥
कपिलेचें म्हणावें क्षीर । मा इतरांचें काय नीर ।
वर्णास्वादें एकचि मधुर । दिसे साचार सारिखें ॥ १२२ ॥
जें पाविजे संस्कृत अर्थे । तेंचि लाभे प्राकृतें ।
तरी न मनावया येथें । विषम चित्तें तें कायी ॥ १२३ ॥
देशभाषा वैभवें । प्रपंच पदार्थीं पालटलीं नांवें ।
परी रामकृष्णादि नामा नव्हें । भाषा वैभवें पालटूं ॥ १२६ ॥
संस्कृत वाणी देवें केली । **प्राकृत** काय चोरापासोनि आली ।
असो या अभिमान भुली । वृथा बोली काय काज ॥ १२७ ॥

शेवटल्या अध्यायांत उपसंहार करितांना **एकनाथ** म्हणतात :

हे टीका तरी **मराठी** । परि ज्ञानदानें होईल लाठी ।
ऐसें निजमुखें बोलोनि वोठीं । कृपादृष्टि पाहिजे ॥

याप्रमाणें संस्कृताचा आणि मराठीचा हा कलह सुमारें **तुकाराम-महाराजांपर्यंत** चालत होता. पुढें मराठी राज्याची स्थापना झाल्यावर कांहीं वेळ मराठी भाषेला सुस्थिर आश्रय मिळण्यास जागा झाली. परंतु पुनः देशांत धामधूम माजल्यामुळें वाङ्मयाचे प्रगतीस अडथळा झाला. पुढें इंग्रजी राज्याची स्थापना झाली, त्या वेळेस तिला पुनः ऊर्जितावस्था येण्याची वेळ आली; व तिचा प्रवेश युनिव्हर्सिटींतहि झाला. परंतु तिचे जुने शत्रु म्हणजे संस्कृतभाषाभिमानी पंडित यांनीं पुनः तिला गण्डान्तर आणलें. परंतु सुदैवानें तिचे वाली कोणी होते व त्यांनीं पुन्हां तिचा प्रवेश युनिव्हर्सिटींत करून दिला, ही आनंदाची गोष्ट आहे. मीं जें आरंभीं रूपक केलें आहे, तें किती खरें आहे, हें आतां आपणांस समजेल. स्वदेशीय पंडितांकडून झालेली हेटाळणी,

आणि देशांतील धामधुमीमुळें तिच्या अभिवृद्धीस आलेले अनेक अडथळे, यांस न जुमानता **श्रीनिवृत्ति** व **ज्ञानेश्वर** यांनीं जें बीज लाविलें, तें अनेक संकटांतून पार पडून जीव धरून राहिलें एवढेंच नाहीं, तर त्याचें आतां झाड झालें आहे व त्या झाडाच्या फलपुष्पवृद्धीचें कौतुक करण्यास आज आपण सर्वजण येथें जमलों आहों.

आतां या वाङ्मयाची वाढ इंग्रजी राज्य झाल्यापासून या मुंबई इलाख्यांत आजपर्यंत कसकशी होत आली आहे व ती कोणत्या दिशेनें होणें इष्ट आहे, इत्यादि गोष्टींचा विचार करणें अगदीं उचित आहे, असें वाटल्यावरून मी या विषयावर चार शब्द बोलण्याची परवानगी मागतों.

मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीचें अशा रीतीनें वारंवार पर्यालोचन करणें अवश्य आहे. प्रापंचिक मनुष्यसुद्धां आपला आय काय, व्यय काय आणि कोणत्या गृहकृत्यांत फाजिल खर्च होत आहे हें पहातो व वेळोवेळीं झाडाझडती करून आपल्या प्रपंचाची सुव्यवस्था लावतो. तसाच प्रकार या कामीं आपल्यास केला पाहिजे. मी आतां जशा प्रकारचें परिगणन करणार आहें, तशा प्रकारचें परिगणन आपण ज्यांस गुरुतुल्य मानीत आलों, त्या महासमर्थ व मार्मिक विद्वन्मुकुटमणि कै. माधवरावजी रानडे यांनीं ६ वर्षांपूर्वीं केलें होतें व त्याच सुमारास विविधज्ञानविस्ताराचे द्वारें मींहि कांहीं टांचणें व माहिती महाराष्ट्र वाचकांपुढें मांडली होती, तीच माहिती संगतवार जुळवून व त्यांत जी न्यूनता होती. ती पुरी करून आज आपल्यापुढें आपल्या जमेकडील रकमांचें तेरीज मांडीत आहें.

हें तेरीज आपल्यापुढें सादर करण्यापूर्वीं प्रस्तावनेदाखल दोन शब्द बोलणें जरूर आहे. कारण अशी प्रस्तावना केल्याशिवाय पुढील अंकांचें महत्त्व ध्यानांत येण्यासारखें नाहीं.

हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची स्थापना होण्याचा काळ मराठी वाङ्मयाच्या किंवा सर्व एतद्देशीय भाषांच्या इतिहासांत सोनेरी अक्षरांनीं नमूद करून ठेविला पाहिजे. यूरोपखंडांत सन १४५३ सालीं एक महत्त्वाची राज्यक्रांति झाली व त्यामुळें तिकडील सर्व देशांत Renaisance म्हणजे ज्ञानाचा पुनर्जन्म झाला व बुद्धिविकासाला व ज्ञानप्रसाराला प्रतिबंधक कारणें होतीं तीं दूर झालीं. त्याचप्रमाणें इंग्लिश साम्राज्य इकडे स्थापन झाल्यावर पूर्वींचीं

बंधनें होतीं तीं तुटून इकडेहि मानवबुद्धीची प्रगति उत्तरोत्तर अधिक अधिक होऊं लागली, ही गोष्ट कोणाहि समंजस मनुष्यास प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे; व ही गोष्ट मी आतां जे थोड्या वेळानें तुम्हांपुढें अंक मांडणार आहें, त्यांवरून अगदीं उघड होणार आहे. इंग्रजी अंमल इकडे सुरू होण्यापूर्वीं आपलें मराठी वाङ्मय बहुधा कवितेच्या किंवा पद्याच्या रूपानें होतें व त्या पद्यांचे विषयहि बऱ्याच अंशीं पौराणिक कथा, धर्म किंवा वेदान्त असे असत. कांहीं थोडे पोवाडे, लावण्या वगैरे ऐतिहासिक प्रसंगांवर आहेत, परंतु बहुतेक धर्मविषयकच ही काव्यरचना होती. त्या कालचें गद्यहि पद्याप्रमाणें एकदेशीयच होतें या गद्याचा विषय म्हणजे राजेरजवाडे किंवा थोर सरदार लोक यांच्या पराक्रमाचें वर्णन असे. अर्वाचीन वाङ्मयांत ज्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक विषयांचा समावेश होतो, त्या विषयांपैकीं बहुतेक विषय तेव्हां अश्रुतच होते. ही गोष्ट ध्यानांत ठेविली म्हणजे इंग्रजी राज्य स्थापन झाल्यामुळें मराठी वाङ्मयावर काय परिणाम झाला हें समजेल इकडे इंग्रजी राज्य झाल्याबरोबर त्यांचीं भौतिक सुखाचीं सर्व साधनें आपोआपच त्यांचे मागें आलीं व त्यांत छापण्याच्या कलेचाहि प्रादुर्भाव इकडे झाला; त्यामुळें महाराष्ट्रांत इंग्रजी राज्य होऊन १० वर्षें झालीं नाहींत तोंच मराठी भाषेंत एक पुस्तक सन १८२६ सालीं मुंबईंत छापून प्रसिद्ध झालें, व एकदां पुस्तकें छापण्यास सुरुवात झाल्यावर एक वर्ष दोन वर्षें आड जाऊन पुस्तकें प्रसिद्ध होत गेलीं. असा क्रम चालतां चालतां सन १८२६ पासून सन १८५७ सालापर्यंत म्हणजे मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना होईपर्यंत ३२ वर्षांत ७५ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. या पुस्तकांची विषयवार वांटणी केली तर असें दिसून येतें कीं, या पहिल्या ३२ वर्षांच्या अवधींतच गणितावर ७, भाषाविषयावर ६, मानसिकशास्त्रावर ५, सृष्टपदार्थज्ञानावर ७, वैद्यकावर २, हुन्नरावर ४, चरित्रविषयावर २, इतिहासावर ७, धर्मविषयावर २, केवळ शालोपयोगी २५; व किरकोळ ९ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. या पुस्तकांची नांवनिशीवार यादी सन १८९८ च्या जुलै महिन्याच्या विविधज्ञानविस्ताराच्या अंकांत मीं दिली आहे. या यादींत **कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या** अर्थशास्त्रपरिभाषेसारखीं इंग्रजींतून अर्थशास्त्र या विषयावर तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं व अलंकारविवेकासारखीं

पुस्तकें वे. रा. **कृष्णशास्त्री राजवाडे** यांच्यासारख्या केवळ संस्कृत भाषाभिज्ञाचे हातून बाहेर पडलीं. हीं दोन नांवें मीं येथें दिलीं, याचें कारण इतकेंच कीं, इंग्रजी राज्याची स्थापना आणि तिच्याबरोबर मुद्रणकलेचा अवतार या देशांत झाल्याकारणानें ज्ञानाचे प्रवाह निरनिराळ्या दोन दिशांनीं वाहूं लागले. प्रमुक्त झालेली बुद्धि व जिज्ञासा नव्या नव्या विषयांत स्वेच्छेनें भ्रमण करूं लागली. यूरोप खंडांत जी बुद्धीला जागृति झाली ती एकाच द्वारानें म्हणजे ग्रीक व लातिन या प्राचीन भाषांच्या द्वारें झाली. परंतु आपल्यास दोन ज्ञानभांडारें एकदम खुलीं झालीं. यूरोपांतील लोकांस जसें प्राचीन भाषांचें ज्ञान झालें, तसेंच आम्हांला आमच्या प्राचीन भाषेचें ज्ञान मिळून शिवाय सर्व पृथ्वीवरील अपरिमित ज्ञानाच्या खजिन्याची जी अजब किल्ली म्हणजे इंग्रजी भाषा ती आमचे हातास लागली.

या दोन खजिन्यांतील अमूल्य रत्नें एकदम दृष्टीस पडल्याकारणानें अगदीं अव्वल पिढीच्या लोकांचे डोळे सहजच दिपून गेले व त्यामुळें मराठी भाषा नेभळी दुबळी असें कित्येकांस वाटूं लागलें. तथापि त्या वेळच्याहि कित्येक दूरदर्शी पुरुषांची बुद्धि मराठी भाषेस प्रतिकूळ नव्हती. त्यांची अशी पक्की खात्री होती कीं, इंग्लिश व संस्कृत भाषारूप दोन कामधेनुंचा आश्रय मराठी भाषारूप निराश्रित आणि दुर्बळ बालिकेस मिळाला तर लवकरच ती पुष्ट होईल व अशा बुद्धीनेंच पहिल्या १०।१२ वर्षें मराठी भाषेला युनिव्हर्सिटींत योग्य मान मिळत गेला. अव्वल ज्यांनीं युनिव्हर्सिटींत मराठी भाषेला स्थळ दिलें, त्यांचे अनुमान पुढें सर्वस्वी खरें ठरलें

सन १८२६ सालापासून सन १८६४ अखेर ३८ वर्षांत ६६१ पुस्तकें मराठींत छापून प्रसिद्ध झालीं. सन १८६६ सालीं कै. माधवरावजी रानडे मराठी ट्रान्स्लेटर होते, तेव्हां या प्रगतीच्या संबंधानें त्यांनीं फार उमेदीचा शेरा लिहिला. त्यांचे शब्द येणेंप्रमाणें —

"The present is full of promise, and there is every likelihood that before long the Marathi language will be in a position to take the first rank among the cultivated languages of modern India."

म्हणजे सध्यांची मराठी भाषेची स्थिति पुढील उत्कर्षाची सूचक आहे, आणि अर्वाचीन हिंदुस्थानांतील सुप्रगल्भ भाषांमध्यें मराठीस पहिलें स्थान थोड्याच काळांत मिळेल, असा सर्वस्वी संभव दिसतो.

रावसाहेब रानडे यांचें हें भाकित उत्तरोत्तर खरेंच ठरत गेलें, ही फार संतोषाची गोष्ट आहे. सन १८७६ सालापासून सन १९०० अखेर २५ वर्षांत ३३७६ नवीन ग्रंथांची भर पडली. या संख्येंत पुनरावृत्ति किंवा भाषांतरें मुळींच नाहींत. म्हणजे सरासरीचे मानानें दर वर्षास १३५ पुस्तकें निर्माण झालीं.

मराठी भाषेच्या संपत्तींत एवढी जी भर पडली, ती कोणत्या प्रकारची पडली हें आतां आपण पाहूं. सन १८८३ सालापासून सन १८९९ अखेर सालोसालचे विषयांवर आंकडे मीं काढिले आहेत, ह्यांवरून कोणकोणत्या विषयाकडे किती भर पडली आहे हें समजेल. सन १८८३ पासून सन १८९९ अखेर प्रथमावृत्तीचीं एकंदर पुस्तकें २४६९ प्रसिद्ध झालीं, त्यांची संख्येच्या मानानें प्रतवारी लागते, ती येणेंप्रमाणें:--

१	किरकोळ	८२२
२	कविता	३५६
३	नाटकें	३०६
४	कादंबऱ्या	२०४
५	भाषाज्ञान	१४३
६	चरित्रें	१०७
७	सृष्टपदार्थज्ञान	१०३
८	हुन्नर	९९
९	इतिहास	७४
१०	वैद्यक	६५
११	गणित व यंत्रशास्त्र	५९
१२	धर्म	४०
१३	तत्त्वज्ञान	४०
१४	कायदा	२०
१५	राजनीति	१९
१६	प्रवासवर्णन	१२
		२४६९

आतां जे अंक मीं वाचून दाखविले, ते सरकारांतून प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांतून घेतले आहेत. ह्या वर्गीकरणांत कदाचित् कांहीं चुका झाल्या असतील. एखादें चांगलें पुस्तक 'किरकोळ' या सदरांत घातलें गेलें असेल. तथापि एकंदरींत ही सरकारांतून झालेली निवड ग्रहण करण्यास कांहीं हरकत नाहीं. ही निवड आपण जमेस धरून महाराष्ट्र भाषेंतील ग्रंथसंपत्ति कसकशी वाढत आली आहे, हें पाहूं.

ज्या १६ आसनांखालीं ह्या ग्रंथांची वांटणी केली आहे त्यांत संख्येच्या मानानें 'किरकोळ' हें आसन पहिलें बसतें. या सदराखालीं त्यांच्या नांवा-प्रमाणें अनेक प्रासंगिक, अचिरस्थायी अशा पुस्तकांचा समावेश झाला आहे तो आहेच; पण कित्येक चांगलीं पुस्तकेंहि यांत नमूद करण्यांत आलीं आहेत, त्यांची नांवनिशीवार यादी येथें देतां येत नाहीं. परंतु यांपैकीं ७५ पुस्तकें चांगल्यांपैकीं आहेत. एवढें येथें सांगणें पुरें आहे.

किरकोळ या सदरानंतर दुसरी जागा 'कविता' या सदरास मिळते. हा (३५६) अंक पाहिला म्हणजे प्रथमदर्शनीं कोणासहि सहज असें वाटेल कीं, कांहीं तरी कारणानें वाग्देवी महाराष्ट्रावर एकदम प्रसन्न झाली असावी. व गेल्या ६०० वर्षांत जितकीं काव्यें निर्माण झालीं, त्यांपेक्षां पुष्कळ अधिक काव्य-प्रबंध गेल्या १७ वर्षांत प्रगट झाले. परंतु ह्या सदराखालीं ज्या पुस्तकांचा समावेश झाला आहे, त्यांचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें असतां असें दिसतें कीं, या सदरांत जुन्या कवींचे लेख आले आहेत ते सोडून दिले तर बाकी लहान लहान कवितांचाच भरणा पुष्कळ आहे. यांत कोणाचें स्वागत, तर कोणाचें निधनवृत्त, कोणाचें अभिनंदन तर कोणाचें नुसतें स्तोत्र असे प्रकार आहेत. सारांश, विविधज्ञानविस्तारांत एप्रिल १९०२ चे अंकांत कोणीं मार्मिक लेखकानें वर्णिलेली "हृदयास स्पर्श करणारी, मनोवृत्ति उचंबळविणारी, मनावर भेदक पण स्पृहणीय संस्कार घडविणारी आणि चिरकाल आल्हाद प्रसवणारी, जी महाशक्ति" तिचा उदय आपल्या अर्वाचीन कवितेंत नुकता कोठें होऊं लागला आहे. अनेक काव्यरसांचा यथावत् परिपोष करितां येईल, असा एकादा धीरोदात्त नायक किंवा हृदयंगम प्रसंग घेऊन त्यावर स्वतंत्र

काव्यरचना करण्याची स्फूर्ति नुकतीच कोठें होऊं लागली आहे. इंग्लंडांतील प्रसिद्ध तत्त्ववेत्ता बेकन यानें तत्त्वज्ञान स्वर्गांतून खालीं आणिलें, व नंतर अनेक दिशांनीं तत्त्वज्ञानाचा प्रवाह वाहूं लागला, त्याप्रमाणें आपले प्रासादिक कवींनीं अध्यात्म, धर्म आणि पौराणिक कथा यांशीं जो कवितेचा निकट संबंध जोडिला होता तो तोडून केवळ व्यावहारिक विषयांवर व तुम्हां-आम्हांसारखा चालत्या बोलत्या, अनेक प्रापंचिक सुखदुःखांचा अनुभव घेणाऱ्या मनुष्यांवर, किंवा प्राचीन कालीं कवितेस अनुचित मानलेल्या अशा अनेक ऐहिक विषयांवर काव्य-प्रबंध रचण्याचा उपक्रम नुकता कोठें दृष्टीस पडूं लागला आहे. इतक्या थोड्या अवकाशांत आपल्यांत एकादा "कालिदास" किंवा "शेक्सपीयर" उदय पावला नाहीं म्हणून असमाधान मानणें माझ्या अल्पमतीनें बरोबर नाहीं. दर वर्षास पर्जन्य पडतो व पीक येतें; तसा प्रत्येक सालीं रम्य–निर्माण–शाली कवि उत्पन्न झालाच पाहिजे असा नियम नाहीं. कारण काव्य-शक्ति ही एक अंतर्ज्योति आहे व ईश्वरी देणगी आहे. ती ईश्वरप्रसादानें कधीं काळीं कोणा महात्म्यास प्राप्त होते, व ती प्राप्त असून तत्कालीन परिस्थिति अनुकूल असल्यास त्या काव्यज्योतीचें पोषण होऊन तिच्या प्रभावानें आल्हदमय नवीन सृष्टि निर्माण होते. परंतु प्रत्येक दशकांत नव्हे, पण प्रत्येक शतकांतहि ही दिव्यशक्ति अवश्यमेव प्राप्त झाल्याचीं उदाहरणें जगांत सांपडणें विरळ. ही दिव्य ज्योति स्फुलिंगरूपानें आपल्यांत सध्यां देखील दृष्टिगोचर होत आहे, व हे स्फुलिंग सुद्धां कालेंकरून प्रज्वलित होऊन आपल्या तेजानें लोकांचे डोळे दिपवून टाकितील, अशीं चिन्हें दिसत आहेत. पण तो काल इतक्यांतच प्राप्त झाला नाहीं म्हणून वाईट वाटूं देण्याचें कारण नाहीं. संस्कृतांतील रघुवंश, कुमारसंभव, किरात, ऋतुसंहार, मेघदूत, भामिनीविलास वगैरे काव्यांचीं भाषांतरें चांगलीं झालीं आहेत. तसेंच इंदिरा हें काव्य इंग्रजी "प्रिन्सेस" यावरून झालेलें आहे. यशवंतराव महाकाव्य, कृष्णाकुमारी, भट्टवंशकाव्य, व प्रतापसिंह काव्य वगैरे ग्रंथ स्वतंत्र रीतीनें छापले असून सुरतरंगिणी, शिवाजी–चमत्कार, तापी नदी, बाजीराव काव्य, हरिविलास, ईशदर्शन काव्य इत्यादि बरींच मोठीं काव्यें काव्यरत्नावलींत प्रसिद्ध झालीं आहेत. याशिवाय बारीक सारीक चुटके अनेक विषयांवर झालेले आहेत. त्यांचें परिगणन करणें सुद्धां आजच्या प्रसंगीं शक्य नाहीं.

संख्येच्या मानानें काव्याच्या खालची जागा नाटक या सदरास मिळते. १७ वर्षांच्या अवकाशांत ३०६ नाटकें नवीं व्हावीं, हें सकृद्दर्शनीं फार अद्भुत वाटतें. परंतु काव्याच्या सदराप्रमाणेंच या सदराची स्थिति आहे. यांत जुन्या संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, तसेंच शेक्सपीअरच्या नाटकांचे अनुवाद, व कैलासवासी विनायकरावजी कीर्तने व सांप्रतचे आमचे देवल यांचीं नाटकें खेरीज करून बाकीचीं बहुतेक नाटकें केवळ अभिनयार्थच रचल्यासारखीं दिसतात. भाषेच्या दृष्टीनें त्यांत खरोखर रम्य व स्पृहणीय असे भाग विरळ आहेत. यांतहि संगीत नाटकांचीं रेलचेल आहे. यांतील कित्येक संगीत नाटकें नीतिदृष्ट्या विगीत आहेत, असें मोठ्या खेदानें म्हणणें भाग आहे. संगीत नाटकांत शृंगार हा प्रधान रस असून त्यांत प्राचीन नाट्याचार्यांच्या किंवा प्राचीन नाटकग्रंथ रचणाऱ्यांच्या किंवा अर्वाचीन विदग्ध सहृदय व सदभिरुचिज्ञ पंडितांच्या मान्यतेस पात्र अशा प्रकारचा शृंगाराचा परिपोष नसून, केवळ टवाळपणा मात्र दृष्टीस पडतो. चांगल्या मार्मिक लेखकांच्या प्रबंधांत शृंगाराचा ध्वनि मात्र असतो. परंतु अलीकडील कांहीं संगीत नाटकांत त्याची उत्तान अशी व्यंजना असते, म्हणजे केवळ-ग्राम्यधर्मवाचक शब्दांचा प्रयोग करणें हेंच करून केवळ लोकरुचीस प्रिय करण्याचा प्रयत्न होत आहे. हा नीतिदृष्ट्या अत्यंत गर्हणीय असून राष्ट्राच्या अभ्युदयास विघातक आहे. कोणत्याशा अलीकडील एका नाटकांत "हां मदंगा लावूं नको" अशी नायिकेची नायकास उक्ति आहे, व ती पुष्कळ अल्पवयी मुलाबाळांच्या तोंडीं बसली आहे. आतां अशा अर्थाच्या नायिकेच्या उक्तीस अनुरूप अभिनय कसा होत असेल, व अल्पवयी मुलगे आणि मुली ह्यांच्या हृदयावर अशा उक्तीचा व अशा अभिनयाचा परिणाम काय होत असेल, याची कल्पना करणें मी श्रोत्यांकडेसच सोंपवितों. केवळ शुद्ध संगीतकला फार रमणीय आहे. तिचा संस्कार मनावर फार हितावह होतो. मनाची प्रसन्नता आणि तादात्म्य प्राप्त करून घेण्याचें संगीत हें एक उत्तम साधन आहे. आणि म्हणूनच भजनांत व हरिकीर्तनांत गायनाची योजना आपले पूर्वजांनीं केली आहे. किंबहुना सामवेद हा गाण्याचा वेद आहे, व "गायन्ति त्वा गायत्रिणो" अशीं वचनें वेदांत आहेत. यावरून गायनकला फार प्राचीन कालापासून आपल्या लोकांत मोठ्या योग्यतेची

मानलेली आहे, ही सर्व गोष्ट खरी आहे. परंतु मन वश करून घेण्याचें जें या कलेंत सामर्थ्य आहे, त्या सामर्थ्याचा सदुपयोग न केला तर परिणाम वाईट होईल, हें उघड आहे. दुधाला अमृताची उपमा आहे, पण रोग्याला तें कधीं विषाप्रमाणें घातक होतें, ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. आपल्या देशांत गायनाची जी योग्यता मानिली आहे, तीपेक्षांहि प्राचीन ग्रीक लोकांत ती अधिक मानिली जात होती. परंतु तेथें सुद्धां या कलेचा दुरुपयोग न होऊं देण्याविषयीं काळजी घेत असत. जगन्मान्य तत्त्ववेत्ता प्लेटो यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, “ ज्यांचेकडे स्वदेशहिताची जबाबदारी आहे, त्यांनीं संगीतावर सख्त नजर ठेविली पाहिजे, कारण मर्यादेचें अथवा कायद्याचें उल्लंघन कोणाचेंहि लक्षांत न येतां करमणुकीच्या रूपानें प्रथमतः या संगीताच्या द्वारानें होऊं लागतें. अमर्यादपणा अथवा उच्छृंखलपणा यांचा या द्वारानें मनांत प्रथम शिरकाव होतो, आणि मग हळूहळू रीतभात व वागणूक यांतहि त्याचे परिणाम दृष्टीस पडूं लागतात. ” प्लेटोच्या या उद्गारांत पुष्कळ सत्यता आहे, हें अनुभवास येऊं लागलें आहे. अप्रबुद्ध अल्पवयस्क मुलांचे मनाची प्रवृत्ति शृंगाराकडे होऊं लागली आहे. शृंगारविषयक पद्यें गुंगण्याचा नाद लागल्यापासून मुलांच्या मनावर व शरीरावर अनिष्ट परिणाम घडल्यावांचून राहणार नाहीं, या गोष्टीचा मार्मिक व सुज्ञ ग्रंथकारांनीं व आमच्या लोकनायकांनीं अवश्य विचार करावा, अशी माझी त्यांस सविनय सूचना आहे. श्रीखंड उत्तम पक्वान्न आहे, परंतु त्यांत माजूम कालवून त्याच्या वड्या विक्रीस मांडूं नयेत. माजूमच ज्याला खावयाची असेल ती त्याला कोठेंहि मिळेल, परंतु आमच्यांत जे संगीत नाटकें हल्लीं रचीत आहेत, त्यांनीं संगीतरूप श्रीखंडांत बीभत्स शृंगाररूप माजूम मिश्रित केली असतां स्वदेशाची मोठी हानि केल्याचें पातक त्यांच्या माथीं येईल, हें त्यांनीं लक्षांत ठेवावें.

याच्या खालोखाल (२०४) संख्येच्या मानानें “ कादंबऱ्या ” हें सदर येतें. ह्यांतहि इंग्रजींतून व संस्कृतांतून उतरलेले बरेच ग्रंथ आहेत. केवळ नवीन कल्पनासृष्टीचे ग्रंथ, मुक्तामाला, मोचनगड, पुष्पकरंडक, सुशील यमुना, आजकालच्या गोष्टी, हंबीरराव आणि पुतळाबाई, पण लक्षांत कोण घेतो, जग हें असें आहे, वगैरे लोकादरास पात्र झाले आहेत. त्यांत अलीकडे

पुष्कळ सुधारणा दृष्टीस पडत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. असंभाव्य संविधानकें, अचाट संकटें व अमानुष पराक्रम वगैरे अतिशयोक्तीचे प्रकार कमी होऊन व्यवहारांत हमेश घडून येणारे प्रसंगावरच नवीन रचना होऊन त्या योगानें संसाराचें व लोकस्थितीचें चित्र रेखाटण्याचा स्तुत्य प्रयत्न रा. आपटे यांसारखे विद्वान् ग्रंथकार करूं लागले आहेत, व त्यांच्या प्रयत्नास यशहि बरेंच आलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

कादंबऱ्यांचे खालची जागा भाषाज्ञान या सदरास मिळते. या सदराखालीं जे (१४३) ग्रंथ नमूद केले आहेत, ते बहुतेक शालोपयोगीच म्हटलें तरी चालेल. यांत अलंकार, वाक्यमीमांसा, पद्यरत्नमाला, कोश वगैरे ग्रंथ आहेत; याविषयीं विस्तार करण्याचें कारण नाहीं.

याच्या खालचें सदर चरित्रें (१०७) हें आहे. या सदराची स्थिति फार समाधानकारक आहे. यांत पाश्चात्य व पौर्वात्य, प्राचीन व अर्वाचीन पुष्कळ थोर मनुष्यांचीं चरित्रें रचलेलीं दृष्टीस पडतात. पाश्चात्यांपैकीं राजकीय उलाढालींत प्रसिद्ध झालेले मुत्सद्दी व पराक्रमी राजे-रजवाडे यांचीं चरित्रें आहेत, पण आपल्याइकडील चरित्रनायकांत बऱ्याच साधुसंत, कवि व राजकारणी पुरुषांचीं नांवें झळकतात.

याच्या खालीं अनुक्रमें थोड्या अंतरानें "सृष्टपदार्थज्ञान" (१०३) व "हुन्नर" (९९) हीं दोन सदरें येतात. या दोनहि विषयांचें अध्ययन जसें व्हावें तसें अजून होत नाहीं. सृष्टपदार्थज्ञानापैकीं रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, आणि ज्योतिष, ह्या पोटशाखांवर कांहीं नामांकित ग्रंथ झाले आहेत, परंतु ह्या विषयाच्या ज्या आणखी अनेक शाखा आहेत, तसेंच हुन्नर या सदराखालीं अनेक शिल्पकलांचा समावेश होतो, त्यांपैकीं फारच थोड्या कलांवर पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. याचें कारण माझ्या बुद्धीस असें वाटतें कीं, या शास्त्रांत आणि या कलांत प्रावीण्य संपादण्यास जें साहित्य लागतें, त्याची उणीव आहे. या विषयांचें ज्ञान केवळ पुस्तकांवरून ज्यांस झालें आहे असे पुष्कळ लोक आहेत, परंतु प्रयोगरूपानें ज्यांनीं यांची स्वतः प्रचीति घेतली आहे, असे प्रो० मोडकांसारखे लोक फार थोडे. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, या विषयांकडे आमच्या लोकांचें जितकें लक्ष लागावयास पाहिजे, तितकें अजून लागलेलें नाहीं.

या दोन सदरांचे पुढील सदर इतिहास (४७) हें आहे. या विषयासंबंधानें बरीच जिज्ञासा जागृत जाहली आहे. आपल्या महाराष्ट्रांतील जुनीं-पुराणीं दप्तरें शोधून त्यांतून इतिहासासाठीं सामग्री संपादन करण्याचें मोठें मेहेनतीचें काम रा. राजवाडे, खरे, पारसनीस वगैरे विद्वान् गृहस्थ करीत आहेत, ही मोठ्या आनंदाची व भूषणाची गोष्ट आहे. पाश्चात्य देशांतील इतिहासहि बरेच मराठी भाषेंत झाले आहेत. आमच्या जुन्या घराण्यांपैकीं बहुतेकांच्या कैफियती, बखरी वगैरेहि प्रसिद्ध झाल्या आहेत व होत आहेत, व इतिहासाचें मार्मिक रीतीनें अध्ययन होऊं लागलें आहे, ही अत्यन्त समाधानाची गोष्ट आहे.

याच्या पुढील सदर "वैद्यक" (६५) हें आहे. यांत संस्कृतांतून व इंग्रजीवरून लहानमोठे बरेच ग्रंथ झाले आहेत.

याच्या खालोखाल संख्या (५९) "गणित" शास्त्राची आहे. त्यांतील बहुतेक ग्रंथ शालोपयोगीच आहेत.

गणिताच्या पुढचीं दोन सदरें संख्येचे मानानें अगदीं बरोबरीचीं आहेत. यांत "धर्म आणि तत्त्वज्ञान" या दोन विषयांवरचें पुस्तकांचें परिगणन आहे. या प्रत्येक सदराखालीं ४० ग्रंथ नोंदले आहेत. या दोन्ही विषयांवर संस्कृत ग्रंथ अनेक आहेत. पण पाश्चात्य तत्त्वज्ञानावर रा. दाभोळकर यांनीं जे ग्रंथ प्रसिद्ध केलेले आहेत, त्यामुळें तिकडील विचाराची दिशा कळण्यास महाराष्ट्र वाचकांस मोठें साधन झालें आहे.

आतां राहिलेलीं सदरें तीन अनुक्रमें कायदा (२०), राजनीति (१९), प्रवास (१२) हीं होत. राजनीति या सदराखालीं कित्येक अर्थशास्त्रावरच्या पुस्तकांचाहि समावेश झालेला आहे व कांहीं ग्रंथ असे आहेत कीं, त्यांचें परिगणन इतिहास या सदराखालीं केलें असतां सुद्धां चालेल राजनीति हें नांव इंग्रजींत ज्याला देतां येईल, असें पुस्तक मुळींच झालें नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. कायदा या सदराखालीं हिंदुधर्मशास्त्रावर कांहीं पुस्तकें आहेत, व प्रवासवर्णनांत इंग्लंड, युनैटेड स्टेटस्, जपान, सिलोन, काश्मीर व कांहीं हिंदुस्थानांतील शहरांचीं वर्णनें आहेत. यांत बरेच ग्रंथ खरोखर वाचनिय असे झाले आहेत.

येथपर्यंत गेल्या १७ वर्षांचा आढावा मीं सादर केला. आढावा फक्त प्रथमावृत्तीचा दिला. केवळ भाषांतरें म्हणून जें सदर सरकारी कागदांत

दिलेलें आहे, त्यांत या १७ वर्षांत ५७४ पुस्तकें नोंदलीं आहेत. हीं जमेस धरिलीं असतां १७ वर्षांत ३०४३ नवीन पुस्तकांची भर महाराष्ट्र वाङ्मयांत पडली असें दिसून येईल. इंग्रजी अम्मल सुरू झाल्यापासून मोजदाद केली असतां एकंदर प्रथमावृत्तीचा आंकडा ४९१३ येतो अथवा स्थूल मानानें सन १८२६ पासून १९०० अखेर ७५ वर्षांत ५००० नवीन पुस्तकें झालीं असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

एवढा वेळपर्यंत मराठी भाषेची प्रगति आंकड्यांच्या रूपानें जेवढी दाखवितां आली, तेवढी दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतु भाषेच्या अंतःस्वरूपांत जो काळोकाळीं भेद होत गेला, त्याचा विचार या प्रसंगीं थोडासा तरी करणें इष्ट आहे. भाषारूप वधू शरीरानें पुष्ट झाली एवढें पाहून मनाला संतोष होणार नाहीं. त्या अवयवपुष्टीबरोबर तिच्या ठायीं मोहकपणा आला आहे किंवा नाहीं, हेंहि पाहिलें पाहिजे. माझ्या समजुतीप्रमाणें अवयवांच्या वाढीबरोबर तिचें सौंदर्यहि वाढत चाललें आहे. हें स्पष्ट करून दाखविण्याकरितां निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या संस्कारांच्या व्यक्तींनीं जे लेख लिहिले आहेत, त्यांतून कांहीं निवडक वेंचे आपल्यापुढें सादर करण्याची परवानगी घेतों.

रा. रा. विश्वनाथपंत राजवाडे यांनीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ याला जी उपप्रस्तावना जोडिली आहे, तिच्या ३३ व्या पृष्ठांत पुढील लेख दिला आहे.

" स्वस्ति श्री सालीवान सकु कु १३१९ वरीसे चित्रभानु संवत्सर आदीक बाहुळ ३ गुरुवारी चांदगडाडुजीपती नन्यसी देवाचा दळवै यानें याचा पिता भाम सावंत तदोद्दीसी उपभोगासी देण वीडा धुणा तेलाद्रेया उपभोगासी दत्त रौप्य टांके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी देउळाच्या कामाया वेचू द्राम १५०० दळवैपणोचे जाले दीनु आर्धे एखंधर याची ला दिनु नीची वेचूद्राम १००० आखेर तोपी सासु उफरासी भाभ सावता वेळाचा दळवै येदीद्दासी भूमी भन्यया २ मडायी मेव ओंयू व्ययी मेरं नेयी मेर सडे खडीचे यी मेर आंभन्यी. "

या सर्व पत्राचा अक्षरशः अर्थ लावण्यास राजवाडे यांचेसारखाच प्राचीनमहाराष्ट्रभाषापटु पंडित पाहिजे, परंतु आज आपल्यास या पत्राचा अर्थ

लावावयाचा नाहीं. सुमारें ५०० वर्षांपूर्वी मराठी भाषा कशी लिहीत होते, याचा हा एक मासला झाला.

व्यवहारांत म्हणजे देवघेवींत व खाजगी कामकाजांत अशा प्रकारची भाषा त्या वेळीं वापरीत असत, असें या पत्रावरून दिसतें. परंतु यानंतर सुमारें ३०० वर्षांनीं जेव्हां फारशी भाषेचें प्राबल्य कमी होऊं लागलें व संस्कृत शब्दांचा भरणा अधिक होऊं लागला, तेव्हां अर्थातच भाषेच्या स्वरूपांत पालट पडला. याचें उदाहरण देतों. राजवाडे यांनीं प्रसिद्ध केलेल्या ८ व्या खंडांत पृष्ठ ८३ येथें रा. खेम सांवत भोसले सरदेसाई यांस राजा शिवछत्रति यांनीं लिहिलेलें एक पत्र दिलें आहे. तें येणेंप्रमाणें :—
"उपरी सांप्रत राजश्री शाहू राजे यांचा फितवा निर्माण होऊन राज्यांत डोहणा जाहला. कितेक सेवक लोकीं अवक्रिया करून जाऊन त्यास मिळोन अनसारिखी वर्तणुक आरंभिलीं आहे. याप्रसंगें तुह्मी स्वामीशी निष्ठा धरून निर्व्याजत्वे एकरूप निष्ठेनें वर्तणुक केली व राजश्री विश्राम अनंत व जिवाजी राम यास कितेक आपुले निष्ठेचे अर्थ हुद्दत सांगोन पाठविले कीं आपण त्रिकर्णशुद्धीनें स्वामीशी निष्ठेनें वर्तणुक करून शाहूराजे याजकडे अनुसंधान लावणार नाहीं." इत्यादि. या मागून वाचलेल्या पत्राची भाषा प्रौढ व संस्कृतशब्दप्रचुर आहे, व हा सगळा फरक २००।२५० वर्षांत झाला. अशा तऱ्हेची प्रगल्भता आणण्यास बरेच अंशीं आमचे प्राचीन कवि कारण झाले असावे असें वाटतें. किंबहुना गद्याच्या प्रौढ रचनेचा आरंभ आमच्या कवींनींच केला असेल असें संभवतें. थोरले **शाहाजी** महाराज यांचे गुरु आरणीकर **आनंदतनय** यांनीं निरनिराळ्या आख्यानांत ज्या चूर्णिका घातल्या आहेत व ज्या चूर्णिकेचें रूपांतर कडाका आणि कटाव या नांवांनीं **अमृतराय** यांनीं लोकप्रिय केलें, त्या चूर्णिकाच आपलें आद्य गद्य असावें असें वाटतें. या **आनंदतनयाचें सीतास्वयंवर** आणि **मार्कंडेय आख्यान** या दोहोंपैकीं दोन लहानशा चूर्णिका उदाहरणार्थ वाचून दाखवितों.

"ऐशिया ऋषिराजसमूहामाझारीं विराजमान, विद्वज्जन सार्वभौम, विमलांतःकरण, विश्वविख्यात, महानुभाव, सिद्धाश्रमविहारी जो महातपाचा तेजोराशि, परंतु उदयास्तावेगळा, आल्हादकारक कलानिधि, परंतु वृद्धिक्षयारहित नित्यागळा,+++ असो ऐसा परम पवित्र विश्वामित्र, सुकृतराशि

स्वयंवर महोत्सवविलोकनविलासी, धर्मादि सद्गुणोत्करजनकें, विदेहदेशाधिप जनकें देखोनि साष्टांग दंडवत वंदिला."

"ऐशी ऐकून दीनवाणी, श्रीमत्पिनाकपाणी भीमशंकर दुष्कर पिंगलाक्ष उठावे. तेणें देखुनि यमतृण लेखुनि, पद वक्षःस्थळावरी ताडिला, वसुंधरेवरी पाडिला, आल्हादूनि देवें नरसिंहें प्रल्हादापरि रक्षिला, तव तो मार्कंडेय जयजय शब्दें उदेला त्रिवार चिरंजीव म्हणुनि संबोधिला" इत्यादि. आतां वाचून दाखविलेल्या चूर्णिका आणि अशा चूर्णिकांचे रचनेपासून मराठी गद्यरचनेवर झालेला परिणाम स्पष्ट करण्याकरितां **नाना फडणविसांचें** एक पत्र वाचून दाखवितों. त्यांतहि कांहीं स्थळीं विरोधाभासाची छाया दृष्टीस पडते.

'सूर्यतनया यमुना हिच्या तिरीं **गोघाट**ाजवळ गेलों, तेथें स्नान संध्या करून दोहों दिवसानंतर मुक्तिपुरी श्रीमथुरा क्षेत्रीं गेलों. तेथें क्षौर प्रायश्चित्त श्राद्धादिक करून तदनंतर पुढें भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण यानें सकल लीला केल्या असें जें वृंदावन त्या स्थळास गेलों. तेथें **कालिया** डोहीं कदंब वृक्ष ज्यावर भगवान बसून वस्त्रहरण करिता झाला त्याच्या शाखा अद्यापि यमुनेंत गेल्या आहेत, त्याखालीं जाऊन स्नान तर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळशीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करित होत्साता वृंदावनांत विहारी व कुंजविहारी व बालविहारी राधाकिशोर गोविंदजी या भगवंताच्या मूर्ति यांचीं दर्शनें घेतलीं. त्यांत कुंजविहारी मध्यान्हकाळीं चोपाळ्यावर निद्रिस्थ, कपाट लागलेलें, चौपळ्याची दोरी बाहेर ओढीत असत ती आपले हातीं ओढून भगवान् जो यास आंदोलनलीला केली. तेथोन शृंगारवाट जेथें भगवंतानें राधेस शृंगार केले, तेथें जाऊन वटदर्शन घेऊन पुढें वंशीवटी म्हणजे जेथें भगवंतें मुरलीवादन केलें, तेथें जाऊन वटाचें दर्शन केलें. तेथून सेवावन, कुंजवन हीं स्थळें, कुंज कसे कीं, भगवान् लीला करितो असाच भास होत असावा. सर्वही वृक्ष छत्राकार ठेंगणे, भूमिस्थ पल्लव कंटक वृक्षासही परंतु कंटक नाहीं हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातिरीं रेतींत भगवान् जो बाळरूपी याणें लीला केली, पादारविंदसंबंधीं रेणुरजःकण त्यांची प्राप्ती मस्तकीं वंदावयाकरितां ब्रह्मादिक देव इच्छितात तेथें जाऊन लोळून ती रेती मस्तकावर घेतली. तेथोन ज्ञानगुदडीस गेलों, तेथें थोर थोर संत

महंत बैरागी भगवत्पर होत्साते सायंकाळचे सहा घटिका दिवसास येऊन बसून पुराण श्रवण करित आहेत, भगवंताच्या कथानामें गात आहेत, त्यांचें दर्शन घेऊन चार घटिका पाहून चित्त बहुत शांत झालें. तदनंतर धीर समीर जे या प्रति कालिंदीतिरीं जाऊन सायंकाळ संध्या करून भगवान् सांबसदाशिव जो याचें एकाग्रमनें करून ध्यान करून येतां झालों. याप्रमाणें तीन चार दिवस क्रमिले. अनेक जन्मांचें पुण्य कीं, असें वृंदावन दृष्टीस पडलें. तेणेंकरून भगवंताच्या मूर्ति व भगवद्भक्त यांचें दर्शन करून नेत्र पवित्र जाहले!"

नाना जरी संस्कृत पंडित नसले तरी फार बहुश्रुत होते, हें या उताऱ्यावरून स्पष्ट आहे. आतां अव्वल इंग्रजींतील मराठी गद्यरचनेचा लहानसा चुटका वाचून दाखवितों. वे. **रघुनाथशास्त्री पर्वते** हे महापंडित होते, व त्यांनीं भगवद्गीतेवर मराठींत एक सुविस्तृत टीका केली आहे, त्या ग्रंथाचे उपोद्घातांत त्यांनीं म्हटलें आहे :—

'प्रत्येक भगवद्भक्तास गीताशास्त्रार्थाचें निरूपण माझ्यानें होणार नाहीं. याकरितां प्राकृत भाषेंत व्याख्यान केलें असतां तें व्याख्यान जे अधिकारी पाहतील त्यांस मींच गीताशास्त्राचें कथन केलें असें होऊन त्यायोगें परमेश्वरभक्ति मला प्राप्त होईल, आणि मी ज्या दुःखप्रवाहांत पडलों आहें त्यापासून परमेश्वर माझा उद्धार करून मला जीवन्मुक्त करतील. या स्वार्थासाठीं आणि माझी शुद्धाशुद्ध वाणी या व्याख्येचे संबंधानें अति पवित्र जें भगवदुक्त गीताशास्त्र त्यास संगत झाल्यामुळें जसे गांवांतील स्वल्प उदकाचे ओहोळ गंगेस मिळाले तर अति पवित्र जें गंगाजल तद्रूपच पवित्र होतात, त्याप्रमाणें माझी वाणी पवित्र होईल. यासाठीं मीं **पर्वते**त्युपनामक **रामचंद्रपुत्र रघुनाथ** शास्त्री यानें ही भाषाविवृत्ति या नांवाची गीताशास्त्राची व्याख्या केली आहे."

पर्वते शास्त्रीबोवा इंग्रजी शिकलेले नव्हते, व त्यांचे वेळेस इंग्रजी वाङ्मयाचा संस्कारहि फारसा झाला नव्हता. तथापि त्यांच्या भाषेंत काठिन्य फार थोडें उरलें होतें, हें आपल्या दृष्टीस पडत आहे. यानंतरच्या पिढींतील पंडितांनीं महाराष्ट्र भाषेची उत्तम सेवा केली. त्यांच्या भाषेंत व सध्यां प्रचलित असलेल्या भाषेंत फारच थोडा भेद दृष्टीस पडतो. कै. **कृष्णशास्त्री भाटवडेकर, परशुरामपंत तात्या गोडबोले** व **कृष्णशास्त्री राजवाडे**

यांची भाषा आजकाल सर्वांना सुबोध वाटत आहे. त्यांत क्लिष्ट असें कांहींच दृष्टीस पडत नाहीं, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

त्याच कालच्या पंडितांपैकीं कै० **कृष्णशास्त्री चिपळुणकर** हे होत. परंतु त्यांनीं इंग्रजी भाषेचा मार्मिक अभ्यास केला, व प्राचीन संस्कृत आणि अर्वाचीन इंग्रजी या उभय वाङ्मयाचा बलवत्तर संस्कार त्यांचे वाणीस झाला, यामुळें त्यांच्या ग्रंथरचनेस जी योग्यता प्राप्त झाली तिजमुळें अर्वाचीन ग्रंथलेखकांच्या आद्य गुरुत्वाचा मान आपण त्यांस देणें अगदीं योग्य आहे. नुकतीच **आनंदतनयाची** विश्वामित्रवर्णनपर मीं जी चूर्णिका वाचिली तिचें स्वरूप आतां जें श्रीमती **अहल्याबाई होळकरीण** हिचें वर्णन वाचणार आहे, त्याच्याशीं ताडून पहाव.

" विचार करून पाहतां ही स्त्री (अहल्याबाई) लोकोत्तर वाटते. परस्परास विरुद्ध जे गुण ते हिच्या अंगीं एकत्र वसत होते असें दिसतें. जातीची बायको असून डामडौल करण्याची बुद्धि तिच्या आंगीं मुळींच नव्हती. स्वधर्मावर पराकाष्ठेची श्रद्धा असून परधर्माच्या लोकांचा द्वेष नाहीं, इतकेंच नाहीं तर त्यांवर पूर्ण कृपा ती करी. तारुण्य दशेंत वैधव्य प्राप्त झालें असतां पूर्ण पातिव्रत्य, लक्ष्मी घरीं पाणी वाहत असतां तपस्व्याची वृत्ति, हातीं अमर्याद राजसत्ता असतां व ती अपरिमेय चातुर्यानें चालवीत असतां जिच्या अंगीं अहंकाराचा लेशहि नव्हता; व जें जें कृत्य करावयाचें तें परमेश्वरास भिऊन करावयाचें. व सर्वांत विशेष गुण हा कीं, आपण स्वतः इतकी शुद्ध व निर्मळ असून दुसऱ्याचे दोष व व्यंगें न काढितां व न्याय न मोडितां त्याजवर जितकें पांघरूण घालवेल तितकें घालण्याची मोठी इच्छा. हे सर्व गुण खरोखर पाहतां अगदीं अमानुष दिसतात. "

आतां कृष्णशास्त्री यांचेच ग्रंथांपैकीं इंग्रजी ग्रंथाच्या अनुवादाचा एक मासला दाखवितों. हा अनुवाद इतका अस्सलबरहुकूम वठला आहे कीं, हें भाषांतर आहे, असें सहसा कोणास वाटणार नाहीं,

" सर्व दुःखें जाण्याविषयीं आपण इच्छितों. पण मेल्याबद्दलचें जें दुःख होतें तेवढें मात्र जाण्याविषयीं आपण कधीं इच्छीत नाहीं. हरएक जखम बुजून बरी होण्याविषयीं आपण झटतों, हरएक हानि विसरण्याविषयीं आपण

यत्न करितों. पण इष्ट जनाच्या मरणानें अंतःकरणास जी जखम पडते ती बुजूं न देणें हा आपला धर्म वाटून ती आपण तशीच ठेवितों, व या हानीचा विसर पडूं न देतां एकांतीं बसून ती मनांत घोळीत असतों. ज्या आईचें केळीच्या कोंबासारखें तान्हें बाळ डोळ्यादेखत गमावलें असतें, त्याची आठवण झाली असतां तिच्या हृदयास हजारों विंगळ्या झोंबल्यापेक्षां अधिक वेदना होतात. पण त्या वेदना होऊं नयेत, व त्या बाळाचा विसर पडावा, असें कोणत्या आईच्या मनांत येणार आहे बरें ?" इत्यादि.

शास्त्रीबोवांचें नांव मराठी ग्रंथकार या नात्यानें काढल्यावर त्यांचे चिरंजीव **विष्णुशास्त्री** याचे नांवाचा उच्चार करणें अपरिहार्य आहे. संस्कृत कवि बाण व त्याचा मुलगा या दोघांची आठवण "कादंबरी" हा शब्द कानीं पडतांच जशी होते तशीच "मराठी भाषा" हें नांव निघाल्याबरोबर माझ्या डोळ्यापुढें **चिपळुणकर** पितापुत्र दोघेहि मूर्तिमंत उभे राहतात. कादंबरी रचण्याचें श्रेय जसें बाण व त्याचा मुलगा यांस, तेंच श्रेय मराठी भाषेच्या गद्यरचनेसंबंधानें **चिपळुणकर** पितापुत्र यांस देणें अवश्य आहे. कारण, थोरल्या शास्त्रीबोवांच्या हातून जें अपुरतें राहिलें तें धाकट्यांनीं परिपूर्ण केलें. असो. **विष्णुशास्त्री** यांनीं मराठी भाषारचनेला जी प्रौढ दशा आणिली, तिचा एक मासला येथें देणें अत्यंत अवश्यक आहे. कविपंचकांत **भवभूतीचे** चरित्राचा उपसंहार करितांना विष्णुपंत म्हणतात :—"तथापि फार दिवसांपासून लोकांच्या दंतकथांनीं त्यांची (म्हणजे **कालिदास** व **भवभूति** यांची) इतकी गट्टी घालून दिली आहे कीं, इतःपर ती कधींहि निघणें नाहीं, व शोधक पंडितांनीं ती तोडण्याविषयीं कितीहि वाद उभे केलें व कितीहि बलवत्तर प्रमाणें आणिलीं, तरी दोघे कविमणि **भोजराजाच्या** सभेंतील पंडितांचीं शिरोरत्नें होतीं. त्यांचें त्या गुणिजनैकपक्षपाती राजानें कंठमण्याप्रमाणें निरंतर लालन करावें. प्रसंग कितीहि हलका, विषय कितीहि तुच्छ असला तरी आपल्या वाणीच्या अस्खलित रसानें त्यास त्यांनीं भूषित करावें. दोघांच्या वाक्चातुर्यांत झटापटी चालाव्या, व परस्परांच्या रसमय कृति पाहून दोघांनीं क्षणभर स्पर्धा विसरून त्यांचें हृदयोल्लासभरांत अभिनंदन करावें. इत्यादि असत्यमय भासांतच रंगून जाणें मनास आवडतें व ज्या वृथा सत्याभिमानी निष्ठुर शोधकांनीं वरील मनोरंजक भ्रमांचा निरास करण्याकडे आपली बुद्धि

खर्चिली त्यांस शतशः शाप देऊन त्यांनीं सर्वथा निर्णय केलेल्या सत्याचीहि ते पर्वा करीत नाहींत!"

या उताऱ्यांतील भाषारचना किंवा रीति हींत संस्कृत भाषेंतील शब्दांचा भरणा पुष्कळ आहे, त्यामुळें अशा प्रकारच्या लेखांत ओज पुष्कळ आहे, व हीच किंवा याच धरतीची भाषा बहुतेक ग्रंथांत सध्यां योजण्यांत येते. डाक्टर **जान्सन** ह्यांच्या काळच्या इंग्रजी भाषेंत **लातिन** व **ग्रीक** शब्द जसे येत होते, तशाच प्रकारची ही रीति आहे. याच्यापेक्षां सुबोध शब्द जींत असत अशी भाषारीति **आडिसन, स्टील** इत्यादि ग्रंथकार यांनीं योजिली, व तशाच रीतीची भाषा योजण्याचा आपले मित्र रावसाहेब **विनायकरावजी ओक** यांचा बाणा आहे. **विष्णुशास्त्री, आगरकर** यांची भाषा **जान्सन**च्या रीतीवर आहे असें म्हटलें तर **ओक** यांची रीति **आडिसन**च्या धर्तीवर आहे, असें म्हणतां येईल. मराठी ग्रंथ पुष्कळ आहेत. सर्वांच्या नांवाचा उच्चार करण्यास व त्यांचें त्यांचें स्थान कोणतें हें सांगण्यास आज अवकाश नाहीं, म्हणून दोनच व्यक्तींचा मीं नामनिर्देश केला आहे. यावरून इतर चांगले लेखक नाहींत, असा मुळींच माझा अभिप्राय नाहीं. ज्यांनीं मराठी भाषेची पुष्कळ सेवा अनन्यभावें केली, त्यांचीं नांवें सांगितलीं म्हणून इतर मान्य ग्रंथकारांनीं रागावूं नये, एवढी माझी त्यांस विनंती आहे.

मराठी वाङ्मयाचा असा अभ्युदय करण्यांत आम्हांला सर्व जातींकडून व त्यांतहि विशेषतः स्त्रियांकडून चांगली मदत झाली आहे, हें पाहून फार संतोष वाटतो. सौ० **काशीबाई कानिटकर** यांची लेखणी बहुधा कांहींना कांहीं विषयावर चालू आहेच. मिस् **भोर** यांच्या पुष्पकरंडकाचा मीं नुकताच उल्लेख केलेला आहे. येथील "मासिक मनोरंजनां"त पुष्कळ कुलस्त्रियांचे चांगले लेख येत आहेत, हें आपणांस माहीत आहेच. स्त्रियांना परमेश्वरानें कदाचित् पुरुषांपेक्षां अधिक प्रतिभा दिली आहे कीं काय कोण जाणे, परंतु पुष्कळ वेळां मीं असें पाहिलें आहे कीं, स्त्रियांचे लेखांत माधुर्याचीं उदाहरणें पुरुषांच्या लेखापेक्षां अधिक आढळतात, व त्यामुळें ते लेख अधिक मनोवेधक होतात. याचें एक अगदीं ताजें उदाहरण देतों. श्रीमती **रमाबाई रानडे** यांनीं आपल्या प्रिय पतीचीं धर्मपर व्याख्यानें मोठ्या भक्तीनें नुकतींच प्रसिद्ध केलीं. त्या व्याख्यानाला एक लहानशी प्रस्तावना जोडिली आहे. त्या प्रस्ता-

वनेंतील तीन–चार वाक्यें इतकीं सरस आहेत कीं, तीं वाचल्याबरोबर अंतः-करण सद्गदित होतें. तीं वाक्यें मी वाचून दाखवितों.

" ती प्रेमळ, शांत व गंभीर वाणी प्रत्यक्ष ऐकण्याचें माझें भाग्य राहिलें नाहीं, तरी पण माझ्या हृदयस्थ असलेल्या मूर्तीच्या मुखांतून निघालेल्या अमृतवाणीचा–त्या पवित्र गंगेचा–आश्रय केला तर, अशा दुःखांतहि कांहीं समाधानाला जागा होईल व मनाला स्थैर्य व शांति येण्याला तीच प्रसादवाणी सर्वांशीं कारणीभूत होईल, असा मला पूर्ण भरंवसा वाटत आहे. आपल्याला नंदादीप लावण्याचें सामर्थ्य नसेल, तर तेवत असलेल्या नंदादीपाची नुसती वात सारली तरी पुण्य घडतें, असें वाडवडील सांगत आले आहेत. दुसऱ्यानें लावलेल्या नंदादीपाची वात सारण्याचें श्रेय इतकें आहे; आणि हा जो उप-देशरूपी ज्ञानदीप **स्वतः**च लावून ठेवण्यांत आला आहे, त्याची वात सारण्याचें काम **माझें**च आहे, हें जाणून मी आज उपलब्ध असलेलीं व्याख्यानें पुस्तक रूपानें प्रसिद्ध करीत आहें. "

ह्या उताऱ्यांत करुण व शान्त हे दोन्ही रस फार उत्तम रीतीनें उतरले आहेत. " हृदयस्थमूर्ती ", " अमृतवाणीरूप पवित्र गंगा " व " नंदा-दीपाची वात सारण्याचें श्रेय " इत्यादि शब्द अंत.करंणास गहिंवर आणतात, असें कोण म्हणणार नाहीं ? " स्वतःच लावून ठेविलेला ज्ञानदीप " या शब्दांत हिंदुस्त्रियांची पतीचा नामनिर्देश न करण्याची जी शालीनता ती किती हृदयंगम आहे, हें सांगावयास नको. संस्कृत भाषेचा बलवत्तर संस्कार झाला असेल व प्रतिभासंपत्ति चांगली असेल, तर स्त्रियांची कृति फारच मनोहर होते.

उदाहरण वाचून दाखवितों :—

" मुंबईहून निघाल्यानंतर ४।५ ठिकाणीं मात्र आम्हांला भूमीचें दर्शन झालें. एरव्हीं खालीं अगाध समुद्र आणि वरती अनंत आकाश आमच्या नजरेस पडत होतें. संध्याकाळच्या वेळेस आम्ही जेव्हां डेकावर बसत होतों तेव्हां समुद्राची आणि आकाशाची अपूर्व आणि अवर्णनीय शोभा आणि महत्त्व पाहून माझ्या मनांत किती प्रकारचे विचार येत असत, हें सांगतां येत नाहीं. एकीकडे सूर्य अस्ताला जात आहे, त्याची सायंकालीन कोमल प्रभा अनंत नील नभोमंडळांत जिकडे तिकडे विशेषेकरून पश्चिमेकडे पसरलेल्या

पिंजलेल्या शुभ्र कापसाच्या ढिगासारख्या मेघराशींवर प्रतिबिंबित होऊन आमच्या पुराणांतील काल्पनिक सुवर्णगिरि मेरूचीं शृंगें चोहोंकडे समुद्रांतून आपलीं डोकीं उचलून आकाशाचें चुंबन घेत आहेत कीं काय, अशी भ्रांति होत असे. किंवा समुद्रोदरांत कल्पिलेली कृष्णाची सुवर्णद्वारका अथवा रावणाची लंका माझ्यासमोर आहे कीं काय असें वाटत असे. सूर्यास्त झाल्यानंतर बंगाल्यांतील पडदपोशी स्त्रिया जशा हळूच पडदा पलीकडे सारून लोकांस भीत भीत खिडक्यांतून डोकावून पहातात आणि पुनः झटकर घरांत आपलें तोंड लपवितात, त्याप्रमाणें वायुवेगाच्या परवश होऊन आकाशांतून इकडे तिकडे फिरणाऱ्या मेघरूपी पडद्याच्या अंतराळांतून एकापाठीगून एक अशा पुष्कळ तारका गगनसौधावरून आमच्याकडे डोकावीत असत आणि पुनः मेघाच्या आड आपले तोंड लपवीत असत. एखाद्या वेळेस आकाश निरभ्र असलें म्हणजे असंख्य नक्षत्रें दिसूं लागत. त्या वेळेस यमुनेच्या नीलजलप्रवाहांत भक्तांनीं वाहिलेलीं शुभ्र जुईचीं पुष्पें चोहोंकडे पसरलेलीं आहेत कीं काय असें वाटत असे, आणि त्या वेळेस चंद्रोदय झाला असला तर त्या शोभेला पारावारच नसे. खालून अगाध समुद्राचा विस्तीर्ण वर्तुळाकार एक भाग आणि वर स्वच्छ नभोमंडळाचा दुसरा भाग असे दोन्ही जुळलेले दिसत असून त्यांत मोत्यांसारख्या चोहोंकडे पसरलेल्या तारका जशा आकाशांत, तशींच त्यांचीं प्रतिबिंबें समुद्रजलांत दिसत असून मला असा भ्रम होई कीं, हा आकाश आणि समुद्र अशा दोन भागांनीं जुळलेला एक अति विस्तीर्ण मोत्यांचा शिंपला आणि याच्यामध्यें हीं पसरलेलीं मोत्यें आणि शिंपल्याच्या आंतील झळकदार दोन्ही बाजू मला दिसत आहेत ! चंद्रप्रभेंत समुद्रांतील उसळणाऱ्या कल्लोळांकडे पाहिलें म्हणजे समुद्रांतील पाणी पातळ झालेल्या चांदीप्रमाणें पांढरें व झळकदार दिसत असे. खवळलेल्या समुद्रांतील कल्लोळांच्या परस्पर संघर्षणानें उद्भवलेल्या फास्फरस नांवाच्या अग्नीच्या ठिणग्या जेव्हां झळकत तेव्हां आमच्या पूर्वजांनीं कल्पिलेल्या वडवाग्नीचें प्रकारांतरानें दर्शन होत असे ” इत्यादि.

या उताऱ्यांत किती मनोहर उपमा आहेत, व पदलालित्य किती साधलें आहे. प्रतिभेचें उज्ज्वलत्वहि किती रमणीय आहे, हें सहृदय श्रोत्यांस सांगावयास नको. हें गद्य असून यांत काव्याची रमणीयता आहे, असें कोणासहि

वाटेल. हा उतारा **पंडिता रमाबाईं**च्या ‘ इंग्लंदचा प्रवास ’ नामक पुस्तकांतून घेतला आहे.

चिरस्थायी व प्रौढ वाङ्मयाचें आणखी एक अंग आहे. तें मासिक व त्रैमासिक प्रसिद्ध होणारे निबंधसंग्रह. यांतहि दिवसेंदिवस पाऊल पुढें पडत आहे. **विविधज्ञानविस्तारासारखीं** नांवाजलेलीं मासिक पुस्तकें चांगल्या स्थितींत आहेत, व नवीन नवीन आपल्याइकडे व वऱ्हाडांत मासिकें निघत आहेत, ही संतोषाची गोष्ट आहे. कोल्हापूरच्या **ग्रंथमालेंत** मोठ्या गहन विषयांवर व प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासावर भारदस्त लेख येत आहेत. वर्तमानपत्रांतूनहि कधीं कधीं चांगले लेख येतात. पण त्यांतील बहुतेक विषयांचें महत्त्व त्या कालापुरतेंच असतें व त्यामुळें वाङ्मयाचें चिरस्थायित्व त्यांत फारसें नसतें. म्हणून त्यांचा उल्लेख मी आज करीत नाहीं.

मराठी गद्यग्रंथांची संपात्ति किती आहे याचा अंदाज काढतांना आपल्या पूर्वजांच्या आणखी एका देणगीचा विचार आपल्यास करणें जरूर आहे. ती देणगी कोणती म्हणाल तर आपल्या नित्य व्यवहारांत उपयोगी पडणारे पत्रें लिहिण्याचे मायने त्यांनीं ठरवून दिले. “ अखंड गुणालंकरण मंडित ” इत्यादि केवल स्तुतिपर उपपदें सोडून दिलीं तरी ‘ राजमान्य राजश्री ’ इत्यादि उपपदें आजकाल आपल्याला अत्यंत उपयोगी पडत आहेत. खुद्द बापास किंवा आईस पत्र लिहिणें असल्यास “ तीर्थरूप ”, सामान्यत्वें वडील माणसास लिहिणें असल्यास “ तीर्थस्वरूप ” असा आरंभ करून “ वडिलांचे सेवेशी ” “ अपत्यें बाळकें ” किंवा “ बाळकें ” असा यथानुक्रम उच्चार करून “ दोन्ही कर जोडून त्रिकाळचरणीं शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ” हे शब्द वडिलांच्याविषयीं अत्यंत भक्तीचे द्योतक आहेत. इंग्रजींतील My dear, affectionate किंवा loving ह्यापेक्षांहि आपल्या या मायन्यांत प्रीति व गौरव अधिक आहे, असें मला वाटतें. प्रत्येक मुलास किंवा आपल्यापेक्षां लहान भावंडास किंवा आप्तास पत्र लिहिणें असल्यास प्रथमतःच आशीर्वादार्थी “ चिरंजीव ” अशीं अक्षरें लिहिणें हें केवळ प्रीतीचें व्यंजक नसून ज्यास पत्र लिहिलें असेल त्याला दीर्घायुष्य प्राप्त व्हावें, अशा दृढलालसेचें द्योतक आहे. व चिरंजीव हें पद लिहिल्यानंतर पुढें आणखी “ विजयी भव ” अशीं अक्षरें जोडण्याची रीति वडिलांच्या मनांतील कल्याणबुद्धीची दर्शक

आहे. पहिल्या दोन ओळींत याप्रमाणें उपपदासहित नांवाचा उच्चार झाला म्हणजे आप्ताखेरीज इतरांस पत्र लिहिलें असेल तर "स्वामीचे सेवेशीं पोष्य" अशीं अक्षरें लिहिण्याचा संप्रदाय घालून दिला आहे. "स्वामीचे सेवेशीं पोष्य" या शब्दाचें सादृश्य इंग्रजींतील "I have the honour to be, sir, your most obedient servant" याच्याशीं नाहीं असें कोण म्हणेल ? ज्यास पत्र लिहावयाचें असेल तो जर स्नेही असेल तर आरंभीं "मित्रवर्य" असेंहि लिहिण्याचा परिपाठ आहे. परंतु हीं अक्षरें जरी न लिहिलीं तरी पत्राच्या तिसऱ्या ओळींत "स्नेहांकित" अशीं अक्षरें लिहिण्याची वहिवाट घालून दिली आहे. "स्नेहांकित" याचा स्नेहानें बद्ध असा अर्थ होतो. म्हणजे इंग्रजींतील जो अर्थ "Yours sincerely" या शब्दांनीं व्यक्त होतो त्याहि-पेक्षां स्नेहाची अधिक व्याप्ति आपल्या मायन्यांत दृष्टीस पडते. याप्रमाणें पहिल्या तीन ओळी लिहून झाल्या म्हणजे "आपल्या कृपेंकरून" किंवा "श्रीकृपेंकरून" किंवा "वडिलांचे आशीर्वादेंकरून" सुखरूप असो, असें यथाक्रम लिहिण्याची पद्धति आहे. "आपल्या कृपेंकरून" म्हटल्यानें पत्र ज्यास लिहिलें आहे त्याचा गौरव होतो. "श्रीकृपेंकरून" म्हटलें तर अर्थात् परमेश्वरकृपेचा कृतज्ञतापूर्वक उच्चार होतो व "आशीर्वादेंकरून" म्हटलें असतां वडील मनुष्यांचा आशीर्वाद मुलांच्या कल्याणाविषयीं फलप्रद असतो, असा पवित्र ध्वनि त्यांत निघतो. याप्रमाणें कुशलता कळविल्यानंतर पत्रांतील मजकुराचा आरंभ होतो व त्या मजकुराची प्रस्तावना "विशेष" या एका शब्दानें होते. हल्लीं "विशेष" शब्दाचा अर्थ न समजल्याकारणानें कांहीं लोक "पत्र लिहिण्यास कारण कीं" अशा लांबलचक व सरकारी कागद-पत्रांत लिहिण्याच्या पद्धतीनें लिहूं लागले आहेत, ही फार खेदाची गोष्ट आहे. पत्राची समाप्ति करण्याची रीतिहि फार प्रशस्त आहे, "वडिलांचे सेवेशीं", "स्वामीचे सेवेशीं", "श्रुत होय हे विज्ञापना." हे सर्व यथानुक्रम संप्रदाय फार उत्तम आहेत, असें निदान मला तरी वाटतें.

आतां वाङ्मयाचें एक प्रधान अंग जें कविता त्यावर दोन शब्द बोलून मी माझ्या भाषणाचा समारोप करितों. काव्य या विषयाखालीं जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, त्यांचें दिग्दर्शन मीं थोड्या वेळापूर्वीं केलेंच आहे. परंतु प्राचीन

जी काव्यसरणी चालत आली आहे, तींत कांहीं विशेष झाले आहेत. त्यांविषयीं खुलासा मी आतां करणार आहें.

आपल्या प्राचीन महाराष्ट्र कवींनीं कवितावधू जितकी सजवावी तितकी सजविलीच आहे. " संस्कृतांतील छंदाप्रमाणें महाराष्ट्र भाषेंत इंद्रवज्रा, उपेंद्रवज्रा, शालिनी, स्रग्धरा, स्वागता, त्रोटक, स्रग्विणी, पंचचामर, मालिनी, पृथ्वी, द्रुतविलंबित, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित इत्यादि लहानमोठ्या अक्षरगणवृत्तांत मनोहर कविता प्रथमतः रचण्याचें आणि तद्वारा महाराष्ट्र भाषेच्या अंगीं संस्कृत भाषेचा डौल आणून तिला तिच्या तोडीस बसविण्यासाठीं प्रथम यत्न केल्याचें श्रेय **आनंदतनयासच** आहे " असा कै. **वामन दाजी ओक** या मार्मिक महाराष्ट्र काव्यपंडितांनीं अभिप्राय दिला आहे. व तो सर्वांस मान्यहि आहे. **आनंदतनयानें** छंदोवैचित्र्य जें महाराष्ट्र भाषेंत आणिलें, त्याची पूर्तता पुढें **मुक्तेश्वर** आणि **विडकर विठ्ठल** कवि यांनीं केली. **विडकर विठ्ठल** यांनीं चित्रकाव्याची प्रथम योजना मराठी भाषेंत केली. हा **विडकर विठ्ठल** थोरले **शिवाजी** महाराजांचा समकालीन होता. आतां सांगितलेल्या तीन कवींनीं वृत्तवैचित्र्य साधलें. परंतु या तिघांचें भाषाशुद्धीकडे विशेष लक्ष नव्हतें. या वृत्तांची व्याकरणदृष्टीनें निर्दोषता संपादन करण्याचें श्रेय **वामन पंडित, मोरोपंत, रघुनाथ पंडित** वगैरे त्यांहून अर्वाचीन कवींस देणें योग्य आहे. सारांश, मात्रावृत्तें, अनेक चालींचीं पदें, कडाके, वगैरे नाना तऱ्हेच्या पद्यबंधरचनेसंबंधानें मराठी भाषा इंग्रजीस काय, परंतु कोणत्याहि प्राचीन किंवा अर्वाचीन भाषांस हार जाणार नाहीं, असें माझें मत आहे.

अशा तऱ्हेचें हें पद्यवैचित्र्य आपल्यास मागल्या पिढीपासून मिळालें आहे व निरनिराळ्या प्रसंगांस साजणारी वृत्तरचना करण्याचें सामर्थ्यहि त्यांजपासूनच आपल्यास प्राप्त झालें आहे. पण ही जी सोय झाली तिच्याबरोबर कांहीं गैरसोयहि अर्वाचीन कवींस वाटूं लागली आहे. यमकात्मक कविता करणें फार काठिण आहे. व कित्येक वेळ यमक साधण्याकरितां अर्थाची हानि करावी लागते, असें अनुभवास आल्यावरून कांहीं अर्वाचीन कवींनीं यमकरहित कविता करण्याचा यत्न केला आहे. कै० **पांडुरंग व्यंकटेश चिंतामणी पेठकर** गंगावर्णनाचे रसिक पण अल्पायुषी कवींनीं यमकरहित परंतु सरस कविता

करण्याचा धडा प्रथम घातला. त्याचें अनुकरण अजून जसें व्हावें तसें झालें नाहीं. तथापि जळगांव येथें प्रसिद्ध होणाऱ्या **काव्यरत्नावलींत** अशा प्रकारचे चुटके कांहीं मीं पाहिले आहेत. यमकराहित काव्य जर लोकरुचीस पात्र होईल, तर माझी अशी समजूत आहे कीं, महाराष्ट्र काव्यनदी जी हल्लीं अगदीं झुळझुळ वाहत आहे, ती मोठ्या वेगानें वाहूं लागून, तिचें पात्र विस्तीर्ण होऊन, रसिक जनांच्या मनोरूपी क्षेत्रांचें आप्लावन करून त्यांत रम्य व सात्त्विक वृत्तीचें पोषण आतांपेक्षां दसपटीनें अधिक करील.

येथवर कवितेच्या बाह्यांगाचें अल्पसें विवेचन केलें. आतां कवितेच्या अंतःस्वरूपाकडे पाहूं :– आधीं प्रथम कवितांचे विषयांत बराच पालट झाला आहे. पौराणिक नायक किंवा नायिका किंवा पौराणिक संविधानें न घेतां ऐतिहासिक प्रसंग यांवर कविता लिहिण्याची प्रवृत्ति झाली आहे, ही एक अभिनंदन करण्यासारखी गोष्ट आहे. तसेंच प्राचीन कविसंकेताप्रमाणें ओजस्वी भाषा योजण्याऐवजीं व्यावहारिक आणि सुबोध भाषा वापरण्याचाहि प्रयत्न होत आहे. हा पालट पहिल्यानें करण्याचा यत्न कै. **माधवरावजी कुंटे** यांनीं केला, व सांप्रतहि क्वचित् क्वचित् त्याचें अनुकरण झालेलें दृष्टीस पडतें. सर्जन लेफ्टनंट कर्नल **कान्होबा कीर्तीकर** यांच्या **इंदिरा** काव्यांत असे मासले बरेच दृष्टीस पडतात. आतां कवितेंत संस्कृत शब्दच असावे, किंवा व्यावहारिक भाषा असावी हा मोठा वादग्रस्त विषय आहे. श्री **ज्ञानेश्वर** महाराजांनीं आपल्या बुद्धिप्रभावानें संस्कृत शब्दांस हवें तसें वांकवून त्यांना मराठीचें रूप आणिलें आहे, व हें रूपांतर इतकें मनोहर रीतीनें केलें आहे कीं, कित्येक वेळां हा शब्द संस्कृतांतून घेतला आहे किंवा केवळ मराठी आहे, हें सुद्धां कळत नाहीं. **ज्ञानेश्वर** महाराजांच्या **ज्ञानेश्वरीं**तील कित्येक शब्द आज देखील उपयोगांत आणण्यासारखे आहेत व त्यांचा प्रचार जर पुन्हां होईल तर मराठी भाषेंत चांगली भर पडल्यासारखें होईल.

मराठी भाषेचें वाङ्मय अगदीं अल्प आहे, अशी कांहीं वर्षांपूर्वीं पुष्कळ लोकांची समजूत होती. पण कै० **जनार्दन बाळाजी मोडक** आणि **वामन दाजी ओक** यांनीं शेट **जावजी दादाजी** यांच्या मदतीनें **महाराष्ट्र काव्य-संग्रह** छापण्यास आरंभ केल्यापासून ही समजूत निराधार होती असें

पुष्कळांस वाटूं लागलें आहे. काव्यसंग्रहांत छापून निघालेलें वाङ्मय बरेंच मोठें आहे, हें कोणीहि कबूल करील. परंतु त्याशिवाय इतर छापखान्यांतूनहि प्रसिद्ध झालेले पुष्कळ ग्रंथ आहेत. त्याखेरीज **मानभावांचें** वाङ्मय अजून छापावयाचें राहिलेंच आहे. त्यांतील कांहीं ग्रंथांची श्लोकसंख्या एक लक्षापर्यंत आहे, असें सांगतात. सारांश, हेंहि वाङ्मय प्रसिद्ध झालें तर परिमाणाचे मानानें महाराष्ट्र वाङ्मय अल्प आहे असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. शिवाय आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, ही सर्व वाङ्मयाची अभिवृद्धि ५५० वर्षांचे अवकाशांत झाली आहे. मराठी आद्य ग्रंथ आजकालच्या माहितीप्रमाणें सुमारें इसवी सनाच्या १२९० च्या सुमारास झाले असें घेऊन चाललें तर सन १८१८ पर्यंत म्हणजे ५५० वर्षांत हें सर्व भारूड रचलें गेलें, व तेंहि सर्व धामधुमीचे प्रसंगांत, हा विचार मनांत आला म्हणजे सरस्वतीचा प्रसाद आम्हां महाराष्ट्रीयांवर कमी होता, असें बिलकुल म्हणतां येत नाहीं. एक गोष्ट खरी आहे कीं, हें वाङ्मय बहुतेक एकदेशीय होतें. पण भौतिक शास्त्राचा उदयच जर त्या वेळेस झाला नव्हता व धर्मपरायणतेचेंच वळण जर सर्व महाराष्ट्रास लागलें होतें तर अशाच प्रकारचें वाङ्मय निर्माण झालें, याबद्दल आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं.

हा माझा लेख आतां आपणांस कंटाळवाणा झाला असेल. मराठी गद्याचे जसे कांहीं मासले आपणास मीं दाखविले तसेच अर्वाचीन कवितेचेहि मनोहर प्रसंग वाचून दाखविणार होतों. परंतु तसें करण्यास आतां अवकाश नाहीं. वाङ्मयासंबंधानें कांहीं सामान्य विचार आतां आपल्यापुढें मांडून मी हा लेख आटपतों.

मराठी भाषेंत ग्रंथसंख्या जरी बरीच वाढली आहे तथापि तिच्या मानानें गुजराथींत ग्रंथसंख्या अधिक झाली आहे, ही गोष्टहि आपण विसरतां कामा नये. सन १८८४ सालापर्यंत मराठी भाषा मुंबई इलाख्यांतील देशी भाषांच्या आघाडीस होती. सन १८८५ सालीं गुजराथीनें मराठीला मागें टाकिलें व तोच क्रम आजपर्यंत चालू आहे. याचें एक कारण असें समजण्यांत येतें कीं, गुजराथी भाषेला श्रीमान् उत्साही व उद्योगी पारसी लोकांचा आश्रय आहे; एवढेंच नाहीं, परंतु पुष्कळ विद्वान् पारसी लोक स्वतः नामांकित लेखक झाले आहेत. मराठी भाषेला अशा तऱ्हेचा आश्रय फार थोडा; तथापि या

संबंधानें सुद्धां सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत. कै. श्रीमंत **बापुसाहेब कुरुंदवाडकर** यांना आमरण कविता रचण्याचा नाद होता व त्यांचे भट्टवंशकाव्याचा उल्लेख मीं केलाच आहे. सध्यांहि श्रीमंत सर **गंगाधरराव मिरजकर** K. C. I. E. हे रसायनशास्त्रावर अत्यंत परिश्रम करीत आहेत व त्यांचें रसायनशास्त्रावरील पुस्तक लोकादरास पात्र झालें आहे. याचप्रमाणें इतर जहागिरदार, इनामदार वगैरे श्रीमंत लोकांनीं जर या कामीं साहाय्य केलें तर त्यांचे स्वदेशावर अत्यंत उपकार होतील. संपत्ति अनुकूल असून या कामीं वेळ खर्च करण्याचें त्यांना सामर्थ्य आहे. बाकीचे लोकांचे मागें " जीवनार्थ कलह " लागला आहे. त्यामुळें त्यांना फुरसदहि नाहीं व द्रव्यसामर्थ्यहि नाहीं. एका सन्मान्य इंग्रज अंमलदारानें आमची सध्यांच्या वाङ्मयाच्या स्थितीची तुलना इंग्लिश इतिहासांतील Anne राणीच्या कालाशीं केली आहे. त्या वेळेस Johnson, Goldsmith वगैरे विद्वान् लेखकांना उदर भरण्याची सुद्धां अडचण पडून ग्रंथ प्रसिद्ध करण्याकरितां कित्येक श्रीमंत लोकांस आपले अमूल्य ग्रंथ नजर करावे लागत; किंवा अल्पस्वल्प किंमतीला विकून टाकावे लागत. तसाच काल आपल्याइकडे हल्लीं आहे. ग्रंथप्रकाशनाचा खर्च देखील कित्येक वेळीं बाहेर पडत नाहीं, असा अनुभव आहे. याचें कारण वाचकवर्ग अजून फार लहान आहे. ज्यांना ग्रंथ विकत घेण्याचें सामर्थ्य आहे, त्यांस इच्छा नाहीं, व जेथें इच्छा आहे तेथें अनुकूलता नाहीं. अशा पेंचाटींत सध्यांचे ग्रंथकार आहेत. यामुळें कित्येक ग्रंथ रचलेले असून बाहेर पडलेले नाहींत व कित्येकांस ग्रंथ लिहिण्याचें सामर्थ्य असून ग्रंथ लिहिण्यापासून ते पराङ्मुख झालेले आहेत. तथापि ही स्थिति कांहीं काळानें पालटेल अशी आपण उमेद बाळगिली पाहिजे. कारण आजपर्यंतच्या अनुभवावरून उत्तरोत्तर वाचकांची संख्या वाढतच आली आहे व असाच क्रम चालला तर चांगले दिवस खास येतील, व कै. रावसाहेब **रानडे** यांचें भाकित खरें होईल.

आतां हा आजचा लांबलचक लेख संपविण्यापूर्वीं उदात्त वाङ्मयाचें लक्षण काय व वाग्देवतेची सेवा कशी करावी, हें थोडक्यांत सांगण्याची मी परवानगी घेतों. **वाग्ब्रह्मेत्युपासीत** म्हणजे वाणी हें ब्रह्म आहे अशा भावनेनें तिची उपासना करावी असा आपल्या धर्मग्रंथांचा आदेश आहे. तसेंच **सत्यं ब्रह्म**

अशींहि वचनें आपल्या प्राचीन व परमपूज्य ग्रंथांत सांपडतात. तेव्हां या वाग्देवतेची सेवा पवित्र अंतःकरणानें करावी व तशी केली असतांच ती फलद्रूप होते. इतर देवतांप्रमाणें हिचीहि भक्ति अनन्यभावानें जो करील त्यास ती प्रसन्न होते. तसेंच वाङ्मयांत सत्यास धरून चाललें पाहिजे. सत्य ह्या ब्रह्मांडांत ओतप्रोत भरलेलें आहे. पदार्थविज्ञान व गणित या शास्त्रांत हें अद्वितीय सत्य नेहमीं दृष्टीस पडतें. रसायन-प्रयोगांत, शिल्पकलेंत, गणितांत रतिप्राय चुकी झाली तर तो सर्व प्रयोग, ती शिल्पकृति किंवा तें उदाहरण चुकतें, याचें कारण त्यांत पूर्वी कोठें तरी असत्य मिश्रित झालेलें असतें. ही गोष्ट वाङ्मयासहि लागू आहे. जें चित्र हुबेहुब वठतें तें तेव्हांच मनांत भरतें, याचें कारण त्यांत सत्य असतें. तसेंच **शेक्सपीयर** किंवा **कालिदास** यांच्या कृति हृदयंगम झाल्या आहेत, याचें कारण त्या सृष्टिधर्मास अनुसरून साधलेल्या आहेत. **कालिदासाचें** शाकुंतल वाचतांना प्रत्येक पात्राशीं आपलें तादात्म्य होतें. कारण प्रत्येक पात्राची योजना नैसर्गिक स्वभावाला धरून आहे, व हाच प्रकार उत्तम कवींच्या उत्तम कृतीला लागू आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, हें सत्य तिन्ही काळीं व सर्व स्थळीं अबाधित असलें पाहिजे. शाकुंतल वाचून युरोपियन पंडित रडल्याचें आपण ऐकतों. कारण कालिदासानें जें लिहिलें तें सर्व मनुष्यमात्रास सर्व काळीं सर्व ठिकाणीं सारखेंच लागू पडतें. यामुळें खरें वाङ्मय जें आहे, तें सर्व विश्वाच्या उपकारास्तव असतें. सर्व भौतिक शास्त्रें सर्वत्र व सर्व कालीं खरीं आहेत म्हणून त्यांचीं प्रमेयें सर्वांस ग्राह्य होतात. त्याप्रमाणेंच उत्तम पद्य व उत्तम गद्य यांच्यांतहि कोणताहि एकदेशीयपणा न रहातां ‘ हें अवघें विश्वचि माझें घर ’ अशी लेखकाची भावना झाली पाहिजे. सारांश, सर्व मनुष्यजातीचें किंवा प्राणिमात्रांचें कल्याण व्हावें, हा उत्तम वाङ्मयाचा पवित्र हेतु असतो. म्हणूनच साधुश्रेष्ठ व कवि-मुकुटमणि श्री **ज्ञानेश्वर** महाराजांनीं गीताशास्त्राचा उपसंहार केला आहे, त्यांत—

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥ १७९४ ॥

जे खळाची व्यंकटी सांडो। सत्कर्मीं रति वाढो। भूतां परस्परें जडो। मैत्र जीवाचें ॥ १७९५ ॥

दुरिताचें तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ॥ १७९६ ॥

अशाच प्रकारचे सर्व प्राणिमात्राच्या कल्याणाचे उद्‌गार **कूपर, वर्डस्वर्थ टेनिसन**सारख्या धार्मिक इंग्रजी कवींच्या कवितेंतहि वारंवार आढळतात.

श्री **ज्ञानेश्वर** महाराजांनींच प्रथम महाराष्ट्र भाषेचा अभिमान धरून तिची अनुपम सेवा केली, असें मीं आरंभीं सांगितलें. आतां हें भाषण संपवितांना त्यांचाच प्रसाद मागून आजचा हा समारंभ आपण आटपून घेऊं.

पुढती, पुढती, पुढती। इये ग्रंथ पुण्य संपत्ति। सर्वसुखी, सर्वभूतीं। संपूर्ण होईजे ॥ १८१० ॥

याहून सुंदर व याहून श्रेयोवाचक दुसरा उपसंहार कोणता पाहिजे? माझ्यातर्फे आज श्रोत्यांस माझी एवढीच विनंति आहे कीं, आजच्या या भाषणांत श्री **ज्ञानेश्वरांनीं** म्हटल्याप्रमाणेंच—

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।
करूनि घ्या हें तुमतें। विनवित असें ॥

टीप : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या पांचव्या वार्षिक सभेपुढें दि. २३ सप्टेंबर १९०३ रोजीं दिलेलें व्याख्यान.

* * *

महाराष्ट्र वाङ्मयाचें पर्या-लोचन

मुंबई ग्रंथसंग्रहालयाच्या पांचव्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं (ता. २६ सप्तंबर सन १९०३) अध्यक्ष या नात्यानें जो लेख मीं वाचिला, त्यांत सन १८२६ पासून सन १९०० अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांचा आढावा मीं सादर केला, व सन १८८३ पासून सन १८९९ अखेर जे ग्रंथ प्रसिद्ध झाले त्यांचें विषयवार वर्गीकरण करून कोणकोणत्या दिशेनें प्रयत्न करणें अवश्य आहे, हें मीं थोडक्यांत सुचविलें. आजचा प्रसंग त्याहून फारच अधिक महत्त्वाचा आहे. आज साहित्याचे विदग्ध व सहृदय भोक्ते सकल भरतखंडांतून श्रीमन्महाराज **सयाजीराव** यांच्या कृपाछत्राखालीं येथें एकवटले आहेत. केवळ महाराष्ट्र ग्रंथकारांचें जें संमेलन गेलीं ४ वर्षे होत होतें, त्यास साहित्यसंमेलनाचें परिणत व प्रगल्भ स्वरूप प्राप्त झालें आहे, पूर्वींच्या संमेलनाचें एकदेशीयत्व नाहींसें होऊन त्याचे ऐवजीं व्यापकत्व आलें आहे. सकल भारतवर्षीय भाषा-भगिनींचा आज अपूर्व प्रीतिसंगम येथें झाला आहे. श्रीमन्महाराज महाराष्ट्र भाषाभिमानी आहेत, म्हणून आज अग्रपूजेचा मान मराठी भाषेस मिळाला आहे. आपण तिचे पुरस्कर्ते आहांत. म्हणून आज तिच्या भांडारगृहांतील संपत्तीचें पर्यालोचन करण्याचें मीं योजिलें आहे.

" खेळणारांच्या चुका खेळणाऱ्यांच्या नजरेस न येतां, खेळ पहाणारांस त्या समजतात." अशी एक इंग्रजी म्हण आहे. त्याच न्यायानें ग्रंथकारांचे दोष वाचकवर्गास अधिक समजतात. स्वैंपाक करणाऱ्या आचाऱ्यापेक्षां त्यानें रांधलेलें अन्न खाणाऱ्यांस, त्या अन्नाची रुचि अधिक समजते, असा अनुभव आहे. आज जो श्रोतृसमाज येथें जमला आहे, त्यांत चाणाक्ष, रसास्वादी वाचकहि आहेत, व मजपेक्षांहि महाराष्ट्र सारस्वतांतील गुण-दोष, त्यांना अधिक समजत आहेत; तथापि, ऊहापोहास आधार व्हावा म्हणून महाराष्ट्र-ग्रंथ-भांडाराच्या सद्यःस्थितीचें एक अल्पसें टांचण मी आपल्यापुढें मांडीत आहें. या टांचणां-वरून महाराष्ट्र ग्रंथांची जी वाढ होत आहे, ती समाधानकारक आहे किंवा कसें? तशी ती नसल्यास कोणत्या दिशेनें विशेष प्रयत्न केला पाहिजे; एकंदर जनतेच्या हिताच्या दृष्टीनें कोणत्या विषयाकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे;

याचा उलगडा होईल. आंकड्यांच्या साहाय्यानें हा अजमास ठरविल्यानंतर ज्या विषयांत पाऊल पुढें पडत आहे, त्यांत देखील कोणते दोष आहेत व ते कसे टाळतां येतील, याचेंहि यथामति दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न मी करणार आहें.

सरकारी कागदपत्रांवरून जी माहिती मिळाली आहे तिजवरून सन १८२६ सालापासून सन १९०८ अखेर ४०७१ पुस्तकें प्रसिद्ध झालीं असें समजतें. यांत द्वितीयावृत्तीचींहि पुस्तकें आहेत. या माहितीची जशी फोड मिळावयास पाहिजे, तशी मिळाली नाहीं. म्हणून सन १८८४ सालापासूनचींच टांचणें मीं केलीं आहेत. त्यांत चूकभूल असेल; तथापि, महाराष्ट्र–वाङ्मयाची वाढ कशी होत आहे, हें स्थूलमानानें अजमावण्यास त्यांपासून साधन होईल.

सन १८८४ सालापासून सन १९०८ अखेर म्हणजे गेल्या पाव शतकांत प्रथमावृत्तीचीं एकंदर ३४१६ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांची विषयवार वांटणी सरकारी कागदांत जी केली आहे तिची संख्येप्रमाणें प्रतवारी येणेंप्रमाणें लागते :

१	किरकोळ	९८२	
२	काव्य	५६७	१२०० (२–४)
३	नाटकें	४०२	
४	कादंबऱ्या	२३१	
५	भाषाज्ञान	१९८	
६	धर्म	१८८	
७	चरित्रें	१७२	
८	सृष्टपदार्थ	१४८	
९	इतिहास	१०२	
१०	हुन्नर	१००	
११	वैद्यक	९८	
१२	तत्त्वज्ञान	७९	
१३	गणित	६९	
१४	कायदा	३१	
१५	राजनीति	३०	
१६	प्रवास	१९	
	एकूण	३४१६	

किरकोळ

किरकोळीच्या सदराखालीं ९८२ पुस्तकें नोंदलीं आहेत. त्यांत भाराभरती पुष्कळच आहे. तथापि, कांहीं चिरस्थायी व वाचनीय अशा पुस्तकांचा समावेश त्यांत झाला आहे. त्यांतल्या त्यांत, १ हिंदुधर्म आणि सुधारणा. २ आत्मोन्नति. ३ प्रपंचरहस्य. ४ अबलोन्नतिलेखमाला. ५ मुलरचीं धर्मपर व्याख्यानें. ६ सृष्टपदार्थविज्ञान आणि सुधारणा. ७ बेकनचे निबंध. ८ प्राच्य व पाश्चात्य ग्रामव्यवस्था. ९ मार्कस् ऑरेलियसचीं बोधवचनें. १० हिंदुस्तान आणि ब्रिटिश वसाहती. ११ ब्राह्मण आणि त्यांची विद्या. हे ग्रंथ लोकादरास विशेष पात्र झाले आहेत.

काव्य

काव्याच्या सदरांत भरणा दिसतांना पुष्कळ दिसतो, परंतु या सदरांतील पुस्तकांचें निरीक्षण केलें असतां कवितादेवीचा प्रसाद अजून आपल्यावर व्हावा तसा झाला नाहीं, असेंच म्हणावें लागतें. गेल्या २५ वर्षांत जीं ५६७ काव्यें प्रसिद्ध झालीं, त्यांतून जुनीं काव्यें व मेळ्यांच्या गाण्यांसारखीं प्रासंगिक स्फुट पद्यें वजा केलीं असतां, " हृदयास स्पर्श करणारीं, मनोवृत्ति उचंबळविणारीं, मनावर भेदक पण स्पृहणीय संस्कार घडविणारीं आणि चिरकाल आल्हाद प्रसवणारीं " महाकाव्यें अजून फारच थोडीं झालीं आहेत. हिरव्यागार जमिनींतून मंजुळ आवाज करीत झुळझुळ वाहाणाऱ्या ओहोळाप्रमाणें लहान लहान चटकदार रसभरित चुटके पुष्कळ दृष्टीस पडतात, परंतु भागीरथीच्या शांत, प्रसन्न, गंभीर जलौघाप्रमाणें वाहणारा व त्याचें सेवन करणाराचे चित्तास " निरस्तवेद्यान्तरा ब्रह्मास्वादसदृशी प्रीति " देणारा असा काव्यप्रवाह अद्यापि या महाराष्ट्र भूमींत वाहूं लागला नाहीं. एका हिंदी कवीनें आपल्या कालास उद्देशून म्हटलें आहेः—

" सूर सूरज, तुलसी शशी, उडुगण **केशवदास** ।
आजके कवि खद्योत सम, जहं तहं करत प्रकाश ॥ "

हीच स्थिति थोडयाबहुत अंशानें आपलीहि आहे, असा माझा नम्र अभिप्राय आहे.

येथपर्यंत काव्याचे परिमाणाविषयीं माझें मत सांगितलें. काव्यरीतीसंबंधानें विशेष समाधान मानण्यास जागा आहे. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं वर्णिलेली आणि जुन्या महाराष्ट्रकवींनीं रूढ केलेली काव्यरीति आधुनिक कवींस बरीच साधलेली आहे, ही संतोषाची गोष्ट आहे.

काव्याच्या परिणामासंबंधानें जशी न्यूनता दृष्टीस पडते, तशीच काव्याच्या क्षेत्रासंबंधानेंहि अजून बरीच संकुचितता आहे. ही संकुचितता जाऊन काव्याचें क्षेत्र याहून विशालतर आपणांस केलें पाहिजे. या विसाव्या शतकांत व पाश्चात्य राष्ट्रांच्या वाङ्मयाशीं निकट संबंध झालेला असतां केवळ कूपमण्डूकवृत्ति धरून उपयोग नाहीं; पाश्चात्य राष्ट्रांत काव्याविषयीं भावना आपल्याहून अधिक व्यापक आहे. पद-लालित्य, कल्पनाचातुर्य, चमत्कृति, इत्यादिकांहून प्रतिभेच्या 'रम्यनिर्माणशालिते' वर त्या वाङ्मयांत अधिक कटाक्ष आहे. तसेंच, कवीला केवळ शब्दसृष्टीचें विधातृत्व न देतां या परमेश्वरसृष्टींत कवीला लोकनायकत्व, सृष्टिरहस्याचें व्याख्यातृत्व इत्यादि थोर अधिकार दिलेले आहेत; हें स्पष्ट करण्याकरितां मी इंग्रजी ग्रंथांतून दोन अवतरणें देतों:—

ले हंट नांवाचा एक मार्मिक इंग्रजी ग्रंथकार गेल्या शतकांत होऊन गेला. त्यानें उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ कवीचें स्वरूप वर्णिलें आहे. त्यांत तो म्हणतो:—

" Imagination teeming with action and character makes the greatest poets; feeling and thought the next; fancy (by itself) the next; wit the last, "

" चरित आणि स्वभाव या दोहींच्या वैचित्र्यास प्रसविणारी प्रतिभा ज्यांचे अंगीं असेल ते उत्तम कवि; मनोविकार आणि विचारप्रागल्भ्य हीं दुसऱ्या प्रतीच्या कवींत आढळतात; कल्पनाचातुर्य अथवा चमत्कृति तिसऱ्या प्रतीच्या कवींत सांपडते आणि केवळ प्रज्ञा किंवा बुद्धिमत्ता शेवटच्या प्रतीच्या कवींत दृष्टीस पडते. "

काव्याची योग्यता ठरविणाऱ्या या चार कसोट्या आपणांसहि जर पसंत असतील, तर उत्तम काव्यांची संख्या अजून अल्पच आहे, असें आपलेंही मत होईल असें मला वाटतें.

कवींची खरी योग्यता कोणती आहे व काव्याचें अत्युत्तम आणि उज्ज्वल स्वरूप कसें असतें, निदान अध्यात्मसुखाचा आस्वाद घेण्याइतकी सहृदयता ज्याचे ठिकाणीं बाणली आहे, त्याची कवि आणि काव्य यांविषयीं काय भावना असते, हें राल्फ वाल्दो इमर्सन यांच्या निबंधांतील पुढील अवतरणांवरून समजेल:—

1. The poet is representative. He stands among partial men for the complete man and apprises us not of his wealth but of the common wealth.

2. The poet is the sayer, the namer and represents beauty. He is a sovereign and stands on the centre. He is Emperor in his own right.

3. It is not metres, but a metre-making argument, that makes a poem—a thought so passionate and alive, that like the spirit of a plant or an animal, it has an architecture of its own and adorns nature with a new thing.

4. The poet alone knows astronomy, chemistry, vegetation and animation for he does not stop at these facts but employs them as signs. He knows why the plain or meadow of space was strewn with those flowers we call suns and moons and stars; why the great deep is adorned with animals, with men and gods; for in every word he speaks, he rides on them as the horses of thought.

5. Language is fossil poetry.

6. Rich poets as Homer,Chaucer, Shakespeare and Raphael have obviously no limits to their works, except the limits of their lifetime and resemble a mirror carried through the street ready to render an image of every created thing,

7. Thou true land-lord ! sea lord ! air lord ! Wherever snow falls or water flows or birds fly, wherever day and night meet in twilight, wherever the blue heaven is hung

by clouds or sown with stars, wherever are forms with transparent boundaries, wherever are outlets into celestial space, wherever is danger, and awe and love, there is Beauty, plenteous as rain, shed for thee, and though thou shouldst walk the world over, thou shall not be able to find a condition inopportune or ignoble.

१. " कवि हा (मानव जातीच्या परिपूर्ण अवस्थेचा) प्रतिनिधि आहे. (इतर) असमग्र मनुष्यांचे समाजांत हा मात्र परिपूर्ण मानव जातीचा आदर्श किंवा प्रतिभू आहे. आणि तो व्यक्तीच्या ऐश्वर्याची खूण न पटवितां मानव जातींच्या ऐश्वर्याचें निदर्शन करतो.

२. कवि, आख्याता, अभिधानांचा कर्ता आणि रामणीयकाचा प्रदर्शक आहे. तो (विश्वाचा) राजा आहे; आणि विश्वाच्या केंद्रांवर त्याचें अधिष्ठान असतें. तो आपल्या (स्वसंपादित) हक्कानें चक्रवर्ती असतो.

३. **पद्यरचना** काव्य नव्हे, पण **पद्यरचनेस** अनुकूल अशी कल्पना काव्य होय. ही कल्पना रसानें आणि चैतन्यानें इतकी थबथबलेली असते कीं, वनस्पतीच्या किंवा प्राण्याच्या ठायीं असणाऱ्या जीव–बीजाप्रमाणें ती आपणांस योग्य असें वसतिस्थान करिते; आणि अपूर्व वस्तूंनीं तें स्थान शृंगारते.

४. ज्योतिःशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र आणि जीवनशास्त्र हीं कवीला मात्र समजतात; कारण, या शास्त्रांच्या प्रमेयापाशींच मुक्काम न करितां तो यांचा संज्ञेसारखा उपयोग करितो. ज्याला आपण सूर्य, चंद्र, तारे असें म्हणतों, तीं पुष्पें या गगनरूपीं अंगणांत कशाकरितां विखुरलीं आहेत; प्राणी, मनुष्यें, देव इत्यादिकांनीं ह्या विश्वभाण्डोदरास कां भूषविलें आहे, हें त्यास समजतें, कारण, त्याच्या तोंडांतून निघणाऱ्या प्रत्येक शब्दांत तो त्यांना आपल्या विचाराचे वाहक करून त्यावर आरूढ होतो.

५. भाषांचें मूळ कवितेंतच गूढस्वरूपानें असतें.

६. होमर, चासर, शेक्सपीयर आणि राफेल इत्यादि महाकवींच्या कृतीला त्यांच्या आयुर्मर्यादेखेरीज इतर कोणतीच नियंत्रणा नाहीं. रस्त्यांतून एकादा आरसा उघडा नेला असतां, त्यांत जसें सभोंवारच्या वस्तूंचें प्रतिबिंब पडतें, तसेंच कवीच्या मनांत वस्तुजाताची प्रतिकृति निर्माण करण्याचें सामर्थ्य असतें.

७. हे कवे ! तूं मात्र या भूप्रदेशाचा, या सागराचा आणि अंतरिक्षाचा स्वामी आहेस ! ज्या ज्या ठिकाणीं बर्फ पडत आहे, पाणी वहात आहे, पक्षी उडत आहेत, ज्या ज्या ठिकाणीं दिवस आणि रात्र यांच्या संगमीं संध्यासमय होत आहे, ज्या ज्या ठिकाणीं अस्मानी रंगाच्या आभाळांत मेघ उठत आहेत, अथवा धान्यबीजांप्रमाणें तारकांचा पेर झाला आहे, ज्या ज्या ठिकाणीं तेजःपुंज आकृति आहेत अथवा गगनाचे अंतराळांत प्रवेशमार्ग आहेत, ज्या ज्या ठिकाणीं संकट, पूज्यभाव (Awe) आणि प्रेम हीं वसत आहेत, त्या त्या ठिकाणीं वर्षाकालांतील पर्जन्याप्रमाणें तुझ्याकरितां सौंदर्याचा सडा घातला आहे. आणि जरी तूं जगभर फिरलास, तरी काव्याला अननुकूल अथवा तिरस्करणीय अशी परिस्थिति तुला सांपडणार नाहीं."

ह्या गद्यरूप काव्यांत जें कवीचें वर्णन केलें आहे, तें किती हृदयंगम आणि सत्य आहे, हें मीं सांगावयास नको. ज्यांच्या काव्याविषयीं मार्मिक वाचकांचे तोंडून असे उद्गार निघतात, ते तर धन्य आहेतच; पण अशा निरतिशय आनंदाचा अनुभव घेण्यास मजसारखीं प्राकृत मनुष्यें समर्थ होतील तर तीं देखील धन्य आहेत.

वरील उताऱ्यांत वर्णिल्याप्रमाणें महाराष्ट्र काव्याची योग्यता पाहूं लागलों, तर कोणी उत्तम कवि यशाच्या शिखराच्या पायथ्याशीं तर कोणी थोडथोडी चढण चढून जात आहेत, असें आपणांस देखील वाटूं लागेल.

नाटकें

नाटकाच्या सदराखालीं ४०२ संख्या नमूद झाली आहे. या संख्येंत नुसती संगीत नाटकें सुमारें ८० नोंदिलीं गेलीं आहेत. या एकंदर नाटकसंख्येपैकीं मूळ इंग्रजीवरून किंवा संस्कृतावरून उतरलेलीं नाटकें खेरीज करून बाकीच्या पैकीं ५० सुद्धां अभिज्ञ लोकांचे आदरास पात्र झालीं आहेत किंवा नाहींत, याविषयीं शंका आहे. संगीत नाटकें रंगभूमीवर प्रयोगाच्या प्रसंगीं पुष्कळ लोकांस आवडतात, हें निर्विवाद आहे वेष, अभिनय व विशेषतः संगीत या तिहींच्या साहचर्यानें प्रयोगकालीं तीं चित्ताकर्षक होत असतील; परंतु वाङ्मयाच्या दृष्टीनें, म्हणजे त्यांतील काव्य, भाषाशुद्धि, संविधानकाचें चातुर्य, तसेंच प्रत्येक प्रसंगाचें व भाषणाचें औचित्य यांचा विचार

केला असतां हीं नाटकें महाराष्ट्र वाङ्मयावर उपकार करीत आहेत किंवा त्यांपासून त्या वाङ्मयाच्या उज्ज्वल स्वरूपास खरोखर हानि पोंचत आहे, याविषयीं मन साशंक होतें. कांहीं संगीत नाटकें वाचतांना त्यांतील अश्लीलतेच्या प्रकारानें अंतःकरणास अत्यंत विषाद वाटतो. नुकतेंच एक संगीत नाटक माझेकडे अभिप्रायाकरितां आलें होतें. त्यांत उत्तान शृंगाररसाचा इतका कडेलोट केलेला आहे कीं, त्या नाटकाचा प्रयोग करून दाखविण्याचें साहस जर कोणी करील तर छकडीचे तमाशे करणारेहि लाजून मान खालीं घालतील. ज्या अश्लील शब्दांचा उच्चार देखील सभ्य पुरुषसमाजांत खपत नाहीं, ज्या शृंगारिक कल्पना केवळ ग्राम्य वृत्तीच्या सूचक अथवा उद्दीपक आहेत, ते शब्द व त्या कल्पना एका प्रसंगांत इतक्या खचल्या आहेत कीं, तरुण मुलांच्या हातांत हें पुस्तक पडलें असतां अत्यंत अनिष्ट संस्कार त्यांचे मनावर घडेल असें वाटतें. याच नाटकांत विवाहाचें पूर्वी नायकाच्या आणि नायिकेच्या भेटीच्या प्रसंगाचें शब्दचित्र नाट्यकारानें रेखाटलें आहे व नायकाच्या असभ्य उक्तीचा आविर्भाव दाखविण्याकरिनां ‘ चुंबन घेतो ’ अशी पात्रास सूचना दिली आहे. येथपर्यंत मजल येऊन पोंचल्यावर आमच्या मर्यादशीलतेच्या आणि नीतीच्या अवनतीस हीं कारण होतील अशी भीति वाटणें साहजिक आहे. अशी नाटकें होऊं लागलीं म्हणजे रंगभूमीवर होणाऱ्या नाटकांचें परीक्षण करणारा जसा एक ‘ नाटकाध्यक्ष ’ (Censor of Plays) म्हणून अंमलदार इंग्लंडांत नेमलेला असतो, तसा प्रजेची नीति बिघडूं नये, म्हणून सार्वभौम सरकारनें जर इकडेहि एकादा अंमलदार नेमला, तर त्याला कारण आपणच होणार आहों. तसा दिवस न यावा म्हणून आपण होऊनच खबरदारी ठेवल्यास बरें होईल.

कादंबऱ्या (२३१)

ह्या सदराखालीं ‘ काव्य ’ आणि ‘ नाटकें ’ यांपेक्षां संख्या जरी कमी आहे तरी चांगलीं पुस्तकें त्या मानानें पुष्कळ अधिक आहेत. काव्यरचनेप्रमाणें कादंबरीच्या रचनेंतहि परमेश्वरी देणगीची अपेक्षा आहेच. स्वतंत्र आणि नवीन रचना करणारे प्रतिभासंपन्न पुरुष जरी थोडेच आहेत व असावयाच, तरी या सदरांत इतर देशी व विदेशी भाषांचें सहकारित्व अधिक फलद्रूप झालें आहे. इंग्लिश व फ्रेंच भाषांतील कादंबऱ्यांचीं रूपांतरें झालींच

आहेत; पण गुजराथी आणि बंगाली कादंबऱ्याचे चटकदार अनुवाद होत आहेत, हीहि समाधानाची गोष्ट आहे.

नाटक जसें संसाराचें चित्र आहे, तशीच कादंबरीहि लोकस्थितीची प्रतिकृति आहे. व्यक्तींत जसे दोष आहेत, तसेंच समाजांतहि दोष आहेत. व या दोन्ही प्रकारच्या चित्रांच्या रचनेंत जरी थोडें वैचित्र्य आहे, तरी दोषांचें दूरीकरण हाच उभयतांचा पवित्र हेतु आहे. याकरितां दोषांचें चित्र काढतांना त्यांना मोहक रूप देणें अनिष्ट आहे. मनुष्याचा आत्मा शुद्ध स्फटिकाप्रमाणें स्वच्छ आहे असें आपण ऐकतों व प्रमाण मानतों. असें जर आहे तर ह्या आत्म्याचे शुद्ध स्वच्छ पृष्ठभागावर कलुषता न येईल अशाविषयीं आपण जपलें पाहिजे. सारांश, माझी नम्र सूचना इतकीच आहे कीं, दुष्टपणाचें वर्णन असें हिडीस असावें कीं, तें वाचल्यापासून वाचकांच्या मनांत दुष्टपणाविषयीं तिटकारा उत्पन्न होऊन अनीतीचे मार्गापासून मनाची परावृत्ति व्हावी.

भाषाज्ञान (१९८)

भाषाज्ञान या सदराखालचीं बहुतेक पुस्तकें केवळ शाळांतून उपयोग करण्यासारखीं असल्यामुळें त्यांविषयीं विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

धर्म (१८८)

धर्मांच्या सदराखालीं गेल्या बारा वर्षांत पूर्वींच्या तेरा वर्षांपेक्षां सहापटीनें वाढ झाली आहे. गेल्या बारा वर्षांत एक विशेष गोष्ट नजरेस पडते. ती ही कीं, या अवधींत जैन, लिंगायत, ख्रिश्चन या धर्मांसंबंधानें त्यांच्या त्यांच्या अनुयायांनीं स्वधर्मबांधवांचे उपयोगाकरितां पुष्कळ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. सर्व धर्मांस समत्वानें लेखणाऱ्या ब्रिटिश सरकारच्या छत्राखालीं या आर्यभूमींत विविध धर्मांनीं आपापलीं मतें शांतपणें प्रगट करावीं, हें उचित व अभिनंदनीयच आहे.

चरित्रें (१७९)

या सदराखालीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची संख्या जरी फार मोठी नाहीं, तरी इतर ग्रंथांच्या मानानें चांगल्या योग्यतेच्या अनेक ग्रंथाची यांत भर पडली आहे. किंबहुना इतर सर्व सदरापेक्षां योग्यतेच्या मानानें, या सदरांत

पुष्कळ वाचनीय पुस्तकांचा संग्रह झालेला आहे. यांत पाश्चात्य व पौरस्त्य इतिहासप्रसिद्ध पुरुष, राज्यकर्ते, मुत्सद्दी, योद्धे, कवि, साधुसंत इत्यादिकांचीं जीवनचरित्रें सुलभ भाषेंत गुंफलेलीं आहेत. इतिहाससंशोधनाचें काम अनेक सद्‌गृहस्थांनीं चालविलेंच आहे, व त्याच्या आधारावर भारतवर्षीय प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें लिहिण्यांत येत आहेतच. ज्यांचे हातून इतिहाससंशोधनाचें काम होण्यासारखें नाहीं, परंतु ज्यांस इंग्रजी भाषा चांगली अवगत असेल, त्यांनीं फुरसत असल्यास Plutarch's Lives आणि Nasmyth's Autobiography या दोन पुस्तकांचीं मराठींत भाषांतरें करावीं अशी माझी नम्र सूचना आहे.

"Plutarch's Lives" हें अद्वितीय पुस्तक आहे, अशी प्रसिद्धि आहे. या पुस्तकाचे अध्ययनापासून प्राचीन ग्रीक आणि रोमन लोकांचा इतिहास व त्यांची राजनीति यांची सविस्तर माहिती मिळून ज्या लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें त्यांत ग्रथित केलीं आहेत, त्यांच्या चरित्रांपासून अनेक प्रकारचा बोध आपल्या देशबांधवांस मिळेल. नास्मिथच्या आत्मचरित्रांत एका फारच गरीब स्थितींतल्या, परंतु करारी आणि बुद्धिमान् मुलानें स्वपराक्रमानें केवळ आपलेंच नव्हे, परंतु आपल्या देशाचें किंबहुना मानवजातीचें हित कसें साधलें हें समजणार आहे. नास्मिथ यानें जे अनेक शास्त्रीय शोध लावले व यांत्रिक कलेंत ज्या सुधारणा केल्या, त्यांमुळें त्याचें नांव अजरामर झालें आहे. या ग्रंथाचे अध्ययनानें तरुण पिढीच्या अंतःकरणांत एका नवीन प्रेरणेचा उदय होईल असा फार संभव आहे.

सृष्टपदार्थविज्ञानशास्त्र

या सदराखालीं जीं १४८ पुस्तकें नोंदिलीं आहेत, त्यांत नांव घेण्यासारखीं २८ पुस्तकें आढळतात. त्यांची विषयावर वांटणी येणेंप्रमाणें:—

सृष्टपदार्थविज्ञान	४	विश्वचमत्कार	१
ज्योतिष	५	जीवनशास्त्र	२
रसायनशास्त्र	३	वनस्पतिशास्त्र	१
सेंद्रिय रसायनशास्त्र... ...	२	समुद्रापासून उत्पन्न होणारे पदार्थ	१
उष्णता	१	सर्प	१
विद्युत् आणि चुंबन	१	जमीन-मोजणी	१
हवा	१	शेतकी	२
पाणी	१	मस्तुलुंगीयशास्त्र	१
		एकूण	२८

एकंदर ग्रंथसंख्येच्या मानानें भौतिक शास्त्रावरील ग्रंथसंख्या फारच थोडी आहे व त्यांतहि विशेष उपयुक्त अशीं पुस्तकें अगदींच थोडीं आहेत. यावरून राष्ट्राच्या बुद्धीचा कल अजूनपर्यंत काव्य, नाटकादि ललितकलांकडेसच आहे असें दृष्टीस पडतें. ह्या ललितकला आपणांस हव्याच आहेत; परंतु हिंदुस्थानाची सांप्रतची सांपत्तिक स्थिति पाहिली असतां आणि पृथ्वीवरील इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या भौतिक प्रगतीचा विचार केला असतां, सृष्टपदार्थशास्त्राच्या अध्ययनाची व तद्विषयक ग्रंथांची न्यूनता भरून काढणें, अत्यंत आवश्यक आहे असें वाटतें.

इतिहास (१०२)

इतिहासाच्या सदराखालींहि कित्येक चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध आहेत, व त्यांतहि इतर राष्ट्रांच्या इतिहासावर थोडींबहुत पुस्तकें झालीं आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे.

हुन्नर

सन १८८४ पासून १९०८ अखेर हुन्नरसंबंधीं जीं शंभर पुस्तकें प्रसिद्ध झालीं, त्यांत साधारण उपयुक्त अशीं ४८ पुस्तकें आढळतात, त्यांची वर्गवारी येणेंप्रमाणें :—

शेतकी	... ३	विणकाम	... २	शाई	... १
यांत्रिक कला	३	कशिदा	... १	सुगंधी सामान	१
मल्लविद्या...	२	चित्रकला	... २	खड्गपरीक्षा	१
पाकनिष्पत्ति	३	ड्राइंग	... ४	रत्नपरीक्षा	१
गायन	... ७	फोटोग्राफी	... ३	पोहणें	... १
तंतुवाद्य	... २	हुन्नरसंग्रह	... ४	लघुलेखन	... २
शिवणकाम	३	जादू	... १	तारायंत्र	... १
	२३		१७		८

एकूण ४८.

वैद्यक (९८)

या सदराखालींहि उपयुक्त पुस्तकांचा भरणा बराच आहे, परंतु ह्यांत व्यापकतेचीं पुस्तकें फार थोडीं आहेत. प्लेग, कॉलरा, प्रसूति, बालरोग, अशा

निरनिराळ्या विषयांवर लहान लहान पुस्तकें, संस्कृत व इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें बरींच झालीं आहेत. परंतु निघण्ट, न्यायवैद्यक, मानुषइंद्रियविज्ञानशास्त्र, मानुषशारीरशास्त्र, वैद्यतत्त्व, शस्त्रवैद्यक इत्यादि मागील पिढींतील मोठमोठे ग्रंथ सध्यां उपलब्ध नाहींत. राष्ट्रीय ज्ञानभांडारांत अशा पुस्तकांची अत्यंत उणीव आहे.

तत्त्वज्ञान (७९)

सन १८६४ सालीं परलोकवासी माधवरावजी रानडे यांनीं मराठी वाङ्मयाचें जें प्रथम परिगणन केलें, त्यांत धर्म आणि तत्त्वज्ञान मिळून एक वर्ग त्यांनीं कल्पिला. कारण, मानवी ज्ञानाच्या या दोन अंगांचा भेद समजण्याइतकें हिंदु लोकांच्या मनास प्रागल्भ्य त्या वेळेस आलेलें नव्हतें, असें त्यांचें मत होतें. ते दिवस जाऊन आतां तत्त्वज्ञानास स्वतंत्र स्थळ मिळूं लागलें आहे, ही संतोषाची गोष्ट आहे. गेल्या १५।२० वर्षांत पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे कांहीं लोकमान्य ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. नीतिमीमांसा, अज्ञेयमीमांसा ज्ञेयमीमांसा शास्त्ररहस्य, शास्त्रसूत्रें, उत्क्रांन्तिसूत्रें इत्यादि भारदस्त ग्रंथ मराठींत झाले आहेत हें आपणांस भूषणच आहे.

गणित (६९)

गणिताच्या सदराखालीं जीं ६९ पुस्तकें नोंदलीं आहेत, त्यांतील बहुतेक शालोपयोगीं पुस्तकेंच आहेत. गणिताचीं जीं उच्चतर उपांगें त्यांत लीलावती आणि परलोकवासी नारायण सदाशिव कुळकर्णी यांनीं केलेलें ' क्षेत्र–शंकुच्छेदा'चें (Conic Sections) पुस्तक, एवढीं मात्र आढळतात. राष्ट्रीय वाङ्मयांत गणिताच्या सर्व उपांगांचा समावेश झाला पाहिजे, हें उघड आहे.

कायदा (३१)

कायद्याच्या सदराखालीं बहुतेक सार्वभौम सरकारांनीं केलेल्या कायद्यांचीं भाषांतरेंच सांपडतात. हिंदु धर्मशास्त्रावर मात्र " मिताक्षराव्यवहाराध्याय " " हिंदु धर्मशास्त्र " व खरोखर अर्थशास्त्राखालीं दाखल करण्यास योग्य असें उत्तम पुस्तक "बंगाल्यांतील जमीनदारी वहिवाट" या तीन ग्रंथांचीं नांवें झळकतात.

राजनीति (३०)

राजनीति या सदराखालीं सर्वसाधारण ऐतिहासिक, उपयुक्त व सोपपात्तिक असा एकहि ग्रंथ दृष्टीस पडत नाहीं. जीं थोडीं पुस्तकें नमूद केलेलीं आहेत, तीं क्वचित् स्थळीं केलेलीं प्रासंगिक भाषणें किंवा तशाच प्रकारचे अचिरस्थायी लेख आहेत.

प्रवास (१९)

प्रवास या सदराची स्थितीहि बहुतेक अशीच आहे. या सदरांत " धौममहाबळेश्वरवर्णन ", " काश्मीरवर्णन " व " इंग्लंडचा प्रवास " हीं पुस्तकें भाषा-सौंदर्याच्या दृष्टीनें विशेष आदरास पात्र झालीं आहेत.

१. **ललित**—(काव्य + नाटकें + कादंबऱ्या) १२००
५६७ + ४०२ + २३१

२. **संकीर्ण**—(कायदा + प्रवास + किरकोळ) १०३२
३१ + १९ + ९८२

३. **शास्त्रीय**—

मानसिक	७९		
भौतिक	१४८		
गणित	६९	=	४२४
वैद्यक	९८		
राजनीति	३०		

४. **ऐतिहासिक**—(इतिहास + चरित्रें) २७४
१०२ + १७२

५. **शिक्षाविषयक**— = १९८

६. **धार्मिक**— = १८८

७. **औद्योगिक**— = १००

एकूण ३४१६

या आंकड्यांचें शेंकड्यावर प्रमाण बसविलें तर ललिताचें प्रमाण शेंकड्यास ३५ बसतें; शास्त्रीय ग्रंथाचें १२.५; ऐतिहासिक ग्रंथाचें ८; धार्मिक ग्रंथाचें ५

व औद्योगिक ग्रंथाचें शेंकडा २ हूनहि कमी बसतें. ह्या आंकड्यांचा विचार केला असतां काव्य नाटकादिकांवर सर्वांत अधिक भर आहे; शास्त्रीय ग्रंथावर असावा त्याहून फारच भर कमी आहे, आणि उद्योगधंद्याकडे लक्ष बहुतेक नाहींच, असें उघड दिसतें.

पुढील प्रयत्नाची दिशा

आजकाल आपल्या देशांत आपल्या सांपत्तिक स्थितीविषयीं सर्वत्र खल सुरू आहे. पाश्चात्य राष्ट्रांत भौतिक प्रगतींत अत्यंत स्पर्धा चालू आहे. त्यांच्या मानानें आपण फारच मागासलेले आहों. त्याची बरोबरी सध्याचे स्थितींत होणें नाहीं; परंतु आहे याहूनहि आपली स्थिति कष्टतर होऊं नये, म्हणून सांपत्तिक स्थिति सुधारण्याच्या कामीं उपयोग होईल असें वाङ्मय आम्हांस निर्माण केलें पाहिजे. त्यांत प्रथमतः अर्थशास्त्रावर चांगला परिपूर्ण ग्रंथ तयार करावयास पाहिजे. मराठींत जे पांच सहा ग्रंथ झाले आहेत, ते मागील पिढींतील अदम् स्मिथ्, रिकार्डो, मिल्ल व फासेट या ग्रंथकारांच्या मतांचे अनुवाद आहेत. त्यांचीं कांहीं मतें सध्यां अग्राह्य आहेत. शिवाय देशा-देशाचें अर्थशास्त्र कालमानानें निरनिराळें असतें. हिंदुस्थानच्या अर्थशास्त्रावर Marryat's Grammar of Political Economy असा एक ग्रंथ २५ वर्षांपूर्वीं झालेला आहे. परंतु तोहि जसा असावा तसा नाहीं. परलो० माधवरावजी रानडे यांचे अर्थशास्त्रांवरील लेख फार मार्मिक आहेत. याच दिशेनें मि. दिनशा एदलजी वाच्छा, रावबहादुर गणेश व्यंकटेश जोशी, प्रोफेसर पाध्ये, प्रोफेसर काळे, यांनीं ग्रंथ लिहिण्याचें मनावर घेतल्यास ही उणीव भरून येईल. निरनिराळ्या कला व शास्त्रें यांवर तज्ज्ञांकडून ग्रंथ लिहविले तर आपला कार्यभाग होईल. भौतिक शास्त्रांत प्रावीण्य संपादन केलेले गृहस्थहि सुदैवानें देशांत निपजत आहेत. त्यांनीं जर मनावर घेतलें, आणि धनिकांनीं त्यांना आश्रय दिला, तर ही न्यूनता भरून काढणें कांहीं दुष्कर नाहीं. हीं भौतिक शास्त्रावरील पुस्तकें मूळ मराठींतच लिहिणें आवश्यक नाहीं. प्रो. बोस, डॉ. राय, प्रो. सील, प्रो. गज्जर यांनीं अनुक्रमें बंगाली आणि गुजराथी भाषेंत पुस्तकें लिहिलीं, आणि त्या पुस्तकांचें मराठींत भाषांतर केलें तरी सुद्धां आपला कार्यभाग होणार आहे. आतां अशा प्रकारच्या

ग्रंथाच्या रचनेसंबंधानें आणखीहि एक गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ती ही कीं, पाश्चात्य देशांत या निरनिराळ्या विषयांत इतके नवीन नवीन शोध होत आहेत कीं, आपल्या देशी भाषेंत एकादा ग्रंथ समग्र लिहून तयार होत आहे, तोंच त्यांत कमीजास्त फिरवाफिरव करावी लागेल. परंतु या फिरवाफिरवीच्या भीतीकरितां ग्रंथरचनेचें काम टाळून उपयोगीं नाहीं. कित्येक इंग्रजी पुस्तकांची ही प्रथमावृत्ति निघून एक दोन वर्षें झालीं नाहींत, तोंच नवीन शोधामुळें द्वितीयावृत्ति काढण्याची पाळी येते. अशा शोधामुळें सर्वच ग्रंथ केवळ निरुपयोगी होतो अशांतला प्रकार नाहीं. म्हणून त्या त्या विषयांत ग्रंथरचना करण्याच्या कामीं उदासीनता धरून उपयोगी नाहीं. या कामीं हिंदुस्थानांतील सर्व प्रगल्भ भाषांचें सहकारित्व स्थापन केलें पाहिजे. असें केलें असतां सर्वच भाषांची प्रगति होईल, व आंग्ल-वाङ्मयांतील सरस व सारभूत ज्ञानामृत देशी भाषांच्या द्वारानें आपल्या सर्व देशबांधवांस प्राप्त करून देण्याचें श्रेय आपणांस मिळेल. सर्व कलांचें व सर्व शास्त्रांचें परिगणन येथें करण्याचें कारण नाहीं. तें काम औद्योगिक व शास्त्रीय विषयांत निष्णात गृहस्थांचें आहे. कोणत्या उपायांनीं देशी वाङ्मयाची या विषयांत अभिवृद्धि होईल, त्याचें दिग्दर्शन मात्र मीं येथें केलें आहे.

महाराष्ट्र वाङ्मयांत आणखी एक न्यूनता आहे. तिचें महत्त्व दिवसेंदिवस अधिक दृष्टीस पडूं लागलें आहे, म्हणून तिचा उल्लेख या प्रसंगीं करणें जरूर आहे. हल्लीं मुलींच्या शाळा दिवसेंदिवस वाढत आहेत, हें अभिनंदनीयच आहे, पण मुलींना समजतील अशीं, किंवा त्यांचें मन रंजेल अशीं पुस्तकें फारच थोडीं आहेत. शाळेंतील वाचनाचीं पुस्तकें मुलांचीं आणि मुलींचीं एकच आहेत फुरसदीच्या वेळीं मुलींना वाचावयास देण्यासारखीं पुस्तकें फारच थोडीं आहेत. याकरितां मुलींच्या उपयोगासाठीं स्वतंत्र पुस्तक-माला असावी; तशींच त्यांच्या करितां चांगलीं पुस्तकेंहि लिहविलीं पाहिजेत. अलीकडे हैस्कुलांत मुली जाऊं लागल्यापासून त्यांना संस्कृत शिकविण्यांत येतें व त्यामुळें त्यांना संस्कृत काव्यें व नाटकें वाचावीं लागतात. ह्या काव्यांत व नाटकांत कमीजास्त शृंगाररस असतो. तरी इंग्रजी काव्यांच्या जशा "Expurgated" किंवा निर्दोष केलेल्या आवृत्ति काढिलेल्या असतात तशा या संस्कृत ग्रंथांच्या देखील निर्दोष आवृत्ति काढणें इष्ट आहे.

ग्रंथकारांस सूचना

महाराष्ट्र ग्रंथकार हे सर्व माझे व्यवसायबंधु आहेत, असें मी समजतों, व या दृष्टीनेंच एका भावानें दुसऱ्यास एकंदर कुटुंबाच्या हिताकडे लक्ष देऊन जसें हितगुज सांगावयाचें, तशाच कांहीं ठोकळ सूचना मीं पुढें मांडिल्या आहेत, व ज्या निष्काम प्रेमबुद्धीनें मीं त्या, त्यांस सादर केल्या आहेत, त्याच प्रेमानें त्यांनीं त्यांचा स्वीकार करावा अशी माझी त्यांस प्रार्थना आहे. "कवि व्हा" किंवा "कादंबरीकार व्हा" असें म्हटल्यानें कोणी कवि किंवा कादंबरीकार होत नाहीं हें मी जाणून आहें. ग्रंथकर्तृत्वाचे कामीं अंतःस्फूर्ति, व परिस्थितीची अनुकूलता, हीं पाहिजेतच हीं असून जो या वाङ्मयाच्या सेवेला स्वतःला वाहून घेतो त्यानें कांहीं गोष्टी ध्यानांत धरून या कार्यास लागावें हें बरें. साहित्यसेवा हें एक पवित्र कार्य आहे. गद्यांत काय आणि पद्यांत काय, मानव जातीच्या उन्नत्तीचा त्यांत हेतु असला पाहिजे, आपल्याला स्वतःला स्वर्गारोहण करावयाचें आहे एवढें नाहीं तर आपल्या राष्ट्राला व मानव-जातीलाहि आपल्याबरोबर उन्नतीच्या मार्गास लावावयाचें आहे, याकरितां पद्य ग्रंथांत अश्लील थिल्लर असे विषय नसावे. नाटकें हीं संसाराचीं चित्रें आहेत, असें मानून प्रपंचांतील अमंगल कृति किंवा उक्ति यांचें प्रदर्शन करणें वाईट आहे. संसाराचें चित्र याचा अर्थ. 'संसारांत दृष्टीस पडणाऱ्या चित्तवृत्तींचें चित्र' इतकाच व्यावयाचा, व ह्या चित्तवृत्तींचें आविष्करण हाण्यापुरतेंच कृतीचें किंवा उक्तीचें प्रदर्शन त्यांत असावें. कादंबरींतहि असंभाव्य संविधानकें नसावीं. तसेंच 'कविसंप्रदाय' किंवा शिष्टसंप्रदाय याचें उल्लंघन होऊं नये. दुष्ट मनुष्यें क्वचित् मोठ्या पदास चढतात व त्यांची अमानुष कृत्यें उघडकीस येत नाहींत व त्यांना शासन होत नाहीं; म्हणून तसेंच चित्र रेखाटणें नीतिदृष्ट्या अनिष्ट आहे. परमेश्वरी न्याय काव्यांत आणि कादंबऱ्यांतहि दृष्टीस पडला पाहिजे. परमेश्वरी न्यायाची एक बाजू आपणांस दिसते, दुसरी दिसत नाहीं. ऐहिक सुख मिळालें, तर पारलौकिक सुखास किंवा निदान चित्तशांतीस तरी पापी मनुष्य अंतरतो. संतति असली तर संपत्ति नसते; संपत्ति असून संततीहि असली तरी कांहीं हृद्रोग, कांहीं चिंता मागें लागलेल्या असतातच. याकरितां, कविसंप्रदायांतील न्यायबुद्धीला अपवाद न येईल अशा तऱ्हेचें संविधानक असावें. येथपर्यंत ललित कला-

संबंधानें माझें मत सांगितलें. इतर वादविवादात्मक गद्यग्रंथासंबंधानें मला थोडेसें सांगणें आहे. तें मी स्पष्ट सांगतों, याबद्दल मला क्षमा असावी.

वाङ्मयाचे व्यवसायांत धनाची व कीर्तीची लालसा बाळगणें यांत वावगें कांहीं नाहीं. परंतु इतर व्यवसायापेक्षां या व्यवसायांत एक विशेष आहे. तो हा कीं, इतर व्यवसायांत प्रायः जड व भौतिक द्रव्यांवर कारागीर आपलें काम करीत असतो; परंतु या व्यवसायांत ग्रंथकारांचा आत्मा, वाचकांच्या आत्म्यावर प्रतिक्षणीं संस्कार करीत असतो. ग्रंथकारानें आपल्या लेखणीनें अद्वातद्वा फरगडे फोडले, तर अनभिज्ञ वाचकांच्या कोमल अंतर्यामावर तशाच निशाण्या उठतात. याकरितां जें त्रिकालाबाधित सत्य असेल, जें उदात्त असेल, जें वाचकांच्या अंतःकरणास सन्मार्ग दाखवून वाचकाचें जीवित उज्ज्वल करील, तेंच ग्रंथकाराच्या लेखणींतून उतरलें पाहिजे. आपण जो व्यवसाय हातीं घेतला आहे त्यांत स्वहिताची अपेक्षा असणें साहाजिकच आहे; परंतु वाङ्मयाची सेवा ही परंपरेनें एकंदर जनसमूहाची व अर्थात् स्वराष्ट्राचीहि सेवा आहे. म्हणून वाचकवर्गावर म्हणजे स्वराष्ट्रावर आपल्या लेखनाचा अनिष्ट परिणाम घडूं नये, याविषयीं विशेष काळजी घेतली पाहिजे. आपल्या लेखामुळें सज्जनाविषयीं किंवा सत्कार्याविषयीं वाचकांचे मनांत तिरस्कार अथवा अनादर उत्पन्न होऊं नये, असें धोरण ठेविलें पाहिजे. लोकांच्या कृतीचें किंवा मताचें परीक्षण करितांना "Measures and not Men" म्हणजे टीकेचा विषय व्यक्ति नसून कृति आहे, हें ध्यानांत बाळगिलें पाहिजे हा केवळ व्यावहारिकच न्याय आहे असें नाहीं. आपण सर्व मनुष्यें चुकीस पात्र आहों. आपले दोषहि आपणांस दिसत नाहींत; मग लोकांनीं अमुक एक गोष्ट अमुक कारणाकरितां केली असा आपल्या मनाशींच तर्क करून असद्हेतूंचा त्याचेवर आरोप करणें हें न्याय्य नाहीं. षड्गुणैश्वर्यसंपन्न एक परमेश्वर आहे, व आपल्यास अज्ञात व अज्ञेय अशा अनेक गोष्टी आहेत म्हणून परकृति किंवा परमत यांविषयीं आपले विचार प्रकट करितांना नुसती मनाची समताच ठेवून चालत नाहीं; कांहीं सहिष्णुतेचाहि अंश आपल्या परीक्षणांत असला पाहिजे.

आपण ज्याच्या ग्रंथाचें किंवा ज्याच्या कृतीचें परीक्षण करीत आहों, तो आपला बन्धु आहे, व त्याचे दोष दाखविण्याच्या कामीं आपण त्याला शत्रु

लेखूं नये, किंवा त्यास शत्रु करूनही घेऊं नये. हे विचार येथें सांगण्याचें कारण असें आहे कीं, पुष्कळ वादविवादाच्या किंवा ऊहापोहाच्या लेखांत युक्तिवादापेक्षां छिद्रान्वेषण, मर्मभेद, असत्कल्पना यांचेंच पारडें जड असतें; असा पुष्कळांचा अनुभव आहे.

उपसंहार

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून मराठी भाषेचें ग्रंथभाण्डार आज केवढें आहे, त्यांत न्यूनता कोठें आहे व दोष कोणते आहेत, याची कल्पना आपल्यास थोडीबहुत करितां येईल; व त्या मानानें व त्या दिशेनें प्रयत्न केला असतां एकंदर जनतेचें हित होईल; असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. मीं जें कांहीं सांगितलें, त्यात विशेष कांहीं नाहीं. आपणां सर्वांना हे विचार सुचलेच असतील.

" कां दीपा सन्मुख । ठेविलिया दीपक । कोण कोणा अर्थिक । कोण जाणे ॥ नाना अर्कांपुढें अर्क । उदयलिया आणिक । कोण म्हणे प्रकाशक । प्रकाश्य कवण ॥ "

आजचा हा समारंभ अपूर्व आहे. श्रीमन्महाराज सयाजीरावांसारखे विद्याभिलाषी, विद्वत्साहाय्यक, राजकार्यधुरंधर आश्रयदाते असल्यावर यशःप्राप्ति दुष्कर नाहीं. " लोह एके अंशें । झगटलिया परिसें । येरीकडे अपैसें । सुवर्ण होय ॥ " अशी ज्ञानेश्वर महाराजांची उक्ति आहे. तीप्रमाणें आपण हातीं घेतलेलें काम जरी लोखंडाप्रमाणें अवघड असलें, तरी श्रीमान् सयाजीराव या परिसाची आपल्यास जोड मिळाली असल्यामुळें तें सुघड होईल; याविषयीं शंका नाहीं.

वर्षचक्रांतील सिंहस्थपर्वणी येऊन गेली व गोदावरीचे तटाकीं क्षेत्रोक्षेत्रीं यात्रेकरूंचे मेळे येऊन गेले, परंतु देशी वाग्वधूंच्या कन्यागत पर्वणीचा अपूर्व योग या विश्वामित्रीचे तटाकीं वटोदर क्षेत्रीं आज आला आहे. अन्य क्षेत्रींच्या कृत्यांचे ऐवजीं आज येथें वाग्यज्ञ होत आहे. या यज्ञाचें दीक्षाकंकण श्रीमन्महाराजांचे मनगटांत बांधिलें आहे ; व अध्वर्युकर्म कर्नल कीर्तिकर यांजकड सोंपविलें आहे. तेव्हां हें काम महाराजांस व सर्व सभ्यांस कीर्तिकर होईलच, यांत संदेह नाहीं. कीर्तिकरांचा सहाय्यक म्हणून " पुरोहितगुणे । मी बोलिलों पुरें उणें । तें तुम्ही माउलीपणें । उपसाहिजो जी ॥ "

* * *

[बडोदें येथील साहित्य-संमेलनाकरितां लिहिलेला निबंध]

महाराष्ट्र साहित्य संमेलन

श्रीमन्महाराजसाहेब रावबहादुर जनरल् मतकरसाहेब व भगिनीबांधवहो !

स्वागतमंडळाचे अध्यक्ष जनरल् मतकरसाहेब यांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत जो माझा गौरव केला त्यास मी सर्वथैव अपात्र आहें.

उलट ते स्वतःच आपल्या निःस्पृहतेनें, विनयानें, सत्त्वशीलतेनें व विशेषतः त्यांच्या मराठी भाषेविषयीं जाज्वल्य अभिमानानें आबालवृद्धांस, रावापासून रंकापर्यंत प्रिय झालेले आहेत असा त्यांचा सर्वत्र लौकिक पसरलेला आहे. अशा सन्मान्य गृहस्थास स्वागतमंडळाचे अध्यक्ष नेमून त्यांचा जो गौरव केला त्यास ते पात्रच आहेत. मजविषयीं जे गोड शब्द त्यांनीं योजिले त्याबद्दल मी मात्र त्यांचा अत्यंत आभारी आहें. या अधिवेशनाचे प्रसंगीं अध्यक्षपदास माझ्याहून अधिक पात्रतेचे अनेक सद्गृहस्थ मिळाले असते व आपली दृष्टि त्यांजकडे वळली असती तर मला अधिक संतोष झाला असता. परंतु ज्या अर्थीं आपण माझीच निवड केली त्या अर्थीं आपल्या या प्रेमाचा अनादर होऊं नये म्हणून मी या स्थानाचा स्वीकार करीत आहें. आपण ज्या प्रेमानें मला निमंत्रण केलें तेंच प्रेम माझ्या हातून होणारी अल्पस्वल्प सेवा गोड करून घेण्यास आपल्यास प्रेरणा करील असा भरंवसा धरून मी आजच्या माझ्या कामास आरंभ करितों.

आपल्या या प्रिय भरतभूमीच्या भावी अभ्युदयाचीं जीं अनेक चिन्हें दृष्टिगोचर होत आहेत त्यांत शास्ते आणि शासित या उभयतांचे सहकारित्वाची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे. सामान्य जनतेच्या ज्या आकांक्षा त्यांविषयीं केवळ सहानुभूतीच नव्हे, पण त्यांस सढळ हातांनीं साहाय्य करून आपले सन्मान्य नरपति त्या सुफलित करण्याच्या कार्यांत स्वतः भाग घेत आहेत ही संतोषाची गोष्ट आहे. साहित्याचे अभिवृद्धीकरितां या देशाच्या निरनिराळ्या भागांत जीं संमेलनें वेळोवेळीं भरत आहेत, त्यांत त्या त्या भागांतील लहान-थोर संस्थानिक स्वतः हजर राहून या सत्कार्यांस प्रोत्साहन देत आहेत. महाराष्ट्रभाषाभिमानी नरपतींपैकीं आपले विद्यासंपन्न व ललित कलांचे उदार आश्रयदाते **श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड** यांनीं

लक्षावधि रुपये खर्च करून मराठींत अनेक उपयुक्त ग्रंथ प्रसिद्ध करविले आहेत. सन १९०९ सालीं आपल्या राजधानींत महाराष्ट्र-साहित्यसंमेलन भरवून त्यांनीं महाराष्ट्र साहित्यसेवेस जें प्रोत्साहन दिलें त्याविषयीं त्यांचा धन्यवाद करावा तितका थोडाच आहे. त्यांनीं या कार्याकरितां मोठा द्रव्यनिधीहि काढून ठेविला आहे. महाराष्ट्र भाषेचे दुसरे अभिमानी भूपति आजचें हें संमेलन स्वतःच्या कृपाछत्राखालीं स्वतःचे प्रिय राजधानींत भरवीत आहेत. याबद्दल इंदूर येथील साहित्यसभेचे सभासद तर कृतज्ञ आहेतच, पण महाराष्ट्रसाहित्याभिवृद्धीची आस्था बाळगणारे जे परस्थ विद्वज्जन येथें जमले आहेत ते सुद्धां **श्रीमन्महाराज सवाई तुकोजीराव महाराजांचे** अत्यंत ऋणी आहेत. **श्रीमन्महाराज सवाई तुकोजीराव** महाराजांनीं लोकशिक्षणाकरितां " मल्हारिमार्तंड विजय " नांवाचें वर्तमानपत्र स्वाश्रया-खालीं चालू ठेविलें आहे, व महाराष्ट्रीय ग्रंथांस उत्तेजन देण्याकरितां दरसाल २५०० रु० मंजूर केले आहेत, याबद्दलहि आपण त्यांचे उपकार मानले पाहिजेत.

या उभयतः महाराजांचे महाराष्ट्रभाषाभिवृद्धीच्या कळकळीबद्दल आपण आभारी आहोंत ही तर गोष्ट खरीच, पण सुदैवानें अशा प्रकारच्या राजाश्रयाची पूर्वपरंपराच आपल्या देशांत चालत आलेली आहे असें वाटतें. **श्रीमंत सयाजीराव महाराज** साहेबांनीं " गायकवाड ओरिएंटल सीरीज " या नांवानें जी पौरस्त्य ग्रन्थमाला सुरू केली आहे, तिचा प्रथम अंक म्हणून **राजशेखर** कवीचा " काव्यमीमांसा " या नांवाचा संस्कृत ग्रन्थ प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या दहाव्या अध्यायांतील कांहीं वाक्यें प्रस्तुत प्रसंगीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. **राजशेखर** म्हणतो, " राजा कविः कविसमाजं विदधीत। राजनि कवौ सर्वो लोकः कविः स्यात्।" कविताशक्ति सर्वांचेच वांट्यास आलेली नसते हें खरें, पण राजे स्वतः ज्ञानसंपन्न आणि विद्याभिलाषी असेल, तह जनतेलाहि तेंच वळण लागतें, असें **राजशेखराच्या** उक्तीस धरून अनुमान काढणें चुकीचें होणार नाहीं. " यथा राजा तथा प्रजा " ही म्हण सर्वत्र रूढ आहेच. कवींचें संमेलन करावें एवढेंच सांगून **राजशेखर** थांबला नाहीं. याच दहाव्या अध्यायाचे शेवटीं " महानगरेषुच काव्यशास्त्रपरीक्षार्थं ब्रह्मसभाः कारयेत्! तत्र परीक्षो-

त्तीर्णानां ब्रह्मरथयानं पट्टबन्धश्च ” असेंही त्यानें सांगितलें आहे. या वाक्यांत त्यानें शास्त्राच्या परीक्षेचाहि उल्लेख केलेला आहे. या काव्यशास्त्रपरीक्षेच्या स्थलासंबंधानेंहि त्याचे उद्गार मनोरंजक आहेत. आपण ज्या राजधानींत आज जमलों आहों, तिचें जवळच या भारतवर्षांतील अत्यन्त प्राचीन, संस्कृत कवींनीं गायिलेली, भोजराजाची सुप्रसिद्ध राजधानी **उज्जयिनी** आहे. तेथें काव्यकारपरीक्षा होत असे. “इह कालिदासमेण्ठावत्रामररूपसारभारवयः। हरिचन्द्रचन्द्रगुप्तौ परीक्षिताविह विशालायाम्. ” काव्यपरीक्षा जशी **उज्जयिनीस** होत असे, तशी शास्त्रपरीक्षा **पाटणा** येथें होत असे. “ अत्रोपवर्षवर्षाविह पाणिनिपिङ्गलाविहव्याडिः। वररुचिपतञ्जली इह परीक्षिताः ख्यातिमुपजग्मुः ” सारांश, ग्रन्थपरीक्षेचा भार उचलण्याचें महत्कार्य राजाश्रयानेंच होत होतें, व **श्रीमंत गायकवाड सरकार** आणि **श्रीमंत होळकर सरकार** या उभय महाराजांनीं पूर्वपरंपरेचें एका अर्थी पुनरुज्जीवनच केलें आहे व त्याबद्दल वाग्देवीच्या उपासकांनीं त्यांचा धन्यवाद करावा हें उचितच आहे.

आतां ज्या विषयासंबंधानें माझे अल्पस्वल्प विचार सादर करण्याचें मीं योजिलें आहे; तिकडे वळण्यापूर्वी मागील बैठकीच्या वेळीं जे जे ठराव मंजूर करण्यांत आले, त्यांपैकीं सांप्रतच्या अधिवेशनांत कोणकोणत्या ठरावाचें पुनरुद्घाटन करणें माझ्या मतें अवश्य आहे, तें आधीं सांगतों.

गेल्या खेपेस **ग्रेट ब्रिटन** आणि **दोस्त राष्ट्रें** यांस चालू महायुद्धांत यश येवो, अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करण्याचा पहिला ठराव होता, दुर्दैवानें तें महायुद्ध अजून चालूच आहे. **ग्रेट ब्रिटन** आणि **दोस्त राष्ट्रें** यांची आतां जय्यत तयारी आहे व शत्रुपक्ष आतां लवकरच जेरीस येण्याचीं सुचिन्हें दृष्टीस पडूं लागलीं आहेत. सर्व पृथ्वीवर व विशेषतः समुद्रावर धुमाकूळ माजून राहिला आहे. आपल्या प्रिय सार्वभौम सरकाराच्या बलाढ्य आरमारामुळें आपण जरी निर्धास्त आहों, तरी एकंदर मनुष्यजातीच्या हिताच्या व शान्तिसुखाच्या दृष्टीनें **ग्रेट ब्रिटन** आणि **दोस्त राष्ट्रें** यांस लवकर विजयश्री प्राप्त व्हावी, अशी परमेश्वराची करुणा भाकावी या अर्थाचा ठराव पुनः मंजूर करावा अशी माझी नम्र सूचना आहे आणि ती आपण एकमतानें पसंत कराल असा मला पूर्ण भरंवसा आहे.

गेल्या बैठकींत **मोडी लिपीचें** सरकारी कचेऱ्यांतून जें उच्चाटन होत आहे तें होऊं नये व तिचें पूर्वस्थान तिला मिळावें असा प्रयत्न करण्याविषयीं ठराव मंजूर झाला व साहित्यपरिषदेनें तसा प्रयत्नहि केला. पण दुःखाची गोष्ट ही कीं, रास्त मागणीलाहि सरकाराकडून नकारार्थींच उत्तर मिळालें. या प्रश्नाची अशा प्रकारें विल्हेवाट लागण्याचें एकच कारण असावें असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. मोडी लिपीचें खरें स्वरूप सरकारी अधिकाऱ्यांच्या अजून ध्यानांतच आलें नाहीं असें अनुमान काढणें फारसें चुकीचें होणार नाहीं. " ङ् " हा वर्ण बहुधा प्रचारांत नाहींच. बाकीच्या ३५ व्यंजनापैकीं ११ व्यंजनें बाळबोधी किंवा देवनागरी लिपीप्रमाणेंच आहेत. राहिलेल्या २४ व्यंजनांचें लेखनसौकर्याकरितां अवश्य तितकेंच रूप बदललेलें आहे. हें रूप हल्लीं घाईघाईनें लिहिल्या जाणाऱ्या बाळबोधी अक्षराच्या रूपापेक्षां पुष्कळच चांगलें आहे, अशी सरकारची खात्री करून दिली पाहिजे. साक्षीदाराच्या जबानीचे वेळीं कारकून लोकांस साक्षीदाराच्या जिभेबरोबर आपल्या लेखणीची गति ठेवावी लागते, व ही गोष्ट दुर्घट असल्याकारणानें लेखनसौकर्याकरितां केलेल्या संक्षिप्त रूपामुळें घोंटाळा झाल्याचीं उदाहरणें ऐकिवांत येतात. सरकाराची समजूत घालण्याकरितां पुनः एकवार प्रयत्न करून पहावा अशी माझी नम्र सूचना आहे. हा प्रयत्न नुसता अर्ज करून न करितां आपल्या अर्जासोबत बाळबोधीचें लेखनसौकर्याकरितां मोडींत झालेल्या रूपान्तराची सुयुक्तता स्पष्ट नजरेंत भरण्याकरितां एक चार्ट अथवा नकाशा अर्जास जोडावा, व शिवाय न्यायकचेऱ्यांत काम करणाऱ्या अनुभवी व वजनदार वकीलाचे 'प्रतिज्ञा लेख' सोबत ठेवावे, व जरूर पडल्यास वजनदार गृहस्थांचें एक डेप्युटेशनहि पाठवावें. इतकेंहि करून सरकार आपली विनंति अमान्य करील तर वरिष्ठ सरकारापर्यंत ही दाद मागण्यास आपण तयार झालें पाहिजे.

वास्तविक पाहिलें तर जे थोडे वरिष्ठ प्रतीचे युरोपियन अधिकारी मोडी लिपींत लिहिलेले लेख वाचण्याची तसदी घेत असतील त्यांस घाईघाईनें किजबिड लिहिलेले बाळबोधी लेख तरी वाचतां येतील कीं नाहीं ही शंकाच आहे. असल्या घाणेरड्या बाळबोधीपेक्षां मोडीच बरी, अशी सरकारची आपण खात्री करून दिली पाहिजे. अशा दुर्बोध बाळबोध लेखाचा एखादा फोटोग्राफ

काढून आपल्या अर्जास जोडला असतां तो पदार्थसंग्रहालयांतहिं ठेवण्यास उपयोगी पडेल.

यानंतर मागील अधिवेशनांतील ठरावांचा अनुक्रम धरिला असतां युनिव्हर्सिटीच्या आर्ट्स शाखेच्या सर्व परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषांचा अवश्यविषयांत समावेश व्हावा (ठ० ५) व दुय्यम शिक्षणाच्या सर्व विद्यालयांतून दिलें जाणारें शिक्षण देशी भाषेच्या द्वारें दिलें जावें (ठ० ६) हे दोन ठराव येतात. हे दोन्ही ठराव या बैठकीसहि पसार करावे अशी माझी शिफारस आहे. देशी भाषांच्या द्वारें शिक्षण देण्याच्या आवश्यकतेसंबंधानें लोकमत बरेंच तयार झालें आहे. पुणें येथील शिक्षक-संस्थेनें बरीच जोराची चळवळ चालविली आहे. मुंबई युनिव्हर्सिटीचे सुप्रसिद्ध विद्वान् व अनुभवी व्हाइसचान्सेलर **डॉक्टर म्याकिकन** साहेब यांना ही योजना मान्य आहे, व नेक नामदार **व्हाइसरॉय साहेब** यांनींहि या योजनेला आपली अनुमति व्यक्त केली आहे. आपणहि या चळवळीस जोराचा पाठिंबा दिला असतां थोड्याच काळांत यश येण्याचा संभव आहे.

देशी भाषेंतून शिक्षण देण्याविषयीं युनिव्हर्सिटीची व सरकारची संमति मिळविणें या कामास फारसे आयास पडतील असें वाटत नाहीं. युनिव्हर्सिटींत या बाबदीची चर्चा थोडीबहुत झालीच आहे. मेहेरबान **व्हाइसचान्सेलर** साहेबांची अनुकूलता आहे, हें मीं नुकतेंच सांगितलें आहे. सरकारी दुय्यम प्रतीच्या शाळांतून या पद्धतीचें अवलंबन बरेंच होत चाललें आहे, व योग्य प्रयत्न केल्यास सरकार सर्वांस अशी परवानगी देईल. परंतु युनिव्हर्सिटी परीक्षांच्या अभ्यासक्रमांत देशी भाषांचा समावेश होण्यासंबंधानें बराच विरोध होण्याचा संभव आहे. कारण, या बाबतींत जे पूर्वग्रह झालेले आहेत त्यांचें समूळ उच्चाटन झालें पाहिजे. अव्वल इंग्रजींत इंग्लिश वाङ्मयाच्या विस्तारानें आपल्या देशबांधवांचे डोळे दिपून गेले. मुद्रणकलेच्या अभावीं देशी वाङ्मयाचा विस्तार व त्याचें वैचित्र्य यांविषयीं अंधुकसुद्धां कल्पना नव्हती, व त्याच समयास संस्कृत वाङ्मयाचें कौतुक पाश्चात्य पंडितांकडून जोरानें करण्यांत येत होतें. त्या मानानें देशी भाषांची तरफदारी करण्यास साधन नव्हतें व ती कोणीं केलीहि नाहीं. यामुळें या भाषा ज्या मागें पडल्या त्या पडल्या.

मराठीचे संबंधानें **परलो० रानडे** यांना किती श्रम पडले याची कल्पना

ज्यांनीं ज्यांनीं त्यांस या कामीं मदत केली त्यांसच होणें शक्य आहे. त्यांनीं वर्तमानपत्रांतून व मासिकांतून यासंबंधाचे लेख लिहविले. शेंकडों मित्र-मंडळींस पत्रें लिहून त्यांचीं उत्तरें आणवून प्राचीन व अर्वाचीन ग्रंथांचें व ग्रंथकारांचें परिगणन करविलें. त्यांच्या परिचयाचे व त्यांच्यासारखेच गंभीर विचाराचे जे युरोपियन अधिकारी, युनिव्हर्सिटीचे **फेलो** होते त्यांच्याशीं या विषयाची पूर्वचर्चा केली व मग युनिव्हर्सिटीनें अर्धीमुर्धी मान्यता दिली. आतां तसा प्रयत्न करावयाचा म्हटलें, तर आधीं देशी भाषांचा इतिहास, त्यांचा विस्तार, त्यांचें खरें स्वरूप, व त्यांची सांप्रत होणारी प्रगति यासंबंधीं सांगोपांग विवेचन करणारे ग्रंथ इंग्रजी भाषेंत तयार करवून त्यांची सर्वत्र प्रसिद्धी करविली पाहिजे. इंग्रजींत असे ग्रन्थ लिहविण्याचें कारण इतकेंच आहे कीं, युनिव्हर्सिटींत देशी भाषा न जाणणाऱ्या लोकांचा बराच भरणा आहे. जे देशबांधव फेलो आहेत त्यांच्या भाषा निरनिराळ्या असल्याकारणानें इतर देशी भाषांसंबंधानें त्यांस आपलें ज्ञान नाहीं. मराठे आहेत त्यांस गुजराथी येत नाहीं, गुजराथी आहेत त्यांस मराठी येत नाहीं व उभयतांसहि कानडीचा गंध नाहीं. शिवाय मुसलमान पार्शी, यहुदी व युरोपियन फेलो आहेत त्यांना या भाषांचें खरोखर महत्त्व कळणें अशक्य आहे. तें कळल्या-शिवाय त्यांची सहानुभूति मिळणें दुर्घट आहे. याकरितां अशा तऱ्हेचे इतिहास तयार करण्याची अगोदर तयारी करून मग युनिव्हर्सिटीकडे हा प्रश्न सादर करावा अशी माझी नम्र सूचना आहे.

" मुलांमुलींच्या शिक्षणाच्या कामीं उपयोगी पडेल असें विशिष्ट वाङ्मय तयार करण्याचा उपक्रम व्हावा " असा ठराव गेल्या अधिवेशनांत मंजूर झाला. तोच ठराव अधिक विशद रीतीनें आपल्यापुढें मांडण्यांत येणार आहे. मुलांच्या ग्रहणशक्तीचेंच नव्हे पण त्यांच्या क्रियाशक्तीचेंहि विकसन झालें पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. अशा तऱ्हेचीं पुस्तकें साहित्य-परिषदेनें लिहविलीं व कोणीं महात्म्यानें तीं छापून काढण्यास आपल्यास द्रव्यनिधीहि दिला, अशी आपण कल्पना करूं. पण शाळांतून कोणतीं पुस्तकें चालवावयाचीं हा अधिकार सरकारी अधिकाऱ्यांचे हातांत आहे. त्यांनीं जर आपलीं पुस्तकें नामंजूर केलीं, तर पुढें आपल्या या पुस्तकांचें काय करावयाचें याचा विचार अगोदरच करावयास पाहिजे.

यानंतरचा मागील अधिवेशनांतील ठराव ग्रंथपरीक्षणासंबंधानें होता, व तो गुरुवर्य रावब० **अण्णासाहेब महाजनी** यांनीं सुचविला होता. याविषयाची चर्चा करितांना चालू परीक्षण-पद्धतीविषयीं विचार करणें ओघानेंच प्राप्त होतें. मराठी भाषेच्या केन्द्रस्थानीं म्हणजे मुंबई, पुणें इत्यादि प्रांतांत मराठी ग्रन्थांचें व विशेषतः शालोपयोगी आणि शाळांतील ग्रन्थालयांत संग्राह्य अशा पुस्तकांचें परीक्षण एका सरकार-नियुक्त मण्डलाकडे असतें. ह्या मण्डलाकडून होणारें परीक्षण अत्यंत संकुचित बुद्धीनें, कधीं कधीं भाषासंप्रदायाच्या केवळ अज्ञानानें आक्षेपार्ह असतें अशी आज फार वर्षांची कुरकुर आहे. या परीक्षा-मण्डलाचे सभासद शाळाधिकाऱ्यांनीं आपल्याच विचारानें नेमलेले असतात. वाङ्मयाची सेवा केली आहे किंवा नाहीं? निदान त्याचा व्यासंग तरी ठेविला आहे किंवा नाहीं? हे प्रश्नच निघत नाहींत. कोणीं वरिष्ठ प्रतीच्या अधिकाऱ्यानें कामकाजांत चलाखी दाखविली कीं त्याची या मण्डलाचा सभासद होण्याची लायकी ठरते. डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टरांपैकीं ज्याची नोकरी अधिक झाली असेल, तो ट्रेनिंग कॉलेजचा मुख्याध्यापक होतो व ही जागा त्यास मिळाली म्हणजे त्या अधिकाराच्या नात्यानें तो मराठी परीक्षक-मण्डलाचा प्रमुख होतो. त्याचा एकदां अभिप्राय पडला म्हणजे मग त्यावर तोड नाहीं. ही पद्धति सदोष आहे व ही परीक्षकांची निवड सरकारी अंमलदारांकडून काढून साहित्यपरिषदेसारख्या संस्थांकडे आली पाहिजे. आपण म्युनिसिपालिटींत, लोकलबोर्डांत व कायदेकौन्सिलांतहि लोकपक्षाचे प्रतिनिधि असावे असें सरकारापाशीं मागणें मागतों. मग अशा वाङ्मयविषयक संस्थांत लोकनियुक्त प्रतिनिधि असावे अशी अपेक्षा साहित्यपरिषदेनें कां करूं नये? अनीति व राजद्रोह यांची कोणीहि विचारी मनुष्य उपेक्षा करणार नाहीं. असें जर आहे तर मग हें ग्रंथपरीक्षणाचें काम लोकांकडे कां असूं नये? त्यांतूनहि जर सरकारांची पैरवी यावर असावी असा सरकारचा हेतु असेल, तर सरकारानें आपले कांहीं सभासद या मंडळांत असूं द्यावे, पण परीक्षण चोख झालें पाहिजे.

सरकारच्या ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या कचेरींतहि एकंदर नवीन पुस्तकांचें तीं प्रकाशित झाल्याबरोबर परीक्षण होत असतें. हें परीक्षण एखाद्या सामान्य प्रतीच्या इसमाकडून होत असतें. दर तिमाहींत जेवढीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं

असतील त्यांचा झाडा एकदोन महिन्यांचे अवकाशांत काढावयाचा असल्या-कारणानें हें परीक्षण अगदींच वरपांगी असून तेंही एकदेशीयच असतें. राजद्रोह, ग्राम्यशृंगार अथवा बीभत्स असा कांहीं प्रकार नसावा याच दृष्टीनें हें परीक्षण होत असतें. सारांश, वाङ्मयाची शुद्धि व सदभिरुचि या दृष्टींनीं सध्यां परीक्षण होत नाहीं, असें म्हटलें तरी चालेल.

ही स्थिति ध्यानांत आणूनच **परलोकवासी माधवरावजी रानडे** यांनीं डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी निर्माण केली. या सोसायटीला सरकारकडून १५०० रु० ग्रंथकारांस बक्षिसें देण्याकरितां मदत मिळते. पण ही रक्कम अगदींच तुटपुंजी आहे व त्या संस्थेची सांपत्तिक स्थितीहि समा-धानकारक नाहीं. या संस्थेकडे आश्रयाकरितां म्हणून जे ग्रंथ येतात, त्यांचें परीक्षण कसलेल्या माणसांकडून करविलें जातें हें जरी खरें आहे, तरी या परीक्षणास बराच कालावधि लागतो, अशी ग्रंथकारांची कुरकुर आहे. हें परीक्षण मोफत करावयाचें असतें. परीक्षकमंडळांत जे तरुण गृहस्थ आहेत, त्यांना त्यांचे पोटाचे उद्योग संभाळून सवडीप्रमाणें हें काम करावयाचें असतें. माझ्यासारख्या वृद्ध माणसाकडून अनेक आधिव्याधींचे कारणानें परीक्षणाचें काम लांबणीवर पडतें. एकंदरींत हें काम करण्याचा कांहीं तरी अधिक कार्यक्षम उपाय योजणें अपरिहार्य आहे. मागील संमेलनाचे वेळीं आचार्यवर्य रा० ब० **अण्णासाहेब महाजनी** यांनीं साहित्यपरिषदेकडून परीक्षण होण्याविषयीं ठराव सुचविला व तो मंजूरहि झाला. पण त्याची अंमल-बजावणी कशी व्हावयाची ? आपण निरपेक्ष बुद्धीनें हें काम वेळचे वेळीं करतील अशीं माणसें निवडलीं पाहिजेत. या संबंधानें इतर देशांतील अनुभवाच्या गोष्टी आपल्यास उपयोगी पडतील तर पहाव्या, या हेतूनें परदेशांतील एका संस्थेची हकीकत सांगतों.

"ओल्ड अकाडेमी आफ् साएन्सेस" म्हणून जी संस्था फ्रान्समध्यें होती, तिला पहिल्या तीस वर्षांत राजाश्रय मुळींच नव्हता. तिचे सभासद आठवड्यांतून दोन वेळां एका सभासदाचे घरीं जमत असत. "फ्रेंच अकाडेमी" म्हणून जी संस्था पुढें उदयास आली तिचा आरंभहि खाजगी स्वरूपाचाच होता. सन १६२९ चे सुमारास कांहीं विद्याव्यासंगी

गृहस्थांनीं पारिस येथें त्यांच्याचपैकीं एका गृहस्थांचे घरीं वाङ्मयविषयाचा विचार करण्यासाठीं जमण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें त्यांनीं हा क्रम पांच वर्षें सतत चालू ठेवला. या मुदतींत कर्णोपकर्णीं या सभांचें व त्यांत होणाऱ्या चर्चेचें वर्तमान **कार्डिनल रिशल्यू** नांवाचा जो वजनदार मुत्सद्दी होता, त्याचे कानावर गेलें आणि त्यानें **चौदाव्या** लुई राजाकडून या संस्थेला सनदा देऊन राजाश्रयही देवविला. " भाषा नियमबद्ध करून सरस करणें व कला आणि शास्त्रें यांचें विवेचन करण्याचें सामर्थ्य तींत आणणें " हा त्या संस्थेचा मुख्य उद्देश होता. व या उदेशाचे स्पष्टीकरणार्थ त्यांनीं जो खुलासा केला त्यांत " सामान्य जनाच्या मुखांत जे अशुद्धीचे दोष आहेत ते, वकील वगैरे लोकांच्या प्रचारांत जी घेडगुजरी बोली आहे ती, तसेंच अशिक्षित दरबारी लोक व अडाणी भिक्षुक यांच्या तोंडीं ज्या शब्दांचा दुरुपयोग होतो ते शब्द काढून टाकण्याचा " उद्देश होता असें स्पष्ट म्हटलें आहे हीं उद्देशांत निर्दिष्ट केलेलीं स्थळें आपल्या येथेंहि आहेतच.

आरंभीं सभासदांची संख्या ८ होती. ती संख्या पुढें ४० पर्यंत वाढविण्यांत आली. आरंभीं हे सभासद पाळीपाळीनें निबंध लिहून ते वाचून दाखवीत. **कार्डिनल् रिशल्यू** याच्या सूचनेवरून **कार्नील** याचें **सिड** या नांवाचें नाटक परीक्षणाकरितां घेतलें सहा महिने वादविवाद झाल्यानंतर हा टीकात्मक लेख प्रसिद्ध झाला. इतर सर्व कामांपेक्षां फ्रेंच भाषेचा कोश हें श्रेष्ठ काम या अकाडेमीनें केलें. या कामाकरितां अकाडेमीच्या सभासदांनीं सर्वसंमत अशा ग्रन्थांची एक यादी तयार केली व ती आपआपसांत वांटून घेतली. पुढें त्या त्या ग्रन्थांत आलेले शब्द व भाषासंप्रदाय निवडून काढून त्यांचा समावेश त्यांनीं आपल्या कोशांत केला. अकाडेमीनें तयार केलेल्या या कोशाचा उल्लेख मीं थोड्या विस्तारानें केला, याचें कारण मराठीचाहि असा नवीन कोश करण्याची आवश्यकता आहे. **मोल्स्वर्थ** साहेबांनीं कोश केला, तेव्हां बखरीशिवाय गद्यग्रंथ असल्यास फारच थोडे होते. आतां त्यांची संख्या कित्येक हजारांवर आहे. मोल्स्वर्थसाहेबांनीं २० कवींच्या ग्रन्थांचें पारायण करविलें, पण इतिहास-संशोधक मंडळाच्या अविश्रान्त व निरपेक्ष परिश्रमानें सन ११०० पासून सन १७४० पर्यंत झालेल्या ८७५ कवींच्या नांवांची व त्यांनीं केलेल्या ग्रंथांची सर्वांगसुंदर सूची आपले मित्र

रा. गोविंदराव चांदोरकर यांनीं नुकतीच प्रसिद्ध केली आहे. या सूचींत ११ कवयित्रींचींही नांवें गुंफलीं आहेत, ही विशेष कौतुकाची गोष्ट आहे. सन १७४० पासून आजतागायत म्हणजे १७५ वर्षांचे अवधींत निदान २०० तरी अधिक कवि सांपडतील. इतकी जर वाङ्मयाची वृद्धि झाली आहे, तर नवीन कोश तयार करण्याची वेळ आली आहे, असें आपण सर्व कबूल करालच.

या अकाडेमीनें जें कार्य केलें, तेंच आपणांस कर्तव्य आहे म्हणून तिच्या कामगिरीसंबंधानें कांहीं उतारे वाचून दाखवितों :

"To begin with its merits, it may justly boast that there is hardly a single name of the first rank among Freneh literateurs that it has not enrolled amongst its members.''

"On the one hand it has been asserted that it has corrected the jndgment, purified the taste and formed the language of French writers, and that to it we owe the most striking characteristics of French literature, its purity, delicacy and flexibility."

पहिल्या प्रतीच्या फ्रेंच ग्रंथकारांपैकीं या परिषदेचा सभासद झाला नाहीं, असा ग्रंथकार क्वचितच सांपडेल. फ्रेंच ग्रंथकारांचें बुद्धिवैशद्य, त्यांची सदभिरुचि आणि त्यांचें भाषालालित्य ह्या अकाडेमीमुळें त्यांना प्राप्त झालें आणि फ्रेंच भाषेची शुद्धि, तिचें माधुर्य आणि तिचें मार्दव हे गुण अकाडेमीच्या परिश्रमाचीं फळें होत.

हीं इष्ट फळें जरी प्राप्त झालीं तरी तिच्या कार्यांत दोषहि राहिलेच.

"While it has raised the general standard of writing it has tended to hamper and crush originality. It has done much by its example for style, but its attempts to impose its laws on language have from the nature of the case, failed."

लेखनव्यवसायास सामान्यतः चांगलें वळण जरी त्या संस्थेनें लावून दिलें तरी कल्पकतेला प्रतिबंध होऊन तिचा समूळ नाश करण्याकडे तिची प्रवृत्ति झाली. स्वतः घालून दिलेल्या उदाहरणामुळें भाषासरणीची जरी सुधारणा झाली, तरी ती नियमबद्ध करून टाकण्याचे सहजच तिचे प्रयत्न निष्फळ झाले.

अकाडेमीचें हें उदाहरण आपल्यापुढें ठेवण्याचें प्रयोजन इतकेंच आहे कीं, भाषाशुद्धि आणि सदभिरुचि या गुणांचा परिपोष करण्याच्या उद्देशानें आपण अशी एखादी खाजगी स्वरूपाची संस्था जरी काढली, तरी आपल्या त्या प्रयत्नामुळें भाषा निर्वीर्य होतां कामा नये–तसेंच कल्पकतेला म्हणजे नवीन वाक्संप्रदाय प्रचारांत आणण्यास प्रतिबंध होऊं नये, अशीहि खबरदारी ठेविली पाहिजे.

अशा तऱ्हेची संस्था निर्माण करण्याकरितां ग्रंथकारांचें एकमेकांशीं सहकारित्व पाहिजे. गेल्या शतकांत खुद्द इंग्लंदांत सुद्धां **जान फास्टर** नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथकारानें याविषयीं काढलेले उद्गार मननीय आहेत. तो म्हणतो :—

"The profession themselves have yet to learn the secret of co-operation ; they have to put away internal jealousies; they have to claim for themselves that defined position from which greater respect and more frequent consideration in public life could not long be withheld ; in fine they have frankly to feel that their vocation, properly regarded, ranks with the worthiest, and that on all occassions to do justice to it, and to each other is the way to obtain justice from the world."

ग्रंथकारांचे वर्गालाच सहकारित्वाचें रहस्य अझून शिकावयाचें आहे. आपआपसांतील मत्सरभाव विसरावयाचा आहे. समाजांत आपला अधिक मान राहील आणि आपल्या धंद्याची अब्रू वाढेल, अशा तऱ्हेचें परिच्छिन्न स्थान आपल्या व्यवसायास मिळविण्याचा हक्क त्यांनीं सांगितला पाहिजे. सारांश, आपल्या व्यवसायाची योग्यता वस्तुतः पहिल्या प्रताची आहे, आणि हरएक प्रसंगीं आपणच आपल्या व्यवसायाची योग्यता जाणून परस्परांच्या योग्यतेचीहि जाणीव बाळगिल्याशिवाय समाजाकडून आपल्या धंद्याचें चीज होणार नाहीं, असें त्यांस वाटलें पाहिजे. यानंतरचे त्याचे उद्गार याहूनहि हृदयंगम आहेत. तो म्हणतो :—

"The world will be greatly the gainer–when the biography of the man of genius shall no longer be a picture of the most harsh struggles and mean necessities to which

man's life is subject, exhibited as in shameful contrast to the calm and classic glory of his fame."

एखाद्या अलौकिक बुद्धिमत्तेच्या पुरुषाचें चरित्र लिहितांना त्याच्या प्रशान्त, विशुद्ध व उज्ज्वल कीर्तितेजाशीं जणूं काय लज्जाप्रद विरोध दाखविण्याकरितांच उपजीविकेच्या क्षुद्र साधनाकरितां कराव्या लागणाऱ्या तीव्र कलहाचें चित्र सध्यां काढावें लागतें, तें काढावें लागणार नाहीं, असा सुदिन येईल त्यांतच जगाचेंहि कल्याण होईल.

ग्रन्थकारांचें आपआपसांत अधिक सहकारित्व पाहिजे, त्याशिवाय साहित्यसेवकांची मानमान्यता वाढणार नाहीं व जीवनार्थ कलहाच्या तापाची परिसमाप्ति होणार नाहीं. या दोन्ही गोष्टी आपल्या सद्यःस्थितीस लागू आहेत व त्या दूर करण्याचाहि आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यासंबंधानें एका अत्यंत हृदयद्रावक गोष्टीची मला आठवण होते. **कुळकर्णी** या आडनांवाचे कोणी एक गृहस्थ इकडे माळव्यांतच एका शाळेंत शिक्षक होते. त्यांनीं एक १६-१७ सर्गांचें आर्याबद्ध काव्य डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीकडे आश्रयाकरितां पाठविलें. सोसायटीस तें काव्य पसंत पडून तिनें त्या ग्रंथाला बक्षीसही मंजूर केलें. सोसायटीच्या नियमाप्रमाणें तिनें आश्रय दिलेलें प्रत्येक पुस्तक छापलें पाहिजे. त्या ग्रंथकाराची तर अत्यंत गरीबी. व त्यांतही तो दुखण्यानें पछाडलेला. औषधपाणी करण्यासही त्याचे जवळ पैसा नाहीं. अशा स्थितींत त्या बिचाऱ्याला बक्षिसाच्या शेंपन्नास रुपयांचे मोबदला त्या काव्यावरचा आपला सर्व मालकी हक्क सोसायटीस द्यावा लागला! अखेर त्या दुखण्यांतच त्या कवीचें देहावसान झालें! व तें काव्य सोसायटीच्या दप्तरांत आज कित्येक वर्षें धूळ खात पडलें आहे. त्यास प्रकाशक कोणी मिळत नाहीं. याहून अधिक अनुकंपनीय स्थिति कोणती असणार? अशीं उदाहरणें दृष्टीस पडलीं म्हणजे — ग्रे नामक आंग्लकवीच्या उक्तीची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं.

Full many a gem of purest ray serene
The dark unfathom'd caves of ocean bear!
Full many a flower is born to blush unseen
And waste its fragrance on the desert air!

याचा भावार्थ पद्यांतच सांगणें झाल्यास असा सांगतां येईल :

घनान्धतमसीं किती दडुनि राहिले गव्हरीं
हिरे बहुत साजिरे जलधिच्या अगाधोदरीं !
सुगंधि कुसुमें किती विकसुनी वनीं निर्जनीं
स्वगन्ध पवनासवें दवडिताति कोमेजुनी !

मागें दोन निरनिराळ्या प्रसंगीं महाराष्ट्रवाङ्मयाची वृद्धि निरानिराळ्या विषयांत कोणत्या प्रमाणानें होत आहे, कोणत्या अंगांत न्यूनता आहे व ती कशी भरून काढावी याचें विवेचन मीं यथाशक्ति केलेंच आहे. बडोदें येथील साहित्यसंमेलनाकरितां जो निबंध मीं तयार केला त्यांत सन १९०८ सालापर्यंत या वाढत्या वाङ्मयाचा विषयवार आढावा सादर केला. या सभेपुढें तसाच खर्डा सादर करून गेल्या ८ वर्षांत आपलें पाऊल कसें पुढें पडत आहे, हे आंकडे देऊन दाखविण्यास मला साधनें मिळालीं नाहींत व अवकाशहि सांपडला नाहीं. यामुळें सामान्यतः जी न्यूनता आपल्यास तीव्रतेनें भासूं लागली आहे, तिचा निर्देश करून वाङ्मयाविषयक एका वादासंबंधानें माझें नम्र मत सांगून पद्य व गद्य या वाङ्मयाच्या उभय अंगांविषयीं आपलें ध्येय काय असावें, याविषयीं चार शब्द बोलण्याची मी परवानगी घेतों.

राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें भौतिकशास्त्रें आणि औद्यौगिक कला या विषयांवर इंग्रजींतील Popular Education सारखी सुलभ व सोपपत्तिक ग्रंथमाला अवश्य व सत्वर तयार करण्याची ही वेळ आहे. आपण अध्यात्मयुगांतून कर्मयुगाच्या क्षेत्रांत कोठें पाऊल ठेवीत आहोंत तोंच सांप्रत चाललेल्या महायुद्धानें आपल्या या राष्ट्रीय कर्तव्याविषयीं जाग्रति आपल्यांत उत्पन्न केली आहे. नित्य प्रपंचांत लागणाऱ्या किरकोळ वस्तूंकरितांहि इतर राष्ट्रांवर आपण किती अवलंबून राहिलों आहों, याची जाणीव आपणांत उत्पन्न झाली आहे. अपार भौतिक संपत्ति परमेश्वरकृपेनें आपणांस मिळाली असतां केवळ आलस्यामुळें व हलगर्जीपणानें आपण ही संपत्ति अनुपयुक्त ठेविली, अशी आतां आपली भावना होऊं लागली आहे. निद्रित सिंह जसा खडबडून जागा होतो, तसें सार्वभौम सरकार आतां औद्योगिक कर्तव्याच्या क्षेत्राची कमिशनद्वारा टेहळणी करूं लागलें आहे. औद्योगिक शाळा जागो-

जाग स्थापण्याविषयीं सरकारास सूचना होत आहेत. कमिशनच्या शिफारशींवर वरिष्ठ व स्थानिक सरकारचे अभिप्राय पडून स्टेट सेक्रेटरीकडून हुकूम सुटेपर्यंत जो अवधि लोटेल त्यांत आपलेकडून ग्रंथमालिका जर तयार झाली तर तेवढी सरकारास मदत होऊन राष्ट्रहिताचें कार्य केल्यासारखें होईल. भौतिकशास्त्रांत निपुण ग्रंथकार आपणांमध्येंहि सांपडतील व हुन्नराचे कामांत प्रावीण्य संपादन करून परत आलेले कित्येक बांधव आहेत, तेहि हें काम करण्यास हातभार लावतील. निदान इंग्रजी पुस्तकें घेऊन त्यांचीं भाषांतरें केलीं तरी सध्यां काम भागेल. **श्रीमन्महाराज सयाजीराव** यांनीं दूरदर्शित्वानें शास्त्रीय ग्रंथमालिकेचा उपक्रम केलाच आहे; एक विश्वकोश रचण्याची सिद्धता होत आहे, हें अभिनन्दनीयच आहे. पण अशाच तऱ्हेचे ज्ञानसंग्रहात्मक अनेक ग्रंथ हवे आहेत. पाश्चात्य देशांत भौतिकशास्त्रांत प्रगति इतक्या झपाट्यानें होत आहे कीं, २।३ वर्षांचे आंतच पुस्तकांच्या नवीन आवृत्ति काढाव्या लागत आहेत. आपण तर फारच त्यांचे मागें आहों. तथापि प्रयत्न करणें अपरिहार्य आहे.

महाराष्ट्र कवितेस पादान्तीं (१) यमक असावा; किंवा (२) तो नसल्यासहि चालेल, अशा अर्थाचा वाद अलीकडे उपस्थित झाला आहे. दोन्ही पक्षांनीं आपआपला सिद्धान्त स्थापन करण्याचा प्रयत्न आवेशानें चालविला आहे; सुवासिनीच्या कपाळीं जसें कुंकूं असलेंच पाहिजे, तसेंच कवितेच्या पादान्तीं यमक असलाच पाहिजे, असें एका पक्षाचें म्हणणें आहे. संस्कृतांत निर्यमक कविताच प्रायः अधिक आढळेल व इंग्रजी भाषेंतहि तोच प्रकार आहे. असें जर आहे तर मराठींत तरी यमकाचें बन्धन कशास हवें, असें निर्यमक काव्याचे पुरस्कर्ते म्हणत आहेत. हें त्यांचें म्हणणें सुवासिनींच्या कपाळावरील कुंकूं पुसण्याइतकें रूढिपक्षास असह्य वाटत आहे.

उभयपक्षांचे म्हणण्यांत सत्याचा बराच अंश आहे, हें विचाराअंतीं कबूल करावें, असें आम्हांस वाटतें. संस्कृत कवितेंत यमक अनावश्यक आहेत, एवढेंच नाहीं, तर त्यांना अत्यंत गौणता मानिली आहे. "काव्यानुशासन" ग्रंथांत त्यांची बहुतेक निंदाच केली आहे, हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल

"एतस्य (यमकस्य) च कविशक्तिख्यापनमात्रफलत्वेन पुरुषार्थोपदेशानुपायत्वात्काव्यगड्डभूततेति भेदलक्षणं न कृतम्। काव्यं हि महाकवयः

सुकुमारमतीनां पुरुषार्थेषु प्रवर्तनाय विरचयन्ति। न च पृथग्यत्ननिर्वर्त्यंयमकादिनिरुद्धरसं **तत्तथा सुखोपायः।**

अर्थ: कवीचें भाषाप्रभुत्व दाखविणें एवढेंच यमकाचें फल असल्यामुळें व पुरुषार्थाचा उपदेश करण्यास तें साधन नसल्यामुळें यमक हें काव्य-शरीरावरचें एक गळू आहे म्हणून त्याच्या भेदाचीं लक्षणें सांगितलीं नाहींत. जे महाकवि आहेत, ते कोमल बुद्धीच्या मनुष्यांची पुरुषार्थसाधनाकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून काव्यरचना करितात. मुद्दाम प्रयत्न केल्याशिवाय न साधणाऱ्या यमकादिकांनीं रसाचा प्रतिबंध ज्यांत होतो, असें काव्य त्या कामीं सुखाचा उपाय नाहीं.

(२) लोल्लट म्हणतात :—

यमकानुलोमतदितरचक्रादिभिदोऽतिरसविरोधिन्यः।
अभिमानमात्रमेतद्गड्डरिकादिप्रवाहो वा ॥

यमक, अनुलोम आणि त्याखेरीज इतर चक्रादि भेद रसाचा भंग करतात. हे केवळ अभिमानास कारण होत व एका मेंढीच्यामागून दुसरी मेंढी जाते, अशांतलाच हा प्रकार आहे.

(३) " एकावली "कार म्हणतात :-

प्रायशो यमके चित्रे रसपुष्टिर्न दृश्यते।
दुष्करत्वादसाधुत्वमेकमेवात्र दूषणम् ॥

यमक आणि चित्र ह्यांत प्रायः रसाचा परिपोष होत नाहीं. हे दुष्कर आहेत. हा एक त्यांचे ठिकाणीं दोष आहे.

संस्कृत काव्यांत वर सांगिल्याप्रमाणें यमकाचें गौरव केलें नसतां यमक मराठींत कोठून आलें, असा प्रश्न सहजच उद्भवतो.

या प्रश्नाचें उत्तर देण्यास केवळ अनुमानावरच अवलंबून राहणें भाग आहे आणि आमचें अनुमान सर्वांसच पटेल, असा भरवंसा आम्ही धरीत नाहीं. तथापि या प्रश्नाचें समाधान व्हावें याकरितां आम्हांस जें सुचलें आहे, तें आम्ही सुज्ञ जनांपुढें सविनय मांडीत आहों.

मराठींत पद्यरचनेचा आरंभ ओवी, अभंग, पदें इत्यादि मात्रावृत्तांतच झाला असावा. **वामन** आणि **मोरोपंत** यांचेपूर्वीं श्लोकादि गणवृत्तांत पद्य-रचना **उद्धवचिद्घन, अनंत गोसावी, आनंदतनय, मुक्तेश्वर** आणि **विठ्ठल** यांचीच उपलब्ध आहे. यांपैकीं पहिल्या चौघांच्या कवितेंत पद्यदोष अधिक प्रमाणानें आढळतात. **विठ्ठल** कवीनें गणवृत्तांतील पद्यरचनेस वरील चौघां कवींहून अधिक शुद्धता आणिली. **वामनानें विठ्ठलावरहि** कडी केली आणि मोरोपंतांनीं छंद आणि व्याकरण या दोन्ही शास्त्रांच्या दृष्टीनें निर्दोषता साधून गणवृत्तांस सांप्रतचें स्थिर स्वरूप प्राप्त करून दिलें. वरील चाऱ्ही कवींनीं अंत्य यमक साधले आहेत, तरी क्वचित् प्रसंगीं त्यांची निर्यमक कविता दृष्टीस पडते. उदारणार्थ, **उद्धवचिद्घनाच्या** सेतुबन्ध काव्यांतील हा श्लोक पहा :—

या महीमंडळीं काम नाहीं दुजें
राममंत्राविना रामचंद्र प्रभू ।
कामरागादिकां पामरां वारिती
रामनामावळी श्यामतेजोनिधि ॥ २७ ॥

मुक्तेश्वरकृत रामायणाच्या युद्ध-कांडांतील हा श्लोक पहा :—

मायास्त्रातें सोडितां मेघनादें
झालीं अंधें मानसें या जनाचीं ।
त्यातें ग्रासूं प्रेरिली ब्रह्मविद्या
योगीवन्द्या जानकीनाथमित्रें ॥ २३० ॥

बारा सूर्यो मीनले एक ठायीं
ज्याच्या घायीं वज्रधारा दुखण्डे ।
तेणें बाणें ताडिलें मेघनादा
केलें छेदा सर्व गात्रांसि तेणें ॥ २३१ ॥

या उद्धृत केलेल्या श्लोकांवरून एक अनुमान असें निघतें कीं, अन्त्ययमक नसल्यास तें पद्यच नव्हे, असें निदान हे कवि तरी मानीत नसत. तसेंच यमक साधण्याकरितां अर्थाची अथवा रसाची हानि होत असल्यास यमकाचा त्याग करण्यास हे कवि सिद्ध होते.

निर्यमक पद्यरचनेचीं एकदोन अपवादात्मक उदाहरणें दाखविलीं, तरी मूळ प्रश्न तसाच राहिला. संस्कृतांत अंत्ययमक अनावश्यक आहेत, हें वर सांगितलेंच. बालभाषेंत गाथासप्तशती, सेतुबन्ध इत्यादि काव्यांतहि अंत्ययमक नाहींत, मग मराठींत कोठून आले ? आपले रसिक मित्र रा. रा. **नरसिंह चिंतामण केळकर** यांनीं यासंबंधाचा एक मार्मिक लेख लिहिला आहे व इतर राष्ट्रीय भाषांची यासंबंधानें स्थिति कशी आहे, याचें सोपपत्तिक विवेचन केलें आहे. त्यांच्या मतें यमकें मूळ हिंदींतून मराठींत आलीं असावीं. हें अनुमान बऱ्याच अंशीं ग्राह्य दिसतें. पण दुसरेंहि एक अनुमान संभवतें. तें हें कीं, संस्कृत साहित्यग्रंथांत श्रव्य म्हणून जो प्रकार वर्णिला आहे, तोच प्रकार आरंभीं मराठींत झाला असावा. एकानें काव्य मुखोद्गत म्हणावें व इतरांनीं तें ऐकावें व अशा प्रकारें तोंडपाठ म्हणून दाखविण्याकरितां केलेल्या काव्यांत कर्णमधुरतेकडे विशेष लक्ष्य पुरविणें अवश्य झाल्यामुळें पादान्तीं श्रोत्यांच्या कानांत चरण घुसत राहून त्या शब्दचमत्कृतीनें श्रवणेन्द्रियाचेद्वारा श्रोत्यांचे मनास आल्हाद व्हावा, अशी योजना करणें भाग पडलें असावें. आम्ही म्हणतों, यास उपोद्बलक असें एक अस्पष्ट पण सूचक प्रमाण सांपडतें; तें हें कीं, **वामन** आणि **मोरोपंत** यांच्यापूर्वींचा बहुतेक काव्यसंग्रह ओंवी आणि अभंग या वृत्तांत आहे व हीं वृत्तें बहुधा एकानें तोंडानें मोठ्यानें म्हणून इतरांनीं ऐकावीं अशीं आहेत. या वृत्तांचे बरोबरच पदांचीहि वाढ होत होती. पदें गाण्याकरितांच रचलेलीं असल्यामुळें त्यांच्या ध्रुवपदांच्या आणि कडव्यांच्या अन्तीं तालसुरांचा एकसमयावच्छेदीं लय होणें आवश्यक असल्यामुळें पदाच्या चरणांप्रमाणें ओवीच्या तीन चरणांस यमकाची योजना होऊं लागली असावी व ह्याच कारणामुळें मोठ्या आणि लहान अभंगांत अनुक्रमें तीन आणि दोन यमक साधण्याचा प्रघात पडला असावा. ओवी आणि मोठा अभंग ह्यांस प्रत्येकीं साडेतीन चरण असल्यामुळें या वृत्तांत तीन यमकांची योजना झाली आणि गणवृत्तास चार चरण असल्याकारणानें पहिला आणि दुसरा चरण यांत एक यमक आणि तिसऱ्या आणि चौथ्या चरणास दुसरा यमक ठेवण्याची प्रवृत्ति पडली असावी. हा आमचा तर्क भ्रांतिमूलक असेल, पण अन्त्य यमकांचेसंबंधानें इंग्रजी वाङ्मयांतील एका

रसिक ग्रन्थकाराच्या उक्तीवरून वरील अनुमानास बरीच बळकटी येते, म्हणून त्या इंग्रजी वाक्याचें अवतरण येथें देतों —

" All poetry may be said to make its primary appeal to the ear; and even the length of the lines must have formed itself to a great degree on the natural conditions of respiration and oral delivery. It is versification regularly accentuated with the terminal rhyme marking each line's end harmoniously that now chiefiy delights the English ear, fixing the measure by a recurrent chime, a beautiful invention that is nevertheless a comparatively recent importation into European Verse." P. 93, English Men of Letters series, Tennyson-by Sir Alfred Lyall.)

भावार्थ : " यच्चयावत् कवितेचें संवेदन प्रथमतः कर्णेन्द्रियासच होतें आणि कवितेच्या प्रत्येक चरणाची लांबीसुद्धां श्वासोच्छ्वास आणि उच्चारणकालीं होणारा प्रयत्न यांवरून निश्चित झाली असावी. नियमित स्वराघातानें आणि पादान्तीं यमकानें युक्त असा पद्यबन्धच सांप्रत इंग्लिश लोकांस विशेष आल्हादकारक वाटतो. अशा पद्यबन्धांत यमकाची पुनरावृत्ति झाल्यामुळें चरणांचें नियमन होतें. ही काव्य-युक्ति युरोपांतील काव्यांत जरी नुकतीच आली आहे, तरी ती सुंदर आहे."

कवितेच्या मूळस्वरूपाची लियालसाहेबांनीं ही जी उपपत्ति सुचविली आहे, ती मान्य केल्यास म्हणजे सर्व काव्याचा श्रवणेन्द्रियच प्रथम विषय मानल्यास यमकाची उपपत्ति समाधानकारक लागते. आणि युरोपियन काव्यसृष्टींत जर यमकाचे सौन्दर्यास प्रस्तुत इतका मान मिळूं लागला आहे, तर कित्येक शतकांच्या रूढीचें अतिक्रमण करून आपण यमकांचा त्याग करण्यास प्रवृत्त व्हावें, याबद्दल कोणास आश्चर्य व विषाद वाटणें साहजिक आहे.

" रसात्मक वाक्य " च काव्य होय, हें काव्याचें लक्षण मानिलें आहे व त्या लक्षणास अनुसरून बाणभट्टाच्या कादंबरीसारख्या पद्यग्रन्थासहि काव्य-सृष्टींत जर साहित्याचार्यांनीं स्थान दिलें आहे, तर पद्यरचना तरी कशास हवी, असा प्रश्न सहज निघण्यासारखा आहे. पण या प्रश्नाचें उत्तर **टेनिसन**

कवीच्या एका हृदयंगम काव्यांत फार सुंदर रीतीनें दिलें आहे. तें येथें वाचकांस सादर करितों.

> "But, for the unquiet heart and brain,
> A use in measured language lies;
> The sad mechanic exercise,
> Like dull narcotics, numbing pain."

भावार्थ: "पण ज्यांचें अतःकरणास व प्रज्ञेन्द्रियास शान्ति नाहीं, त्यांस पद्यरचनेपासून उपयोग होतो. पद्यरचनेंत जो यन्त्रप्राय मानसिक व्यायाम होतो त्यामुळें बधिर करणाऱ्या निद्राजनक औषधीप्रमाणें दुःखसंवेदन नष्ट होतें."

ही कवीनें स्वानुभवाची गोष्ट सांगितली आणि थोडाफार पद्यरचनेचा प्रयत्न ज्यांनीं केला आहे, त्यांस **टेनिसन**च्या या उक्तीची सत्यता पटेल यांत संशय नाहीं. सारांश, पद्यरचना करतांना कवि आपलें दुःख विसरतो, तसाच सहृदय वाचकहि कवीशीं तादात्म्य पावून स्वतःचें दुःख तात्पुरतें तरी विसरून पद्यरचनेच्या सौन्दर्यास अनुरूप कवीचें कौतुकहि करितो. स्वतः कवीची पद्यरचनेच्या व्यवसायांत जितकी एकतानता होते, तितकी वाचकाची काव्यास्वाद घेतांना जरी झाली नाहीं, तरी कवि आणि वाचक हे काव्य-माधुर्याचे थोडे फार वांटेकरी असतातच; आणि अक्षरवृत्तांत गणाची जुळणी जर उभयतांस आल्हाद देते, तर अंत्ययमकाच्या म्हणजे पादान्तीं येणाऱ्या स्वरव्यंजनसमुदायाच्या आवृत्तीमुळें अर्थात् दुधांत साखर घातल्याप्रमाणें पद्याचे माधुर्याचा उत्कर्ष होतो. हें अन्त्ययमक साधणें कवीस कष्टावह असतें; पण तें साधलें म्हणजे त्याच्या सौन्दर्याच्या मानानें वाचकाचे मनास चमत्कृतीचा अनुभव येऊन त्यामुळें तें पद्य मनोवेधक होतें. पण प्रतिभेच्या भरांत सहजगत्या यमक साधलें तर तें प्रसादयुक्त असल्यामुळें जितकें आल्हादकारक वाटतें, तितकेंच "हठानें" ओढून ताणून आणलेल्या पदांच्या जुळणीनें साधलेलें व त्यामुळें क्लिष्ट झालेलें यमक नीरस वाटतें. अशा नीरस काय, पण ग्राम्य यमकांचीं उदाहरणें **वामन** आणि **मोरोपंत** यांच्यासारख्या भाषाप्रभु कवींच्या काव्यांतूनहि अनेक दृष्टीस पडतात व तीं तीं वाचतांना सहृदय वाचकांस विषाद वाटल्यावांचून रहात नाहीं. हें सर्व जरी खरें आहे, तरी दोनशें वर्षांच्या रूढीमुळें पादान्तीं यमकाची अपेक्षा करण्याची जी कानांस

संवय झाली आहे, ती मोडावी कशी ? ही संवय कांहीं वर्षांनीं मोडेल, असें निर्यमकवादी म्हणतील व तें खरेंहि आहे; पण सरास निर्यमक कविता करण्यास अडचणी काय काय आहेत, याविषयीं पोक्त व सांगोपांग विचार केला पाहिजे.

इंग्रजींत आणि संस्कृतांत निर्यमक काव्य आहे, म्हणून तसें काव्य रचण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीं मराठी भाषेचे संप्रदाय व तिची नैसर्गिक प्रवृत्ति कशी आहे, यांकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे. मराठी पद्यांत प्रायः दुसऱ्या चरणांतच विवक्षित अर्थाची पूर्णता होते. तशी ती क्वचित् झालीच नाहीं तरी चौथ्या चरणाचे अंतीं पद्याचा शेवट होऊन अर्थाचीहि परिसमाप्ति व्हावी लागते. पद्याचा अंत होण्याची कान वाट पहातात व त्यांचेबरोबर अर्थाची परिपूर्ति होण्याची मन आकांक्षा करीत असतें. पादान्तीं यमकाची वहिवाट मोडून टाकिल्यास इंग्रजीप्रमाणें दूरान्वित वाक्यें होऊं लागतील व त्यामुळें दूर्बोधता येईल. संस्कृतांत युग्में, कुलकें वगैरे आहेत, तसेच नवीन प्रकार मराठींत रूढ करावे लागतील. दूरान्वयापासून होणारी दूर्बोधता टाळण्याकरितां यमकरचनेस पडणाऱ्या कष्टापेक्षांहि कदाचित् अधिक प्रयास पडूं लागतील व गणवृत्ताच्या पूर्णतेची चार चरणांची जी मर्यादा आहे, तिचें अतिक्रमण करावें लागेल. पद्यरचनेचा थोडाबहुत अनुभव ज्यांस आहे, त्यांस अर्थाचें अनुसन्धान राखून केवळ गणाचीच जुळवाजुळव करितांना प्रयास पडतात; व त्यांत अन्त्ययमक साधण्याची भर पडल्यामुळें अधिकच नियंत्रण झाल्यासारखें वाटणें साहजिकच आहे, तथापि अन्त्ययमकाची पीडा टाळण्याकरितां केलेल्या प्रयत्नामुळें एखादी आगन्तुक उपाधि उत्पन्न होण्याचा संभव आहे. **वाल्मीकि, व्यास** किंवा **कालिदास** आणि **भारवि** यांचेसारखी उज्ज्वल प्रतिभा असेल आणि त्यांचेसारखें भाषेवर प्रभुत्व असेल, इंग्रजींतील **बैरन, शेली, टेनिसन** यांच्यासारखें काव्यरसाच्या दुथडी भरून वाहणाऱ्या प्रवाहाबरोबर वाचकांस सहज ढकलीत नेऊन त्यांस देहभानहि विसरविण्याचें सामर्थ्य ज्या कविपुंगवास असेल, त्यानें निर्यमक काव्य केल्यास कोणीहि वाचक त्यास दोष देण्याचें धाष्टर्य करणार नाहीं. प्रतिभारूप जें काव्यसृष्टीचें भांडवल तें तुटपुंजें असून निरंकुशत्वाची जी कवींस साहित्याचार्यांनीं सवलत दिली आहे, तिचा मात्र भरभरक्कम उपयोग करावयाचा आणि प्रतिभेच

जो अल्पस्वल्प स्फुलिंग असावयाचा, त्याची चमचम दहापांच ओळींतच नाहींशी व्हावयाची, असल्या प्रकारच्या काव्यास वाचकवर्गानें नांवें ठेविलीं तर त्या त्या काव्याच्या जनकांनीं विषाद मानण्याचें कारण नाहीं. प्रसंग विशेषीं १०।५ पद्यें लिहितां आल्यानें कवि होत नाहीं. इंग्लंडांतील व या देशांतीलहि उच्चतम पाठशाळांतील वाङ्मयविषयाचे परीक्षेंत पद्यरचनेचे प्रश्न असतात व पुष्कळ सुशिक्षित गृहस्थांस पांच-चार पद्यें जुळवितां येतात, पण पद्यरचनासामर्थ्य म्हणजे कवित्व नव्हे. घट निर्माण करणारानें त्रिभुवन निर्माण करणाराचा आव घालूं नये. गल्लोगल्लीं कवि निर्माण होण्यासारखी काव्यबीजाची पेरणी विधाता करीत नाहीं, आणि खरा प्रतिभाशाली पुरुष जर कोणी आज असता तर त्याचेसंबंधानें असा वाद उपस्थित झालाच नसता.

असो. पण आपणांस यासंबंधानें अझून थोडासा विचार करावयाचाच आहे. निर्यमक कविता बहुधा श्रव्य नसून पाठ्य म्हणजे एकांतांत बसून वाचावयाची असते. श्रव्य कवितेपासून होणाऱ्या आनंदाचे वांटेकरी बहुधा म्हणून दाखविणारा आणि ऐकणारा असे दोघे असतात. पाठ्य काव्याचा रस विविक्त आणि विश्रान्तस्थलीं प्राप्त होत असतो. निर्यमक काव्याचा प्रवाह सुरू झाला म्हणजे अध्याय, सर्ग, उच्छ्वास, अंक अशा विविध विश्रान्तिस्थलीं वाचकांस विश्रान्ति देऊन तो अलोट वहात जातो. व त्यांतील विविध प्रसंगांस अनुसरून अशा अर्थांच्या व वर्णांच्या चमत्कृति वाचकाचे अंतरंगास गुंगवून टाकितात. इंग्रजींतील पद्यरचनेचे प्रकार संस्कृतांतील पद्यरचनेपेक्षां सामान्यतः सुलभतर आहेत; तथापि त्या भाषेंतहि **टेनिसन** कवीप्रमाणें बहारीची पद्यरचना करणारे फार थोडे आहेत. " Blank verse can be the finest mode of expression in our language " म्हणजे " निर्यमक पद्यरचना ही इंग्रजी भाषेंत अर्थ व्यक्त करण्याची उत्तम रीति आहे " असे उद्गार **टेनिसन** कवीनें एका प्रसंगीं काढिले. परंतु यासंबंधीं **सर आल्फ्रेड लियाल** यांचेहि विचार मनन करण्यासारखे आहेत. सर आल्फ्रेड म्हणतात, " He (Tennyson) had his own secrets of arranging and diversifying it (blank verse) and all the latest composers in this essentially British metre have profited by his lessons. " म्हणजे निर्यमक पद्याची रचना करण्याची किंवा त्या

पद्यरचनेंत वैचित्र्य उत्पन्न करण्याचीं रहस्यें त्याचीं त्यासच माहीत होतीं. निर्यमक पद्यबन्धरूप जें निखालस ब्रिटिश वृत्त आहे, त्या वृत्तांत अलीकडील तशी पद्यरचना करणारांनीं **टेनिसनचे** वळणापासून बोध घेतला आहे. ”

सारांश, पादान्तयमकाचें निर्बंधन तोडल्यापासूनच महाराष्ट्रकाव्यवधू अप्रतिहत स्वैर संचार करूं लागेल, हा मिथ्या भ्रम आहे. अशा प्रकारचा पद्यबंध लोकप्रिय आणि रूढ करण्यास लोकोत्तर प्रतिभासंपन्न कवि उत्पन्न झाला पाहिजे. तशा कवीच्या अचाट बुद्धिसामर्थ्यानें ह्या नवीन पद्यबन्धाची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. सांप्रत केवळ मनोरंजनाकरितां दहावीस ओळी लिहिणारांनीं व त्या ओळी लोकांनीं पाठ कराव्या, किंवा गाव्या, किंवा एकमेकांस म्हणून दाखवाव्या, इतकीच इच्छा बाळगणारांनीं रूढ संप्रदायासच धरून पद्यरचना करावी हें बरें. शास्त्रीय दृष्ट्या निर्यमक पद्य करण्यास जरी प्रत्यवाय नाहीं, तरी तशा तऱ्हेच्या पद्यरचनेस राष्ट्रीय साहित्यांत स्थान प्राप्त करून देण्याचें अद्वितीय बुद्धिवैभव ज्यास परमेश्वरानें दिलें असेल, त्यानेंच तो प्रयत्न करून पहावा. स्नान केल्याशिवाय अन्नग्रहण करण्यास शास्त्रानें रुग्णास परवानगी दिली आहे, या सबबीवर स्नान न करितांच अन्नसेवन करण्याचा हट्ट धरून बसणारास कांहीं फायदा न होतां व्याधि मात्र जडतील. खरा काव्यानुभव नसतां केवळ पद्यरचनाकौशल्यच ज्यांचे अंगीं असेल त्यांनीं शब्दचमत्कृतिरूप अन्त्ययमकाचा अव्हेर न करितां त्यांतच आपलें सामर्थ्य दाखवावें हें बरें.

बंगाली भाषेंत मायकेल मधुसूदन या प्रसिद्ध कवीनें जो नवीन प्रचार सरास सुरू केला, त्याचें अनुकरण आपण करावें असें कित्येकांचें म्हणणें आहे. “ आनंदा”चे संपादक व वाङ्मयाचे कट्टे उपासक आपले सन्मान्य चिटणीस यांनीं “ बंगाली साहित्याविषयीं चार उद्गार ” या नांवाचा जो सुंदर लेख लिहिला आहे त्यांत ते म्हणतात, “ सध्यां बंगाली कवितेची अशी स्थिति आहे कीं, कवींचें यमक, प्रास वगैरे गोष्टींकडे फारसें लक्ष नसतें. अंत्ययमक जुळलें म्हणजे पुरे, कित्येकांचें त्याकडेहि फारसें लक्ष नसतें.” पुढें ते असाहि इषारा देतात कीं, “ अनुकरण सर्वांनींच करावयाचें नसतें. विशेषतः कोणतीहि सुधारणा अनुकरणानें घडवून आणतांना फार सावधगिरी ठेवावी लागते, हें आपण इतर बाबतींत पाहतोंच. अनुकरण करणाराच्या अंगीं सुद्धां पात्रता व

रचनाकौशल्य लागतें. अनुकरणानें कां होईना, पण योग्य काळीं, योग्य स्थळीं व योग्य रीतीनें कार्यनिष्पत्ति करण्याची धमक अंगीं असेल त्यानेंच या गोष्टीला हात घालावा. एकापासून सोनें आणलें व दुसऱ्यापासून रत्नें मिळविलीं. तथापि त्या सुवर्णसूत्रांत रत्नांचा हार गुंफण्याचें चातुर्य नसेल तर रत्नमाला कंठांत धारण करण्याचें भाग्य माणसाला कधीं प्राप्त व्हावयाचें नाहीं, ही गोष्ट साहित्याचे बाबतींत अनुकरण करूं इच्छिणारांनीं लक्षांत ठेविली पाहिजे."

मराठी काव्यरचनेसंबंधानें उपस्थित झालेल्या या वादाचा विचार करितां ओघानेंच काव्याच्या खऱ्या स्वरूपासंबंधानें चार शब्द बोलणें अवश्य आहे. पद्यरचना म्हणजेच काव्य, अशी पुष्कळांची समजूत आहे, पण पद्य हें काव्याचें केवळ शरीर आणि रस हा त्याचा आत्मा होय. शरीर सुंदर आणि अव्यंग असून त्यांत अधिष्ठित होणारा आत्माही जर निरवद्य असेल तर दुधांत साखर पडल्यासारखें होईल. निर्दोष पद्यरचनेंत सरस अर्थाचें गांभीर्य किंवा लालित्य असेल तर उत्तमच, पण केवळ पद्यशुद्धि असून तींत जर सरस अर्थाची निष्पत्ति नसेल तर तें काव्य केवळ चेतनारहित कलेवरच होय. जो खरा प्रतिभावान् कवि असेल त्याला योग्य शब्दाची वाण कधींच पडत नाहीं. यासंबंधानेंहि **राजशेखराची** जी उक्ति नुकतीच माझ्या वाचनांत आली, ती अत्यन्त मार्मिक असल्याकारणानें ती आपल्यापुढें सादर करितों.

न तत् त्र्यक्षः सहस्राक्षोवा यच्चर्मचक्षुषोपि कवयः पश्यान्ति । मतिदर्पणे कवीनां विश्वं प्रति फलति । कथं नु वयं दृश्यामह इति महात्मनामहं पूर्विकयैव शब्दार्थाः पुरो धावन्ति । यत्सिद्धप्रणिधाना योगिनः पश्यान्ति, तत्र वाचा विचरन्ति कवयः ॥

"चर्मचक्षू असूनहि कवि जें पाहूं शकतो तें तीन डोळ्यांच्या महादेवास आणि हजार डोळ्यांच्या इन्द्रासहि दिसत नाहीं. बुद्धिरूप आरशांत कवीपुढें सर्व विश्वाचें प्रतिबिंब पडतें. आम्ही कसे यांच्या दृष्टीस पडूं, अशा चढाओढीनें शब्द व अर्थ कवींच्या दृष्टीपुढें धांवतात. ज्यांना समाधियोग साधला आहे, अशा योग्यांना जें दृष्टीस पडतें, त्यांत कवि आपल्या वाणीनें संचार करीत असतात."

" हा शब्द घालूं कीं तो शब्द घालूं, ही परतंत्रवृत्ति जोंपर्यंत कवीचें आपल्या विचाराशीं तादात्म्य झालें नसतें तोंपर्यंतच त्यास बाधते. एकदां ती निर्विकृत स्थिति प्राप्त झाली म्हणजे कवीची आत्मविचारांना उद्गारित करण्याची शक्ति तीव्रपणें उदित होते. " असें रा. **ना. म. भिडे** यांनीं विविधज्ञानविस्ताराच्या गेल्या सप्टेंबरच्या अंकांत जें विधान केलें आहे तें काव्यकलेच्या मर्माच्या जाणिवेचेंच द्योतक आहे.

शके १२८० चे सुमारास **कंपन** नांवाच्या विजयानगरचे राजानें मदुरा शहर घेतलें. त्याची राणी **गंगादेवी** हिनें आपल्या पतीच्या पराक्रमाचें वर्णन **मधुराविजयम्** नांवाच्या संस्कृत काव्यांत केलें आहे. त्या काव्याच्या पहिल्या सर्गांत **गंगादेवी** म्हणते:—

क्वचिदर्थः क्वचिच्छब्दः क्वचिद्भावः क्वचिद्रसः ।
यत्रैते सन्ति सर्वेपि स निबन्धो न लभ्यते ॥ १–१७ ॥

ही जर संस्कृत काव्याची स्थिति आहे, तर तशी आपल्या मराठीचीहि असणार यांत नवल नाहीं. पण काव्याचा आत्मा जो रस तो ओळखण्याची एक सुलभ युक्ति **विजया** नांवाची एक कवयित्री कर्नाटकांत होऊन गेली, तिनें काव्यरसाचा आश्वाद घेतल्यावर वाचकाची वृत्ति कशी होते, याचें दिग्दर्शन केलें आहे. ती म्हणते:—

कवेरभिप्रायमशब्दगोचरं स्फुरन्तमार्द्रेषु पदेषु केवलम् ।
वदाद्भिरङ्गैः कृतरोमविक्रियैर्जनस्य तूष्णीं भवतोयमञ्जलिः ॥

रसानें ओथंबलेल्या पदांतून शब्दानें व्यक्त न होणारा परंतु केवळ चमचम करणारा कवीचा अभिप्राय अंगावर रोमाञ्च उभे राहिल्यानें गात्रद्वारेंच स्पष्ट होऊन जो वाचक स्तब्ध होतो त्यास माझा अंजली असो !

काव्य वाचल्यावर रोमाञ्चादि सात्त्विक विकारांचा आविर्भाव होऊन वाचकाची निष्टब्ध वृत्ति होईल तर तें खरें काव्य होय, असा **विजयेचा** अभिप्राय होय. ही कसोटी काव्याचे वाचकांनीं लावून पहावी.

गद्यरचनेंत भाषाशैलीच्या दृष्टीनें पहतां वर्तमानपत्रें व मासिकें यांच्या भाषेंत ओज लालित्य, गांभीर्य इत्यादि गुणांची उत्तरोत्तर वृद्धिच होत आहे,

ही अत्यंत संतोषाची गोष्ट आहे. ऐतिहासिक संशोधन हेंहि एक महत्त्वाचें अंग आहे. हें काम ज्या विद्वान् गृहस्थांनीं निःस्वार्थबुद्धीनें आपल्या शिरावर घेतलें आहे, त्यांच्या परिश्रमाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच होणार आहे. त्यांनीं जे महत्त्वाचे कागदपत्र उजेडांत आणले आहेत. त्यांचें संरक्षण व प्रकाशन करणें अवश्य आहे; पण द्रव्याचे अभावीं हीं कामें करणें दुष्कर झालीं आहेत. या कामाकरितांही धनिकांचा आश्रय मागणें अपरिहार्य आहे.

लोकस्थितीचीं निदर्शक म्हणून जीं वाङ्मयाचीं अंगें मानलीं जातात, त्या संबंधानें जे आक्षेप चर्चेचे विषय झाले आहेत, त्यांविषयीं आतां थोडा विचार करूं.

पौराणिक कथाभागांचा आधार घेऊन जीं नाटकें अलीकडे रचलीं आहेत त्यांत पुराणप्रसिद्ध व्यक्तींवर मिथ्यारोप, तर कधीं कधीं त्यांचे स्वभावाचा विपर्यास करण्यांत येत आहे. “ आपल्या कल्पनेप्रमाणें प्रस्तुत स्थितीला अनुरूप असें नाटक लिहिण्यास प्राचीन व्यक्तींचा मनसोक्त उपयोग करणें म्हणजे चवरीची झाडणी करणें, किंवा काष्ठें तोडण्यास असिलतेचा उपयोग करणें यासारखेंच हास्यास्पद आहे. ” असें एक मार्मिक लेखक म्हणणात. पण मला हें केवळ हास्यास्पदच न वाटून दूषणीय वाटतें. पौराणिक व्यक्तींसंबंधानें जो मनांत आदर वसत असतो, तो नष्ट होणें इष्ट नाहीं. अशा प्रकारच्या नाटकांचे प्रयोग रंगभूमीवर होऊं लागले म्हणजे अशा भूमिकांचा अभिनय करणारे नट अतिरेक करून त्या आदरणीय व्यक्तींविषयीं मनांत तिरस्कार उत्पन्न करितात. नाटकाचा प्रयोग करून दाखविणारांपेक्षां अशीं नाटकें रचणारांकडे अशा प्रकारें सदभिरुचीचा घात करण्याबद्दल जबाबदारी येते, असें मला वाटतें.

कादंबऱ्या व मनोरंजक गोष्टी यांतहि अशा प्रकारचे आक्षेप घेण्यासारखीं पुष्कळ स्थळें सांपडतात. सुमारें दोन वर्षांपूर्वीं एका कादंबरींत कुळकर्णी या उपनांवाच्या एका कल्पित व्यक्तीचें चरित्र माझ्या वाचण्यांत आलें. ह्या कुळकर्ण्यांनें न केलेलें असें पातक बहुधा कोणतेंच नसेल. जगांत सज्जन आणि आणि दुर्जनहि आहेतच. दुर्जनांपेक्षां सज्जनांची संख्या अधिक आहे, म्हणूनच समाजाची संघटना स्थिर आहे. इंग्रजी वाङ्मयांत जें Millenium अथवा सुवर्णयुग वर्णिलेलें आहे. तें कधींकाळीं प्राप्त होणार असलें, तर तें

पापाचें समूळ उच्चाटन झाल्याखेरीज होणें शक्य नाहीं. हें सुवर्णयुग प्राप्त व्हावें व मनुष्यजातीस उत्तमोत्तम सुखाचा लाभ व्हावा, अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें हेंच वाङ्मयाचें अंतिम ध्येय असावें, असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें.

हा विषय महत्त्वाचा असल्यामुळें मी दोन्ही म्हणजे अनिष्ट व इष्ट फळें वाङ्मयाचे प्रभावामुळें प्राप्त झाल्याचीं दोन-तीन ऐतिहासिक उदाहरणें देतों. **व्हाल्टेअर** आणि **रूसो**प्रभृति फ्रेंच ग्रंथकारांच्या लेखांमुळें बरीचशी उच्छृंखलता उत्पन्न झाली व फ्रेंच राज्यक्रान्ति म्हणून जो अनर्थापात पुढें घडून आला, तो तिचेंच पर्यवसान होय, असें इतिहासकार म्हणतात. याचे विरुद्ध म्हणजे इष्ट फलप्राप्तीचींहि उदाहरणें इंग्रजी वाङ्मयाचे इतिहासांत नमूद आहेत. एकदां एका दरवडेखोराला देहान्तशिक्षा झाली होती. **डीन स्विफ्ट** नांवाच्या प्रसिद्ध ग्रंथकारानें त्या दरवडेखोराच्या नांवाचें एक बनावट पत्र प्रसिद्ध केलें. " मृत्यूच्या द्वारीं उभा असतां मला कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन तुरुंगावरील अधिकाऱ्यांजवळ आजपर्यंत घातलेल्या सर्व दरवड्यांतील माझ्या साथीदारांचीं नांवें मीं लिहून दिलीं आहेत म्हणून यानंतर त्यांनीं दरोडा घातला असतां सरकार त्यांस पकडून नेईल. " अशा अर्थाचें तें पत्र होतें व मौज ही कीं, या पत्रामुळें त्या भागांत कित्येक वर्षे दरवडे पडण्याचेंहि बंद झालें. ग्रे नामक ऑंग्ल-कवीनें Beggar's Opera नांवाचें एक नाटक लिहिलें. त्या नाटकाचे प्रयोग एका गांवीं सतत ११२ वेळ झाले व चोरांचा सुळसुळाट जेथें होई, तेथें ह्या नाटकाचे प्रयोग करण्याविषयीं पोलिसांकडून त्या नाटकमंडळीस निमंत्रण होत असे, असे दाखले सांपडतात. सारांश, ग्रंथकाराचे हातांतील लेखणी हें वाग्वज्र आहे व तें दुधारी आहे. त्याचा सदुपयोग केला तर जें सत्य, जें सुंदर व जें पवित्र आहे, त्याची जोड होईल. त्याचा दुरुपयोग केला असतां अर्थातच अनिष्ट फळें प्राप्त होतील. अमंगल पदार्थांकडे चर्मचक्षूनें पाहण्यास जर आपणांस किळस वाटते, तर अमंगल व अपवित्र विषयाचें निरीक्षण आपल्या अन्तश्चक्षूंसहि दुःसह वाटलें पाहिजे. वाक् ही ब्रह्म आहे अशी भावना धरून तिची उपासना करावी, असा वाङ्मयाचे उपासक **रा. हरिभाऊ आपटे** यांनीं अकोलें येथील संमेलनांत आपणांस उपदेश केलाच आहे. श्रीसमर्थ **ज्ञानदेवमहाराज** वाङ्मयतपाचें विवरण करितांना म्हणतातः–

तरी लोहाचें आंगतुक । न तोडितांचि कनक ।
केलें जैसें देख । परिसें तेणें ॥
तैसें न दुखवितां सेजे । जावळिया सुख निपजे ।
ऐसें साधुत्व कां देखिजे । बोलणां जिये ॥
पाणी मुदल झाडा जाये । तृण तें प्रसंगेंचि जिये ।
तैसें एका बोलिलें होये । सर्वांहि हित ॥
जोडे अमृताची सुरसरी । तै प्राणांतें अमरकरी ।
स्नानें पाप ताप वारी । गोडी हि दे ॥
तैसा अविवेक हि फिटे । आपुलें अनादित्व भेटे ।
आइकतां रुचि न विटे । पीयूषीं जैसी ॥ ज्ञानदेवी
१७–२१६–२२०–॥

श्रीज्ञानदेवाहून अधिक अधिकारयुक्त वाणी कोठें सांपडणार आहे ?

आतां माझें आजचें भाषण संपविण्यावीं एका अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीची सूचना करणें अवश्य आहे. " सर्वारंभास्तण्डुलाः प्रस्थमूलाः " ही उक्ति सर्वांच्या परिचयाची आहे. साहित्यपरिषदेनें ग्रन्थमालिका तयार करावयाच्या, त्या छापून प्रसिद्ध करावयाच्या, इत्यादि कार्यांस जो द्रव्यनिधि लागणार तो कोठून आणावयाचा हा पहिला व अत्यंत निकडीचा तसाच बिकट प्रश्न आहे. **सरस्वतीचे** उपासक प्रायः हातावर पोट भरणारे आहेत. **लक्ष्मीचें** आणि **सरस्वतीचें** चिरन्तन वैर आहे, हें सुप्रसिद्ध आहे. उभयहि देवतांचे प्रेमास पात्र आमच्या लोकप्रिय व प्रजाहितैषी श्री० महाराज **सयाजीराव गायकवाड** किंवा श्रीमन्महाराज **सवाई तुकोजीराव** यांचेसारखे भाग्यवान् " हरीचे लाल " विरळा. युनिव्हर्सिटीस सार्वभौम सरकाराचा आश्रय असल्यामुळें तिकडे आम्हांपैकीं जे धनिक आहेत, त्यांच्या दानाचा ओंघ सहजच वाहतो. पाश्चात्य देशांत व अमेरिकेंत जे कोट्यधीश व्यापारी आहेत, ते विद्यादानाची महती पूर्णपणें जाणत आहेत. आपल्याइकडेहि थोडेफार धनिक आहेत, पण त्यांच्या दानधर्मांचा प्रवाह विद्येच्या क्षेत्रांत वळविण्याचें महत्कार्य अजून करावयाचेंच आहे, व तेंहि साहित्यभक्तांनींच करावयाचें आहे. हें राष्ट्रीय हिताचें कार्य साधावयास जनतेस प्रेरणा करण्याचें वाक्–सामर्थ्य पूर्वपुण्याईनेंच प्राप्त होत असतें. परलोकवासी **न्यायमूर्ति रानडे** व मी एक दिवस

बोलत बसलों असतां **श्रीज्ञानेश्वर** आणि **श्रीतुकाराम** यांच्या पालख्यांचा विषय निघाला, त्या वेळेस ते म्हणाले : " पालख्यांचे बरोबर जे हजारों वारकरी ऊन्हतान, पाऊसपाणी, उपासतापास इत्यादि हालअपेष्टा भोगीत पंढरीस जातात ते उगीच जात नाहींत. **श्रीज्ञानेश्वर** आणि **श्रीतुकोबाराय** बोलले आणि हें वारकरी मंडळ हाललें, त्यांना स्फुरण आलें. तुम्ही आम्ही बोलतों, व्याख्यानें देतों, पण आपलें कोणी ऐकतें काय? पांचपांचशें वर्षें होऊन गेलीं तरी त्या साधूंच्या शब्दांतील चेतना करण्याचें सामर्थ्य होतें तसेंच आहे! याचेंच नांव पुण्याई!" अशा तऱ्हेचें पण दुसऱ्या दिशेचें अलीकडील उदाहरण परलो० नामदार **गोखल्यांचें** आहे. सर्व्हंट्स् आफ् इंडिया सोसायटीकरितां वर्गणी गोळा करितांना ते एक दिवस मजकडे आले. तेव्हां याकामीं लोकांची अनुकूलता मिळविणें फार दुर्घट आहे, असें मीं त्यांस सांगितलें. पण एकदोन वर्षांचें अवधींतच हजारों रुपये किमतीचें सदन, बहुमूल्य पुस्तकसंग्रह व मेंबरांचे उपयोगाकरितां टुमदार, हवाशीर व सोयींची वसतिगृहें निर्माण करून या संस्थेला शाश्वती येण्याचीहि व्यवस्था त्यांनीं केली व आपल पूज्यगुरूंचें स्मारक म्हणून "**रानडे इन्स्टिटयूट**" स्थापिली. या कामाकरितां जे लक्षावधि रुपये लागले ते कोठून आले? मुंबईतील लक्षाधीश सावकारांनीं **गोपाळरावजींच्या** मधुर वाणीनें मोहित होऊन पांच-पांच मिनिटांचे बैठकींत पांच-पांच दहा-दहा हजारांचे चेक सही करून दिले. त्यांच्या जिभेंत जी जादू, जी मोहनी भरली होती, ती कोणा तरुण उत्साही साहित्यभक्तास प्राप्त असेल व तो साहित्यपरिषदेकरितां द्रव्यानिधि गोळा करण्याचें काम शिरावर घेईल तर या पवित्र कार्यांत परमेश्वरहि त्यास साहाय्य करील.

आपण जो आज माझा बहुमान केला व शांत चित्तानें माझे चार वेडेवांकडे शब्द ऐकून घेतले, त्याबद्दल पुनः एकवार आभार मानून श्रीज्ञानेश्वराचेच प्रासादिक शब्दांनीं आपली रजा घेतों:—

तुम्हीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला ।
तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थूं काई ॥ १–६५

* * *

(महाराष्ट्र साहित्य समेलेन, इंदूर (१९१७), मधील अध्यक्षीय भाषण.)

" बाष्पाञ्जलि "

राजारामा ! किति तरि तुझ्या आठवूं सद्गुणांतें ?
कैसा आतां तुजसि विसरूं ? सान्तवूं वा मनातें ?।
जी माझा तूं सुत म्हणुनियां धन्यता मानियेली
मच्छोकातें द्विगुण करण्या हेतु ती आज झाली !

माझ्या पोटीं तव जनन हें मानिलें भाग्य मोठें
तूं गेल्यानें मजसि तितुकें तेंच दुर्भाग्य वाटे।
होतें जाणें नियत तरि बा कासया ते अमूप
केले बाळा ! गुण, हृदयिं जे टोंचती शल्यरूप ?

ज्येष्ठें " अप्पा " * म्हणुनि तुजला कौतुकें बाहियेलें
भावंडांनीं वडिलिंहि तुझें नांव तें रूढ केलें ।
धुंडाळीती घरभर मुलें त्याच नांवें तुला बा !
तूं गेल्यानें अहह ! घरची लोपली सर्व शोभा !

छायाचित्रा तव बघुनिया नाचुनी बोट दावी
" अप्पा ! अप्पा ! " म्हणुनि टकळी धाकुटा छोटु‡ लावी ॥
तो वर्षांचा, प्रतिदिनिं तुला आठवी बाळ सान !
काळाच्या ह्या अदय कृतिचा सर्वथा तो अजाण !

[१]

शोकावेगें प्रथम दिवशीं लोपलें देहभान
गेली कोठें न मज कळली भूक किंवा तहान ।
बाल्याचें त्वच्चरित सगळें मानसीं आठवोनी
उच्चाक्रंदें रडत बसलों धाय मी मोकलोनी.

होती तेव्हां स्तिमित पडली शोकपर्यस्तगात्री
त्वन्माता ती स्मरुनि तुजला अश्रु ढाळीत नेत्रीं ।
होती माझ्याहुनिहि जरि ती ग्रासिली घोर शोकें
उच्चाक्रंदा मम परिसुनी बोलली ती विवेकें :

---

* वडील बंधु ‡ वडील बंधूचा मुलगा.

" आक्रोशानें परत तुमचा काय येईल राजा ?
नाहीं का हो विकल तुमच्यासारखा जीव माझा ? ।
जें माशानें स्वमुखिं गिळिलें मागुती तें न येतें
ठावें सारें म्हणुनि नलगे सांगणें आपणांतें.

केल्या ऐसें रुदन इकडे, बाळकें हीं अजाण
टाहो मोठा करितिल, तयां धीर देईल कोण ? ।
तींही शोकें जणुं दडपलीं बापडीं दीनवाणीं
त्यांना कांहीं तरि समजवा दुःखशोका गिळोनी ! "

[२]

भार्येचें हें वच परिसुनी धैर्य-गांभीर्य-युक्त
शोकावेगा गिळुनि, करुनी चित्त यत्नें प्रशांत ।
डोळे दोन्ही पुसुनि बसलों स्तब्ध जो मी क्षणार्ध
तों तो झाला विफल अवघा चित्तसंक्षोभरोध.

कासाराचें जल उफळतां पात्रिं जेव्हां न मावे
तेव्हां वेगें अगतिकाचि तें बांध फोडूनि धांवे ।
तैसा क्षोभें वर उफळतां शोकरूपी उमाळा
डोळे माझे फिरुनि भरले, कंठ दाटूनि आला.

सोसेनासा प्रसभ मज तो तीव्र आवेग झाला
तेव्हां चित्तीं मजसि गमलें मार्ग द्यावा तयाला ।
भार्येला मी म्हणुनि वदलों कीं,–" सुता आठवोनी
पद्यांमध्यें रुदित सगळें ठेवितों सांठवोनी. "

[३]

राजारामाभिधाचि चुलते तासगांवांत होते
त्यांच्या नांवें विदित नगरद्वार* अद्यापि तेथें ।
त्यांच्या ठायीं अतिशय मनीं प्रीति होती म्हणोनी
मत्तातानें तुजसि अभिधा ती दिली आदरोनी

* तासगांव. जिल्हा सातारा येथें भिलवडी वेशीला राजारामपंत आगाशांची वेस म्हणतात.

तूं दीर्घायू निज सुचरितें, विक्रमी भाग्यशाली
आपद्ग्रस्तां सकल सुजनां थोर होशील वाली !
सांभाळोनी स्वकुलबिरुदा कीर्ति संपादशील
ऐशी आशा तयिं धरिलि ती जाहली आज फोल !

" राजाबा " या प्रिय मधुरशा शब्दिं मारूनि हांक
प्रेमें अंकीं बसवुनि तयीं लाड केले अनेक ।
चौदा* वर्षे विरह घडला, जाहला तो असह्य
नेलें त्यांनीं जवळ म्हणुनी हांक मारूनि काय ?

आजोबांचा बहुतचि लळा त्यामुळें एक काळीं
गांवीं गेल्यावर निघुनि ते, खंति त्वां फार केली ।
आला तेव्हां ज्वर, मग पुढें गांठिलें गोवरानें
झालों आम्ही तधि उभयतां ग्रस्त चिंताज्वरानें.

त्या वेळीं जी बसलि कडकी तीमुळें फार रोगी
झाली बाळा ! कृश तनु तुझी, वृत्ति तेंवी विरागी ।
वैद्यें जेव्हां तुजसि कथिलें कीं करंजी कुपथ्य
त्वां टाकोनी दिधलि, धरिला तोच निर्धार नित्य.

[४]

जैशी बुद्धि प्रकटचि तुझी वानियेली कुशाग्र
तैसें शील स्तवितिच, तुझें नांव घेती समग्र ।
अव्यंगत्वें तुजसि घडितां सर्वथा पक्षपात
देवें केला, म्हणुनि मज हा जाहला वज्रघात !

भावंडांना प्रियतम तसा सर्वही आप्तवर्गा
सौजन्याचा निधि म्हणविलें, धन्य केलें निसर्गा ।
अन्तर्यामांतिल गुण जसे पावले बा विकासा
तूं स्वीयांना, इतरहि जनां वाटलासी हवासा !

* आजोबा १९०१ सालीं निवर्तले.

तूं संतोषी, स्थविर यतिसा संयमी, नित्ययोगी
विद्याभ्यासीं सतत रमलें चित्त, केव्हां न भोगीं ।
योगभ्रंशें तव जनन कीं संचिता भोगण्यातें
झालें किंवा धवल करण्या कीर्तिनें मत्कुलातें ?

झाला नाहीं तुजसि कधिंही स्पर्श बाळा ! रजाचा
सत्त्वोद्रेकें विमल हृदयीं पाड कैंचा तमाचा ? ।
स्वाध्यायाची विरति न कधीं, केवळ प्राणधारी
बा ! गेलासि त्रिदिविं म्हणुनी योगिसा ब्रह्मचारी !

वाग्ब्रह्माची अविरत तुला ती घडावी उपास्ती
यासाठीं त्वां विषयिं धरिली सर्वथा कीं विरक्ती ! ।
स्वाध्यायाच्या नियत पठना मात्र तूं देहधारी
या अर्थींही खचित सखया ! नैष्ठिक ब्रह्मचारी !

[५]

आले कन्या कितिक तुजला द्यावया लोक थोर
केला यत्नें बहुविध मला त्यांहि निर्बन्ध फार ।
दुःखामध्यें सुखचि गमतें, मागणी ती तयांची
मानायातें मति न धजली, हे कृपा श्रीहरीची !

केला बाळा जरिहि असता शैशवीं त्वद्विवाह
माझ्या नेत्रांतिल न खळता अश्रुधाराप्रवाह ।
त्वां प्रेमानें वरिलि दयिता नोवरी जी सुकीर्ती
मागें राही, परि मम मना तीच दे आज शान्ती !

[६]

प्राशीं, देवद्विजगुरुपदीं, ठेविली योग्य निष्ठा
त्या योगानें मिळविलि तुवां अल्पकालीं प्रतिष्ठा ।
दुःशब्दाचा चुकुनिहि मुखें नाहिं उच्चार झाला
थारा कैंचा तव शुचि मनीं दुष्ट दुर्वासनेला ?

स्वाध्यायानें स्वमन करुनी शुद्ध, शांत प्रसन्न
शुश्रूषेनें गुरुजन तसे वृद्धही तोषवून ।
गाढ प्रेमें सुखवुनि निजां सोदरां स्वावतार-
कार्यान्तीं त्वां गमन वरिलें स्वर्गसौख्या अपार !

उत्कर्षाचें स्वमनिं धरुनी ध्येय धर्मानुरोधें
चारित्र्यातें अनघ खचिलें पूर्ण तत्त्वावबोधें ।
पुत्र, भ्राता, गणुं तुजसि वा छात्र वा मित्र तें तें
केलें **राजा !** समुचितगुणीं श्लाघ्य सर्वांशिं नातें.

[७]

आहे लोकीं प्रथित बहु जी " दक्षिणा-पाठशाला "
जेथें विद्यागम मम, तसा मामकांचाहि झाला ।
आम्हांपेक्षां अधिक यश बा ! तेथ त्वां जोडियेलें
स्वोत्कर्षानें अमरचि तुवां आपुलें नांव केलें !

तेथें आतां स्मरुनि तुजला त्वद्‌गुरू धन्यवाद
जो देती तो परिसुनि पुन्हां वाढतो मद्विषाद ।
वाटे शिष्यस्थितिंतहि जरी जोडिली हे सुकीर्ती
प्रौढावस्थागमिं पसरती कां न सर्वां दिगन्तीं ?

जो केला त्वां प्रतन-नगरें* दाखवाया नकाशा
त्वद्भाग्याची उपजलि तथा पाहतां थोर आशा ।
काव्यादर्शा† करुनि दिधली जी तुवां श्लोकसूची.
ठेली माझ्याजवळ तुझिया स्मारिका जीविताची.

माघग्रन्थीं सहज सुचला श्लोक शोधावयातें
जातां, पोटीं बघुनि तुझिया शीसका-लेखनीतें ।
त्वत्पाठाची ठळक जरि ती खूण ही शल्य घाली
आले अश्रू स्वकरिं पुसुनी ठेविला ग्रंथ खालीं !

* दशकुमारचरितांतील स्थळें दाखविण्याकरितां प्राचीन हिंदुस्थानाचा नकाशा.
† दाण्डिकृत काव्यादर्शातील उदाहरणार्थ दिलेल्या श्लोकांची वर्णानुक्रमानें सूची.

कोठें कांहीं तरि मज तुझा सांपडे हस्तलेख
येई पोटीं भडभडुनियां, नष्ट होई विवेक ।
होतां ऐशी सतत तुझिया टोंचणी सद्गुणांची
चित्तीं माझ्या क्षणभर तरी विस्मृती होय कैंची ?

[८]

पुष्पोद्यानीं नवकिसलयोद्भिन्न पर्णी विलीन
चांपेयाचा* लुसलुशित तो कोरक स्वर्णवर्ण ।
होतो काळें विकसित ऋतु प्राप्त होतां वसन्त
आमोदानें दरवळुनि दे सर्वही आसमंत.

तैसा तूंही मृदुकुसुमसा शैशवीं, गौरवर्ण
शालिन्यानें गुण सकलही झांकुनी फार लीन ।
झाला जेव्हां तव हि सखया ! यौवनायुःप्रवेश
तेव्हां सारे गुण विकसले, दाटला तत्सुवास.

[९]

थोडी कोठें कळि उमलली, पूर्णतेला सुगन्ध
नाहीं आला, परिणत तसा नाहिं झाला मरन्द ।
जों आरंभीं भ्रमर भंवतीं गोड गुंजारवातें
तों तें जाई सुमचि सुकुनी तीक्ष्णशीताभिघातें !

तैशी **राजा !** न तव तनुची वाढही पूर्ण झाली
अल्पायुष्यें तव गुणतती अंतरीं गूढ ठेली ।
कोठें थोडा तव पसरला जो जनीं धन्यवाद
तों त्या जागीं तव विरहिं बा दाटला तीक्ष्ण खेद !

वृक्षस्कन्धीं फळ लटकलें, तेथ पाडास आलें,
वर्णें, स्वादें मधुर खुललें, पाहतां नेत्र धाले ।
एकाएकीं गळुनि पडतां होतसे खिन्न माळी
तैसा मीही अवचित तुझ्या या वियोगें अकाळीं !

---

* चांफा.

[१०]

नाहीं बाळा ! तुजसि दुखणें चार वर्षांत आलें,
वाटे बाळग्रह उलटले, विघ्न कांहीं न ठेलें ।
एकाएकीं जणु उगविण्या सूड फारा दिसांचा
काळानें हा निपट खुडिला मोड आशातरूचा !

तूं झालासि व्यथित, अगदंकार मोठे प्रवीण
आले, केले बहुविध तयीं औषधोपाय तीक्ष्ण ।
त्यांच्या पायां पडुनि वरिली म्यां त्वदारोग्यभिक्षा
मद्‌दुर्दैवें परि नच तयां जाहली बा ! परीक्षा !

प्राग्जन्मींचीं विविध असती संचितीं घोर पापें
तीं तीं येथें प्रगटुनि नरा घेरिती रोगरूपें ।
तेथें धन्वन्तरि उतरुनी काय बेटा करील ?
प्राक्कर्मांचें कटु फल कसें स्वोपचारें हरील ?

आयुष्याची बळकट जरी ईश ठेवील दोरी
येतो रुग्णा गुण जपतपें, तेंवि वैद्योपचारीं ।
दोरी मूळांतुनि जरि तुटे, यत्न ते मानवाचे
होती सारे विफल, न कळे गूढही जीविताचें !

गंडे, दोरे, नवस, जपही, ग्रंथपारायणादी
केले सारे तव न हरली व्याधि, माझी न आधी ।
केले धांवे, परि न करुणा देवपादास आली
कांहीं केल्या नियति न टळे, बुद्धि हे ठाम झाली !

वाटे केले फुकटचि तुझे हाल, तापोपशान्ती
नाहीं झाली, म्हणुनि हृदया वाटते फार खंती ।
अज्ञानानें तुजसि दिधले कष्ट, ते सोशियेले
सत्त्वोत्कर्षा निमुट सगळें सोसुनी व्यक्त केलें !

हा सत्त्वाचा समुदय तुवां वीस वर्षांत केला ?–
पूर्वीच्या कीं सुचरितबलें जन्मतः सिद्ध ठेला ?
जो रुग्णाचा तिरसटपणा सर्व लोकांसि ठावा
तोही नाहीं तुजसि शिवला शान्तिचा काय ठेवा ?

[११]

" गेला गेला ! " परिसुनि तुझ्या बन्धुच्या क्रन्दितातें
पोटीं माझ्या भरलि धडकी कीं जणूं वज्रघातें ।
कानीं माझ्या अझुनि घुमति दुष्ट ते शब्द दोन
जातो त्यांचें स्मरण घडतां जीव हा घाबरून.

पञ्चत्वाच्या क्षणिंहि न तुझी लोपली लेश शुद्धी
होती नित्यापरि विशद ती तीक्ष्ण निश्चिन्त बुद्धी ।
" आई " ऐसें वदुनिच तिच्या स्कन्धि ठेवूनि माथा
अक्लेशानें त्यजुनि तनु ही भेटलासी कृतान्ता !

" आई " ऐसें वदुनि सखया घेतला कीं निरोप !
मायापाशा निवटुनि तुवां लाविला ज्ञानदीप ! ।
आसक्ती जी तव शिशुपणापासुनी ग्रन्थि होती
तीही एक क्षणिं निरसुनी पूर्ण केली विरक्ती !

शय्यास्थान त्यजुनि पहिलें उत्तरासंमुखीन
देहत्यागक्षण जवळ तो पाततां त्वां उठून ।
केली दृष्टी अभिमुख तुवां आपुली सूर्यपादीं
कीं गांठावा निजपथ तथा श्रेणिनें अर्चिरादी.

कीं सूर्यांच्या करिं बघुनि वा विश्व हें हर्षपूर्ण
व्हावें स्वान्तःकरण हि सुखें स्वर्गयानीं प्रसन्न ! ।
किंवा नोहे तुजसि पुढती जन्म येथें म्हणून
या लोकातें क्षण निरखिलें काय डोळे भरून !

बाळा ! कां त्या दिनिं बघितली वाट साडेदहाची ?
कीं जन्माचा समय अथवा वेळ भोगक्षयाची ? ।
होता ठावा तुजसि अथवा आपुला अन्तकाळ ?
किंवा इच्छामरणि म्हणुनी साधिली तीच वेळ ?

सुट्टी होतां मधुर-वचनीं स्नेहधर्मानुरूप
त्वां मित्रांचा, मजसि कथिती घेतला वा ! निरोप ।
नाहीं होणें पुनरपि पुढें भेट ऐसें तयांतें
त्वां निक्षोनी म्हणति कथिलें ! ज्ञात कां मृत्यु तूंतें ?

[१२]

झोंपीं गेल्यापरिस गमली सौम्य, गंभीर मुद्रा
कोणालाही नकळत कशी लागली कालनिद्रा ।
काळाचे जे अनुचर तुझा प्राण आले हराया
वाटे तेही न तव धजले कान्तिभङ्गा कराया !

मृत्यूनेंही न तव हरिलें शान्तिचें सौम्य तेज
मर्त्याकारें कवण मुनिचा तूं जणूं पुण्यपुञ्ज ।
पुण्यात्मे ते पडति सरतां पुण्य, तारास्वरूपें
तारारूपें त्रिदिविं चढसी तूंहि पुण्यप्रतापें !

बा शुभ्रांशो ! सुखकर तुझें तेज कोठूनि आलें ?
पुण्यात्म्याचें धवल यश कीं चोरुनी सांचवीलें ! ।
माझ्या राजासमच मजला भाससी सौम्यमूर्ती
त्याच्या तेजा हरुनिच तुवां केलि कीं आत्मपूर्ती !

[१३]

तत्त्वज्ञानें भयचि मृतिचें जिंकिलें ज्या नरानें
वाटे त्यानें मरणाचि असे मारिलें योगियानें ।
मातेच्या त्वां बघुनि नयनीं अश्रुधाराप्रणाली
आश्वासोनी तिजशि, पुशिली ती स्वयें अंतकाळीं.

" भूतग्रामीं नच मम पुन्हां संग केव्हां घडावा
चौऱ्यांशीचा नच मज पुन्हां व्यर्थ फेरा पडावा।
जे प्राग्जन्मीं असतिल विभो ! वंचिले घोर रोग
ते ह्या देहा घडवुंत सुखें आपुले दुःखभोग.

" राहो कांहीं ऋण न पाहिलें येथ फेडावयाचें
जावो सारें तुटुनि हृदयीं मूळही वासनांचें ! ।
पांचां भूतीं मिसळुनि पुन्हां स्थूल हा देह जावो !
हा जीवात्मा तव पदिं विभो ! पूर्ण विश्रान्ति पावो ! "

गांगेयानें शरशयनिं ही प्रार्थना शुद्धभावें
केली,-जीचें मनन करितां मृत्युभीती दुरावे !
ती त्वां केली, म्हणुनिच तुझ्या अंतरीं अंतकाळीं
देहत्यागीं तळमळ जिवा लागुनी नाहिं ठेली !

गीतार्थांचे बहुविध तुवां ग्रंथ जे मेळवीले
वाटे त्यांचें स्वमनिं सगळें सार त्वां बिंबवीलें।
निष्कामत्वें निज उचित तें सर्व कर्तव्य केलें
त्या योगानें तव मन सख्या ! वासनाशून्य झालें !

[१४]

आत्मज्योतीरहित शव तें काष्ठलोष्ठांसमान
आत्मस्वीय त्यजुनि फिरती मागुती खिन्न दीन।
आत्म्यासंगें सहचर सदा धर्म जाई परत्र
हें जाणोनी सतत सखया ! सेविला धर्म मात्र !

बाळा ! स्वर्गीं उदगयनिं तूं यान केलें मुहूर्तीं
वैशाखाची तिथि बघुनियां शुक्लपक्षीं चतुर्थी।
नोहे शंका तुजसि उघडा मार्ग तो अर्चिरादी
शुद्धब्रह्मीं लय नियत बा जेथ नोहे उपाधी.

मात्रास्पर्शें सुख असुख वा, इन्द्रियांचा प्रमाथ
क्षुत्तृष्णेचा इतर अथवा ताप ठावा न जेथ।
नाहीं कांहीं कलह, भव वा, शोक वा, जेथ रोग
नाहीं जेथें प्रणयकृतही केधवां विप्रयोग.

पिण्डश्राद्धीं वसुगाणिं तुझा जाहलासे प्रवेश
त्यायोगें बा! नियत तुजला अन्तरिक्षीं निवास।
तेथोनीही तव गमन तें रुद्रलोकीं घडेल
आदित्याच्या भुवनिं मग तूं तेथुनी पोंचशील!

ऐशा लोकीं सुखमय तुझा सूक्ष्मदेहीं निवास
पारंपर्यें पुढति नियत ब्रह्मलोकीं प्रवेश।
अन्तीं मायावरण सुटतां प्रौढपुण्यप्रतापी
कैवल्याच्या वरिशिल सुखा सच्चिदानन्दरूपीं!

[१५]

आत्मा शुद्ध स्फटिक फलकासारखा जन्मकाळीं
पापीं त्याच्यावर नव पुटें बैसती कुद्द काळीं।
त्वां तीं बाळा! सकळ पहिल्या संचिता क्षाळियेलें
संपादोनी अधिक सुकृता जन्मसाफल्य केलें.

जन्मा आल्यावर निरसण्या प्राक्तना संचितातें
त्याशीं धैर्यें झगडुनि तुवां दाविलें पौरुषातें।
अन्तीं त्यानें तुजसि हरितां दाविली आत्मशक्ती
त्वांही लोकीं स्थिर उरविली पौरुषाची सुकीर्ती!

प्राक्कर्मांचा क्षय सुचरितें अल्पकाळांत केला
त्वन्मोक्षाचा पुढति सगळा मोकळा मार्ग झाला।
पुण्यें केला जवळचि तुवां ईश या भावनेनें
धैर्यें लोटूं दिवस उरले ईश्वराच्या कृपेनें।

[१६]

हर्षे सुस्वागत दिविषदीं योग्य केलें असेल
त्यांच्या संगें अमित सुख तूं सर्वदा भोगिशील।
या लोकीची स्मृति जरि तुला जाहली तेथ बाळा !
आम्हांसाठीं विनवि करुणासागरा विश्वपाळा !

या लोकीची स्थिति सकलही दृश्य त्या लिङ्गदेहीं
ऐसें कोणी कथिति, जरि तें सत्य वा ! तूंचि पाहीं ।
त्वद्विश्लेषें किति तरि असूं सर्वही ग्रस्त शोकीं
नाहीं त्याची अहह ! अमरां कल्पना काय नाकीं ?

ज्ञात्यांनाही यमनियमनें नावरे पुत्रशोक
ऐसें आले कथित सगळे आजपर्यंत लोक ।
आलें आतां मज अनुभवा, सर्व हें विश्व शून्य
भासे, वाटे सकलहि जनीं एकटा मी अधन्य !

ब्रह्मज्ञाना कथित इतरां आजपर्यंत आलों
घाला माझ्यावरिच पडतां सर्वथा चूर झालों !।
जें म्यां लोकांप्रति शिकविलें तें क्षणीं नष्ट झालें !
गात्रें सारीं शिथिल पडलीं, धैर्य माझें गळालें !

अन्तश्चक्षूंपुढति उमटे कल्पनाचित्र जें तें
रेखाटाया पुसटहि मला शब्दरंगीं न येतें ।
चिच्छक्तीनें अविकलपणें केवल ग्राह्य ऐसें
शब्दें हीनें विशद करितां पामरां येइ कैसें ?

ऐशी आहे स्थिति, तरि फुटे शोकरूपी उमाळा
तो चिद्वृत्ती करपवि जसा वृक्ष, वेली उन्हाळा ।
त्यातें श्लोकीं प्रकट करितां, जोडितां पद्यबन्ध
मात्राप्रासादिक जुळवितां होय चित्ता विनोद !

शब्दीं शब्दीं नकळत किती लोटले अश्रु नेत्रीं
ठायीं ठायीं अचुक गळले शुभ्र ते लेखपत्रीं ।
थेंबीं थेंबीं पुसट सगळीं अक्षरें काजळीनें
अन्तर्यामांतिल कलुषता हारिली लेखनीनें !

[१७]

ब्रह्माण्डातें रवि उजळितो स्वीय दिव्य प्रकाशें
त्वां चारित्र्यें कुल उजळिलें, थोर सत्कीर्तिशेषें ।
जातां अस्ता द्युमणि, तिमिरें व्याप्त हो विश्व सारें
त्वद्विश्लेषें मम हृदयही व्याप्त शोकान्धकारें.

प्राणापेक्षां प्रियकर गमे पुत्र मातापित्यांला
होतां पुत्रा असुख लवही क्लेश त्यांच्या जिवाला ।
येतां त्यातें निधन, मग त्या काय शोका पुसावें !
दुर्दैवी जे मजसम तयां मात्र तें होय ठावें !

आवेगानें हृदय उडतें, कंठ दाटूनि येतो
हाले नासापुट, अधरही, श्वास कोंडूनि जातो ।
वाटे जाती असुहि गळुनी अश्रुधाराप्रवाहीं
सीमा कोठें अवनितलिं या पुत्रशोकास नाहीं !

मूर्ती डोळ्यांपुढति दिसते, तेथुनी ती न हाले
रात्रीं सुद्धां शयनिं पडतां झांकती हे न डोळे ।
वारंवार स्मरण घडतें, आठवे त्वच्चरित्र
शोकाक्रन्दें हृदय फुटतां तोहि वाटे पवित्र.

' अंगादंगाद् ' अवयव, घडे जन्म हृत्कोटरांत
साक्षात् आत्मा सुत म्हणविला राहुं वर्षें शतान्त ।
ऐसे बोले श्रुति, न कवणा होय तैशी प्रतीती
वांचो माझा सुत ' शत-शरद् ' ही न कोणास आर्ती ?

[१८]

जन्मप्राप्ती प्रथम पितरां स्नेहरज्जूंत गोंवी
बाल्याचें तें चरित पुढती प्रीतिला त्या दुणावी।
जो जातो तो प्रतिदिन करी घट्ट त्या प्रेमपाशा
अन्योन्याच्या ग्रथित करितों एकमेकीं सुखाशा!

मैत्री होते सहज पडतां पावलें सात संगें
नोहे कांहीं नवल तनयप्रीतिनें चित्त रंगे!
अन्नीं, पानीं, शयनिं, वसनीं संगती नित्य ज्यांचीं
मायापाशें नवल न जरी बद्ध चित्तें तयांचीं!

या प्रीतीनें गवसण असे घातली या प्रपंचा
प्रेमापोटीं निपजत असे साहचर्याभिवांच्छा।
प्रेमाभावीं न जनहृदयीं दुःखशोकास थारा
मायापाशीं परि गवसिला हा जगाचा पसारा.

" या प्रेमाचा उगमचि मनीं केधवां होउं नेदी
आसक्तीचें दृढपरिकरें सर्वथा मूळ छेदी"।
ऐसा " ज्ञाते " कवण करिती गोडसा बुद्धिवाद
वाटे मातें परि सकळ हा सृष्टधर्मा विरोध!

ही वैराग्यस्थिति मज गमे घातुक स्नेहमूला
संसारातें, असुलभ तशी प्राकृता पामराला।
जातां प्रेमास्पदजन, जरी अश्रुंनीं कंठ दाटे
प्रेमाभावाहुनि मजसि हा शोकही श्रेय वाटे.

होणें नाहीं अतुल कनकें प्रीतिचें योग्य मोल
नोहे प्रीति, तरि मग सुखें अन्य होतात फोल!
" प्रीति लाभाविण कळवळा " तथ्य हे साधु-वाणी[1]
प्रीतिच्छेदाहुनि अधिक ती कोणती अन्य हानी?

---

१ ' कळवळ्याची जाती '। करी लाभाविणें प्रीति। —तुकाराम

[१९]

जागोजागीं ग्रहिं पसरलीं पुस्तकें सानमोठीं
मद्धैर्यातें जणुं बघति तीं लावुनीयां कसोटी ।
जी ती वस्तू मजसि तुझिया दे स्मृती जीविताची
कैसी यावी जडपणिं तिला कल्पना मत्स्थितीची ?

जेऊं, खाऊं, प्रतिदिवसिच्या वावरूं कामधामीं
जेथें तेथें घडिंघडिं तुझी पाहूं जागा रिकामी !
ऐसी दृष्टी सहज पडतां स्मारकें जागजागीं
कैसे आम्ही विसरूं तुजला पुण्यवन्ता अभागी ?

[२०]

निद्रा, मृत्यू उभय गणिती अल्पअंशीं समान
भावंडें तीं म्हणविति, परी एकमेकां अजाण ।
निद्रावस्थानुभव असतां मृत्यु तेथें न येई
मृत्युग्राहीं पळभर तया स्थानिं निद्रा न राही !

ही मृत्यूची बहिण असतां नोळखी त्यास निद्रा
या योगानें मजसि तव ती दाखवी हास्यमुद्रा !
तूं गेल्याचें तिजसि न खपे स्वप्नही, या गुणानें
वाटे निद्रा प्रिय मज तुझ्या दुर्लभा सन्निधानें !

[२१]

स्वच्छंदानें सदनिं लिहितां, वाचितां वेळ गेला
गेला तोही मज न कळला, चित्तिं संतोष ठेला ।
आतां मात्र स्वग्रहिं अथवा दूर रानावनांत
कोठें केव्हां मज न करमे, सौख्य नोहे कशांत !

वस्तू जातां तळमळ मना नित्य लागूनि राही
ती आहे तों परिचयवशें तींत वाटे न कांहीं ।
तैसें **राजा** ! अनवहित जें त्वद्गुणी चित्त होतें
आतां त्यातें स्मरुनि शतधा तेंच फाटूनि जातें !

जें दृष्टीला कधिं न पडतें राहि त्याचें न भान
ऐसें लोकीं म्हणति परि तें भासतें अप्रमाण ।
राजा ! आतां न इह भुवनीं तूं जरी विद्यमान
आहे रात्रंदिवसहि तुझें मन्मनीं सन्निधान !

झाली मातें तुजविण सुता ! सर्व सृष्टी उदास
जेथें तेथें तुजसि बघतों, होतसे वा हताश !
तोंडीं येतें नकळत तुझें, लाडक्या ! गोड नाम !
भासे डोळ्यांपुढति मुख तें गोड मत्सौख्यधाम !

[२२]

जों बाळा ! त्वां प्रकृतिगुण ते आपुले व्यक्त केले
तों भाग्याच्या शिखरिं मजला वाटलें बैसवीलें ।
आतां वाटे मज ढकलिलें उंच शैलावरून
आशारूपी सुखद तनुच्या अस्थि गेल्या चुरून !

या डोळ्यांनीं सुचिर तुझिया वैभवातें बघावें !
या कानांनीं श्रवण तुझिया लौकिकाचें करावें !
या चित्तानें तव गुणगणीं नित्य संहृष्ट व्हावें !
मद्वंशाचें प्रतनु यश तें त्वत्प्रकाशें स्फुरावें !

ऐसें मोठें स्वरचित मनोराज्य तें ध्वस्त झालें
वाळूमध्यें सदन रचिलें तें जलें भग्न केलें !
मर्त्यत्वातें मनिं विसरलों, घेरिलों सान्द्र मोहें !
आतां चित्तीं उमज पडला, क्रंदुनी अर्थ नोहे !

[२३]

एकान्ताचा क्षणहि मजला हो किती दुःखदायी
याची अन्या लवभर कधीं कल्पना शक्य नाहीं ।
गेलें माझें सुख, हरपलें भाग्य या भावनेनें
राजारामा ! तुजविण जिणें सर्व कंटाळवाणें.

देतां येता जरि लव तुला अंश मज्जीविताचा
आनंदानें तुजसि असता म्यां दिला, तो फुकाचा
झालों आतां गलित, पिकलों, जाउं केव्हां पडोनी
नोहे आम्हां भुवनिं उरलें कार्य कांहीं जगोनी.

देऊं केलें मजसि असतें राज्य कोणीं नृपानें
राजारामा! तुजसि नसता म्यां दिला, देव जाणे।
या काळाच्या पुढति थकले सर्व माझे उपाय
केला दैवें तुजसि हरितां मर्मि माझ्याहि घाय!

ठावें साऱ्या त्रिभुवनिं मला प्रेय ऐसें न कांहीं
ओंवाळुनी तुजवरुनि जें टाकितों मी न तें ही!
जी झाली ती नच भरुनि ये हानि आतां कशानें
ईशेच्छेच्या विण न दुसरें मी समाधान जाणें.

[२४]

जेथें तेथें मजसह तुझी येतसे रम्य मूर्ती!
निद्रा भ्रूतें जड करि, परी लेश नोहे सुषुप्ती।
या लोकींची क्षणिक वसती सर्वथा हा विवेक
चित्तीं येतांक्षणिंच वितळे, नावरे पोटिं शोक.

बाले किल्ल्यावर वसतसे आत्मराजा विविक्तीं
बुद्धी तैसें मनहि करिती दुर्गरक्षा सभोंतीं।*
जेव्हां पूर्वस्मृति बहुजवें तोफ डागी धडाडा
तेव्हां बुद्धी, मन लटपटे, दुर्ग डोले कडाडा.

[२५]

अन्तर्यामीं सखल खचला, ऊतुं जाया मिळेना
चाले मोठी खळबळ, परी ताप कोणा दिसेना।
पारा जैसा पुटिं निमुटसा अग्नितापास साही
तैसें माझें मन तळतळे घोर शोकाग्निदाहीं!

*"इन्द्रियाणि मनो बुद्धिः" ... भगवद्गीता ३–४०

माझ्या शोकस्थितिविषयिंची कल्पना कीं प्रभूला
नाहीं झाली ह्मणुनि करुणा नाहिं आली तयाला?।
बाळा! तर्कें तुजसिहि तिचें जाहलें नानुमान
या योगें त्वां त्वरित वरिलें स्वर्गलोकीं प्रयाण.

[२६]

मी एकान्तीं बसुनि रडतों पर्वतीच्या तळ्यांत
तेथें सुद्धां क्षणभर न हो शान्ति माझ्या मनांत।
ठेली माझ्या मनिं विरसतां तीच कीं त्वद्वियोगीं
तोयाभावें मजसि गमतें बिंबली त्या तडागीं!

स्वच्छंदानें वनिं विहरतां, झोंप घेतां पडोनी
किंवा दांतीं हराळि खुडितां, चाखितां थंड पाणी।
व्याधें पोटीं शर रुतविला त्यासि घेऊनि रंकू
धांवे, तैसे दिन ढकलितों वाहुनी शोकशंकू.

[२७]

त्वत्प्रेमातें स्मरुनि लिहिली एकही ओळ नाहीं
ऐसा जातां दिवस चुकल्यासारखा भास होई।
वाटे गेला दिवसचि फुका टाळितां नित्यकर्मा
आलस्यानें जणुं विसरलों स्वीयवात्सल्यधर्मा.

जातो कैसातरि दिवस तो कामकाजांत माझा
संलापीं, वा पठनिं, अथवा लेखकर्मांत **राजा**!
रात्रौ शय्येवर पहुडतां तूं, तुझी गोष्ट कांहीं
शोकाग्नीतें ज्वलित न करी होइना हें कधींही!

येतां कोणी जन मजकडे बा! समाचार घ्याया
झालें कैसें तुजसि दुखणें लागती हें पुसाया।
नामोच्चारा तव परिसतां अश्रु डोळ्यांत येती
वाटे मातें उगिच खपली काढुनी दुःख देती!

कोणी जातां दुरुनि तुझियासारखा राजमार्गीं
न्याहाळूनी उगिच बघतों त्याजला मी अभागी !
माझा राजा पुनरपि मला एविं भेटेल काय
वेडी ऐसी मम मनिं उठे कल्पना हाय ! हाय !

[२८]

पर्जन्यानें जलमय कधीं सर्व भूभाग होई
कुल्या, वापी, सम, विषम वा भेद कोठें न राही।
आतां शोकें किमपि नुरलें हास्य, गेला विनोद
सर्वां भावां निरसुनि मनीं राहिलासे विषाद.

चित्तीं माझ्या सततचि तुझा ध्यास हा लागलासे
वेडें झालें मम मन तुझ्या सद्गुणाच्या विकासें।
त्वद्विश्लेषीं स्मृतिहि तुझिया सद्गुणाची मनातें
लागे माझ्या मधुर, न कधीं तृप्ति चित्तांत होते !

शीतें सांठे हिम गिरिगुहागव्हरीं सान्द्र जैसें
प्रीतीचेही थरचि जमती अन्तरङ्गांत तैसे।
ग्रीष्मीं जैसें हिम वितळतें चण्डसूर्यप्रतापें
अन्तस्तापें थर वितळती प्रीतिचे अश्रुरूपें.

शोकाब्धीला प्रबल भरती येतसे वेळुवेळां
नाहीं ठावी इतरजलधीसारखी त्यास वेला।
केव्हां ही त्वत्स्मृतिवश गळूं लागती बाष्पबिन्दू
चित्तक्षोभा करिशि सखया तूं कलानाथ इन्दू

जेव्हां तेव्हां स्मरण घडतां जीव हा होय गोळा
वाटे केव्हां तव मधुर तें रूप पाहीन डोळां।
स्वर्गीं गेल्यावर जरि तुझी भेट बाळा ! घडेल
या नेत्राचें मज गमतसें पारणें बा ! फिटेल !

[२९]

त्वन्मातेची कितितरि सुता, जाहलीसे निराशा !
कैसा तीच्या अहह ! हिसका बैसला प्रेमपाशा !
प्रेमें केलें जतन तुजला लाडक्या ! वीस वर्षें !
त्याचें आतां अहह ! करि ती पारणें अश्रुवर्षें !

माझा **राजा** अझुनि न असे जाहला फार मोठा
बी. ए. होतां उपवर वधू शोधितां काय तोटा ?
तो विद्येनें खचितचि असे या कुलाचा प्रदीप
साजे ऐशी करित बघुनी नोवरी सुस्वरूप.

काळें मोठा उचित मिळतां त्याजला रोजगार
तो ज्येष्ठाचा करिल हलका थोर संसार-भार !
प्रेमें त्याचा बघुनि सगळा थाटलेला प्रपंच
डोळे माझे निवतिल जगीं धन्य होईन साच.

ऐशा तीच्या कितीतरि मनीं लालसा रूढ झाल्या !
त्वांही बाळा ! स्वगुणसलिलें सर्व त्या पोषियेल्या !
एकाएकीं अदय विधिनें पार निर्मूळ केल्या !
आतां तिच्या हृदयिं गरता मात्र ठेवूनि गेल्या !

[३०]

प्राक्कर्माचें फळ म्हणुनि जो पातला दुःखभोग ।
तो धैर्यानें सहन करिते माउली त्वद्वियोग ।
नाक्रंदे, ना ढळढळ रडे, स्तंभिते शोकभार
मर्मीं त्याचें जहर भिनलें तें दिसे आरपार !

तें ओष्ठांचें स्फुरण, कुटिल भ्रूहि संकोचलेली
तें नासेचें धमन, वदनीं कान्ति कोमेजलेली ।
अन्तर्यामांतिल गहन तो शोक या इंगितांनीं
मूकत्वानें प्रकटाचि तिचा तो न तैसा वदोनी !

[३१]

केव्हां सुद्धां शिशुपणिं तुवां हट्ट नाहींच केला !
कोणी रागें तुजसि भरलें नाठवें माउलीला !
भावंडांशीं कलह अथवा केधवांही अबोला
नाहीं केला ! प्रकृति-गुण हा जन्मतःसिद्ध ठेला !
आहे अन्या अभिलषित जें सौख्य कर्मेन्द्रियांचें
आधीं भासे अमृत, विष जें मागुतीं होय साचें ।
आसक्ती त्या सुखिं तुजसि वा ! सर्वथाही नकोशी
होती भू ही त्यजिलि म्हणुनी यौवनाच्या प्रवेशीं.

[३२]

वेळोवेळीं करुनि बहु त्वां दाविलें कौतुकातें
नाहीं आम्हांकडुन घडलें चीज त्याचें कसें तें !
उंची वस्त्रें नच तुज मनासारिखीं म्यां कधींही
किंवा खाऊ तुजसि दिधला, हें मना आज खाई.
त्वद्बन्धूनें तुजसि दिधला रेशमी जो रुमाल
तो त्वां बाळा ! प्रथम दिवशीं घातला एकवेळ !
नाहीं त्याची फिरुनि घडिही मोडली, वेष साधा
केला, यावी जणुं न कधिंही योगसिद्धींत बाधा !

[३३]

प्रेमें **राजा** ! प्रतिकृति तुझी रंगवी बन्धुराया
येती अश्रू नयनिं, न मला देति ते ती पहाया ।
पद्यें कोणी सरस रचिती त्वद्गुणा आठवोनी
तीही त्यांची नच परिसवे तीक्ष्ण शोकार्तवाणी.
जो येई तो सण मम मना दुःख अत्यन्त देतो
जो शोकाग्नी हृदयिं धुमसे तो पुन्हां पेट घेतो ।
झाल्या गेल्या फिरुनि कधिंही ज्या न होणार गोष्टी
त्या त्या चित्तीं स्मरुनि मम हा होतसे जीव कष्टी.

खिन्ना चित्ता असुखकर ती होय अभ्यङ्गवार्ता
मिष्टान्नातें सजलनयनीं खंति येई पाहातां ।
अन्यातेंही बघुनि नटतां वाटतो पोटिं हेवा
जातो कष्टें दिवस, रुचलें तेंच देवाधिदेवा !

[३४]

पद्यांमध्यें न सजति अशा शुष्क सामान्य गोष्टी
व्हावी कैंची अनुचित कथाभागिं सौरस्य-पुष्टी ?
ऐसें कोणी पुसतिल, सुखें यापरी ते पुसोत !
वैदग्ध्याचे रसिक निधडे तेचि लोकीं असोत !

चित्तीं माझ्या खळबळ किती चालते सर्वकाळ
ती मी सांगे, मग मजकडे येतसे काय बोल ?
शोकक्षोभव्यथितजनहृद्भावनाचित्र ज्यांतें
वाटे दोषास्पद, करितसे मी नमस्कार त्यांतें !

सांगावें बा ! तुज सकलही आपुल्या हृद्गतातें
या हेतूनें करिं धरुनियां बैसलों लेखनीतें ।
जें जें माझ्या मनिं उमटतें, सांठवीं पत्रिं तें तें
नोहे चिन्ता, बरळ रसिका मान्य होते न होते !

[३५]

नेलें बाळा ! तुजसि न यमें शैशवीं गोंवरानें
जेव्हां आशा तुजविषयिंची सोडिली माउलीनें ।
वेणुग्रामीं* तुज खिळियलें जेधवां बा ! क्षयानें
तेव्हां सुद्धां मजवर कृपा-छत्र केलें हरीनें.

होतें विद्यार्जन न पुरतें जाहलें तेधवां कीं ?
किंवा होती प्रगति न तुझी जाहली कां विवेकीं ?
योग्याभ्यासें न तव सुतिचा सिद्ध संभार झाला ?
त्या योगें त्वां मनुजभुवनीं वास बा ! लांबवीला ?

---

* बेळगांव.

अन्योन्याचें-ऋण न फिटलें, भावि उत्कर्ष किंवा
व्हायाचा त्या अवसर नसे लाभला काय तेव्हां ?
वांटा माझा अशुभ उरला शोकरूपी म्हणोनी
तो फेडाया इह जगिं तुवां वास केला फिरोनी.

जें जें केलें शुभ अशुभ वा म्यां तुला पूर्वदेहीं
त्याचें त्याचें फळ मज दिलें, संगती अन्य नाहीं।
होतें घेणें मजकडुनि तें घेतलें, शोकरूप
व्याजासुद्धां, सकळ फळलें येथ माझेंचि पाप !

प्राक्कर्मांचा जरिच नसता योग कां त्वां अकालीं
स्वर्गीं केलें गमन, मज ही बाष्पबिन्दुप्रणाली ?
नोहे आतां मज इह समाश्वासनोपाय अन्य
मी शोकीं, तूं सुचरितबलें स्वर्गलोकांत धन्य !

माझ्या पोटीं जनन वरिलें त्वांहि देवास बुद्धया
साधायातें गुणसमुदया इष्ट संस्कारसाध्या !
माझ्या पापें मजसि घडला शोक, इष्टार्थसिद्धी
झाली, **राजा** ! तुजसि, सगळा योग कर्मानुबन्धी !

[३६]

नेलें बाळा ! तुजसि तुझिया जन्मलग्नग्रहांनीं
ऐशा बोलें बघति करण्या मत्समाधान कोणी।
आयुर्दाय ग्रह नियमिती हें जरी सत्य होय
प्राग्जन्मीचें सुकृत दुरित व्यर्थ तें सर्व काय ?

हें तों नोहे परि मज गमे भावि अर्था, अनर्था
स्वस्वस्थानें ग्रह सुचविती, ईश तो एक कर्ता।
जैसें सामुद्रिक करपदोत्कीर्णरेखादिकांनीं
दावी भाग्यस्थिति तशिच ते सांगिजे कीं ग्रहांनीं

[३७]

सांगे कोणी स्मरण न तुम्हीं गेलियाचें करावें
होतां तेंही अगतिकपणें तत्क्षणीं आवरावें ।
हें तों सारें मजसि समजे, प्रीतिची ही कसोशी
हो ऐशी कीं, क्षणहि न तिची होय पोटीं असोशी !

झाला नाहीं मजसि तुजसा पुत्र ऐसें म्हणावें
त्वच्चारित्र्या निजमनिं सुख-स्वप्नसें म्यां गणावें ।
ऐसें कोणीं मजसि म्हणती, शक्य व्हावें कसें तें
जों मी नाहीं मनिं विसरलों आपही आपणांतें ?

[३८]

नाहीं, नाहीं, स्मृति तव मनीं होउं देणार नाहीं !
पूर्वाण्हीं हा नियम करितों तो फुका सर्व जाई ।
येई जैसा दिवस चढुनी, ढासळे नेम तैसा
चन्द्रालोकें जलनिधिस हो क्षोभ जैसा अपैसा.

रात्रीं शय्येवर पहुडतां मूर्ति डोळ्यांसमोर
ठाके सारा मग लटपटे मानसींचा विचार ।
" अप्पा " ऐसा अचुक निघतो शब्द तोंडीं अपाप !
येई तैसा कुशिस वळतां, कोठची गाढ झोंप ?

स्वप्नामध्यें उठुनि तुझिया खोलिच्या दारिं जातों
कानोसा मी क्षणभर उभा राहुनि तेथ घेतों ।
झोंपीं गेला असशिल असा भास चित्तांत होतो
जागा होतां झणि फिरुनियां पेट शोकाग्नि घेतो.

[३९]

शोकावेगें न कळत असे वाढली पद्यमाला
एकामागें सहज दुसरा श्लोक बाहेर आला ।
जैसे एकावर सुम दुजें भक्त देवास वाही
तैशीं पद्यें स्मृतितनुवरी वाहतों मी तुझ्या हीं.

कांहींबाहीं लिहित सुटलों, नार्थ वा शब्द गोड
कोणी कांहीं म्हणुत, मजला त्वत्स्मृतीचीच चाड।
देवा अर्पी भजक सुमनें मोगरा वा कण्हेर
भावीं गोडी धरुनि तुज हा अर्पितों पद्यहार.

किंवा, जैशी वरिवरि मुके माउली तान्हुल्याचे
घेई प्रेमें, परि न पुरती कोड तीच्या मनींचें।
तैसें आतां बहु परि तुला लाडक्या! आळवावें
ऐसें वाटे, स्मरुनि तुजला चित्त हें रंजवावें!

[४०]

होतें ठावें जननदिवसापासुनि पुण्यशील,
माझ्याआधीं परि पितृगणीं जाउनी बैसशील।
हें तों ध्यानीं नच कधि मनीं स्वप्निंही नाहिं आलें
मद्दुर्दैवें उलट सगळें तेंच बा आज झालें!

माझ्यामागें मजसिच तुवां आत्मजें पिंड द्यावे
देतां म्यां ते उलट तुजला कैंवि बाळा रुचावे!
नामोच्चारें उदक तुजला तर्पणीं नित्य देतां
कैंची तृप्ती तुजसि? रुचलें कासया हें कृतान्ता?

कोठें अंगा जखम पडतां ती बुजाया उपाय
योजी सारा जन, परि तसा काळिजालागिं घाय।
होतां, ठेवी जखम उघडी, दे तयाचीच साक्ष
प्रत्यब्दीं जें स्मरुनि पितरां योजिती श्राद्धपक्ष.

शोकीं ऐसा व्यतिकर असे प्रीतिचा, कीं तियेच्या
आधिक्यानें प्रियचि गमती यातना त्या मनाच्या!
ती प्रेमाची ठळकहि छटा शोभवी शोकवर्णा
कीं तद्योगें करुण रस ही शोभते त्यास संज्ञा.

[४१]

आतां भेटी मजसि घडणें शक्य बा ! लिङ्गदेहीं
ऐसें कोणी मजसि कथिती, तींत ही विघ्न राही।
होतां भेटी असुख तुजला प्राप्त होईल ऐशी
आहे शंका तरि मज तुझी भेट वाटे नकोशी !

नाहीं गेला, परि जडतनू सोडुनी मुक्त झाला !
आहे आम्हाजवळिच जरी लिङ्गदेहांत ठेला !।
ऐसें कोणी ह्मणति, परि तो राहिला काय गेला !
दोन्ही आम्हां समचि जरि या नेत्रिं पाहूं न त्याला !

[४२]

जन्मा आल्यावर जरि नरें नाद्भुतोद्योग केला
लोकीं सारे जन म्हणति कीं बापुडा व्यर्थ मेला !
आयुर्दाया जरि नच दिलें बुद्धिची तीक्ष्णताही !
सारी होई विफल, मतिचें चिन्ह राही न कांहीं !

या दृष्टीनें विषम गमतें अल्पजीवित्व लोकीं
जाणारातें अफल करुनी बान्धवां पाडि शोकीं।
ऐसा कैसा अनय उघडा ईश्वराच्या कृतींत !
कोडें मोठें नच उकलण्या शक्ति मानुष्यधींत.

अन्तर्यामीं मम उठतसे जेधवां हा विचार
होई तेव्हां प्रबळ पहिला शोक तो दुर्निवार।
वाटे देवें मजवरि अशी आग कां पाखडीली
आधीं ताटीं अमृत भरुनी मृत्तिका कालवीली ?

[४३]

वेडे आम्हां करुनि तुजला काय देवा ! मिळालें ?
देतां आलें तुजसि नसतें दुःख कां बा निराळें ?
किंवा शिक्षा उचित दिसली नान्य कांहीं म्हणोनी
आनंदाचा अहह ! अमुचा कंद नेला खुडोनी ?

म्यां आरोप **प्रभु**पदिं परी कासया हा करावा?
ज्याचा त्यानें स्वविषय पुन्हां घेउनी कां न जावा?
माझ्या सौख्यास्तव मज दिला वीस वर्षें म्हणोनी
कां तें त्याचें अचल पहिलें स्वत्व गेलें उडोनी?

[४४]

अल्पायूंतें स्थिति कवण ती प्राप्त होई परत्र
ठावें नाहीं; खचित पितरां क्लेश अत्यंत मात्र!
कीं पुत्राचें निधन पितरां नेमिली घोर शिक्षा
लोकेशानें, तरि मग तया मागतो हीच भिक्षा!

" बा **विश्वेशा**! सकल तुजला ठावकें पापपुण्य
नेमी पाप्यां तनय-निधनावांचुनी दण्ड अन्य!"
वेळोवेळीं हृदयिं सलतें शल्य जें कीं स्मृतीचें
त्यापेक्षां तें मरण बरवें वाटतें एकदांचें!

श्रेय प्रेय प्रसभ मनुजा प्रेरिती भिन्न मार्गें
श्रेयाची ती मनुजहृदयीं वासना नित्य वागे
त्या दोघांचें अति तुमुल तें युद्ध चित्तांत चाले!
द्वैधीभावें उभयहि तटीं घेतसे चित्त झोले!

चित्तोन्माथी सतत, परि तो शोकही **प्रेय** वाटे
यत्नें त्याचें दमन जरि तें सर्वथा **श्रेय** मोठें।
प्रेमावेशा पुढति न मन स्थैर्य ठाके बिचारें
प्रेयाचा हो विजय, सरतें **श्रेय** तें पाठमोरें

शोकीं सुद्धां नकळत नरा होतसे लाभ मोठा
ज्ञानैश्वर्यादिक मद जिरे, मोडतो सर्व ताठा।
होते भक्तिप्रवण इतर व्याप सांडूनि बुद्धी
शोकाग्नीनें खळमळ जळे, होतसे चित्तशुद्धी.

या मर्त्यांच्या भुवनिं अमुचा जन्म झाला, तरी ही
सूक्ष्माकारीं स्थिर अमरता-बीज आत्म्यांत राही।
शोकीं त्याची पदिं पदिं मनीं स्पष्ट जाणीव होते
देवापायीं दृढ भरवसा तीच चित्तास देते.

[४५]

कोणी मातें म्हणति " गमतें दुःख देण्या तुम्हांला
प्राग्जन्मींचा रिपुचि तुमच्या पोटिं जन्मास आला "।
त्वत्प्रेमाचा अनुभव जया लाभला अल्पकाळ
साहे त्याच्या श्रवणिं न अशा कल्पनेचा विटाळ!

होतें विद्याव्यसन तुज तें पूर्ण येथें कराया
येशी जन्मा पुनरपि, जनीं नांवही गाजवाया।
ऐसें कोणी मजसि कथिती, अन्यथा तेंहि वाटे!
गेले कार्य त्यजुनि अपुरें काय ना मोठमोठे?

आहे मर्त्यां अभिलषित ती सर्वथा कार्यसिद्धी,
ईशाला तों अभिमत असे एकटी चित्तशुद्धी।
ती झाल्या तो नच बघतसे कार्य झालें, न झालें,
त्याचें साध्यावरि, न लवही साधनीं लक्ष्य ठेलें

[४६]

माझ्याहूनी अधिक असुखी शेंकडों या जगांत
ऐशी आहे स्थिति, बघुनि हें चित्त व्हावें प्रशान्त।
या शोकाचा प्रसभ परि ये वेग ऐसा प्रचण्ड
कीं तर्कास्त्रें न पळभरही होय त्यामाजि खण्ड

विद्युत्पातें कितिक मरती, बाष्पयानापघातें
नौकाभङ्गें कवण अथवा शैलश्रृंगप्रपातें।
ऐसे मृत्यू अचुक घडती तेथ दैवास दोष;
रोगोपाया करुनिहि कसा जाहलों मी हताश!

[४७]

नैरन्तर्यें सुखाचि कवणा प्राप्त हो या जगांत ?
किंवा दुःखें सतत कवणा सारखीं ग्रासितात ?
जाई खालीं वरति अथवा चालती धांव जैशी
राहे भाग्यस्थिति इह जना उच्च वा नीच तैशी ।
कालाब्धीच्या उदरिं, निपजे रत्न दैदीप्यमान
तें ठेवाया पुट न गवसे त्याजवांचूनि आन ।
ऐसें आहे अवितथ, तरी तेंहि डोळे भरूनी
पाहूं नेदी, परि अचुक कां ईश ने तें हरूनी ।

[४८]

बापापेक्षां म्हणति मुलगा जाहला हा सवाई
या शब्दांनीं मजसि गमली हीच माझी बढाई ।
शिष्याहातीं परिभव नसे गोड कोणा गुरूला ?
पुत्रोत्कर्षे मनिं न कवणा धन्यता हो पित्याला ?
आगाशांचे कुलिं कवणही मूर्ख होणार नाहीं
एकाहूनी वरचढ दुजा दावितो कारवाई ।
ऐसा झाला अनुचित मला गर्व मोठा म्हणोनी
नेला माझा अनुपम हिरा धर्मराजें हरोनी ।

[४९]

ही दुःखाची वसति अवघी, ही नव्हे पुण्यभूमी
ह्या बुद्धीनें गमन वरिलें शीघ्र कां सौख्यधामीं ?
जों जों आला अनुभव तुला दुर्जनांचे कृतीचा
तों तों कीं रे ! मन उबगलें वीट आला जगाचा ?
डामेडाचा* प्रिय सुत रणीं पावला पञ्चतेला
" मीं फ्रान्सातें समरविजयी वीर तो अर्पियेला " ।
डामेडोक्ती परिसुनि अशी, वाटतें वाढवोनी
झालों मीही सुरगणिं तुला धन्य कीं बैसवोनी.

* डार्डेनेल्सच्या रणक्षेत्रावरील फ्रेंच सेनापति.

[५०]

ग्रीष्मीं केव्हां अवचित उठे हास्तिसा कृष्ण मेघ
त्याच्याभोंतीं रजतमयशी भासते सूक्ष्म रेघ ।
वृष्टी झाल्यावर करितसे ती तमाचा विनाश
मोदें सारें भुवन भरितो भास्कराचा प्रकाश.
तैसें दुःखापुढति सुखही ईश्वरी योजनेंत
राहे ऐसा अनुभव किती प्राज्ञही वर्णितात ।
हें तों आश्वासन नच जरी दुःखिता मानसातें
नेणों आम्ही जडमति खऱ्या ईश्वरी योजनेतें !

[५१]

या लोकींची स्मृतिहि तुजला दिव्य लोकीं नसल
तेथें ही त्वन्मति तव नव्या कार्यभारीं रमेल ।
वारंवार स्मरुनि तुजला कासया शीणवावें ?
माझ्या सौख्यास्तव तव सुखाआड कां व्यर्थ यावें ?
तूं सत्त्वाचा निधिच बरवा योशि अन्यत्र कामा
नेलें ईशें इह जनिं तुला पाहुनी पूर्णकामा ।
किंवा नोहे तव मजसवें शक्य उत्थान* भावी
त्वज्जीवात्म्यास्तव मम न ही हानि बा ! म्यां गणावी !

[५२]

मर्मीं घाता करुनि विधिनें सर्वथा हीन, दीन
केलें मातें, तळमळ उणी ती न अन्या कथून ।
दुःखें मित्रा कथुनि हलकीं होति ऐशी जनोक्ती
येतें आतां मजसि उलटी या प्रसंगीं प्रतीती !
माझ्या दुःखें व्यथित रडती मित्र माझे अनेक
बाष्पव्याजें सदय मम ते वांटुनी घेति दुःख
ही तों त्यांची अति सुजनता, ते खरे सत्त्वशील
अन्यार्तीनें द्रवति हृदयीं ते मनाचे मवाळ !

---

* उत्थान–Evolution.

पुष्पांपेक्षां मृदुल कविचें चित्त होतें म्हणोनी
गेला दुःखें कळवळुनि तो क्रौंचघाता बघूनी।
दुःखें त्याच्या हृदयिं फुटला शापरूपी उमाळा।
तो काव्याचा उदय पहिला श्लोकरूपेंच झाला !

[५३]

जो दुःखानें दशम दिवशीं पिण्ड म्यां अर्पियेला
काकें हां ! हां ! म्हणत म्हणतां तो क्षणामाजि नेला।
ठावें मातें न तव सखया ! गुंतली येथ आशा
माझ्या चित्तांतूनि सरक जा ! तोडिं या प्रेमपाशा !

माझ्याभोंतीं सतत घिरट्या कासया घालितोसी ?
बाळा ! माझ्या अभिमुख असा कां उभा राहतोसी ?
तूं पाषाणीं, स्थळिं, जळिं, तसा काष्ठिं कां भासतोसी,
ब्रह्मीं होतां लय भुवन कीं व्यापुनी राहिलासी ?

जा ! जा ! बाळा ! नच खवाळिं या तीक्ष्ण शोकार्तचित्ता !
दे विश्रान्ति क्षणभर तरी ! थांबुं दे अश्रुपाता !
तूं गेलासि त्यजुनि सखया दुःखरूपी जगातें !
कां बा ! मागें वळुनि बघसी ? आठवे काय तूतें ?

[५४]

या संसारीं सुख जवभरी दुःख अद्रीसमान
हें संतांचें वच अनुभवें आज आलें कळून।
झालें **राजा** ! सुख मज तुझ्या गोडशा अल्प संगें
त्याच्याहूनी शतपट मला दुःख बा त्वद्वियोगें.

देवाज्ञेनें मरण घडतें हाच तत्त्वार्थ गूढ
'देवाज्ञा' हें पद सुचवितें, शब्द तो योगरूढ
त्रैलोक्याच्या प्रभुस रुचलें, त्यापुढें काय चाले ?
भोगावें तें निमुटपणिं जें भोगणें प्राप्त झालें.

[५५]

गेले कोठें नरपति बली पांडवांच्या समान ?
विद्यावाचस्पति इतरही शिल्पविद्यानिधान ?
जन्मा आले, नवल करुनी दाविलें आणि गेले !
तत्साक्षित्वें अचल धरणिक्षेत्र हें एक ठेलें !
ही मर्त्यांची वसति, मरणापासुनी मुक्त कोण ?
आहे मृत्यु प्रकृतिच असें सांगती जे सुजाण ।
कोणीसुद्धां न मनिं करिती मृत्युराहित्यकांक्षा
दीर्घायूची सहजचि असे जन्मल्यातें अपेक्षा.

[५६]

मालाघातें* अजनृपवधू स्वर्गवासास गेली
ईशेच्छेनें अमृतहि विषप्राय हो प्राप्तकाळीं ।
बाळा ! आलें तुजसि दुखणें ईश्वरेच्छानुरोधें
ईशेच्छेचें विकल हृदया ! घे समाधान साधें !

[५७]

आहे मृत्यु प्रकृति, विकृती जीवित स्वल्पसुद्धां
लाभावाती मनिं समजणें याच तत्त्वावबोधा ।
शिष्यद्वारा करुनि गुरुनें सान्तवीला नृपाल[१]
मानूं तोही सुखचि घडला संग जो अल्पकाल !
दुष्टें दैवें अदय मतिनें हारुनी प्रेमपात्र
अन्तर्यामीं तिखट जहरी रोविलें शल्य मात्र ।
ऐसा चित्तीं भ्रम बहु, परी नेणतों कीं, मृताला
मृत्युद्वारा सुघड पुढचा मुक्तिचा मार्ग झाला !
शोकावेगें न अनुमृतिही दे पुनः संगमातें !
प्राणत्यागी मृतहि मिळती स्वस्वयोग्यस्थितीतें ।
ऐसी आहे स्थिति जर खरी कासया मीं शिणावें ?
राजारामा ! रडरडुनिही कां तुला शीणवावें ?

---

* इंदुमती. १ अज.

[५८]

ठावें लोकीं घटहि घडतां जाति कांहीं फुटोनी,
कांहीं चाकावर, किति अव्यामाजि जाती उलोनी।
तैसे जाती शिशु, तरुण वा वृद्धही प्रातकाल
ब्रह्माण्डाच्या घटनिं गमतो तो विधाता कुलाल.

[५९]

हा जीवात्मा वसति करितो कोणत्या इन्द्रियांत
आहे वायु, द्रव, इतर वा मूर्त, ऐसा पदार्थ।
येई कैसा जननिं, मरणीं जाय कैसा निघोनी
ये राखाया चिर, सतत वा काय तो औषधांनीं?

हें जीवाचें गहन सुटलें नाहिं कोणास कोडें
तें सोडाया बुध न खपले आजपर्यंत थोडे।
जन्मप्राप्ती, मरण, उभयें होतसे मर्त्य मूढ.
वाटे केले सुदृढ पट हे झांकण्या सृष्टिगूढ.

[६०]

कोठें गेला असशिल? तुझें काय झालें असेल?
ऐशी माझ्या हुरहुर मना लागली सर्वकाळ।
ही चित्ताची तळमळ मिटे कोंवि? ऐशा विचारें
द्वैधीभावें मम मन किती खाय झोले बिचारें.

देहत्यागावर गति पुढें होय कैशी परेता
हें सांगाया क्षम अनुभवें कोणता तत्त्ववेत्ता?
जो गेला तो परतुनि पुन्हा येथ नाहींच आला
तर्क-श्रद्धा-रहित न तिजा मार्ग हें जाणण्याला,

या विश्वाची सुरळित घडामोड चाले कशानें?
कोणी ज्ञाते म्हणति सगळी ती यदृच्छाबलानें।
भूतें सारीं क्रमरहित तीं वर्ततां ही निजेच्छा—
मात्रें कैशी नियमन करूं शक्त होई यदृच्छा?

विश्वामध्यें अमित भरलें गूढ तें आकळाया
शास्त्रें यत्ना करिति परि ते सर्वही जाति वांया।
तर्कांची हो प्रतिहत गती शोधुं जातां अनन्ता
ना दे श्रद्धेविण इह दुजा मार्ग शान्तीहि चित्ता.

ज्याचा विश्वीं भरुनि उरला योजनेचा प्रकर्ष
यत्सामर्थ्यें स्थिरचरजगीं हो न विच्छेदलेश।
यत्सत्तेनें सरळ अवघ्या सृष्टिचें कार्य चाले
ज्याचे आज्ञेविण न तरुचें एकही पान हाले.

ज्यानें येथें चर-अचरही ओंविलें एक सूत्रीं
एकाहूनी वरचढ दुजा निर्मुनी हे धरित्री।
श्रेणी केली सरळ चढत्या पूर्ण सत्त्वोदयाची
पारंपर्यें सरणिच परब्रह्मरूपीं लयाची.

नानारंगीं सजविलि जयें विश्व ही रङ्गभूमी
भूतें पात्रें, नटविलिं जयें देउनी वेष नामी।
अज्ञेयाचा पट करुनि जो पाटवी नाट्यकार
संसाराचा अभिनय करी जो स्वयें सूत्रधार !

उद्भिज्जाच्या उपरिच तयें प्राणिमात्रा अशेष
स्वोद्धाराला उचित दिधला तारतम्यें चिदंश।
देहत्यागावधि मिळविली सत्त्वशुद्धी तयेचा
एकाएकीं निधनसमयीं अंतही योग्य कैंचा ?

तिर्यग्योनीहुनि मनुज हा श्रेष्ठ, मानुष्यकाच्या
सोपानानें उपरि चढतां वास लोकीं वसूंच्या।
ऐसा आहे क्रमचि हरिनें लाविला भूतमात्रां
त्या मार्गानें सफल करणें सर्व संसारयात्रा.

[६१]

जे अल्पायू तुजसम सुता ! लंघिती अल्पकालीं
ह्या सोपाना, निजसुचरितें, धन्य ते पुण्यशाली।

देवांनाही प्रिय म्हणुनि त्यां देवही शीघ्र नेती
पाचारूनी, विदितचि असे लोकिं ही देव-रीती.
चाले सृष्टी सकल नियमें, तींत अन्याय कैंचा ?
उत्थानाचा नियमचि असे उच्छ्रया सेवण्याचा ।
झालें सारें तव इह जगीं कार्य जाणूनि नेलें,
मानुष्याच्या वरचढ पदीं नेउनि बैसवीलें.

[६२]

काठी हातीं धरुनि जपुनी भोंवतीं साद घेत
जाती जैसे हळुहळु पथीं आंधळे भीत भीत ।
श्रद्धायष्टी धरुनि बुधही अंध जन्मानुबन्धें
आयुर्दाया क्रमिति जपुनी आप्तशब्दानुरोधें.
नानाधर्मी विविधहि मतें जाहलीं रूढ लोकीं
त्यांचें तत्त्वग्रहण करितां मेळ ना एकमेकीं ।
ज्यांचे जैसे अनुभव तसे त्यांहि केले विचार,
ज्यांच्यामध्यें निवड करण्या पामरा नाधिकार.

[६३]

सारासारग्रहण करितां वाटतें या मनातें
कीं हा आत्मा जरि अवतरे घेउनी संचितातें
व्हावा त्याचा लय तरि, उगा कासया देहपातें
या जन्मींचें सुकृत अवघें काय जावें लयातें ?
सर्वस्वाचा लय, जरि असों बाहुलीं मृत्तिकेचीं;
भूतग्रामीं स्वमतिविभवें श्रेष्ठता मानुषाची ।
आत्मज्योती हृदयिं विलसे हानि कैशी तियेची ?
पुण्याईला नच कधिं चुके जोड शश्वत्सुखाची.

[६४]

विज्ञानानें लव न उकले सृष्टिचें तत्त्व गूढ,
चालेना बा ! मनुजमतिचा तेथ केव्हांहि पाड ।

यासाठीं त्वां प्रगति करुनी स्थूल विज्ञानमार्गीं
ज्ञानीं श्रद्धा अचल धरिली होउनीयां विरागी.

अज्ञानानें विवश दुबळा जीव जातो भिऊनी
वाटे त्यातें खचित मरणें होय सर्वस्व-हानी ।
या भीतीचें निरसन असे शक्य एक्या उपायें,
तोही मर्त्यां सुगम करुनी ठेविला देवरायें.

देवापायीं दृढ भरंवसा ठेवुनी वावरावें
कर्तव्यातें विहित म्हणुनी निःस्पृहत्वें करावें ।
आयुर्दायावधि सुकृत तें निश्चयें आचरावें,
मृत्यूचें हें भय मग बुधें शान्त चित्तें तरावें.

ऐशी शान्ती कितिक सुजनीं जोडिली आजवेरी !
वानूं त्यांची कृपणमति मी कैंवि अत्यन्त थोरी ?
पूजा-अर्चा प्रतिदिवसिंची सारुनी सिद्ध झाले !
कोणी देवा नमन करुनी देह ठेवूनि गेले !

साकेतीसा मरणदिवशीं लागली गाढ निद्रा !
त्याची नित्याहुनि अधिक ती भासली हृष्ट मुद्रा ।
" मृत्यूनें हें मम पुरविलें जीविंचें आज कोड "
ऐसें त्यानें विशद कथिलें शान्तिचें तत्त्व गूढ !

जी मृत्यूचें भयचि नुरवी ती खरी तत्त्वसिद्धी
जीवात्म्याची परमफलदा ती खरी सत्त्वशुद्धी ।
हृद्ग्रन्थींचा सकलहि जयें होय अत्यन्त भेद
सन्देहातें निरसि पुरता तो खरा तत्त्वबोध.

[६५]

" क्लीबत्वातें न धरिं न करीं मानसीं शोकक्लेश "
कौन्तेयातें हरि करितसे हाच धर्मोपदेश ।
सौभद्राचे निधनिं गिळिला शोक कुन्तीसुतानें
म्यांही तैसा तव विरहिं कां नावरावा धृतीनें ?

[६६]

जैशीं जीर्ण त्यजुनि वसनें मर्त्य लेई नवीन
आत्मा देहान्तर करि तसा पूर्व देहा त्यजून।
ऐसें गीतावचन, न मना दे समाधान आन
संसाराचें गहन विवरी तत्त्व वा सप्रमाण.

जन्मामागें मरण, मरणामागुती जन्म येई
अस्तामागें उदय, उदयामागुती अस्त होई।
हा सृष्टीचा क्रमाचि गमतो त्याजला नापवाद!
ह्या शोकाचा विसर पडण्या हा खरा तत्त्वबोध.

[६७]

एकामागें ढकलत दुजा वारि-बिन्दु प्रवाहीं
जाई जो तो परतुनि न ये मागुती केधवांही।
या भूलोकीं नियतिवश ते वाहुनी जीव-बिन्दू
जाती त्यांतें सतत उदरीं सांठवी कालसिन्धु.

अब्धीमध्यें सलिलगतिनें काष्ठ काष्ठासि भेटे
काळें जाती निघुनि पवनें दूर तीं दोन वाटे।
भूतांचाही नियति गतिनें कालसिन्धुप्रवाहीं
होतो संग प्रथम, पुढती नित्य विश्लेष होई.

एका गांवा मिळुनि निघती एकमेकांसमेत
कांहीं मार्ग क्रमुनि सगळे जाति मोठ्या सुखांत।
त्या सार्थातें त्यजुनि पुढती गेलिया पांथ एक
बाकीच्यांनीं उगिच करणें कासया दीर्घ शोक?

सारे यात्रेकरुच धरुनी एकमार्गा निघालों
पाथेयातें स्वरुचित यथासौख्य सेवीत ठेलों।
जो स्वोद्योगें अभिलषित तें अन्तिमस्थान गांठी
विश्वेशाची सुखकर तया होतसे शीघ्र भेटी.

[६८]

आल्या भोगा निमुट सुजनें सादरत्वें नमावें
ओझें देवावर न कधिंही घालुनीयां शिणावें ।
ऐसे सिद्धप्रमुख **तुकया** सांगतो तें प्रमाण
अध्यात्माचे खचितचि असों सर्वथाही अजाण !

मामा साक्षात्प्रभुवर जगद्वन्द्य गोविन्द ज्याचा
पांचाचाही प्रियकर, कृती पुत्र जो अर्जुनाचा ।
त्या सौभद्रा तरुणपणिंही गांठिलें क्रूर काळें
त्या काळाची उडि चुकविण्या शक्त कोणी न झाले.

अब्धीमध्यें उपल तरले रामनामाक्षरांनीं
या युक्तीनें जलधितरणा सेतु केला कपींनीं ।
जावें म्यांही सहज तरुनी शोकरूपा समुद्रा
त्वन्नामाच्या म्हणुनि रचिल्या म्यांहि या पद्यमुद्रा !

[६९]

तूं पुण्यात्मा, न तव ढळली चित्तशान्ती कधींही
देवें केला तव विरह हा सोसण्या धैर्य देई ।
अन्तश्चक्षूपुढति तव ती सद्गुणाचीच मूर्ती
राहो नित्य स्थिर, मधुर ती; तीच देवो प्रशान्ती ।

हृत्पाषाणीं सगुण तव जी मूर्ति बा ! कोरियेली
राहे ध्यानस्थित, नयन जे वारिनें पाखळीली ।
नामोच्चारें कवित-कुसुमें वाहुनी भूषवीली
जैशी चित्तीं तशिच नयनीं ती अहोरात्र ठेली ।

[७०]

मत्पिंडत्वें तव तनुवरी होति गाढानुरक्ती
ईशांशत्वें तव गुणगणीं राहिली सान्द्रभक्ती ।
मी एकीला जरि विसरलों मर्त्यतेच्या विवेकें
राहो चित्तीं स्थिर मम दुजी चित्सुखाच्या विशेखें

प्रीती, भक्ती विविध नसती, ऐहिकीं जी स्वभावें
आसक्ती ती प्रथम, दुसरी ईशपादीं स्थिरावे।
राजारामीं प्रियकर सुतीं प्रीति होती अमूप,
ती **श्रीरामीं** परिणत असो पावुनी भक्तिरूप

पुत्रोद्देशें सहज वदतां नाम नारायणाचें
कोणीं विप्रें भय निरसिलें पूर्वकालीं भवाचें।
जाळी अग्नी सहज घडतां स्पर्श जैसा स्वभावें!
राजाराम-स्मरण करितां म्यांहि मोक्षा भजावें!

झाला दैवें विरह तरि बा शान्तिनें त्यास साहूं
तैसें लोकोत्तर तव गुणां प्रीतिनें नित्य गाऊं
केली प्रीती इह जगिं तशी स्वर्गलाकींहि राहो
विश्वात्माही उचित तुजला सद्गती शीघ्र देवो!

[७१]

प्रेतोद्देशें सतिल सलिलें अंजली देति लोक!
स्नेहव्यक्ती करुनि तिल ते दाविती गूढ शोक।
प्रेमोद्रेकें क्षुभितहृदयापासुनि जे अपाप
येती अश्रू धरुनि कवनीं देतसें मी निवाप

वैचक्षण्यें विविध जन हृद्भावनांचा अभिज्ञ
काव्याचाही दृढ परिचयें सर्वथा तूं रसज्ञ।
देतों आतां अकृतक तुला मी नितान्तानुरागें
राजारामा! कवितसुमनोयुक्त **बाष्पाञ्जली** घे

श्रीरामाच्या करुण रुदितें दण्डकारण्यदेशीं
शैलांनींही रुदन करुनी शान्तवीलें तयाशीं।
ऐसें सांगे प्रथम कवि, तें काव्यचातुर्य कोठें?
कोठें माझी बरळ? विबुधीं क्षम्य हें धाष्टर्य मोठें!

* * *

[' बाष्पांजली ' हें काव्य कवीनें आपल्या पुत्राच्या निधनानंतर शोकदग्ध मनःस्थितींत लिहिलेलें आहे. हें काव्य प्रथम श्री. अ. आ. मोरमकर यांनीं नाडकर्णी आणि मंडळीच्या द्वारां फेब्रुवारी १९१६ मध्यें प्रसिद्ध केलें. मराठींतील हाताच्या बोटांवर मोजल्या जाणाऱ्या विलापिकांत (Elegy) या काव्याची गणना अग्रभागीं केली जाते. विद्यापीठीय अभ्यासक्रमांतहि या काव्याचा समावेश झाला होता. ज्या प्रियपुत्राच्या मृत्यूच्या दुःखांतून या काव्याचा जन्म झाला, त्याचा स्थूल परिचय खालीं दिला आहे—

रा. रा. गणेश जनार्दन आगाशे यांचा द्वितीय पुत्र **राजाराम** यास शके १८३७ अधिक वैशाख शु. ४ रविवारीं (ता. १८ एप्रिल १९१५ रोजीं) पुणें येथें देवाज्ञा झाली. **राजारामाचा** जन्म धुळें येथें फाल्गुन व. ५ शके १८१६ ता. १५ मार्च १८९५ रोजीं झाला. त्याच्या मराठी शिक्षणास आरंभ धुळें येथेंच झाला होता, परंतु त्याच्या वडिलांची बदली मुंबई येथें झाल्यावर गिरगांव म्युनिसिपल स्कूलमध्यें त्याचें पुढील मराठी शिक्षण पुरें झालें. इंग्रजी तीन इयत्तांचा अभ्यास मुंबईच्या ' आर्यन एज्युकेशन सोसायटी ' च्या शाळेंत करून त्याच शाळेंतून त्यानें हायस्कूल स्कॉलरशिप मिळविली. पुढें १९०८ सालीं त्याच्या वडिलांनीं पेन्शन घेतल्यावर तो पुणें हायस्कुलांत दाखल झाला व तीन वर्षांतच, म्हणजे १९११ सालीं, तो युनिव्हर्सिटीच्या प्रवेशपरीक्षेंत पास होऊन गुणानुक्रमानें त्याचा ७ वा नंबर आला. सन १९१२ सालीं तो डेक्कन कॉलेजांत रुजू झाला व प्रवेशपरीक्षेंतील गुणानुक्रमाप्रमाणें दरमहा १० रुपयांची जूनियर स्कॉलरशिप त्यास मिळाली. सन १९१२ च्या नवंबर महिन्यांत तो **प्रिव्हियस** परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिला आला व संस्कृत विषयांत पहिला आल्यामुळें त्यास " विनायकराव जगन्नाथ शंकरशेट प्राइझ " आणि " बाई दयाकुंवर स्कॉलरशिप् " व " महाजनी प्राइझ " मिळून शिवाय २० रुपयांची सीनियर स्कॉलरशिपहि मिळूं लागली. सन १९१३ सालीं **इंटरमीजियट** परीक्षेंतहि पहिल्या वर्गांत पास होऊन ५२ रु. दरमहाच्या " जैन लिटरेचर " व " वरजीवनदास माधवदास " अशा दोन स्कॉलरशिपा त्यानें मिळविल्या. त्याच सालीं " आपटे प्राइझ "हि त्यास मिळालें. सन १९१५ च्या मार्च महिन्यांत ता. १५ च्या सुमारास त्यास ताप येऊं लागून निर्घृण काळानें त्यास ता. १८ एप्रिल रोजीं मृत्युलोकांतून ओढून नेलें !]

राज्यारोहण

उपोद्‌घात

(साकी)

— १ —

श्रीमत्प्रौढप्रताप **आंगल**–भूपतिकुलप्रवाल ।
श्रीयुत **जार्ज** महाशय झाला **ब्रितानिया**भूपाल ॥ १ ॥
युवराजा तो असतां त्यानें दर्शन आम्हां दिधलें ।
कृपाकटाक्षें पाहुनि सर्वां प्रेमपाशिं वश केलें ॥ २ ॥
ईशकृपेनें त्यास पित्याच्या सिंहासनिं आरूढ ।
पाहुनि सहजचि मना वाटलें पुरलें मनिंचें कोड ॥ ३ ॥
प्रिय आधीं तो होता त्यांतचि दुधांत साखर पडली ।
राज्यश्रींची माळ तयाच्या कंठीं अमोघ सजली ॥ ४ ॥
युवराजपदीं असतां त्यानें दिधली सहानुभूती ।
भेट, असंशय चक्रवर्ति तो करील आतां प्रीती ॥ ५ ॥
आनंदीआनंद जाहला देशोदेशीं लोकां ।
गेले लक्षावधि जन बघण्या राज्यारोहणकुतुका ॥ ६ ॥

— २ —

राजावांचुनि सर्वहि लोकां राहे भीती मोठी ।
म्हणुनि निर्मिली भूप विभूती लोकरक्षणासाठीं ॥ ७ ॥
इन्द्र, वायु, यम, सूर्य, धनंजय, वरुण, सोम, वित्तेश
या देवांचा भूपाठायीं ठेवियला तेजोंऽश ॥ ८ ॥
नांदे मोठी नृपतिदेवता मनुष्यरूपें भुवनीं ।
बालहि राजा असतां त्यातें नावगणावें कोणीं ॥ ९ ॥
गर्जे ऐशी धर्मशासनीं आद्य**मनू**ची वाणी ।
भूपति तितुका अंश **विष्णू**चा हें कथियलें पुराणीं ॥ १० ॥
भूपाविषयीं पूज्यभावना ही धर्में निर्मियली ।
तीच अबाधित लोकाचारीं या देशीं दृढ ठेली ॥ ११ ॥

— ३ —

किरीटधारण हा भूपाचा केवळ नच उपचार ।
परंतु पूर्वापार मानिला तो धार्मिक संस्कार ॥ १२ ॥
निग्रह तैसा अनुग्रह असे ईशाचा अधिकार ।
तो चालविण्या आज्ञा त्याची हाच खरा आधार ॥ १३ ॥
ईशप्रतिनीधि असे भूपती ऐसा शास्त्रि विचार ।
आहे म्हणुनी पाळियला हा तसाच लोकाचार॥ १४ ॥
ऐहिक सत्ता वैभव सारें देणारा प्रभु तोच ।
प्रभुसेवेला अर्पण त्याचें नृपतिधर्म हा साच ॥ १५ ॥
राज्य म्हणति ती धार्मिक संस्था ऐशी उदात्त नीती ।
श्रीख्रिस्तमतीं* मान्य जाहली तीच पाळिली रीती ॥ १६ ॥

— ४ —

या विधिचें ह्या दोन्ही राष्ट्रीं शुद्ध भावनासाम्य ।
विचारशीला कवणा मनुजा न वाटतें हें रम्य ॥ १७ ॥
व्यवहाराचें दुजें अंग जें या विधिचें, उपचारीं ।
यथाविभव तें पूर्ण होतसे, तें जनमानसहारी ॥ १८ ॥
पाश्चात्य तशी प्राच्य पद्धती या नृपसंस्काराची ।
दावायातें येथ गुंफिलीं कथानकें दोहींचीं ॥ १९ ॥
पहिल्या सर्गीं अभिषेकविधी समंत्र **देवेन्द्रा**चा ।
दुसऱ्यामध्यें वानियला तो दाशरथी **रामा**चा ॥ २० ॥
तिसऱ्यामध्यें **युधिष्ठिरा**चा, पुढतीं **जार्ज**नृपाचें ।
किरीटधारण, रहस्य कथुनी त्या त्या विध्यंगाचें ॥ २१ ॥
पंचम सर्गीं चक्रवर्तिचा तो **दिल्ली-दरबार** ।
संक्षेपानें कथिला त्याचें कौतुक जनीं अपार ॥ २२ ॥
प्रसंग सुंदर परी लेखणी माझी हे बहु दुबळी ।
कशा तरी म्यां चार गुंफिल्या भीत भीत या ओळी ॥ २३ ॥
आवडतां ह्या विषयगौरवें रसिकां थोड्या फार ।
मानित त्यांच्या सौजन्याचें कौतुक ही साभार ॥ २४ ॥

* * *

* The Coronation Service by the Lord Bishop of Madras.

॥ इन्द्राभिषेक ॥

सर्ग १

(साकी)

आनंदाचें भुवनाचि जेथें सौख्य अखण्डित नांदे।
प्राणिमात्रही सदा विहरती ज्या लोकीं स्वच्छन्दें ॥ १ ॥
पूर्ण मनोरथ करिती कल्पतरु देउन वांछित तें तें।
पवित्र मन्दाकिनी ज्या स्थलीं शांत करी तृष्णेतें ॥ २ ॥
ज्या सुखभुवनीं तारुण्याविण दुसरें वय नच ठावें।
परंपरेच्या विहारकुतुकीं जेथें नित्य रमावें ॥ ३ ॥
कुसुमें सुद्धां म्लान न होतीं, व्याधी कोठुनि येती।
मरणाचें तर नांव कशाला ऐशी जीवित-रीती ॥ ४ ॥
अत्यानंदें मात्र अश्रुचे बिंदू नयनीं दिसती !
गोडीच्या कलहाविण जेथें विरह कधीं नच होती ॥ ५ ॥
जिकडे तिकडे दाट लागती वनवृक्षांच्या राई।
शीतल छायेखालीं रमतीं मिथुनें ठाईं ठाईं ॥ ६ ॥
प्रसन्न निर्मल जलौघ वाहे कोठें सुंदर टाकीं।
काञ्चनपद्में नानापरिचीं फुलतीं उभय तटाकीं ॥ ७ ॥
माणिक-मरकत-नील मण्यांचे पर्वत जागोजागीं।
स्पृहा तयांची दिव्य लोकिं त्या करितो कोण अभागी ॥ ८ ॥
रत्नशिलातालिं बैसुनि कोणी सुखसंलाप करीती।
कोणी काञ्चनपद्मकिसलयास्तरणीं निद्रा घेती ॥ ९ ॥
आगर केवळ सर्व सुखांचें ऐशा या सुरभुवनीं।
विधिसह होते देव बैसले यथोचित स्वस्थानीं ॥ १० ॥

तेव्हां सहजाचि गोष्ट निघाली कीं सुरलोकांमाजी ।
राजा[1] कोणी तरी असावा सर्व जाहले राजी ॥ ११ ।
देवांमध्यें **इन्द्रा**इतुका ओजस्वी नच कोणी ।
बळकट, काटक, कनवाळूही वारिल येतां बाणी ॥ १२ ॥
संमति यापरि सर्वजणांची पडतां अभिषेकाचा ।
करावया संभार लागले, तोटा तेथ कशाचा ? ॥ १३ ॥
इन्द्रालागीं बसावयास्तव आसन्दी[2] देवांनीं ।
वेदमन्त्रमय कल्पियली ती अद्‍भुत त्यांची करणी ॥ १४ ॥
बृहद्*, रथन्तर* दोन कल्पिले पाय तिचे ते पुढचे ।
वैरूपें,* वैराजें* केले पाय मागचे तीचे ॥ १५ ॥
उशा, पायथ्या **शाक्वर, रैवत** ही जोडी बैसविली ।
नौधस-कालेयाचीं गातीं बाजूला योजियलीं ॥ १६ ॥
ऋग्मन्त्रांची दोरी विणिली अग्र करुनि पूर्वेस ।
सामांची ती तिरपी विणकर केली आसन्दीस ॥ १७ ॥
या दोऱ्यांच्या मधलीं छिद्रें **याजुष** मन्त्रीं भरलीं ।
कीर्तिरूप ती मऊ बिछाइत बसावया आंथरली ॥ १८ ॥
श्रीची केली उशी तेधवां **इन्द्रा** शिर टेकाया ।
धरुनि बैसले दोन दोन सुर आसन्दीच्या पायां ॥ १९ ॥
सविता एका, दुज्या **बृहस्पति** पूर्वेच्या पदिं बसले ।
वायू, पूषा या देवांनीं पश्चिमपद सांवरिलें ॥ २० ॥
मित्रावरुणीं उसें पायथें अनुक्रमें रक्षियलें ।
अश्विबन्धुंनीं दों बाजूंच्या गातां सांभाळीलें ॥ २१ ॥
होतां यापरि सर्व सिद्धता, मङ्गल मन्त्रा पढला ।
इन्द्र अनन्तर यथाविधी त्या आसन्दीवर चढला ॥ २२ ॥

---

१ ते देवा अब्रुवन्सप्रजापतिका अयं वै देवानामोजिष्ठो बलिष्ठः सहिष्ठः सत्तमः पारयिष्णुतम इममेवाभिषिञ्चामहा इति । ऐ ब्रा. अध्याय ३८ खण्ड १. २ लहानसा पलंग अथवा चौपाई. * हीं वैदिक छंदांचीं नांवें आहेत.

" **वसू** चढुंत या आसन्दीवर देउंत मज साम्राज्य[१] ।
रुद्रहि माझ्या आधीं चढुनी देउंत मजला भौज्य[२] ॥ २३ ॥
आदित्यहि ते आधीं चढुनी देवोत स्वाराज्य[३] ।
विश्वेदेवहि हीवर चढुनी मज वितरुंत वैराज्य[४] ॥ २४ ॥
पवित्र ऐशा आसन्दीवर चढुनि अगोदर माझ्या ।
साध्य[५] आणखी **आप्त्य**[६] देव ते देउंत मजला राज्या ॥ २५ ॥
मरुत्[७] तसे **अङ्गिरे**[८] देव ह्या आसन्दीवर चढुनी ।
परमेष्ठीच्या लोकीं वसती देउंत मजलागोनी ॥ २६ ॥
माहाराज्यहि[९] त्या लोकीं मज आधिपत्य चिरकाल ।
त्यांजमुळें मज अपारतंत्र्यहि त्या लोकीं साधेल " ॥ २७ ॥
या अर्थाचे मंत्र पढुनियां **इन्द्र** अधिष्ठित झाला ।
बघुनि तयातें **विश्वेदेवीं** विचार ऐसा केला ॥ २८ ॥
लोकीं जैसे गुण राजाचे बन्दिजन स्तविताती ।
गुणख्यापनें ऐशा उपजे शत्रूंच्या मनिं भीती ॥ २९ ॥
विचार ऐसा करुनि सभोंतीं **इन्द्रा**च्या ते जमले ।
तद्गुणकीर्तनिं[१०] चित्त, वदनही तेव्हां त्यांचें रमलें ॥ ३० ॥
" सम्राड्रूपी आहे म्हणुनी धर्मे जन शासाया ।
स्वयें भोग भोगाया तैसा भोग-समृद्धि कराया ॥ ३१ ॥
स्वतंत्र आपण राहुनि भूपां माण्डलिकां रक्षाया ।
परमेष्ठीचा अंश म्हणोनी पारमेष्ठ्य[११] सेवाया ॥ ३२ ॥
समर्थ सर्वा क्षतापासुनी स्वविक्रमें पाळाया ।
असे लाभला स्वामी प्राण्या, प्रजेप्रती हा राया ॥ ३३ ॥

---

१ धर्मानें प्रजेचें पालन. २ उपभोग्य वस्तूंची समृद्धि. ३ स्वातंत्र्य. ४ इतर राजांहून अधिक योग्यता. ५, ६, ७, ८ देवांचे गण. ९ इतरांहून श्रेष्ठत्व. १० तं विश्वेदेवा अभ्युदक्रोशन्निमं देवा अभ्युत्क्रोशत सम्राजं साम्राज्यं भोजं भोजपितरं स्वराजं स्वाराज्यं विराजं वैराज्यं राजानं राजपितरं परमेष्ठिनं पारमेष्ठ्यं क्षत्रमजनि क्षत्रियोजनि विश्वस्य भूतस्याधिपतिरजनि विशामत्ताजनि पुरां भेत्ताजन्यसुराणां हन्ताजनि ब्रह्मणे गोप्ताजनि धर्मस्य गोप्ताजनीति । ११ प्रजापतीचे लोकीं वास्तव्य.

अरींस जेता, असुरां हन्ता, वेदांचा हा गोप्ता ।
धर्मांचा हा त्राता, झाला देवांचाही नेता " ॥ ३४ ॥
इन्द्राचें गुणकीर्तन यापरि देवमुखानें झालें ।
प्रजापतीनें मग मन्त्रानें **इन्द्रा** अभिमन्त्रियलें ॥ ३५ ॥
" नियमा[1] करुनी सत्संकल्पा **इन्द्रानें** मनिं धरिलें ।
आरोहण या आसन्दीवर साम्राज्यास्तव केलें " ॥ ३६ ॥
आसन्दीच्या पुढें उभा मग पश्चिमाभिमुख ठेला ।
प्रजापती अभिषेक-साधनीं सज्ज तत्क्षणीं झाला ॥ ३७ ॥
उदुंबराची सपर्ण शाखा आर्द्र, दर्भ सोन्याचे ।
इन्द्र-शिरावर धरुनि दाखवी कौतुक अभिषेकाचें ॥ ३८ ॥
उदुम्बराचा चमस[2] करूनी द्रव्यें आठ तयांत ।
दहीं, तूप, मध, मदिरा, दूर्वा, अंकुर, हिरवें गवत ॥ ३९ ॥
उन्हांत पाउस पडतो तें जल, द्रव्यें ऐशीं आठ ।
घालुनि अभिषेकितां करी तो या मन्त्रांचा पाठ ॥ ४० ॥
" औषध[3] सर्व व्याधीवरचें अभिषेकोदक शान्त ।
राष्ट्रातें हें वृद्धिस्थितिकर, केवल विनाशरहित ॥ ४१ ॥
इन्द्र[4], **सोमही, वरुण, यम, मनू** जयें तयें तुज आज ।
अभिषिञ्जितसे तूं हो सकलां राजांचा अधिराज ॥ ४२ ॥
मोठ्यांमध्यें[5] मोठा तूं बा, धर्में प्रजेस शास्ता ।
प्रसवुनि तुजला धन्य जाहली कल्याणी तव माता ॥ ४३ ॥
परमेशाच्या[6] आज्ञेनें मी **अश्वींच्या** बाहूंनीं ।
इन्द्रा तुजला अभिषिञ्चितसे **पूषाच्या** हस्तांनीं ॥ ४४ ॥

---

१ निषसाद धृतव्रतो वरुणः परस्त्यास्वा. २ चमचा. ३ इमा आपः शिवतमा इमाः सर्वस्यं भेषजीः । इमा राष्ट्रस्य वर्द्धनीरिमा राष्ट्रभृतोऽमृताः । ४ याभिरिन्द्रमभ्यषिञ्चत्प्रजापतिः सोमं राजानं वरुणं यमं मनुम् । ताभिरद्भिरभिषिञ्चामि त्वामहं राज्ञां त्वमधिराजो भवेह । ५ महान्तं त्वामहीनां सम्राजं चर्षणीनाम् । देवी जनित्र्यजीजनद्भद्रा जनित्र्यजीजनत् । ६ देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यामग्नेस्तेजसा सूर्यस्य वर्चसेन्द्रस्येन्द्रियेणाभिषिञ्चामि बलाय श्रियै यशसेन्नाद्याय ।

अग्नितेज, **रवि**कान्ति, **आत्म**बल हें जल तुजला देवो ।
शक्ति, श्री, यश, अन्नसमृद्धी अखण्ड तुजला होवो " ॥ ४५ ॥

मुलगा, नातू, पणतू यांसह नांदुं सुखें म्हणवोनी ।
अभिषिञ्चियलें व्याहृतिमन्त्रें[1] मग इन्द्रालागोनी ॥ ४६ ॥

अभिषिञ्चियलें पुनश्च इन्द्रा मग अन्या देवांनीं ।
प्रत्येकाही दिशेस विधिनें यथोक्त त्या मन्त्रांनीं ॥ ४७ ॥

यानंतर जे क्षत्रिय राजे झाले त्यांस असाच ।
अभिषेकविधी केला ऋषिंनीं, मन्त्रभागही तोच ॥ ४८ ॥

श्रुतिमय इन्द्रा आसन्दी ती कल्पियली देवांनीं ।
उदुम्बराचीं क्षत्रिय-भूपां सांगितली वेदांनीं ॥ ४९ ॥

टीच उंचिच्या चार खुरांवर गातीं मुंडा हात ।
चौ बाजूंनीं चार असावीं, मापें हीं शास्त्रोक्त ॥ ५० ॥

ही चौपाई दाट विणावी मोळाच्या दोरीनें ।
व्याघ्रचर्म[2] त्यावरि पसरावें आसन साक्षेपानें ॥ ५१ ॥

करुनि केंस वर तोंड तयाचें पूर्व दिशेस करावें ।
कीं राजाच्या शौर्याचें तें सूचक जनासि व्हावें ॥ ५२ ॥

आसन्दीच्या पाठीमागें तोंड करुनि पूर्वेस ।
उजवा गुडघा लववुनि भूपें टेंकावा भूमीस ॥ ५३ ॥

डावा गुडघा उभाच ठेवुनि आसन्दीस करांनीं ।
स्पर्शुनि तीचें नृपें करावें अभिमन्त्रण मन्त्रांनीं ॥ ५४ ॥

" हे आसन्दी ! बसोत तुजवर **अग्नी, सविता, सोम** ।
इन्द्र, बृहस्पति, विश्वेदेवहि देउंत मजला क्षेम " ॥ ५५ ॥

अभिषेकविधी करणारा मग मन्त्र म्हणे शान्तीचा ।
स्वयें म्हणोनी राजाकरवीं करवी पाठ तयाचा ॥ ५३ ॥

---

१ औदुंबरी आसन्दी तस्यै प्रादेशमात्राः पादाः स्युररत्निमात्राणि शीर्षण्यान्यनूच्यानि मौञ्जं विवयनं व्याघ्रचर्मावस्तरणम् । २ व्याघ्रचर्मणाऽऽस्तृणात्युत्तरलोम्ना प्राचीनग्रीवेण क्षत्रं वा एतदारण्यानां पशूनां यद्व्याघ्रः ।

"हे[1] उदकांनो ! कृपादृष्टिनें मजला तुम्हीं पहावें ।
तुमच्या शान्त तनूनें माझ्या गात्रांतें स्पर्शावें ॥ ५७ ॥
तुमच्या ठायीं असति अग्नि जे त्यांतें मी आवाहीं ।
कान्ती, शक्ती ओजहि तैसें द्यावें मजला त्यांहीं" ॥ ५८ ॥
वेदोक्तें या विधिनें पूर्वीं **जनमेजया**दि राजे ।
अभिषिञ्चियले त्यांचें सद्यश कथापुराणीं गाजे ॥ ५९ ॥
या देशाला भरतखण्ड हें नांव लाधलें, पूर्वीं ।
स्वविक्रमें पाळिली जयानें सागरान्त ही उर्वी ॥ ६० ॥
त्या सम्राजा **भरता** झाला या विधिनें अभिषेक ।
धार्मिक हा संस्कार नृपाला प्रजेसही दे हरिख ॥ ६१ ॥

* * *

१ शिवेन मा चक्षुषा पश्यतापः शिवया तन्वोपस्पृशत त्वचं मे । सर्वाँ अग्नीँ रप्सुषदो हुवे वो मयि वर्चो बलमोजो निधत्त ॥

॥ रामाभिषेक ॥

सर्ग २

(आर्या)

विजयश्रीनें **लङ्का**-रणरंगीं **जानकी**धवा वरिलें ।
सापत्न-मत्सराचें वारें तीच्या मनांत नच शिरलें ॥ १ ॥
श्रीरामाचे कण्ठीं जेव्हां रणरङ्गि घातली माळा ।
तेव्हां तिनेंच **सीता-राम**समागम-सुयोग आणियला ॥ २ ॥
सीता, दुजी **जयश्री** हें भार्याद्वय सवेंच घेऊनी ।
राज्यश्रीस वराया साकेता **राम** येइ परतूनी ॥ ३ ॥
वनवासाचे पूर्वी वाङ्निश्चित **दशरथें**च ती केली ।
आतां परिग्रहातुर कंठित एकैक दिवस ती ठेली ॥ ४ ॥
येतांच **अयोध्ये**च्या सन्निध **सीता**समेत **रघुनाथ** ।
राज्यश्रीचे दूताचि सामोरे येति मान्त्रिजन, **भरत** ॥ ५ ॥
केले **राज्यश्री**च्या स्वयंवराचे समग्र संभार ।
एकपतित्व धरेचें असतां कोठूनि वाण पडणार ? ॥ ६ ॥
श्रीरामा पूजियलें प्रेमपुरःसर गुरू **वसिष्ठा**नें ।
सीमान्तपूजनचि तें केलें गमलें जनास संमानें ॥ ७ ॥
पुरवुनि पित्राज्ञेतें निजप्रतिज्ञाभरास उतरोनी ।
केला स्वराजधानी-प्रवेश **रामें** चतुर्दशाब्दांनीं ॥ ८ ॥
आनंदाची उकळी पौरमनीं तधवां गमे फुटली ।
चिरविरहानन्तर ती नाथा भेटावया पुरी नटली ॥ ९ ॥
आनंदी-आनंद प्रकट जनाच्या मुखावरी दिसला ।
कीं अन्तर्यामींचा भाव वदनदर्पणीं गमे वठला ॥ १० ॥
जाया वधूगृहाप्रति वर जेंवि निघे तसाच **रामा**चा ।
गमला स्वराजधानी-प्रवेश पौरां अपार मोदाचा ॥ ११ ॥

देदीप्यमान **रविसा** जोडियला दिव्य रथ **सुमंत्रानें** ।
आरोहण तयिं **रामें** केलें **हरियुजिं** जसें **महेन्द्रानें** ॥ १२ ॥

रश्मी धरिल्या **भरतें, शत्रुघ्नें** छत्र नवनृपावरतीं ।
लक्ष्मण चामर वारी, चवरी विलसे **बिभीषणा**हातीं ॥ १३ ॥

प्रेमादरभावाचें भरतें आलें त्रिवर्गबन्धूंतें ।
त्या बन्धुत्वा उपमा नोहे, त्यांचेंच साजलें त्यांतें ॥ १४ ॥

भूमण्डल दुमदुमलें ऐसा स्तुतिपाठ मांडिला ऋषिंनीं ।
तो आकाशकटाहहि घुमला अमरांचिया प्रशंसांनीं ॥ १५ ॥

शत्रुंजय नांवाच्या पर्वतशा तुंग कुंजरावरती ।
सुग्रीव महातेजा होई आरूढ वानराधिपती ॥ १६ ॥

तो कृष्णकुंजरावर पिङ्गट कपिराज जेधवां बसला ।
काळ्या खडकावर जणुं लोध्रद्रुम तो गमे जनां फुलला ॥ १७ ॥

मानवरूपा धरुनी, विभूषणीं भूषवूनि तनुयष्टी ।
इतर कपीहि निघाले वैसुनियां नवसहस्र गज-पृष्ठीं ॥ १८ ॥

डंके दणाण झडती, शङ्ख तुताऱ्या दणाणुनी देती ।
जणुं त्या निज-उच्च-रवें पुकारिती **राम**विक्रमा पुढती ॥ १९ ॥

रामा विपद्विरामा नेत्रीं जनहो पहा ! तुम्ही याहो ! ।
या अर्थेंच जणूं कां भेरींनीं फोडिला तदा टाहो ॥ २० ॥

रामाचा सुखसंक्रम व्हाया ज्या वाजल्या मधुर सनया ।
त्यांहींच रिझाविले ते आले जे **राम**दर्शना व्याया ॥ २१ ॥

नक्षत्रीं **चंद्र** जसा मन्त्रिगणीं शोभला तसा **राम** ।
बघतां त्यातें लोकां गमलें कीं पूर्ण जाहले काम ॥ २२ ॥

साक्षत सुवर्णकुम्भा शिरिं घेउनि चालल्या पुढें कन्या ।
मोदकहस्तीं नरही शुभ-शकुन करीति त्या नृपा धन्या ॥ २३ ॥

पुढती चालति धेनू मूर्तांचि पुण्यौघ तेंवि विप्रवर ।
श्रीरामातें त्यांचें पुरोगमत्वीच अमोघ भद्रकर ॥ २४ ॥

प्रत्येक गोपुरावर प्रत्येक चतुष्पथावरी दिव्य।
इन्द्रधनुष्यासन तीं विलसलिं उत्तुङ्ग तोरणें भव्य ॥ २५ ॥

उभयत्र राजमार्गीं गुब्या, पताका विचित्र रंगाच्या।
द्वारीं प्रजाजनांनीं उभारिल्या सूचक स्वमोदाच्या ॥ २६ ॥

संमार्जन चांग करुनि आसेक सुवासिकें जलें करुनी।
रेखूनि रंगवल्ली सजविलिं भवनाङ्गणेंहि गृहिणींनीं ॥ २७ ॥

श्रीरामा वन्दाया, अभिनन्दाया तयासि सामन्त।
आले, तत्परिवारें गजबजलें प्राज्य सर्व **साकेत** ॥ २८ ॥

बघण्या अभिषेकोत्सव जन तेव्हां लोटले असंख्यात।
मुंग्यांची रवण तशी रीघ मिळेना मुळींच मार्गांत ॥ २९ ॥

फुललें, डुललें सारें जनसंमर्दें विशाल तें नगर।
ये पारिजातकातें वर्षाकालांत जेंवि कुसुमभर ॥ ३० ॥

सुंदर ललनावदनें प्रातिवातायनिं तटस्थ तीं ठेलीं।
श्रीरामवदनचन्द्रोदयकांक्षी उत्पलेंच तीं गमलीं ॥ ३१ ॥

त्या स्मितसुंदरवदनीं मुकुलितकमलीं तडागसें गमलें।
प्रतिवातायन, त्यातें बघतां मार्गस्थ-नेत्र-युग रमलें ॥ ३२ ॥

उच्चाट्ट, चन्द्रशाला, गृहवलभी, वृक्ष राजपथिं निकट।
गमले वदनश्रेणी रेखुनि कीं निर्मिलेच चित्रपट ॥ ३३ ॥

सादर विप्राशीर्वच, सप्रेम जनप्रणाम तो घेत।
जयघोषें अभिनन्दित पुरमार्गें जाय धन्य नरनाथ ॥ ३४ ॥

कुतुकें ईक्षित शिशुंनीं, साश्चर्य प्रौढ दृप्त वीरांनीं।
सादर सामन्तांनीं, भक्तिपुरःसर समग्र पौरजनीं ॥ ३५ ॥

सोत्कण्ठ प्रमदांनीं, सुतवात्सल्यें तसा पुरन्ध्रींनीं।
स्नेहें आप्तजनांनीं, गाढ-प्रेमें त्रिवर्गजननींनीं ॥ ३६ ॥

श्रीरामाचें दर्शन प्रवेश-यात्रेंत ज्या जनां घडलें।
त्यांना गमलें तेव्हां डोळ्यांचें आज पारणें फिटलें ॥ ३७ ॥

केली जी कुसुमांची वृष्टी प्रतिमार्गिं पौरजानपदीं ।
घनदाट शेज झाली पडुनी ती **राम**रथतुरङ्गपदीं ॥ ३८ ॥

लाजा फेंकुनि बाला सुस्वागत करिति **राम**भूपाला ।
ओंवाळुनि नीरांजन मङ्गल **रामा**सि वांछिती महिला ॥ ३९ ॥

प्रतिगेहिं मंगलार्ती पुरन्ध्रिवर्गें नृपास जी केली ।
ती सूचक जणुं झाली कीं आर्ती प्रकृतिची लया गेली ॥ ४० ॥

फेंकित सर्वदिशांसी विधुसा आल्हादकारि किरणांतें ।
श्रीरामचन्द्र आला इक्ष्वाकूंच्या सुरम्य भवनातें ॥ ४१ ॥

तेजस्वी **भरत** तदा **सुग्रीवा** वानराधिपास वदे ।
अभिषेकसिद्धता बा करण्या आज्ञा त्वदीय दूतां दे ॥ ४२ ॥

सुग्रीवें सोन्याचे चार कलश वानराधिपां दिधले ।
वदला, " जा आणा हो भरुनी हे चार अब्धिच्या सलिलें " ॥४३॥

गरुडाच्या वेगें मग केलें उड्डाण वानरेन्द्रांनीं ।
सागरनदीनदोदक एक्या रात्रींत आणिलें भरुनी ॥ ४४ ॥

पूर्वसमुद्राचें जल सोन्याच्या रत्नखचित कलशांत ।
भरुनि **सुषेण** कपीनें आणियलें तेथ चार यामांत ॥ ४५ ॥

जल दक्षिणोदधीचें कलश भरुनि आणितां न **ऋषभा**स ।
झाले प्रयास, कोठुनि, असतां प्रभुसेवनांत उल्हास ? ॥ ४६ ॥

पश्चिममहार्णवाचें जल आणियलें भरून वेगानें ।
कर्पूर-रक्तचन्दन-सुवासित स्वर्णकलशिं **गवयानें** ॥ ४७ ॥

उत्तर रत्नाकरिंचें शीत उदक रत्नकुम्भि **मारुति**नें ।
आणियलें, अनिलसुता विक्रमवेगांत केंवि होय उणें ? ॥ ४८ ॥

जल पंचशतनद्यांचें इतर कपींनीं तसेंच आहरिलें ।
श्रम कोठुनि त्यां ? ज्यांनीं अब्धिस एक्या उडींत लंघियलें ॥ ४९ ॥

तीर्थजलें हीं येतां **शत्रुघ्नें** इतर सिद्धता केली ।
आमन्त्रणें **वसिष्ठा** मंत्रिजनां, बांधवांसही दिधलीं ॥ ५० ॥

पाचारिले **वसिष्ठ कात्यायन, वामदेव, जाबालि** ।
काश्यप, गौतम, विजय श्रौतीं ज्यांनीं प्रसिद्धि मेळविली ॥५१॥
त्यांसमवेत **वसिष्ठ** प्रयतें तैसेंच तें उपक्रमिलें ।
अभिषेककार्य विधियुत जैसें ग्रंथांत तें उदाहरिलें ॥ ५२ ॥

श्रीरामा रत्नासनिं **सीता**देवीसमेत बैसविलें ।
अभिषिञ्चिलें सुवासिक मंत्रपवित्रें अमोघ तीर्थजलें ॥ ५३ ॥

वसुंनीं ज्या कल्पानें स्वर्गीं अभिषेक **वासवा** केला ।
रामाभिषेकसमयीं पुरोहितें तोच कल्प आदरिला ॥ ५४ ॥

इन्द्रास सुरविशेषीं अभिषेक जसा पृथक् पृथक् केला ।
रामाभिषेकसमयीं प्रजाजनीं क्रम तसाच तो धरिला ॥ ५५ ॥

आधीं ऋत्विग् ब्राह्मण यांकरवीं गुरु नृपास अभिषेकी ।
मग कन्यामंत्रिजनीं, त्यांमागुति बाहुजीं, वणिग्लोकीं ॥ ५६ ॥

पृथगभिषेकें संमति विशद जशी जाहलीच देवांची ।
अनुरक्ति **श्रीरामीं** उद्घोषित विविधजाति मनुजांची ॥ ५७ ॥

हेमस्तम्भीं केलें रत्नखचित इन्द्रनीलमणिरचित ।
पटल गगनसें गमलें विविधोज्ज्वलकांतिरत्नतारकित ॥ ५८ ॥

दिव्य सभास्थानिं अशा सिंहासन मध्यभागिं मांडियलें ।
सामन्तपौरसाक्षिक विधियुत अभिषेककार्य तें केलें ॥ ५९ ॥

मन्वाभिषेकिं मुकुट जो **ब्रह्मया**नें रत्नखचित कल्पियला ।
पारंपर्यागत तो पुरोहितें **राम**शीर्षिं ठेवियला ॥ ६० ॥

मग इतर ऋत्विजांनीं अन्य अलङ्कार **राघवा** दिधले ।
शत्रुघ्नें रामशिरीं धवल शुभद आतपत्र तें धरिलें ॥ ६१ ॥

चवरी **सुग्रीव**करीं एक, दुजी त्या **बिभीषणा**हातीं ।
ते मशकवारणमिषें प्रकृतिजना **राम**मूर्ति दाखविती ॥ ६२ ॥

अभिषेककार्य सारें सारुनियां साङ्ग गुरु **वसिष्ठानें** ।
दिधला निरोप विप्रां संमानुनि भूरि दक्षिणादानें ॥ ६३ ॥

सामन्तातें देउनि वस्त्रालंकार भूषणें उचित ।
बहु संमानें त्यांना निरोप दिधला करूनियां सुखित ॥ ५४ ॥

अतिथींस मिष्ट भोजन, दुबळ्यांतें अन्नवस्त्रही दिधलें ।
पौरां जानपदांतें विविधोपायीं उमोप तोषविलें ॥ ६५ ॥

रामा जगदभिरामा, पूरितकामा, परार्ध्यगुणधामा ।
कविवरवागारामा, नृपालसोमा, तपस्विविश्रामा ॥ ६६ ॥

अभिषिक्त पूर्वजांच्या सिंहासनिं बघुनि जाहला सकलां—।
आनन्द, त्यास कोठें पारावार क्षमातलीं नुरला ॥ ५७ ॥

* * *

युधिष्ठिराभिषेक

सर्ग ३

(दिंडी)

कृष्ण योगीश्वर जेथ उभा पाठीं
सज्ज चढवुनि धनु जेथ तो **किरीटी** ।
अढळ तेथें श्री, विजय, भूति, नीती
तिन्ही काळीं सत्य हे भगवदुक्ती ॥ १ ॥

कृष्णसाहाय्यें वधुनि **कौरवांसी**
जयें लंघियला समर-वारि-राशी ।
युधिष्ठिर तो प्रत्यक्ष धर्ममूर्ती
भरत-भूतालिं जाहला चक्रवर्ती ॥ २ ॥

वैरवृक्षाचीं सकळ मुळें पाळें
खणुनि निष्कंटक राज्य सर्व केलें ।
आधि भूपाच्या सर्वही निमाल्या
तशा सौराज्यें प्रजा हृष्ट झाल्या ॥ ३ ॥

पाठिराखा **श्रीकृष्ण पाण्डवां**चा
असुनि अन्याया वाव मिळे कैंचा ? ।
धर्म चालवितां राज्य-कारभारा
दुराचारा कोठूनि मिळे थारा ? ॥ ४ ॥

ग्रीष्मतापें संतप्त मृगी झाली
वटच्छाया पाहून मनीं धाली ।
कौरवांच्या दुर्नयें त्रस्त तैशी
प्रजा डुलली पावूनि सुराज्यासी ॥ ५ ॥

धर्मराजा अभिषिक्त कधीं पाहूं ?
तया वंदुनि कृतकृत्य कधीं होऊं ? ।
अशी उत्कण्ठा प्रजाजना झाली,
धन्य राजा तो **धर्म** भाग्यशाली ॥ ६ ॥

प्रजेचा हा अभिलाष आकळोनी
प्रजापालन विधियुक्त हो म्हणोनी ।
धौम्यगुरुंनीं अभिषेक मन्त्रयुक्त-
करायातें योजिला शुभ मुहूर्त ॥ ७ ॥

राजपुरुषीं संभार सिद्ध केला
इतर भूपां संदेश पाठवीला ।
श्रौतपारग विप्रांस आणवीलें,
नगर नागरिकीं सर्व शोभवीलें ॥ ८ ॥

सडा संमार्जन करुनि राजमार्ग
विविध चित्रांनीं बाह्य भित्तिभाग ।
गृहद्वारादिक गुड्यापताकांनीं,
चौक सजवीले दिव्य तोरणांनीं ॥ ९ ॥

नगरिं शुभ वेळा पाहुनी प्रवेश
नृपें केला पाळुनी गुरुनिदेश ।
वानितां ह्या स्वारिचा थाट कविही
थकुनि गेले, मज पाड तेथ नाहीं ॥ १० ॥

झूल पाठीवर कसलि भरजरीची,
भाळिं पानें लटकलीं जडावाचीं ।
उभयशृंगें मढविलीं सोनियानें
कनकघण्टादिक कण्ठिं विविध लेणें ॥ ११ ॥

असे षोडश वृष गौरवर्ण, पीन
रथा जोडियले वयें समसमान ।

धौम्यगुरुला उजवीस बैसवोनी
धर्म बसला डावीस बसे राणी ॥ १२ ॥

भीम सारथ्या करी आदरानें,
श्वेत धरिलें करिं छत्र **अर्जुना**नें ।
नकुलसहदेवीं व्यजनचामरांतें
करीं वारुनि सेविलें स्वबन्धूतें ॥ १३ ॥

पुढें शिबिकायानांत पितृव्यातें ।
सपत्नीका बसवोनि नृपें हातें ।
धाडियेलें प्रणिपात त्यां करोनी
स्वयें त्यांतें बहुसाल आदरोनी ॥ १४ ॥

नियोजूनी हय चार, सुवर्णांच्या
रथीं बैसुनि मागुती नृपालाच्या ।
सात्यकीच्या समवेत **कृष्णनाथ**
जाय सर्वांचे नमस्कार घेत ॥ १५ ॥

अग्रभागीं दळभार थोर चाले
तयें शेषासह भूमिगोल हाले ।
वाद्यघोषें दशदिशा बधिर होती
बंदि मागध नृपगुणा संस्तवीती ॥ १६ ॥

जागजागीं होतसे मङ्गलार्ती
पुष्पवर्षें झांकली पादपंक्ती ।
विप्र आशीर्वच देति, सान बाला
शालिवर्षें पूजिती भूमिपाला ॥ १७ ॥

जिच्या उपदेशें अचळ धर्मनिष्ठा
पाण्डवांची जी सत्कुलप्रतिष्ठा ।
रथीं बैसुनियां शुद्ध सत्त्वमूर्ती
सुभद्रेसह चालली सती **कुन्ती** ॥ १८ ॥

तिच्या मागुति जाय तो सत्त्वधीर
विदुर, वदला जो कुरुंस नीतिसार ।
तयामागें सामन्त सान थोर
पादचारी जनसंघही अपार ॥ १९ ॥

पुरद्वारीं गज एक सजविलेला
धरुनि शुण्डाग्रीं माळ उभा ठेला ।
जवळ येतां भूपाळ संभ्रमानें
माळ तत्कण्ठीं घातली गजानें ॥ २० ॥

नवा मण्डप निर्मिला दिव्यवर्ण
स्तंभ रजताचे, त्यावरी वितान ।
अतुल शोभा जणुं काय ती **सुधर्मा**
जया पाहुनि लाजला **विश्वकर्मा** ॥ २१ ॥

आठ दिक्पालां आठ दिशां ठाईं
स्थान व्हावें म्हणुनियां बहूपायीं ।
फुल्ल कमलाच्या आठ पाकळ्यांची
रम्य आकृति साधिली मण्डपाची ॥ २२ ॥

गर्भि रत्नासन नृपा कल्पियेलें
तेंहि कमलाकृति शिल्पकारिं केलें ।
मणिस्तंभावरि घोंस मोतियांचे
नीलगगनीं तारकापुंज साचे ॥ २३ ॥

श्रौतकर्मास्तव वेदि अष्टकोनी
मध्यभागीं कल्पिली ऋत्विजांनीं ।
व्याघ्रचर्महि तिजवरी आंथरीलें
स्थान अभिषेकासाठिं तेथ केलें ॥ २४ ॥

तीर्थ-सलिलें शत कलश पूरियेले
सोनियाचे मांडूनि ठेवियेले ।

विविध अभिषेकद्रव्यभार हातीं
येइ ऐसा मांडिला त्यांसभोंतीं ॥ २५ ॥

मंडपाच्या पश्चिमद्वारिं आला
भूपतीचा रथ, तदा **द्रौपदी**ला ।
हात देउनि उतरून रथाखालीं
कृष्ण घेई, ऐशीच सभ्य-शैली ॥ २६ ॥

धर्म खालीं उतरतां उभे ठेले
सभ्य, सामोरे मौल भूप आले ।
अग्रभागीं घेऊनि राजदण्ड
धौम्य चाले, जयघोष हो प्रचण्ड ॥ २७ ॥

तयामागें **श्रीकृष्ण** महातेजा,
सवें घेउनि **कृष्णेस धर्म**राजा ।
भीम अर्जुन चालती नृपामागें
तयां मागुति सापत्न बन्धु दोघे ॥ २८ ॥

बादरायण–मुनि–**धौम्य–वामदेव**—
प्रभृति आले द्विज सर्व सुप्रभाव ।
तयीं संमानुनि **धौम्य** उपाध्याया—
करविं करवीलें सर्व धर्म्य कार्या ॥ २९ ॥

वेदिवरती भूपास उपाध्यायें
द्रौपदीतें बान्धवें **कृष्णरायें** ।
व्याघ्रचर्मावर यथोचित स्थानीं
बैसवीलें मन्त्रोक्त विधि करोनी ॥ ३० ॥

घृतें, मधुनें त्या राजदम्पतीला
उपाध्यायें अभ्यङ्गाविधी केला ।
पंचपल्लव, सर्वौषधीहि कलशीं
पंचरत्नें जलिं घालुनियां तैशीं ॥ ३१ ॥

पूर्वसागरजल घेउनी क्रमानें
प्रोक्षियेलें उभयांसही विधीनें ।
" इमा आपः शिवतमा " आदिमन्त्रें
यथाशास्त्रागम-विहित विविधतन्त्रें ॥ ३२ ॥

जलें अभिषेक प्रथम सागराच्या
करुनि सलिलें मागुती नदनद्यांच्या ।
सकल धार्मिक संस्कार पूर्ण केला,
औपचारिक मग विधि प्रक्रमीला ॥ ३३ ॥

व्यासमुनिंनीं मग यथोचितस्थानीं
रत्नसिंहासनिं तया बैसवोनी ।
नवीं वस्त्रें उभयांस अर्पियेलीं,
आदरें तीं परिधान तिहीं केलीं ॥ ३४ ॥

तिलक केला **धर्मा**स ऋषिगणांनीं
द्रौपदीलाही मिलित-कुलवधूंनीं ।
उभयतांची मग काढियली दृष्ट
पुरन्ध्रींनीं लाविलें गालबोट ॥ ३५ ॥

व्यासमुनिंनीं मग एक रत्नखचित
मुकुट मन्त्रानें स्वयें करुनि पूत ।
स्वकरिं भूपाच्या शिरीं ठेवियेला
अलङ्कारीं तद्देह भूषवीला ॥ ३६ ॥

छत्र धरिलें नृपाशिरीं **वायुपुत्रें**,
अर्जुनानें धरियलीं राजशस्त्रें ।
नकुलसहदेवीं व्यजनचामरातें
ढाळियेलें नृपाशिरीं आत्महस्तें ॥ ३७ ॥

मुकुट राजाच्या शिरीं **व्यास**मुनिंनीं
ठेवितांक्षणिं तया सभास्थानीं ।

" **धर्म**सम्राड् जय जय ! " ध्वनि उदेला
तोंच पौरीं शतगुणित पथीं केला ॥ ३८ ॥

वेदमन्त्राशीर्वाद ऋषिजनांचे
मङ्गलार्तिक्यध्वनिहि पुरन्ध्रींचे ।
मधुर तैसे स्तुतिपाठ मागधांचे
तारमन्द्रस्वन शंखकाहलांचे ॥ ३९ ॥

अशा नादव्यतिकरीं अन्तराळीं
बसलि अमरांची स्वर्गि कानटाळी ।
धर्मराज्यारोहणें हर्ष झाला
परोपरिनें प्रकृतिंनीं व्यक्त केला ॥ ४० ॥

पुढें सिंहासन सोडुनियां खालीं
भूप आला, सर्वत्र शान्ति झाली ।
भूप राज्ञीसमवेत उभा ठेला
शपथ त्यानें सद्गदित रवें केला ॥ ४१ ॥

" स्मरुनि चित्तीं **ब्रह्मा**दि देवतांला
महाभूतांतें, **अष्टलोकपालां** ।
चतुर्वर्णां, सत्यासही स्मरोनी
ईश्वरातें प्रार्थितों मी नमूनी ॥ ४२ ॥

धर्ममूलें न्यायेंच जोडियेलें
तया न्यायें तें राहुं पाळियेलें ।
राज्य माझ्या करिं हीच कृपा भाकी
मजसि द्यावें साहाय्य सर्व लोकीं " ॥ ४३ ॥

अशा शपथातें करुनि आदरानें
वन्दियेलें ऋषिगणा भूपतीनें ।
भक्तिपूर्वक **कुन्ती**स, पितृव्यातें
विदुरगान्धारीप्रभृति गुरुजनांतें ॥ ४४ ॥

जया योगें हा सुदिन पाहियेला
दिलें आलिङ्गन तया **कृष्णजी**ला ।
मौल-सामन्तें उपायनें दिधलीं
नृपें स्पर्शुनियां तींच परत केलीं ॥ ४५ ॥

भूरि दिधली दाक्षिणा ब्राह्मणांतें,
अन्न आच्छादन दीन दुर्बलांतें ।
पातला जो जनसंघ उत्सवाला
यथामानें तो नृपें तोषवीला ॥ ४६ ॥

* * *

पंचमजार्जाभिषेक

सर्ग ४

(श्लोक)

सौराज्यानें सुखित जनता पाहुनी हृष्ट होई
जीचे राज्यावरि म्हणुनिया सूर्य अस्ता न जाई ।
कीं सौराज्यें सुख वितरणें पुण्य हें मानितात
देव स्वर्गीं, म्हणुनि करिती यापरी पक्षपात ॥ १ ॥

प्राज्या राज्या बघुनि म्हणतो लोक सारा अगाई
स्वातंत्र्याच्या नृपसरणिची मानिली लोकिं आई ।
नौसामर्थ्यें उचित अभिधा " स्वामिनी सागराची "
राष्ट्रें सारीं करितिच तिच्या लालसा मित्रतेची ॥ २ ।

स्वयें सुराज्या उपभोगणारी
सौराज्य अन्याप्रति अर्पिणारी ।
राजन्वती उत्तमभूपयोगें
ब्रितानिया धन्य सुभाग्य-भोगें ॥ ३ ॥

शुक्लेन्दुची नित्य कलाभिवृद्धी
तशी जयेची प्रतिवर्ष ऋद्धी
सहस्रवर्षावधि होत आली
ब्रितानिया दुर्लभ-भाग्यशाली ॥ ४ ॥

एकाहुनी एक नृपाल थोर
नीतिज्ञ मन्त्री, चरितें उदार ।
योद्धेहि तैसे रणरङ्गधीर
प्रजेंत विद्याविनयप्रचार ॥ ५ ॥

सर्वाङ्गसामर्थ्य असें जयेला
दिलें परेशें मनुजोन्नतीला ।
ती कां न राष्ट्रांत पुढें सरावी ?
सर्वांहि राष्ट्रां प्रिय कां न व्हावी ? ॥ ६ ॥

असो, अशा सद्‌गुणसन्निपातीं
ब्रितानिया उन्नतिमार्गिं होती ।
तों लाभली तीस हरिप्रसादें
व्हिक्टोरिया संस्तुत धन्यवादें ॥ ७ ॥

चौसष्ट वर्षें प्रकृतीस तीनें
दयायुतें पाळियलें नयानें ।
केली तियेनें स्वयशासमान
ब्रितानियेची चढती कमान ॥ ८ ॥

होती प्रजेलागिं जशी सुराज्ञी
तशी सती ती पतिला सुपत्नी ।
होती जशी ती स्वसुतां सुमाता
तशीच ती वत्सल हो अनाथा ॥ ९ ॥

झाली पवित्राचरणें स्त्रियांना
आदर्श तैशा इतरां नृपांना ।
तद्राजनीती उपमान झाली
तद्वंशजा प्रेरक तीच ठेली ॥ १० ॥

स्वर्णाक्षरांनीं **ब्रितिशे**तिहासा
ती लेखवूनी परलोकवासा- ।
गेली सती ठेवुनि कीर्तिदेहा
तिच्या गुणीं चित्त धरी विमोहा ॥ ११ ॥

मागूनि तीच्या सुत **एदवर्द**
सिंहासनाधिष्ठित हो सुबुद्ध ।

मातेचिया शिक्षणिं वाढलेला
आदर्श तो अन्य नृपांस झाला ॥ १२ ॥

न्यायें प्रजा पाळुनि भक्ति तींची
संपादुनी प्रीति नृपान्तरांची ।
अग्रेसरत्वा नृपमंडलांत
तो पावला स्वल्पदिनावधींत ॥ १३ ॥

नांदो सुखें सर्व मनुष्यजाती
धरूनियां भाव असा स्वचित्तीं ।
संग्रामवार्ता जगिं होउं नेदी
तो 'शान्तिचा मित्र' अशी प्रसिद्धी ॥ १४ ॥

आलें तयाला बहु तांतडीचें
बोलावणें **श्रीहरि**च्या घरींचें
केलें तयें केवळ न प्रजेला
परंतु शोकाकुल या जगाला ॥ १५ ॥

व्रतें पित्याचीं जनिं चालवाया
तद्राजलक्ष्मी वरि **जार्ज**राया ।
ब्रितानिया-ब्रीद खरें कराया
सुराज्य-सौख्या जनतेस द्याया ॥ १६ ॥

किरीट-भूषा विधियुक्त कर्में
आदेशिलीं भूपतिला स्वधर्मे ।
म्हणूनि आज्ञा सुटली नृपाची
तत्सिद्धता सर्व करावयाची ॥ १७ ॥

होतांचि आज्ञा, दिननिश्चयातें
करूनियां, या नव उत्सवातें ।
निमंत्रिलें मन्त्रिजनीं विदेश्य
भूपांस तैसें जनताग्रणींस ॥ १८ ॥

संभार या अप्रतिमोत्सवाचा
वानूं किती ? तेथ चले न वाचा।
असा समारंभ कधीं न डोळां
कोठेंहि कोण्या जनिं पाहियेला ॥ १९ ॥

अनेकभाषीहि अनेकवेषी
अनेकदेशीहि अनेकवंशी ।
एकत्र त्या मानवजाति झाल्या
प्रदर्शनार्थीं जणुं आणियेल्या ॥ २० ॥

न देश तो जेथिल लोक तेथें
आले न आनन्दमहोत्सवातें ।
सूक्ष्माकृती कीं अवनीच त्यांनीं
ती भासली **लंदन**-राजधानी ॥ २१ ॥

महाप्रतापी परकीय राजे
चरित्र ज्यांचें इतिहासिं गाजे ।
घेऊनि आले परिवार तेथ
जार्जप्रभूच्या अभिनन्दनार्थ ॥ २२ ॥

सामन्त, भूपाल, जनाग्रगण्य,
नीतिज्ञ, योद्धे, अभिजात अन्य ।
शिल्पी, कवी, सूरि, धनी, वदान्य
या उत्सवा येउनि होति धन्य ॥ २३ ॥

आले सहस्रावधि कोस दूर
लक्षावधी द्रव्य करूनि चूर ।
राज्याधिरोहोत्सव हा अपूर्व
पहावया उत्सुक लोक सर्व ॥ २४ ॥

शृंगारिली **लंदन**-राजधानी
पौरीं प्रसङ्गोचित-मोदचिन्हीं ।
अनेक सौन्दर्य-चमत्कृतींहीं
विडंबियेली **अमरावती** ही ॥ २५ ॥

गुढ्या-पताका-ध्वज-तोरणांनीं
आच्छादिला सूर्य जसा ढगांनीं ।
पदोपदीं भूपति-धन्यवाद
स्वर्णाक्षरीं श्लक्ष्णपदीं निबद्ध ॥ २६ ॥

देवालयीं मौलिनिधान-कार्य
करावया भूपति तो सभार्य ।
जाणार ज्या ज्या पथिं, तेथ उच्च
प्रेक्षार्थ केले जनिं थोर मंच ॥ २७ ॥

महोत्सवाचा दिन नेमियेला
उजाडतां वाट पहात ठेला ।
यात्रापथीं भूपतिच्या अशेष
सोत्कण्ठ मंचीं जन निर्निमेष ॥ २८ ॥

वाद्यें अनेक प्रतिचीं पुढारां
त्यांमागुतीं तीं पथकें झरारां
चौखंडिचीं भूपतिंच्या दळाची
साक्षी तयाच्या गुरु वैभवाची ॥ २९ ॥

त्यामागुतीं **भारत-वर्ष-भूप-**[1]
किशोर-सेना अति सुस्वरूप ।
येतां क्षणीं प्रेक्षकसंघिं मोदें
प्रशंसिली ती करताल-नादें ॥ ३० ॥

अनेक मानव्यपदेशधारी
अश्वावरी बैसुनि एक हारी ।
अनेक योद्धे रणरङ्गधीर
ज्यां पाहुनी प्रेक्षकिं हर्षपूर ॥ ३१ ॥

त्यांमागुती ये रथ सोनियाचा
जो भासला केन्द्रचि उत्सवाचा

१ The Imperial Cadet Corps.

जयध्वनी त्या बघतां उदेला
तो फोडुनी व्योमकटाह गेला ॥ ३२ ॥

रथासि त्या ओढिति शुभ्रवर्ण
वाजी सहा उन्नतचारु-कर्ण
शिरःस्थ तें चामर मन्द हाले
ते चालतां सुंदर अश्व डौलें ॥ ३३ ॥

तें राजदम्पत्य रथीं विराजे
तत्कालिंचा वेष तयास साजे ।
मन्दस्मितें शीर्ष-विभूषणातें
स्पर्शूनि घेई जनवन्दनातें ॥ ३४ ॥

मागें तयाच्या रथिं राजमाता
वैधव्यदुःखाहृतलोकचित्ता ।
अश्वावरी **जर्मन**-चक्रवर्ती
ज्याची असे गाजत भव्य कीर्ती ॥ ३५ ॥

चौखंडिचे अन्यहि भूमिपाल
ब्रितानिया-राजकुल-प्रवाल ।
घोड्यावरी बैसुनि येति मागें
श्रीजार्ज-भूपाल-दृढानुरागें ॥ ३६ ॥

ऐशापरी **वेस्त-मिनिस्तरास**
येतांचि तो राजकुलावतंस ।
सर्वांपुढें चालत जाय राज्ञी
संवेष्टिली तत्परिचारकांनीं ॥ ३७ ॥

मागें तियेच्या उमराव मानी
तीं राजचिह्नें स्वकरीं धरोनी ।
तिघे तिघे चालति सावकाश
करूनि कालोचित रम्य वेष ॥ ३८ ॥

एकाचिया हातिं नृपाल-शस्त्र[१]
दुजा स्वहस्तीं धरि भूपवेत्र[२] ।
किरीट[३] नेई तिसरा अमोल
चौथा तयामागुनि हेमगोल[४] ॥ ३९ ॥

घे एक तें पावन धर्मपुस्त[५]
असे दुजा काञ्चनपात्रहस्त[६] ।
थाटी[७] तिजा एक करांत घेई
पाठीं तयाच्या नृपराय येई ॥ ४० ॥

एकेक या माङ्गलिक प्रसङ्गीं
धर्मोपदेष्टा[८] नृपपार्श्वभागीं ।
चाले, जणो होउनि मूर्तिमन्त
प्रताप, सद्धर्मचि देति हात ॥ ४१ ॥

महार्ह शीर्षण्य शिरीं झळाळे
तें शोण चीनांशुक पायिं लोळे
सुरम्य वेषें नृप शोभला तो
मागूनि देवायतनांत येतो ॥ ४२ ॥

त्या पाहतां गायकचक्रिं केला
आरम्भ त्या मङ्गल-गायनाला ।
"जाऊं[९] प्रभूच्या गृहिं" हाच भाव
धरुनियां मङ्गलगीतराव ॥ ४३ ॥

निजासनीं भूपति आणि राज्ञी
तीं बैसतां तत्परिचारकांनीं ।
वेदीचिया चार दिशा क्रमोनी
विचारिलें कण्ठरवा करूनी ॥ ४४ ॥

---

१ Sword of State. २ Sceptre. ३ Crown. ४ Orb.
५ The Bible. ६ Chalice. ७ Paten ८ Bishop. ९ The Choir sang as the procession entered, "We will go into the house of the Lord."

त्या त्या दिशे संमुख भूप ठेला
तों[१] प्रश्न ऐसा प्रकृतीस केला ।
" हा निर्विवाद **प्रभु जार्ज** झाला
असे तुम्हां संमत काय ? बोला " ॥ ४५ ॥

" रक्षो **प्रभू जार्ज**नृपास " ऐसें
प्रत्येक बाजूकडुनी अपैसें ।
प्रजामुखीं उत्तर हेंचि आलें
तूर्यस्वनोद्घोषित तेंचि झालें ॥ ४६ ॥

पूर्ण प्रजासंमति-अंग झालें
भूपें पुढें या शपथासि[२] केलें ।
" न्याया, स्वधर्मा, जनसंप्रदाया
सांभाळुनी सारिन राजकार्या " ॥ ४७ ॥

भूपें प्रतिज्ञा करितां, क्रमानें
अभ्यंग आरंभियला गुरूनें[३] ।
जामा नृपाचा बहु आदरानें
तो काढिला तत्परिचारकानें ॥ ४८ ॥

नृपावरी सुन्दर आतपत्र
अमीर चौघे धरुनी कृतार्थ ।

---

१ The Archbishop said at each side while the King faced each side in turn, "Sirs, I here present unto you King George, the undoubted King of this Realm. Wherefore all you who are come this day to do your homage and service, are you willing to do the same ?" Four times with loud acclamation the answer was given: "God save King George."

२ Then the Archbishop of Canterbury administered the oath by which His Majesty promised and swore to govern the people of the United Kingdom and its Dominions accordiug to the statutes of Parliament and the Laws and Customs etc, etc. ३ The Archbishop of Canterbury.

झाले, सुपर्णाकृति[1] पात्र, दर्वी
आणूनियां सन्निध एक ठेवी ॥ ४९ ॥

त्या भाजनांतूनि यथोक्त-मानें
घेऊनियां तेल पुरोहितानें ।
शिरीं, उरीं, हस्ततलीं नृपातें
अभ्यंजिलें रेखुनियां क्रुसातें ॥ ५० ॥

अभ्यंजनानन्तर त्या गुरूला
लवूनि भूपें प्रणिपात केला ।
गुरूहि आशीर्वचनें वदूनी
भूपास संतोषवि गोडवाणी ॥ ५१ ॥

दण्डावया[2] दुर्जन, सज्जनांतें
पाळावया खड्‌ग दिलें नृपातें ।
शास्त्रें, म्हणोनी गुरु **जार्ज**राया
प्रवृत्त तो धर्मविधी कराया ॥ ५२ ॥

प्रधानधर्माधिकृतें[3] नृपाचें
तें खड्‌ग मन्त्रा जपुनी स्ववाचे ।
वेदीवरी नेउनि ठेवियेलें
भूपाल-भृत्यांप्रति अर्पियेलें ॥ ५३ ॥

त्यांहीं नृपाच्या कसलें कटीस
तें खड्‌ग, भूपें करुनी विकोष ।
पुनश्च वेदीवरि अर्पियेलें
देऊनियां निष्क्रय सोडवीलें ॥ ५४ ॥

किरीटसंस्कार नृपा अशेष
हो, तोंवरी तें धरिलें विकोप ।

१ Eagle-shaped ampula. २ The sword with which the King is girded is a symbol " for the terror and punishment of evil-doers and for the protection and encouragement of those that do well. " ३ The Archbishop of Canterbury.

नृपापुढे खड्ग, तसाचि ठेला
आचार तो पूर्वजिं पाळियेला ॥ ५५ ॥

खड्गार्पणानन्तर भूपतीतें
महार्ह वस्त्रें गुरुनें स्वहस्तें ।
समर्पिलीं तीं परिधान अङ्गीं
केलीं नृपें सादर त्या प्रसङ्गीं ॥ ५६ ॥

ते राजलक्ष्मी-विविधोपचार
किरीट-भूषादि यथाप्रचार ।
प्रधान-धर्माधिकृतें कराया
आरंभ केला मग **जार्ज**राया ॥ ५७ ॥

करावया साङ्ग विधान धर्म्य,
क्रूसाधिरूढ क्षितिगोल रम्य ।
देऊनियां भूपतिच्या करांत
निरूपिला त्यांतिल गूढ अर्थ ॥ ५८ ॥

"हीं राजवस्त्रें[१] निजदेहिं लेई
भूगोल हा क्रूससनाथ घेई ॥
प्रभू तुला ज्ञान, विवेक देवो
श्री, वीर्य हस्तीं तव नित्य राहो ॥ ५९ ॥

गोलावरी क्रूस सदैव राही
ह्याचा मनीं सूक्ष्म विचार पाहीं ।
हा **ख्रिस्त**सत्तेंतचि भूमिगोल
राहे, असा अर्थ पहा सखोल" ॥ ६० ॥

---

१ Receive this Imperial Robe and Orb and the Lord your God endue you with knowledge and wisdom, with majesty and with power from on high. And when you see this Orb thus set under the Cross, remember that the whole is subject to the Power and Empire of Christ, our Redeemer.

ही अंगुठी सुन्दर माणिकाची
संज्ञान भूपाल-महापदाची ।
भूपाचिया सव्य अनामिकेंत
घाली गुरू सांगुनियां तदर्थ ॥ ६१ ॥

" ही खूणं जाणें तव वैभवाची
तशीच धर्मस्थिति-रक्षणाची
मुद्रा प्रतिज्ञा-परिपालनाची
ही अंगुठी साक्षाचि या विधीची " ॥ ६२ ॥

करूनियां शुद्ध पवित्र मंत्रें
दिलीं नृपाचे करिं दोन वेत्रें[२]
एकावरी क्रूस नृपश्रियेची
संज्ञा तशी नीति-पथाश्रयाची ॥ ६३ ॥

दुजावरी एक कपोत, दावी
कीं न्यायदण्डींहि दया असावी
एकें करत्राण[३] दिलें, दुजानें
भुजास आलम्ब दिला करानें ॥ ६४ ॥

किरीट रत्नोज्ज्वल कान्तियुक्त
करूनि वेदीवरि मन्त्रपूत ।
ठेवी उपाध्याय शिरीं नृपाच्या
मावे न आनन्द मनीं जनाच्या ॥ ६५ ॥

जयध्वनी जो उठला जनांत
तो तत्क्षणीं व्यापुनियां दिगन्त ।

---

१ It is the ensign of kingly dignity and of the defence of the Catholic Faith and symbolises his being sealed with the Spirit of promise. २ The Sceptre with the Cross and the Sceptre with the Dove, " Ensign of kingly power and justce " and " Rod of equity and mercy " were then placed in the King's hands. ३ Glove (हातमोजा).

दुणावला पावुनि सागरान्त
आकाशमार्गें भिनला नभांत ॥ ६६ ॥

शिंगें, तुताऱ्या, जन वाजवीती
तोफा धडाडां उडती सभोंतीं ।
आनन्द-कल्होळ असा प्रशांत
होतां गुरु बोलियला यथार्थ ॥ ६७ ॥

" ठेवो[१] प्रभू सर्व गुणें वरिष्ठ
तुझ्या शिरीं धर्मयशःकिरीट– ।
अभ्यर्थना या प्रिय आशयाची
करूनि आशीर्वच हेंच याची " ॥ ६८ ॥

" धैर्यें[२] स्वकर्तव्य तुवां करावें
त्वां ईश्वरादिष्टपथेंचि जावें "
अभ्यर्थना मङ्गल गायकांनीं
वाद्यांत ही गायिलि मंजुगानीं ॥ ६९ ॥

संस्कार हा यापरि पूर्ण झाला
आनन्ददायी सकला जनाला ।
सामन्तमौलीं मग त्या नृपाला
अत्यन्तमानें प्रणिपात केला ॥ ७० ॥

बाजे, शिंगे, तुताऱ्या दणकति पुढतीं, देति लोकां इशारा
तोफांचे बार होती, दचकती अवघे, भूमि हाले थरारा ।
चौखंडीचीं लढाऊ बघुनिच पथकें शत्रु-पोटीं दरारा
ऐशा या थाटमाटीं नरपति परते हर्षला लोक सारा ॥ ७१ ॥

* * *

१ "God crown you with a crown of glory and righteousness."

२ The Choir sang, "Be strong and play the man: keep the Commandments of the Lord thy God and walk in His ways."

दिल्ली दरबार

सर्ग ५

स्थिर चर अवघें हें विश्व निर्मूनि रक्षी
प्रकट न दिसतां हीं सर्व कर्मे निरीक्षी ।
प्रभु सदय जगाचा एकटा सूत्रधार
सुविहित-नियमानें चालवी कारभार ॥ १ ॥

स्फुट वचन वदाया मूकही शक्त होइ
गिरिशिखर चढूनि पङ्गुही पार जाई ।
लवहि **हरि**कृपेचा लाधतां सर्व कांहीं
सहज घडुनि येई, जें घडेना उपायीं ॥ २ ॥

खचित **हरि**कृपेचा लाभ झाला म्हणोनी
ब्रिटिश-नृपतिसत्तायोग आला जुळोनी ।
अवगुण दवडाया, जोड व्हाया गुणांची
अभिलषित असे ती संगती सज्जनाची ॥ ३ ॥

सुचिर **भरतपुत्रीं** राज्य या देशिं केलें
परि नच जनतेचें ऐक्य केव्हांहि झालें ।
सुघटित नृपनीती दाखवोनी प्रजेला
प्रकृति-हित कराया ईश्वरी योग आला ॥ ४ ॥

जरि परिस न भेटे, लोह तें लोह राहे
कनकहि नच तापावांचुनी दीप्ति लाहे ।
अवगुण निवटोनी, सद्गुणाचा विकाश
भरतभुमि कराया आणि हा योग **ईश** ॥ ५ ॥

प्रियतमचि[१] **हरी**ची **हिंद-भू** हे म्हणोनी
निभवुनि परचक्रें जीव राहे धरूनी ।

---

१ "I profess implicit faith in two articies of my creed. This country of ours is true Land of Promise. This race of ours is the chosen race. It is not for nothing that God has showered His choicest blessings on the ancient land of Aryavarta."

Justice Ranade.

पुढतिं सुख पहाया ईश्वरें राक्षियेली
विबुध[२] म्हणति संधी ती फळा आज आली !। ६ ॥

सिंहासनाधिष्ठित भूप झाला
हें ऐकतां येथिल तत्प्रजेला ।
आनन्द झाला परमावधीचा
घरोघरीं तो दिन उत्सवाचा ॥ ७ ॥

ह्या हिंदु-भूची सुदृढानुरक्ती
पाहूनि त्याच्या समुदार चित्तीं ।
आधींच जी होति सहानुभूती
आली प्रजेलागिं तिची प्रतीती ॥ ८ ॥

अत्यंत दूर स्थित या प्रजेला
तो मौलिसंस्कार पहावयाला ।
येणें असें दुर्घट या विचारें
केला नृपें निश्चय या प्रकारें ॥ ९ ॥

---

२ Both Hindus and Mohamedans lack many of those virtues expressed by the love of order and regulated authority. Both are wanting in the love of municipal freedom, in the exercise of virtues necessary for civil life and in aptitude for mechanical skill, in the love of science and research, in the love of daring and adventurous discovery, the resolution to master difficulties and in chivalrous respect for woman-kind. Neither the old Hindu nor the old Mohamedan civilization was in a condition to train these virtues in a way to bring up the races of India on a level with those of Western Europe. And so the work of education had to be renewed and it has now been going on for the past century and more under Pax Brittanica with results which all of us are witnesses to in ourselves." Ibid.

स्वयें पुन्हां दर्शन **हिंदु-भूस**
देऊनियां तेथ निज प्रजेस ।
स्वमौलि-संस्कार मुखें कथावा
संतोष तीच्या मनिंचा करावा ॥ १० ॥

ऐशा करूनी दृढ निश्चयातें
उद्घोषिला तोचि निजप्रजेतें ।
या प्रीतिच्या भूपतिच्या निदेशें
सारी प्रजा डोललि गाढ हर्षें ॥ ११ ॥

नृपाज्ञा ही होतां पटुमति नृपाचा प्रातिनिधि
नियोजी स्थानातें उचित करण्या उत्सवविधी ।
तया **इन्द्रप्रस्था**विण नच दुजें स्थान सुचलें
प्रजेला सर्वस्वीं अभिमत, नृपा तेंचि रुचलें ॥ १२ ॥

धर्मानें यमुनातटीं, समतळीं, पाहूनि रम्य स्थली
इन्द्रप्रस्थ म्हणूनियां वसविली जी राजधानी भली ।
सौन्दर्यें तुलितां **महेन्द्रनगरी** जीच्यापुढें लाजली
सर्वांगीं नटली, पुरींत पहिली, **व्यासें**हि जी गायिली ॥१३॥

काळाच्या परिवर्तनांत पडली, ती जीर्णता पावली
भाग्यानेंहि पुनश्च **तोमर**कुळी जी **ढिल्लिका** जाहली ।
पृथ्वीराज नृपाळ तेथचि बळी ती राज्यधू आकळी
राजश्रीगृहदेहलीच गमली सुक्षत्रियां साउली ॥ १४ ॥

हिंदूंच्या अपकर्षकाळिं फिरुनी जी जाहली **देहली**
खिल्जी–सय्यद–लोदि–मोगलकुलीं भाग्यें प्रतिष्ठापिली ।
यत्कीर्ति स्थिर पंचवीस शतकें या भूतलीं गाजली
दिल्लीद्वार म्हणूनियां प्रतिपुरीं यत्साक्ष ती राहिली ॥१५॥

हिन्दूंतें यवनांसही प्रिय अशी होऊनि जी राहिली
श्री जीची स्मृतिशेष जाहलि परी कान्ती नसे लोपली ।

वास्तूत्कर्षगुणें प्रजानियमना श्रेयस्करी मानिली
राहे यद्बिरुदावलींत खचिली चक्राधिराजावली ॥ १६ ॥

ही दिल्ली सकळपुरींत पट्टराणी
भूपातें प्रकृतिजनास ही शिराणी ।
हो योग्य प्रभुवर-घोषणा कराया
संमानें प्रभुवर-दर्शनासि ध्याया ॥ १७ ॥

ऐसा करूनि दृढ निश्चय देइ आज्ञा
तत्काल तो प्रतिनिधि स्वजनासि तज्ज्ञा ।
दिल्ली दुजी उठविली पटमण्डपांनीं
त्यांहीं प्रभूस्तव जणूं नव राजधानी ॥ १८ ॥

विस्तार, वैभव, तिची रमणीयताही
केली अलौकिक तिला उपमाच नाहीं ।
तीच्यापुढें **मय**कृती धरि तुच्छतेला
त्वष्टा जणूं अवतरूनि रची तियेला ॥ १९ ॥

स्वर्गातुनी जणुं अचानक येथ आली
पाताळ फोडुनि धरातलिं कीं उदेली ।
हे इन्द्रजाल अथवा कृति यक्षिणीची
भांबावली मति तिला बघतां जनाची ॥ २० ॥

क्रीडागृहें उपवनें, रमणीय वीथी
रम्याकृती रुचिर ती पटवेश्मपंक्ती ।
पाहूनि दृष्टि रमली, अनिमेष ठेली
वेडावली, निरखिण्यांतची गुंग झाली ॥ २१ ॥

भूपाचिया वसतिला अनुरूप **हर्म्य**
नानाविधोपकरणीं युत आणि रम्य ।
जेथें उणे न पडतील नृपा विलास
होईल जेथहि तया सुखसंनिवास ॥ २२ ॥

ते स्तंभ गोल, पुट त्यांवरती रुप्याचे
त्याच्यावरी कळस सुन्दर सोनियाचे
आंतूनियां भरजरी पट नेसवीले
ऐसे अनेक पटमण्डप निर्मियेले ॥ २३ ॥

ही जेधवां पटपुरी अतिशुभ्रकान्ती
रक्तांशुंनीं उजाळिली **रविनें** प्रभातीं ।
ती शोभली रुचिर अस्फुट-पीतरंगें
कीं निर्मिलीच जणुं कृत्रिम पुष्परागें ॥ २४ ॥

विद्युत्प्रकाश परिकल्पियला सुखार्थ
रात्रौ, तयांत दिसलें स्फुट वस्तुजात
त्या गौरवर्ण-किरणीं गमली जनातें
दुग्धींच कीं बुडविली अवघी पुरी ते ॥ २५ ॥

कीं निर्मिली कमलपत्रपुटें जुळोनी
किंवा हिमद्रव मुशींत बळें भरोनी ।
नाना तरङ्ग उठले मनिं त्या पुरीची
शोभा बघूनि, कृति धन्यचि कल्पकाची ॥ २६ ॥

दिल्ली-पुरींत, इतरत्रहि उत्सवाचे
संभार चालति अनेक परोपरीचे ।
सुस्वागता नृपतिला करण्यास जीं तीं
सोत्कण्ठ सर्व नगरें नृपराज-पंथीं ॥ २७ ॥

मुंबापुरीं नृपतिनें करितां प्रवेश
आरंभ हो **भरतभू**तळिं उत्सवास ।
जिंकावया प्रकृति-चित्ताचि जैत्रयात्रा
ही वाटली **भरतभूं**त मनुष्यमात्रा ॥ २८ ॥

बहुविध उपचारें थोर **मुंबापुरीनें**
करुनि विभवयोग्य स्वागता आदरानें ।

प्रथम विदित केली स्वामिभक्ती अपार
प्रमुदित मनिं झाला चक्रवर्ती सदार ॥ २९ ॥

दिल्लीला नृपवर जाय तो जनांनीं
केलेला पथिं सुखसोहळा बघूनी ।
जामाता वधुगृहिं जावया निघाला
ऐसा या प्रकृतिजनास हर्ष झाला ॥ ३० ॥

संराज्ञीसह नृप चक्रवर्ति आला
दिल्लीला, जयजयकार थोर झाला ।
सामोरे प्रतिनिधि, मुख्य कामदार
आले ते प्रणति करीति सोपचार ॥ ३१ ॥

श्रीशिंदे, नृपति तसे **बिकानिरीं**चे
विश्वासू परिचर ते अधीश्वराचे ।
आले, ते प्रथित **नबाब रामपूरी**
सामोरे प्रतिनिधिच्या सवें पुढारी ॥ ३२ ॥

श्रीरामान्वय-भव हिंदुजातिसूर्य
मेवाडक्षितिपति बाहुजातवर्य ।
भूपांचा प्रतिनिधि, आदरार्थ आला
सामोरा, कुशल वदूनि धन्य झाला ॥ ३३ ॥

सम्राट्पदा उचितशा विभवें प्रवेश
दिल्ली-पुरींत करि भूपति सावकाश ।
अश्वावरी बसुनि राजपथें निघाला
आनन्दपूर्ण-नयनीं जनिं देखियेला ॥ ३४ ॥

बसुनियां रथीं चक्रवर्तिनी
हळुंहळूं पथीं जाय नन्दिनी ।
प्रणति घेत ती सस्मिताननीं
निरखिली सती आदरें जनीं ॥ ३५ ॥

सर माधवराव शूर शिंदा
सरपरताब नृपालवीर खंदा।
श्रुत **रामपुराय** ते नबाब
तुरगारूढ पुढें खरा अदाब ॥ ३६ ॥

मागें नृप-प्रतिनिधि, अभिजात मन्त्री।
जे राजकार्य करिती सविवेक तन्त्रीं।
त्यामागुती रथिं धुरंधर कामदार
सेनापती अतिरथी, दळभार थोर ॥ ३७ ॥

भरला दरबार बादशाही
उपमा त्यास कथापुराणिं नाहीं।
विसरूनि पुराण भिन्न भाव
जन झाले अवघेहि एक जीव ॥ ३८ ॥

अवघे धन **भारतावनीचें**
अवघें वैभव त्या **ब्रितानियेचें**
जणुं एकवटूनि उत्सवाचें
रचिलें कौतुक, पारणें दृशेचें ॥ ३९ ॥

रचिला पटमण्डप प्रयत्नीं
पटुता दाविलि ज्यांत शिल्पिरत्नीं
बसलें जन ज्यांत लक्षसंख्य
परि झालें नच लेशही असौख्य ॥ ४० ॥

सिंहासनद्वय तया पट मण्डपांत
केलें सुरम्य **भरतावनिनाथ** जेथ।
सर्वांचिया सहज दृष्टिपथांत यावा
तद्दर्शनें सकल लोक कृतार्थ व्हावा ॥ ४१ ॥

आला नृपाल दरबार खुला कराया
राज्यप्रतिग्रह जना स्वमुखें कथाया।

त्या वेळचा अजब थाट पहावयाला
वर्णावया क्षितिस **गीष्पति कां न आला** ॥ ४२ ॥

सामन्तभूभृदभिनन्दित चक्रवर्ती
सर्वाभिवादित, समाहृत-चित्तवृत्ती ।
श्वेतातपत्र, शिरिं रत्नकिरीट साजे
सिंहासनस्थ दयितेसह तो विराजे ।। ४३ ।।

सिंहासनीं बसुनियां निजघोषकातें
आज्ञापिलें प्रकृतकार्य करावयातें ।
झाला प्रचण्ड शतदुन्दुभि-तूर्य-नाद
केला अनन्तर नृपें निजवाक्प्रसाद ॥ ४४ ॥

" राज्ञीसवें येथ पुनश्च आलों
सर्वां तुम्हां भेटुनि धन्य झालों ।
हें वर्ष गेलें बहुधा श्रमाचें
नैमित्तिकाचें परि उत्सवाचें ॥ ४५ ॥

जें प्रेम केलें स्वजनासमान
आम्हांवरि तें मनिं आठवून ।
सिंहासनारोहणिं बोललों तें
आलों पुन्हां पूर्ण करावयातें ॥ ४६ ॥

सामन्तभूपांवरि राजनिष्ठ
प्रजेवरी प्रेम मनीं प्रकृष्ट
तें दाविण्या उत्सुक फार झालों
म्हणूनि राज्ञीसह येथ आलों ।। ४७ ।।

सिंहासनारोहसमुत्सवाला
येणें न ज्या ज्या घडलें जनाला ।
त्या त्या जना उत्सविं आज भाग
घ्यायासि हा आणियला सुयोग ॥ ४८ ॥

प्रांताधिकारी, दुसरे इमानी
मद्भृत्य, सामन्तनृपाल मानी ।
लोकाग्रणी, सैनिक मुख्य रंगीं
पाहूनि धालों बहु अन्तरङ्गीं ॥ ४९ ॥

ते स्वामिभक्ती निज दाखवाया
येतील मातें मुजरा कराया ।
घेऊनि तोषें मुजरे तयांचे
करीन साफल्य तदीप्सिताचें ॥ ५० ॥

प्रजा, तशी भूपति एकचित्तीं
प्रीती तशी सान्द्र सहानुभूती ।
माझ्यावरी या समयीं करीती
तें पाहुनी तोष मदीय चित्तीं ॥ ५१ ॥

संतोष हा व्यक्त जनीं करावा
राज्याधिरोहोत्सव हा स्मरावा ।
म्हणूनि केल्या मदनुग्रहातें
वर्णील तो मत्प्रातिभू तुम्हांतें ॥ ५२ ॥

जे हक्क, जे मान हि पेशजीचे
दिलें समाश्वासन पाळण्याचें ।
सन्मान्य माझ्या पितरीं तुम्हांतें
पाळीन निर्बाधचि मीहि ते ते ॥ ५३ ॥

संतोष, शान्ती, सुख या जनांत
राहो अशी जी धरिली मनांत ।
मत्पूर्वजीं तीच तयांसमान
चिन्ता मनीं संतत वागवीन ॥ ५४ ॥

प्रभु सदय करो कृपा, मदीय
प्रकृतिजनीं, मज तो असो सहाय ।

प्रकृतिसुखसमृद्धि साधण्यातें
मज वितरो बल, हीच भाक त्यातें " ॥ ५५ ॥

वदूनि ऐसें क्षितिभृल्ललाम
भूपां, प्रजेतें करुनी सलाम ।
सिंहासनीं तो बसतां उदण्ड
हर्षें जयध्वान उठे प्रचण्ड ॥ ५६ ॥

जैसा कोंदणिं बैठकींत गहिरा अत्यंत शोभे हिरा
सोन्याच्या मखरांत तेंवि नृपती सिंहासनीं साजिरा।
लावूनि स्वकरां भुईस, मुजरा त्या राजराजेश्वरा
संराज्ञीसह, सर्व सभ्य करिती हो चक्रवर्ती खरा ॥ ५७ ॥

हा पूर्ण होतां प्रकृतिप्रणाम
संस्कार, तो भूपति पूर्णकाम ।
उठूनि राज्ञीसह सज्ज जाया
द्वितीय सिंहासन आक्रमाया ॥ ५८ ॥

पुनश्च तूर्यादिक-वाद्य-घोषणा
पुनश्च अग्न्यस्त्र-गभीर-गर्जना ।
पुनश्च सम्राट-परिवार चालला
यथाक्रमें मण्डपिं जेंवि पातला ॥ ५९ ॥

पुनश्च सिंहासनिं तो विराजला
राजश्रियेच्या उपचारिं वेष्टिला ।
त्या प्रांगणीं वीस हजार सैनिक
येऊनि ठेले नृपराजसंमुख ॥ ६० ॥

त्यांहीं सलामी नृपचक्रवर्तिला
देऊनि आनन्द तया निवेदिला ।
मागूनि भूपप्रतिभू विचक्षण
स्वयें करी स्वामिकृपा-निरूपण ॥ ६१ ॥

सम्राट्-प्रसादा परिसूनि कानीं
जयध्वनी प्रक्रमिला जनांनीं ।
तो सागराच्या लहरीप्रमाणें
क्षणोक्षणीं वाढत जाय मानें ॥ ६२ ॥

हा आटोपुनि कार्यभाग सगळा, भूपाळ संतोषला
आला त्या विभवें पुनश्च पहिल्या तो मंडपीं पातला ।
राज्ञीच्या समवेत घेत मुजरे सिंहासनीं बैसला
लोकांनीं अभिनंदिला, जयजयध्वानें पुन्हां वंदिला ॥ ६३ ॥

सर्वत्र होतांच पुनश्च शान्ती
तो गोड वाणी नृप-चक्रवर्ती
बोले प्रजेला, जणुं गोड घास

तो जाहला भूपतिचा निदेश ॥ ६४ ॥
" जें श्रेय होय सचिव-प्रतिभूविचारें
तें सांगतों करुनि निश्चित आज सारें ।
हे **दिल्लि** सर्व नगरींत जुनी पुराणी
केली असे **भरतभू**तालिं राजधानी ॥ ६५ ॥

तैसाच **वंग**जन राहिल एकछत्रीं
होईल पालन तदीयहि एकतंत्रीं ।
हा होउं पालट सुखावह मत्प्रजेला
प्रेमें प्रसाद म्हणुनी दिधला तुम्हांला " ॥ ६६ ॥

हे शब्द कानिं पडतांच समुद्र जैसा
हेलावला सकलही जन तो अपैसा ।
आनन्दविस्मयवशें जणुं नष्टसंज्ञ
तो भासला जन नृपालपदीं कृतज्ञ ॥ ६७ ॥

आटोपुनी सकल तें दरबार-काज
आला तसा परतला क्षितिपाधिराज ।

नेपाळदेशिं मग तो मृगया कराया
जाई कृतार्थ, बहुल श्रम ते हराया ॥ ६८ ॥

अनेक भूपोचित-शिष्टकार्यें
करूनियां **भारत**भूपवर्यें ।
प्रयाण **आंग्लावनि**लागिं केलें
वाटे प्रजाचित्त हरूनि नेलें ॥ ६९ ॥

संस्थानें न च हीं, परी विखुरले[1] देशांत या प्रस्तर
अस्ताव्यस्त समस्त, त्यांस घडुनी साम्राज्यसन्मन्दिर ।
ज्यांनीं हें रचिलें प्रसन्न म्हणुनी त्या **आंग्ल**-भूभृत्करीं
ठेवी येथिल राज्यसूत्र सगळें अस्माद्धिता **श्रीहरी** ॥ ७० ॥

अव्यक्त निष्ठेसहि मूर्तरूप
ज्यानें दिलें तो जनिं वंद्य भूप ।
अस्तासि नेला स्वपरादि-भेद
सर्वांमुखीं हा शुभधन्यवाद ॥ ७१ ॥

जी धन्यता **देवपतीस** नाकीं
जी **राम**रायासहि मृत्युलोकीं ।
जी लाधली **धर्म**नृपा जनीं या
ती प्राप्त हो **पञ्चमजार्जराया** ॥ ७२ ॥

चिरायु देवो **प्रभु जार्ज**राया
सौराज्यसौख्या प्रकृतीस द्याया ।
नान्दो दिगन्तांत तदीय कीर्ती
या **हिन्दभू**चीहि असो विभूती ॥ ७३ ॥

---

१ A remark attributed to the late Tukoji Rao Holkar, grandfather of the present Chief of Indore.

दिल्ली–दरबार

(कटाव)

दिल्लीचा दरबार, ऐका त्याचा हा अखबार ॥ धृ० ॥

बादशहाच्या आगमनाचा, दिवस उगवला तो सोन्याचा, चक्रवर्तिला पहावयाचा, सुयोग आला बहु भाग्याचा, ऐसें मानुनि जों आभाळीं, तांबड कोठें फुटूं लागली, तों दिल्ली खडबडून उठली, राजमार्गि येऊन थडकली, राजदर्शना आतुर झाली, गच्च्या ओटे पाहुं लागली, बसावयाला सोय चांगली, कोणी उंच तरूच्या खालीं, पाहुनियां घनदाट सावली, पोरेंबाळें सान चिमुकलीं, कटिखांद्यावर घेउन बसलीं, सम्राड्मार्गीं दृष्टि रोखिली, सान मुलें हीं भूक विसरलीं, चित्रासम तीं तटस्थ ठेलीं, उत्कण्ठित झालीं, अधिपा पहावया आलीं ॥ १ ॥

जों न दहाचा ठोका पडला, तों दळभार सकलही हलला, स्वस्वस्थानीं गोरा काळा, राजमार्ग रोखुनिया ठेला, आपआपला वेष निराळा, लाल पांढरा तुमान डगला, टोपी फेटा कंबरपट्टा, संगिन बंदुक बर्ची भाला, तुस्त कसुनियां सज्ज जाहला, बादशहाच्या मार्गीं डोळां, लावुनि बघतां चित्र भासला, जणुं दगडाचा करूनि पुतळा, राजपथीं तो निपट बसविला, सभोंवर जन झाला गोळा, एकदील सर्वांचा झाला, दिवस हळुं हळूं चढूं लागला, तोंच धुराचा लोट निरखिला, भकभक सुरसुर शब्द उमटला, आगगाडिचा सिग्नल पडला, बादशहा आला, लोकां हर्ष बहू झाला ॥ २ ॥

स्वारी **सेलिमगडीं** पातली, तोफांची सरबत्ती झडली, रणवाद्यांची धूम उसळली, सलामीस उमराव मंडळी, जाउनि सादर उभी ठाकली, सारंगा घोड्यावर बसली, खासा स्वारी पुढें निघाली, अघाडीस काळ्या घोड्यावर, **सरमाधव** अलिजाबहादर, त्यांजसवें पांढऱ्या हयावर, **बिकानीर**चे शूरवीर **सर प्रताप** तैसे, **रामपुरी**चे नबाब खासे, पुढति चालती, खाशा स्वारी मागें सुरथीं, चक्रवर्तिनी **श्रीमेरि** सती, परिचारक-गण तिच्या सभोंतीं, पिछाडीस राजाचे मन्त्री, राज्य सुयंत्रित ज्यांच्या तंत्रीं, चाले तो अधिकारि-

पुरुष- गण, शूरवीर सरदार बहादर, अश्वपदाती, असंख्यात त्या मागें येती, सम्राटाचें रक्षण करिती, ती आली, सगळी दिल्ली गजबजली ॥ ३ ॥

अजब त्या दरबाराचा थाट, वर्णूं न शके चारणभाट, मंडप रचिला थोर अफाट, युक्ती तैशी कृतिहि अचाट, एककेन्द्रवलयद्वयघाट, लक्ष मनुष्यांचा तयिं साठ, सिंहासनस्थ श्री–समाट् अधोभागीं त्याच्या तो लाट, पहावयाचा न हो बोभाट, बेत करूनी आटोकाट, मंडप रचिला, चोहोंबाजुंनीं भव्य कमानी, दिव्य तोरणें, स्तंभीं स्तंभीं कळस साजिरे, दृष्टी क्षणभर जयीं न च ठरे, चित्र पताका, सुखद बैठका, महाराज राजेश्वर राणे, रावळ ठाकुर राव पुराणे, नबाब बेगम नबाबजादे, खानीखानान ही सुलतान, मीर अमीर, जुने उमराव खानबहादर, रायबहादर शम्-सुल्-उल्मा, महामहोपाध्याय इतरही, बडे लोक कामदार मानी, काळे गोरे भृत्य इमानी, मुसलमान रजपूत मराठे, शीख जाट ही शान भुतानी, काश्मीरी सिंधी नेपाळी, चिनी आणि ब्रह्मी बंगाली, कन्नड तामिळ जन मल्याळी, तमाम ऐसे निमंत्रिलेले लोक बसाया, दिवाणखान्यापरी सुबकसा, तंबू मोठा त्यांतचि गर्भी बादशहाचे तख्त मांडिलें तें सोन्याचें, पडदे सुन्दर किनकाफाचे, पायांखालीं छान जरीचे, आंथरिले, ते मऊ गालिचे, इतर वर्तुळीं सुरम्य दुसरें, सिंहासन भूपास साजिरें, सभोंवर उमराव धुरंधर, बसावयाची सोय चांगली, एकाखालीं एक पायरी, संगमरवरी, ऐशापरिची रम्य योजना, केली दरबाराची अद्भुत कृति ते साची ॥ ४ ॥

दरबाराची वेळ जाहली, स्वस्वस्थानीं सर्व मंडळी, वेळेवर येऊनि बैसली, मध्याह्नाची वेळ ठेपली, सुस्वर वाद्यें वाजुं लागलीं, काळ्या गोऱ्या भडक पलटणी, तडक दुजी एकीच्या मागुनि, भव्य पटांगणिं, उभ्या राहिल्या सज्ज होउनी, वीस हजार बडे लढवय्ये, शीख जाट गुरखे पुरभय्ये, पठाण कडवे आणि रोहिले, शूर मराठे चपळ मावळे, क्रमाक्रमानें येउनि ठेले, फिरुनि वाजल्या शिंगतुताऱ्या, चोबदार मारिति ललकाऱ्या, मंत्रि प्रतिनिधि यांच्या स्वाऱ्या, येतां लगबग दरबारीं त्या बहुत जाहली, सर्व मंडळी सलामीस ती खडी राहिली, हा कोलाहल न जों थांबला, तों फिरुनी झणझणाट उठला, तोफांचा खडखडाट झाला, भूमिभाग तो थरथर हलला, सम्राड्-रथ तो दिसूं लागला, पुढें थोर दळभार चालला, येतां येतां हळूं हळूं तो दिव्यस्यन्दन

जवळ पातला, हर्षांचा कल्होळ मातला, दरबारा आला, अधिनृप लोकांतें दिसला ॥ ५ ॥

आठ राजपुत्रांनीं जामा, चक्रवर्तिचा उचलुनि धरिला, चक्रवर्तिनीच्या खिदमतिला, सादर सन्निध राजकुमार-द्वय राहियलें, अपार कुतुकें जनीं देखिलें, सम्राटाचे शिरीं हिऱ्याचा मुकुट शोभला, सुवर्ण-दंडावरी भरजरी आतपत्र तें, चामर दों बाजूंस वारितीं, चोबदार ललकारी मारिति, ऐशा विभवें सावकाश सर्वांची प्रणती, घेत घेत ती राजदंपती, दरबाराच्या गर्भीं आली, सिंहासनिं आरूढ जाहली, आनंदाची उकळी फुटली, सर्वांनीं सानंद वंदिली, मग आज्ञेनें कंठरवानें घोष करूनी, अधिकृत पुरुषें, दरबार सुरू केला, हर्षा पार नसे उरला ॥ ६ ॥

* * *

(सन १९११ च्या ‘ दिल्ली दरबार ’ च्या निमित्तानें लिहिलेलें ‘ राज्यारोहण ’ हें काव्य १९१२ च्या ऑगस्टमध्यें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालें. त्यास सर एन्. जी. चन्दावरकरांनीं इंग्रजी प्रस्तावना लिहिली होती.या काव्याची रचना कवीनें श्री. विष्णु कृष्ण भाटवडेकर या आपल्या मित्राच्या सूचनेवरून हातीं घेतली, परंतु काव्यपूर्तीपूर्वींच श्री. भाटवडेकरांचा देहान्त झाला.)

पुण्यस्मरणें

बिरुदावली

(न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे)

शुद्ध-सत्त्व-गुण-धीर माधवा
कोण जाणति न लोक बांधवा ।
यद्गुणीं स्वजन भूषित केले
यत्कथाश्रवणिं लोक भुकेले ॥

* * *

प्रचंड नगराज तो हिमगिरी असे लोळला !
अगाध अथवा पयोनिधि अशेष तो आटला ।
दुभंग अथवा अहो धरणिगोल हा जाहला !
अकान्त असला कसा भरतभूतलीं मातला ॥ १ ॥

हळाळती कशामुळें जन लहान मोठे वदा
विलापरव एवढा परिसिला न कोणीं कदा ।
हताशजन सर्वही ! कवण विघ्न हो पातलें ?
दिसे भरतभूमि ही सकल आर्त शोकानलें ॥ २ ॥

हिरा बहुत साजिरा, रुचिर कोहिनूराहुनी,
क्षणीं हरपला असे वदति दीनसे होउनी ।
दुजे " गगनिं लोपला अतुल–तेज तारा " असें
वदूनि असुं ढाळिती, परिमिती तयाला नसे ॥ ३ ॥

अवर्ण्य अनिवार्यशी कथिति हानि जी जाहली
कृपाचि हरिची गमे भरतवर्षि दूरावली ।

असाच गहिरा हिरा, जनपदांत जो मोहरा
कधीं निपजवील हो निजमहोदरीं ही धरा? ॥ ४ ॥

पडे मसलतींत जें गहन पण्डितां सांकडें
जयापुढतिं मांडितां उलगडा तयाचा पडे।
रमेसह सरस्वती विसरुनी जुनें वांकुडें
यदीय गृहिं नांदती परि न गर्व ज्याला चढे ॥ ५ ॥

परोपकृतिचें महाव्रत अखंड ज्या आवडे,
निरुद्यमचि रोगियाप्रति कुपथ्यसें वावडें।
पदोपदिं जयाविणें प्रगति–काज सारें अडे
दिसे विबुधवृंद ज्याविण अनाथसें बापुडें ॥ ६ ॥

"स्वकीय कुलदीप हा हरपला" अशी ओरडे
स्वदेश-जननी, खळे नच अजूनि तीचें रडें।
यदीय मृति सर्वहि स्वजनकार्य–भारा नडे
रमा-रमण तो असा कवण नेणती रानडे ॥ ७ ॥

गुणी बुधशिरोमणी जनपदाग्रणी धोरणी
स्वदेशहित-कारणीं झिजवि देह रात्रंदिनीं।
सुहृद्–व्यसन–वारणीं, श्रम गणी न, विद्यार्जनीं
हिरा जडित-कोंदणीं विलसला तसा सज्जनीं ॥ ८ ॥

जयें उपनिषद्वचें वदुनि प्रार्थना-मन्दिरीं
प्रकाश बहु पाडिला मिलित–भावुकाभ्यन्तरीं।
प्रपंच परमार्थही सहजरीतिनें साधिला
असा न म्हणवे कसा 'नर भला भला रे भला' ॥ ९ ॥

करी विशद प्राकृतीं भगवदुक्ति[१] तो ज्ञानिया[१]
अभङ्ग–यश तो तुका[२], यदवतार तो नामया[३]।

---

१ भगवद्गीतेवर टीका करणारे श्रीज्ञानदेव. २ तुकाराम. ३ नामदेव.

समर्थ[1] शिव-सद्गुरू, परमभक्त एका[2] जनीं
सहाय असती जया त्रिविध-ताप-संहारणीं ॥ १० ॥

जळीं, स्थळीं तसेंच जें गगनमण्डळीं कोंदलें
अनंत विभु-रूप हृत्कमळिं ज्याचिया रंगलें ।
जया परमशान्तिचें सबळ मूळ हें लाधलें
तया नवल काय हो जरि न आधिनें गांजिलें ॥ ११ ॥

पुरा विमल धर्म जो भरतवर्षिं या नांदला
जनाभ्युदय-हेतु तो खचित पाहिजे स्थापिला ।
समाज-घटना पुरातन अभीष्टशी वाटली
'सुधारक' अशी तया न पदवी गमे साजली ॥ १२ ॥

सुधारक-शिरोमणी असुनि, वृत्ति साधी जुनी
पुराण नव शोधुनी उचित घेइ विद्वन्मणी ।
करूनि जल वेगळें पयचि हंस तो आदरी
विवेक करुनी तसा विहित तोंचि जो स्वीकरी ॥ १३ ॥

पुरंदरसमान ते स्वजन-पक्ष छेदावया
प्रवृत्त रिपु जाहले परि न वाटली भी जया ।
सुमेरुसम राहिला अढळ जो महा-संकटीं
न वा खवळला कधीं न च हि जाहला हिंपुटी ॥ १४ ॥

रुसो नृप, रुसोत ते स्वजन ही स्वकीया पथा
जयें लव न सांडिलें, किति वदूं तयाची प्रथा ।
हिमालयतटाहुनी प्रणय-पाशिं रामेश्वरा
जयें सुदृढ गोविलें खचित तोचि वाली खरा ॥ १५ ॥

स्वधर्म-रिपुंनीं किती जरि वितंड तें मांडिलें
पदोपदिं तयांसवें प्रबल नास्तिका खंडिलें ।

---

१ शिवाजी महाराजांचे गुरु रामदास. २ एकनाथ.

विशुद्ध निजधर्म तो, स्वजनही, जयें मांडिले
नयासनिं खलापरी, उचितशासनीं दंडिले ॥ १६ ॥
किती हरिलिं संकटें स्मरति पुण्यवासी जन
किती श्रमहि सोशिले करुनि ते स्वदेशार्पण
किती जनिं कृतघ्नता, परि किती कृपा–साउली
अशा मनुज-भूषणा विरल जन्म दे माउली ॥ १७ ॥

प्रमाण इतिहास या नच मिळे महाराष्ट्रिचा
म्हणूनि रचिला नवा, चरम लाभ त्या हास्तिंचा ।
जया पढुनि डोलती स्वजन, डोलवीती शिरें
परस्थ जन, ही अशी विमल कीर्ति ज्याची स्फुरे ॥ १८ ॥

जया उपजतां दिली अतुल ईश्वरें तीक्ष्ण धी
जयें श्रमुनि जोडिला अति अगाध विद्या-निधी ।
जयाविण सरस्वती-सदन[1] शून्यसें जाहलें
यदीय निधनीं नसे कवण भाग्य हो लोपलें ? ॥ १९ ॥

जना इतर भासले मनुज-दृष्टिच्या बाहिर
तदीय मतिवैभवें सहज त्यासि दृग्गोचर ।
जरी करतलामलापरि परोक्ष ही भासतें
पडे तरिच जोडिलें विपुल सार्थकीं ज्ञान तें ॥ २० ॥

तया तुलिति भानुच्या[2] सम, कितीक बिस्मार्कसे
अनन्वय-निदर्शन प्रकट तच्चरित्रीं दिसे ।
अमोल-गुण-संहती; सुगुण पोषिती दोष ते
तयासदृश तोचसें उचित मन्मना भासतें ॥ २१ ॥

गुरू कवण[3] मानिती परि जगद्गुरू वाटला
अहर्निश मदीयही रडुनि कंठ हा शोषला ।
कृपा भरतभूवरी न च करी दयाळू हरी
म्हणूनि वरचेवरी यम महार्घ रत्नें हरी ॥ २२ ॥

---

१ युनिव्हर्सिटी. २ नाना फडवर्णीस. ३ कर्नल् कीर्तिकर.

तयास किति आठवूं ? किति वदूं तदीया गुणां
विलाप बहु जाहला, परि दिसे मला तो उणा ।
जरी प्रतिकृती शिलामय तदीय केली जनीं
तदुन्नति कशी घडे स्मृतिपटीं चिरस्थायिनी ? ॥ २३ ॥

(२)

पुणें नगर गाजलें भुवनिं पुण्य-भूमी असें
ततस्त्य-बुध-रानडे-मुख-विलोकन श्राद्धसें ।
असें मम सुहृज्जनीं[१] गुणविचक्षणीं मानिलें
मदीय मतिलाहि तें उचित सत्यही वाटलें ॥ २४ ॥

जनाकुल तदीय तें सदन भासलें देउळ
गुणी अगुण दर्शना मिळति रङ्क वा राउळ ।
प्रसाद-लव याचिती, कुशलवृत्त वा सांगती
तयाप्रति विचारिती हित घडेल कोण्या रिती ॥ २५ ॥

स्वलेख पढुनी तयाजवळ मागती संमती
" तुम्हीच मज लेख द्या लिहुनि " यापरी प्रार्थिती ।
जनोपकृतिचे नवे पथ अनेक उद्धाटिती
अनेकविध कारणां मिळति लोक त्याभोंवतीं ॥ २६ ॥

न येइ उदया हितप्रद अशी सुसंस्था नवी
जये फलवती अशी विबुध-रानडे-धी न वी ।
प्रबन्ध रचिला न वा सरस कोणत्या ही जनीं
यथार्थ न परीक्षिला विबुध रानड्यांनीं मनीं ॥ २७ ॥

दिनावधि घडे तरी विसर बान्धवां ही पडे
असा न जन सांपडे विसरले जया रानडे ।
न त्याजवाळिं पातला कवण ही जयाला तयें
न उद्यम करावया वळविलें सुधावाङ्मयें ॥ २८ ।

---

१ प्रोफेसर काथवटे.

नसेच उपमा तुम्हां गुणनिधे ! अहो माधवा !
कठोर हृदयें कसें त्यजियलें अम्हां बांधवां ?
तुम्हांपरि उदारधी भरतभूतळीं पाठवा
तुम्हीच अमुच्या हितास्तव हरीस हो आळवा ॥ २९ ॥

तुम्हां न शिवलें कधीं अघ, तुम्ही हरीच्या पदा
स्मरूनि दिन कंठिले, न शिवली तुम्हां आपदा ।
अदैन्य भववास तो, निधन तें अनायास ही
उदात्त चरिता अशा विरल जाणते ही मही ॥ ३० ॥

निवृत्त गुरु होतसे प्रथम सांग शास्त्रक्रिया
यथार्थ उपदेशुनी, करुनि शिष्य-मेधोदया ।
तसे स्वहितसाधनीं कुशल सर्व या बांधवां
बघूनि, परलोकिंच्या धरियलें पथा माधवा ! ॥ ३१ ॥

समाप्त इति-कृत्यता तुमाचि काय या लोकिंची
म्हणूनि धरिली अशी परम लालसा स्वर्गिंची ? ।
तुम्हीं स्वशिरिं जीं स्वयें जन-धुरीणता घेतली
प्रयाण-समयीं वदा कवण सज्जना सोंपिली ॥ ३२ ॥

तुम्हांसि उपहासिलें जरि अजाण लोकीं, तरी
सुजाण जनिं गायिली विमलकीर्ति नानापरी ।
कधीं जडजनोक्तिची न परवा तुम्हां वाटली
असें असुनि कासया वसति येथची त्यागिली ? ॥ ३३ ॥

निराश अथवा तुम्ही खचित काय हो जाहलां
म्हणूनि परलोकिंचा त्वरित मार्ग आलंबिला ? ।
क्षणांत खचलें कसें अमित धैर्य जें वर्णिलें
कृमी निधड काळिजा तुमचिया कसें झोंबले ॥ ३४ ॥

स्वराष्ट्र उदया चढो ! प्रगतिमार्ग त्या सांपडो !
कलाभ्यसन आवडो ! जन सदा सुविद्या पढो !

दुराग्रह तसा झडो ! दुरभिमान सारा उडो !
विकाश मतिला घडो ! मन विशुद्ध धर्मीं जडो ! ॥ ३५ ॥

अभीष्ट मनिं हेतु हे धरुनि बोध केला जनां
सुधामधुरभाषणीं, न रुचला परी तन्मना ।
अरण्यरुदितापरि सदुपदेश हा जाहला
म्हणुनि निजबांधवांप्रति असाल कंटाळलां ? ॥ ३६ ॥

सुभव्य तुमची तनू पुढति माझिया ठाकते !
रसाळ तुमची गिरा श्रवणिं माझिया गुंगते !
स्वदेश-दृढ-भक्तिची सतत साक्ष देई मन !
घडेल मग केंवि या व्यथित अंतरीं सान्त्वन ! ॥ ३७ ॥

तुम्ही भरतखंड हें निजकुटुंबसें लेखिलें
हिताहित पित्यापरी सतत आमुचें देखिलें ।
शिरीं सतत वाहिलें स्वजन-कार्य-चिन्ता-भरा
प्रनष्ट जन-छत्र हें म्हणुनि जीव हा घाबरा ॥ ३८ ॥

दिनान्तसमयीं तुम्ही सहल अन्यमित्रांसवें
करूं निघतसां, मला सकल आज तें आठवें ।
सुबोध तुमचा तदा गमलि मेजवानीच ते
रसायनचि मानसा सुखवि, पोषि चिच्छक्तितें ॥ ३९ ॥

अनेक विषयांवरी विविध तर्क फैलावले
अनेक-विध-कल्पना-गहनिं चित्त भांबावलें ।
विकाश घडला मना, जिरलि ते अहंता मनीं
प्रमोद बहु वाटला सुलभ ह्या मनोमुंडनीं ॥ ४० ॥

कधीं रुचिरपर्वतीपरिसरीं, कधीं दूरचा
धरूनि पथ चाललों हळुहळू चतुःश्रृंगिचा ।
जसा चढउतार त्या पथिं तसेंच संभाषण
कधीं मृदु कठोर वा स्खलत वा कधीं रोषण ॥ ४१ ॥

कड्यावरुनि कोसळे खळखळे जशी पर्वतीं
प्रशान्त मृदु-शाद्वलीं, झुळुझळूं झरी सैकतीं ।
तशी विषय-धोरणें चटुल वाग्नदी वाहिली
निमालि, परि मर्मरश्रवणरूप ती राहिली ॥ ४२ ॥

कठोर शठनास्तिकांविषयीं बोलतां ती गिरा
हिमालयगिरींतुनी घसरते जशी घोगरा ।
प्रसादयुत सज्जनांविषयिं बोलतां शान्त ती
प्रयागपुर सोडितां स्थिर गभीर भागीरथी ॥ ४३ ॥

जनस्थितिसुधारणाविषय वर्णितां कोमळ
नदी प्रभवनिर्गता रव करी जसा मंजुळ ।
परेशमहिमा तया प्रिय निरूपितां प्रेमळ
अगाधजळ सिन्धुचा प्रवह ज्यापरी निर्मळ ॥ ४४ ॥

अफाट वनिं निर्जनीं शकट चालला धोपट
नभीं तिमिर दाटलें, पदहि टाकितां दुर्घट ।
प्रसुत जननी रथीं, न कळतां पडे बालक
अशा बिकट संकटीं जगवि त्या जगच्चालक ॥ ४५ ॥

निचेष्ट पडला असा प्रहर एक तो एकटा
न माय भगिनी तशी सुचिर जाणती संकटा ।
पितृव्य मग येतसे पथिं तया हयारूढ तो
शिशू बघुनि ओळखी हरिकृपाच ती मानितो ॥ ४६ ॥

अचाट करण्या कृती सगुणमूर्ति ही वांचली
तिच्याच गुणवर्णनीं सुकवि-भारती रंगली ।
उदाहरणरूप ह्या सुचरितासि वाखाणितां
न शीण गमला मना उलट वाटली धन्यता ॥ ४७ ॥

विदेह वरिली स्थिती, म्हणुनि केवलेच्छाबळें
तुम्हीं मरण आणिलें, भव-भयास निर्दाळिलें !

पवित्र करणें असें जरिच जन्मुनी ही धरा
तुम्हां विनवितों पुन्हा भरतवार्षि जन्मा धरा ॥ ४८ ॥

परोपकृतिच्या कृती तुमचिया स्मरूं मी किती ?
अनेकविध उद्यमा तुमाचियाच त्या वर्णिती ! ।
शतांश तुमचा जरी इतर मानवा साधता
तरी खचित तो जनीं बहुत पावता धन्यता ॥ ४९ ॥

विशाल पृथिवीपरी सुयश विस्तरा पावलें
म्हणूनि गुणकीर्तनीं पृथिविवृत्त हें साधिलें ।
सुवर्णकुसुमें चितेवरि सुहृद्गणीं वाहिलीं
यशस्तनुस अर्पिली सबहुमान पद्यावली ॥ ५० ॥

नृरत्न-बिरुदावली, घडविली तशी गांठिली
सुवर्णगुणिं ओविली नयनवारिनें क्षाळिली ।
विदग्धपदिं अर्पिली, प्रिय असो तया धाकुली
गणेशकृति ही, जशी कवि-मयूर-केकावली ॥ ५१ ॥

* *

ठेवुनी इह सुकीर्ति-शरीरा
गांठिलें भव-नदी-पर-तीरा ।
तेथुनीहि निज-भारत-लोका
माधवा ! प्रणय-पूर्व विलोका ॥

* * *

अबला - विलाप

('बाइ अक्रुर हा नेतो श्रीकृष्णाला ' या चालीवर)

महाराष्ट्र-भाषा : बाइ ! गेला तो गुणनिधान माझा वाली
वदुं किती हानि मम झाली ॥ धृ० ॥

चाल–दृढ ममता त्यानें केली ।
उदयाची आशा धरिली ।
त्या आशेला। अंकुर ही नच फुटला।
दुर्दैवें मोडाचि खुडिला ॥ १ ॥

विश्वविद्या : बाइ ! दुःखाचा डोंगर हा कोसळला ।
मजवर हा घाला पडला ॥ धृ० ॥
चाल–बाइ, पट्टशिष्य जो माझा ।
पदवीधर-मण्डलिं राजा ।
जो तन्मणिसा । मम कंठीं सजला खासा ।
तोडिला, दया नच ईशा ॥ २ ॥

स्वदेशभक्ति : बाइ ! कडकडली वीज कशी मजवरती ।
ताटांत पाडिली माती ॥ धृ० ॥
चाल–कुलदीपक मजला थारा ।
चमकला गगनिं जणुं तारा ।
बाइ, उदयाला । पोंचतांच तो मावळला ।
अंधेर प्रपंचीं झाला ॥ ३ ॥

धर्मोन्नति : बाइ, पडली हो कुऱ्हाड आकाशींची।
आतां मज आशा कैंची ॥ धृ० ॥
चाल–आधाराचि मम सदनाला ।
होता तो अवचित खचला ।
कशी मी राहूं । हें दुःख कसें मी साहूं ।
कवणाला मुख हें दावूं ॥ ४ ॥

न्यायदेवता : बाइ, दुर्धर हा प्रसंग कीं ओढवला ।
नच सीमा मम दुःखाला ॥ धृ० ॥
चाल–धर्माची केवळ मूर्ती ।
अवतरला सुकृतें जगतीं ।

ती वानुं किती । पसरली दिगन्तीं कीर्ती ।
आबालवृद्ध ही गाती ॥ ५ ॥

सर्वजणी : चाल–आपुल्या परी हळहळतों ।
शोक हा लेश नच खळतो ।
परि जाउं चला । सान्तवूं तया साध्वीला ।
जीवर हा पडला घाला ॥ ६ ॥
चाल–जन्माची संगत दिधली ।
ती **रमा** अश्रुंनीं न्हाली ।
हा ! हा ! दुर्दैवा । नेलासी प्राणविसावा ।
सौख्याचा अनुपम ठेवा ॥ ७ ॥

सगळ्या जणी : (रमाबाईकडे जाऊन त्यांना उद्देशून)
बाइ ! लुटिलें गे नच केवळ तव सौभाग्या ।
परि थोर भरत-भू-भाग्या ॥ धृ० ॥
चाल–जो जीव प्राण तव भर्ता ।
आमुचाहि तो हितकर्ता ।
बाइ, तद्विरहीं । कवणाला शोक न होई ।
करि विवेक तूंही हृदयीं ॥ ८ ॥
चाल– हे **रमे** धन्य तूं गृहिणी ।
सुखविला विबुध–जन–तरणी ।
उगा कां रडुनी । शोषिसी तनू, या भागिनी ।
तव दुःखीं वाटेकरिणी ॥ ९ ॥
चाल– ईश्वरासि बाई रुचलें ।
मनुजाचा उपाय न चले ।
मनिं धीर धरी । शोक हा वृथा तूं न करी
माधवयश तव सहचारी ॥ १० ॥

★ ★

तीन हरिभाऊ

(श्लोक)

एकास जाउन न जों दिन आठ झाले ।
तों आज दुर्नियतिनें दुजियास नेलें ॥
दोघेहि सद्गुणगणीं गणिले ललाम ।
दोघेहि आपअपुल्यापरि सार्वभौम ॥ १ ॥

अध्यापनीं मिळविलें यश थार एकें ।
कादंबरी-जनकसा दुसरा विशेखें ॥
नांवाजला, जनहितीं उभयांसि गोडी ।
भूषाचि **पुण्यनगरा हरिभाउ जोडी** ॥ २ ॥

कीं वाटलें उभयतांसि परोपकारी ।
गेला पुढें निघुनियां निजनामधारी ॥
तो देव जो स्वगुरुसा सुख-निर्व्यपेक्ष ।
एकाग्रचित्त झिजला जनकार्यदक्ष. ॥ ३ ॥

तोही विटोनि भरतावनिदुःस्थितीला ।
गेला परत्र मग येथ जिणें कशाला ॥
ऐसें मनीं समजुनीच सरोबरीनें ।
केलें प्रयाण उभयें परमेश जाणें ! ॥ ४ ॥

१. हरीभाऊ देव :

स्वार्थीं न होय परमार्थ म्हणूनि ज्यानें ।
राजाश्रया त्यजुनियां समुदारधीनें ॥
ज्यानें निजायु दिधलें भरतावनीच्या ।
सेवेसि वाहुनि जिणें निजमाउलीच्या ॥ १ ॥

ठेवूनि केवळ निजोदरपूर्तिमात्र ।
वेंची निजार्जित परार्थं बघूनि पात्र ॥

ज्याला परार्थ झटतां न मिळे उसंत ।
जो शान्त दान्त गमला सकलांसि संत ॥ २ ॥

तो देव आठवतसे सकलां वदान्य ।
जो जाहला अधन शिष्यजनां शरण्य ॥
चंपारणीं सहुनि अंगिं जयें अपेष्टा ।
संपादिलें सुयश साधुनियां अभीष्टा. ॥ ३ ॥

* * *

‘ ही लाडकी **भरतभू** परमेश्वराची । ’
उक्ती घुमे श्रवणिं ही गुरु **रानड्यांची** ॥
ती हो खरी, तरीहि केविं अशा विभूती ।
अर्धे स्वकार्य करुनीच परत्र जाती ? ॥ ४ ॥

शेतें प्रयत्न करुनी जनिं नांगरावीं ।
पेरे करुनि बहु आस मनीं धरावी ॥
व्हावें अवर्षण न वा कडका पडावा ।
केला, परंतु उगला जणुं शीण व्हावा ! ॥ ५ ॥

हातास पीक नच येइ, वृथा प्रयास ।
केले असें गमुनि मानस हो उदास ॥
ऐशी कशी अवकृपा करितो परेश ।
आम्हांवरी, म्हणुनि जीवित हो हताश ! ॥ ६ ॥

२. हरीभाऊ लिमये :

साष्टींत योजियलि जी नव पाठशाला ।
मुंबापुरीस दिपवील अशी विशाला ॥
जी ज्ञानदानरतमण्डल वैजयन्ती* ।
तत्कीर्ति वाढविल ती उभयापरान्तीं.§ ॥ १ ॥

---

* Deccan Education Society.

§ अपरान्त = कोंकण.

व्हावी तिची आचिर शाश्वत-सुप्रतिष्ठा ।
ऐशी मनीं धरुनियां बहुसाल निष्ठा ॥
केला समुद्यम जयें दिनरात्र त्यातें ।
न्यायास कां सुचली बुद्धि अहा ! यमातें ? ॥ २ ॥

होऊनि मुख्य गुरु राहिन शिष्य-मेळीं ।
हें पाहणेंच नव्हतें **हरिच्या** कपाळीं ॥
एका क्षणांत विधिनें करुनी अनर्थ ।
केला मनोरथिं अहा अतट-प्रपात ! ॥ ३ ॥

नोहेच बीज रुजलें, फुटला न मोड ।
अद्यापि दूर फळ, पौष्टिक आणि गोड ॥
पायाहि नाहिं भरला, मजले सुदूर ।
आशा मनांतिल मनांतचि होय चूर ! ॥ ४ ॥

एका क्षणांत जणुं लावि गळ्यास फांस ।
कीं तोंडचा हिसडि दैवाचि गोड घास ॥
ऐशी विचित्र कृति ती बघतां विधीची ।
चित्तीं अभीष्ट परि होइल शांति कैची ? ॥ ५ ॥

आतांच येथ बसला, हसला, निघाला ।
चक्रद्वयावरुनि हीरकवाटिकेला* ॥
झाला जरी निरत कन्दुकखेलनांत ।
व्याघ्रापरी टपुनि तो बसला कृतान्त ! ॥ ६ ॥

छातींत ये कळ म्हणूनिच जो निजेला ।
नाहीं फिरुनि उठला परि अंत झाला ! ॥
खेळांतल्या संवगड्यां कळलें न कांहीं ।
हा काळशी नच भयंकर कल्पनाही ! ॥ ७ ॥

* हिराबाग.

आली न शिंक उचकी, नच खोकलाही ।
प्राणांतिंचें उमटलें नच चिन्ह देहीं ॥
जों पापणी न लवली इतक्यांत शून्य ।
झालें **हरीस** हरुनी विधि तो अधन्य ! ॥ ८ ॥

चक्राधिरूढ युवसंघ करूनि हारी, ।
मागें, पुढें, रथ मधोमध शीघ्रचारी ॥
यात्रा अशी पथिं बघूनिच कोण ? काय ।
पृच्छा करूनि वदती जन हाय ! हाय ! ॥ ९ ॥

मार्गस्थ हें करुण दृश्य बघूनि सारे ।
हेलावले परिसतां जन ते बिचारे ॥
येतां गृहाप्रति यमातिथीची सवारी ।
जी जाहली स्थिति कशी वदवेल सारी ॥ १० ॥

आकाश कोसळुनि कीं पडलें विशाळ ।
किंवा दुभंग धरणी गमली असेल ॥
विद्युत्प्रपात गमलाचि असेल थोर ।
हा शीर्षिं काय पडलाचि नभःकुठार ! ॥ ११ ॥

नित्यापरी स्वगृहिं येउनि जेवतील ।
प्रेमें मुलांस कुरवाळुनि बोलतील ॥
विश्रांति घेउनि दिनश्रम हारितील ।
निद्रा करूनि नव जीवन पावतील. ॥ १२ ॥

ऐसे किती प्रिय मनोरथ तत्प्रियेचे ।
तैसेच सान असमंजस अर्भकांचे ॥
चित्तास रंजविति तोंचि दिनान्त झाला
अस्तास भाग्यरवि त्यासमवेत गेला ! ॥ १३ ॥

मार्गाकडे बसलिं लावुनि सर्व डोळा ।
तों हें अचानक भयंकर ये कपाळा ॥

एका क्षणांत डुलला मनिंचा मनोरा ।
होता अतर्क्यनियमें विधि पाठमोरा ! ॥ १४ ॥

केला विलाप सतिनें, किति सान तोकीं ।
किंवा किती मिलित त्या स्थलिं मित्रलोकीं ।
वर्णू कशास अतिदारुण तो प्रसंग ।
तो चिंतितांच मन होत असे दुभंग ! ॥ १५ ॥

आचार्य केवळ न तो परि कार्यकर्ता ।
तो लेखनीकुशल, निर्भिड, धीट वक्ता ॥
विद्याप्रदानरतपण्डितमण्डलाला ।
आधार जो निजशिरीं भर घ्यावयाला ॥ १६ ॥

शिष्यांस जो प्रिय तसा इतरां गुरूंतें ।
बन्धुत्वरूप सकळांहि जनांसिं नातें ॥
त्याचा समागम जया क्षणमात्र झाला ।
तो तत्क्षणांताचि तयें निजमित्र केला. ॥ १७ ॥

सन्मान्य नागरिक, लोकहितीं पुढारी ।
कामांत वाकब, विचक्षण तो विचारी ॥
मर्मज्ञ वादपटु तो परपक्षभेदी ।
तत्त्वावबोधक कृती इतिहासवेदी ॥ १८ ॥

अध्यापनव्रतिं जया अनुपम्य निष्ठा ।
हो विश्वपंडितगणांत जया प्रतिष्ठा ॥
निष्काम, निर्व्यसन, धार्मिक निष्कलंक ।
प्रेमें प्रशंसिति जयाप्रति राव, रंक ॥ १९ ॥

ठेवूनि निर्मळ, निरंतन कीर्ति लोकीं ।
गेला परत्र, जन पाडुन घोर शोकीं ॥
तत्स्मारका करुनि लोक कृतार्थ होवो ।
त्याचें कुटुंब परि सान्त्वन केविं पावो ! ॥ २० ॥

३. हरीभाऊ आपटे :

विद्युल्लता शमुनि, शांति न अल्प झाली ।
दुश्चिन्ह तों उमटलें नव अंतरालीं ॥
तें वाङ्मयक्षितिज भेसुर कुट्ट काळें ।
झालें, जनीं वळविले तिकडेस डोळे. ॥ १ ॥

कार्योद्देशें भ्रमण करितां दीर्घमार्गश्रमानें ।
मन्दाक्रान्ता प्रकृति **हरिची** दुष्ट तोयोदरानें ॥
केली मुंबानगरि जवळी लोक-कार्यार्थ वेगें ।
वैद्यें केले श्रम बहु तरी रोग तो घे न मार्गे ॥ २ ॥

आयुष्याचे दिवस बहुधा येथ गेले सुखांत ।
केलें विद्याध्ययन, रचिले आपुले ग्रंथ येथ ॥
येथें आलें उचित यश तें देशकार्योद्यमांना
येथें पौरप्रतिनिधिमुखें पावला अग्रमाना ॥ ३ ॥

पुण्यग्रामा परतुनि पुन्हां स्वाश्रमातें पहावें ।
आप्तां मित्रां, चिरपरिचितां भेटुनी तोषवावें ॥
ह्या बुद्धीनें, विकल असतां संकटें येथ आला ।
मार्गक्लेशें खवळुनि गदें सर्वथा ग्रस्त केला ॥ ४ ॥

खग्रासाचे समयिं शशिचें बिंब राहु क्रमानें ।
ग्रासी तैसें हळुहळु पथा आक्रमीलें गदानें ॥
सूर्यास्ताच्या समयिं पडती तारका अंतराळीं ।
गेला अस्ता ध्रुवसम **हरी** वाङ्मयाचे अभाळीं ! ॥ ५ ॥

'**आनंदाश्रम**' ठावुका न कवणा श्रीशारदोपासका ? ।
ज्ञानाचा घुटका न तेथ कवणा हो लाधला नेटका ?
आला त्यास निका प्रसाद दिधला भावें जिनें भावुका–
ती कैची **हरि**-मूर्ति लोक विसरे त्या मंदिरीं स्थायिका ॥ ६ ॥

ज्याचें वृत्त विशाल, या जनिं जयें शार्दूलविक्रीडित ।
केलें, तन्निधनीं कसें न अवघें हो राष्ट्र संपीडित ? ॥

वर्षें चाळिस वाङ्मय-क्षितिजिं जो तारा ध्रुवासारखा ।
तेजःपुंज झळाळला अहह ! तो आतां अम्हां पारखा ! ॥ ७ ॥

कृष्णाची मुरली, तशीच हरिची ती गोड कादंबरी ।
दोहींना वश बाल, वृद्ध, युव वा ऐशी तिची माधुरी ॥
आस्वादींच तहानभूक हरली, चिद्वृत्तिही मोहिली ।
ती दुर्भाग्यवशेंच मूक अमुच्या राष्ट्रीं अहा जाहली ! ॥ ८ ॥

मोठा ध्यास विदग्धवाङ्मय महाराष्ट्रींत निर्मावया ।
सर्वांगीं रमणीयता, गहनता तैशी तिला द्यावया ॥
मातृप्रेमाचि जीवरी करुनि तत्संगोपनीं शीणला ।
लोकीं कोट्यवधी सुतांत तिजला सत्पुत्र तो शोभला ! ॥ ९ ॥

साहित्योन्नतिसाधनास्तव किती वैदेश्यही भारती ।
धुंडाळोनि नव्या नव्या कृति दिल्या त्या स्वीयमातेप्रति ।
मोठे सुंदर ते प्रबन्ध सुतसे कादंबरी-विंशती ।
कन्या ही कुळसंततीच भुवनीं राखील त्याची स्मृती ! ॥ १९ ॥

[या तीन हरीभाऊंचे मृत्युदिन :
(१) हरीभाऊ देव–८ ऑक्टोबर १९१८
(२) हरीभाऊ लिमये–२६ फेब्रुवारी १९१९
(३) हरीभाऊ आपटे–३ मार्च १९१९]

* * *

अनुस्मरण

(परलोकवासी गोविंदराव वासुदेव कानिटकर)

साहित्य–संगीत–कला–प्रवीण ।
आलेख्य कौशल्य करीं अधीन ।
गोविन्दराया ! सकला कलांचा ।
निवास तूं बा ! गमलासि साचा ॥ १ ॥

सुविद्य तैसाचि मनोज्ञरूप ।
झालासि मित्रा ! स्वकुलास दीप ।
कीं दृष्ट लागेल असा विधीनें ।
बा ! निर्मिजेलासिच कौतुकानें ॥ २ ॥

न कोणती वाण तुला पडावी ।
अशीच इच्छा विधिची असावी ।
म्हणोनि पत्नी विदुषी तुला ती ।
मिळे कराया तव भाग्यपूर्ती ॥ ३ ॥

दोघेंहि विद्या-विनय-प्रकर्षें ।
प्रकाशलां स्वीय गुणीं विशेषें ।
दांपत्य अन्योन्य गुणानुरूप ।
दावोनियां धन्य विधी अमूप ॥ ४ ॥

भार्या तुझी ती जरि रोहिणीशी ।
मानूं तरी ती शशिच्या प्रकाशीं ।
शोभे, तशी हे नच आत्मतेजें ।
काशी स्वयें विज्ञजनीं विराजे ॥ ५ ॥

तुझीं काव्यें मित्रा रसिकजन-चित्ता रिझवितीं ।
तुझ्या चारित्र्याची स्मृति इहजनीं तीं उरविती ॥
तुझ्या अंतस्तापा प्रकट करि '**संमोहलहरी**' ।
तया आतां स्वर्गीं शमविल कृपासागर हरी ॥ ६ ॥

सरस्वतीकण्ठमणीच एक । गमावला त्वन्निधनीं सुरेख ।
असा महाराष्ट्रजनीं विलाप । जो जाहला तोच तुला निवाप ॥ ७ ॥

जादा कलम—

जसा सखा प्रिय तूं माधवाचा । **काशी**वरी स्नेह तसा **रमे**चा ।
करावया अंतिं समानदुःखी । दोघींस पाडी विधि घोर शोकीं ॥ ८ ॥

रमा गिळोनी अनिवार शोक । लोकोपकारोद्यम ते अनेक ।
शिरावरी घेउनि कंठि काळ । कर्तव्यनिष्ठाच तिची अमोल ॥ ९ ॥

काशी रमेची जनतोपकारीं । सहाय्यकर्ती श्रुत आजवेरी ।
तशीच ती आमरणान्त होवो । तिच्यापरी शोक तरूनि जावो ॥ १० ॥

सहानुभूती महिलाजनांची । तशी तिला साक्षर बान्धवांची ।
विवेक, ईशार्पित चित्तवृत्ती । यांहीं समाधान, न अन्यरीती ॥ ११ ॥

एकाच घायें करि घात दोन । ऐशी विधीची कृति ही बघून ।
रडे महाराष्ट्र कवीस नेतां । केली विधीनें विदुषी अनाथा ॥ १२ ॥

विद्यानुरक्ती प्रणयोदकानें । लतेपरी पोषियली जयानें ।
ऐसा पती नेइ जरी कृतान्त । पत्नी न कां विव्हल हो नितान्त ॥१३॥

परी असे ती विदुषी सुजाण । टाळावया मृत्यु समर्थ कोण ।
जैसें हरी ठेवील येथ तैसें । बुधीं रहावें, कथि साधु ऐसें ॥ १४ ॥

जून १९१८.

* * *

स्फुट कविता

अलीकडील हरिदास

(श्लोक)

जो खरोखर असे हरिदास, त्यास ढोंग बाडिवार कशास ?
कासया मधुर गायन, पेटी, सुप्रसन्न करण्या जगजेठी ? १
भक्तिचा म्हणति देव भुकेला, त्यासि भक्तिरस केवळ भेला;
शुद्ध चित्त, करुणामृदु वाणी, भाव निर्मलचि तो मनिं आणी. २
गीतवादनवशें नर मोहे, श्लेषबद्ध वच त्या प्रिय आहे;
आवडे बहु विनोद मनुष्या, काय आवडति हीं अविनश्या ? ३
काय ढोंग करितात बिचारे ! काय हे नटविती स्वशरीरें !
रंगभूमिवरि नाटकपात्रें, तेविं दाविति कथेंत चरित्रें ! ४
सूक्त काय वदण्यासि कथेंत कोणतें न वदणेंच असूक्त,
भेद हा न करिती धनलोभी, यांस पाप करितां न गमे भी. ५
नामकीर्तन पवित्र सुकर्म, जाणती नच तयातिल वर्म;
भक्तिचें अमृत मिष्ट सांडिती, येर तें विषसमान सेविती. ६
श्रोतृरंजनचि इष्ट मानुनी, नाटकी करिति हे बतावणी;
सांगुनी विषयसेवनगोष्टी, साधिताति जनमानसतुष्टी. ७

मकरसंक्रांत

(पद)

[**चाल**—अभिनवमधुलोलुप हे—]

भोगुनि धनुराशि मकरिं सूर्य पातला,
गगनिं आज उत्तरपथ धरुनि चालला. ॥ ध्रु० ॥
रजनी संकोच धरुनि, दिवसमान वाढवुनी,
हिमपीडा संहरुनी, निजताप प्रकटवुनी,
हरुनि रोग सुखावित हा सकल भूतला. १

अभ्यंगस्नान करुनि, आभरणें अंगिं खचुनि,
पुरमार्गीं नट्टनि थट्टनि, सान थोर नारी जन,
हर्षें सौभाग्यवाण लुटित चालला. २

पर्वकाळिं पुरुष न्हाति, तिळ अंगां लावितात‍ि,
सतिल अन्न सेवितात‍ि, भिक्षुकांसि वाण देति,
'मधुर वदा' वदुनि असें वांटिती तिळां. ३

मुलीचें लग्न

(पद)

[चाल—रुचती का तीर्थयात्रा—]

पालटलें वर्ष नाहीं कन्येला आठवें,
तों वाटे मंगलाचें कौतुक तें पाहवें ॥ ध्रु० ॥

गेलें जों नाहिं तीचें भाषण तें बोबडें,
नसतांही काज कांहीं जी हांसे ओरडे,
आईला सोडुनी ना पळ जीला राहवें,
खेळाचे नादिं जीला नच कांहीं आठवें. १

समजेना काय आहे संसारीं काज तें,
उमजेना कांहिं नातें परि लटकी लाजते,
रागाचा शब्द जीला नच अगदीं सोसवे,
आईचा प्रेमराशी मनिं जीच्या सांठवे. २

धर्मादी अर्थ चारी जोडिन मी पतिसवें,
शपथेंसी घेववीती परि अर्था नेणवे,
जातांना सासऱ्याशीं काळिज तें कालवें,
घळघळ तीं वाहतात‍ी नेत्रींचीं आसवें. ३

दैवानें चांगलींशीं मिळतां तीं माणसें,
नच वाटे बंधुवर्गा दुःखहि तें फारसें.
दुष्टाशीं योग येतां नच दुःखा पाहवें,
नच धर्में जोडियेल्या संबंधा तोडवें. ४

निपजे तो केविं लोकीं कन्येचा नोवरा,
हा लागे नित्य पोटीं सर्वांच्या धोसरा,
निघतां तो सुज्ञ होतें कौतुक तें गोडवें,
नाहीं तो भोग तीचा अपुलाही ओढवे ! ५

उपवर कन्या

(श्लोक)

लग्नाला जी जाहली योग्य तीचे, होती जे जे सोहळे कीं सुखाचे
ते वानावे हीच इच्छा धरून, हातीं घेतें लेखणी मी जपून. १
माझ्यासाठीं सुस्थळा शोधण्यातें, बाबा गेले जेधवां गे पुण्यातें,
नेलें मातें तेधवां दाखवाया, केला वाटे शीण तो व्यर्थ वायां. २
कोठें मेली पात्रिका ती पटेना, कोठें माझें रूप हें आवडेना,
कोणी मोठी, सान कोणी गणीती होते बाई काय सांगूं फजीती ! ३
कोणी बोले नाक हें नीट नाहीं, डोळ्यांमाजी तो दुजा व्यंग पाही,
कोणी कांहीं खोड काढी नवीन स्त्रीजातीची ही स्थिती हीन दीन ! ४
कोणी कोणी पुस्तकें वाचवीती, कोणी बोले ही नवी चालरीती,
कोणी प्रश्ना घालुनी बोलवीती, कोणी उंची मोजुनी माप घेती ! ५
कोणी सांगे छानसें गीत गाया, कोणी हातीं सूय देती शिवाया !
ज्याची त्याची वेगळाली परीक्षा, देती वाटे काय ही घोर शिक्षा ! ६
गे बाजारीं गाय घोडे विकाया, येतां जैसे लोक येती पहाया;
ह्या कीं बाला आणियेल्या विकाया, नोहे कां ही श्रेष्ठ गे मर्त्यकाया ? ७
जीचे पोटीं भास्कराचार्य यावे, ज्यांनीं ज्योतिर्मण्डला आक्रमावें,
जी कीं वीरां पंडितां जन्म देते, ती स्त्री येथें विक्रया काय येते ! ८
शीला किंवा लौकिका नेणताती, द्रव्या किंवा सुस्वरूपा पहाती;
'ही कोणाची ?' हें पुसे कोण बाई ! 'हुंडा देती काय ?' हा प्रश्न येई. ९
कोणी लक्ष्मीपुत्र कोणी भिकारी, दोघे हुंडा मागती दुर्विचारी,
कोठें पैसा जोडिला पूर्वजांनीं, कोठें नाहीं अर्थ कांहीं म्हणोनी ! १०

झाला पैसा खाउनी एक थोर, कोणी ठेवी दाबुनी थंडगार;
कोणाची गे वोखटी चालरीती, वाटे त्यांची भेट व्यायास खंती. ११
नाहीं ज्याच्या मान कांहीं कुलाला, तोही पावे पुत्रयोगें पदाला !
विद्येचा गे गंध सातां पिढ्यांत, नाहीं तोही पुत्रयोगें कृतार्थ ! १२
आचारी वा पाणक्या का असेना, तोही पुत्रें पावतो थोर माना !
जो जन्माचा राहियेला करंटा, मानापाना घालितो तोहि तंटा ! १३
जो तो पाहे नोवरी सुस्वरूप कोणी पाहे नोवऱ्याचें न रूप !
राहो मोठा खेंबडा लेंबडा वा, तो पोरींना सर्वथा आवडावा ! १४
ऐशा सांगूं काय बाई ! अपेष्टा, स्त्रीजातीच्या जाणतो कोण कष्टा ?
हा लग्नाचा लागतां पाठिं धोशा, पोरींना हा जीव होतो नकोसा। १५

कवि आणि काव्य

(उपजाति)

प्रतिभा स्फुरते न अंतरंगीं, नच बुद्धी अपरोक्षमार्ग लंघी,
नचि निर्मि नवीन रम्य सृष्टी, दिधली ती विधिनें न दिव्य दृष्टी. १
न फुटे हृदयीं कधीं उमाळा, बघतां दुष्कृति जीव हो न गोळा,
फुटती न अपाप शब्द वाचे; बघतां कौतुक भूतलीं अजाचें. २
पडतें श्रवणीं न मंजु गीत, भरुनी जें उरलें असे क्षितींत;
मन आत्मिक सौख्य तें न चाखी, जगिं आनंदघना न जें विलोकी. ३
'ट' सि जो जुळितों कसा तरी 'ट', कवि तो मानिति रामदास 'धीट'.
यमक्या गणिलेंहि वामनाला, कवि व्हाया मज हाव ती कशाला ? ४
भवभूति कवी नगापगांतें, रडवी, बोलवि दंडकावनातें;
अनुभाव तदीय त्यासि ठावा, मजला तो उपलब्ध केविं व्हावा ? ५
कवि तो सुकृती मनासि वेधी, मनुजाभ्यन्तरवृत्त जो निवेदी,
म्हणुनी कविमंडलावतंसा, भजती शेक्सपियरास कालिदासा. ६
तमसा, सरला, प्रियंवदा, अनसूया कवणासि वा कदा
हरिती न ? निसर्गसत्यता हृदया आकाळि हीच धन्यता. ७

न जपें, न तपें, न वा श्रमानें, मिळतें अध्ययनें न वा धनानें;
हरिचाचि खरा महाप्रसाद, कविताशक्ति गमे निसर्गसिद्ध. ८
दिधली कविशक्ति ही जयाला, हरिनें तो न गणी परिस्थितीला,
सहज प्रकृतीच गोड गावें, इहलोकीं जंव त्या जनें जगावें. ९
कविमानस मारितें भरारी, क्षणमात्रीं त्रिदिवांत गूढचारी;
अतला सुतलासि भेदि वेगें, गगना आक्रमि शीघ्र एक वेंगे. १०
कविच्या कृतिला नसेचि तोल, इहलोकीं न तयेसि योग्य मोल;
टटटेति मृदंग काढि बोल, प्रतिभेवांचुनि सर्व अन्य फोल. ११
कवि कोण जगीं धनाढ्य झाला ! न सपत्नी खपते सरस्वतीला;
अनुराग अनन्यभावनेनें, करि त्या सेविल ती अनन्यतेनें. १२
निपजे न जनीं कवींद्र मोलें, सहजस्फूर्तिविणें न शीर्ष डोले;
खर अश्व न होय पोसिल्याही, गति जातीविण येथ अन्य नाहीं. १३
पढता कवितोपयोगि छंद, रचितां येति नवीन पद्यबंध;
परि छंद गणीति देहमात्र, रस आत्मा, प्रणयासि तोचि पात्र. १४
रस तो निपजेल केविं, ठावें, कविला मात्र, तयासि तें पुसावें,
रचण्या शिकवोत पद्यमाला, कविकर्मा न सजोत शिल्पशाला. १५
न महाकवि कां म्हणूनि झाले, पुसतां नित्य मनांत गूढ खेळे,
खडकावरि झाड कां न यावें, कवठाला मधुरत्व कां नसावें ? १६
असल्यास मनःप्रसन्नता ती, असतां ज्ञान, तशी दृढानुरक्ति,
स्फुरतां प्रतिभास्फुलिंग चित्तीं, कविताज्योति अपाप घेइ दीप्ति. १७

रूढिमाहिमा

(श्लोक)

अये रूढे ! वर्णूं अतुल महिमा मी तव किती ?
न शास्त्राची सुद्धां तुजपुढतिं गे चालत गती !
तुझे झाले पाहीं जन सकलही दास जगतीं !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असती तूं बलवती ! १

त्वदाज्ञेनें लोकीं जन विफल वित्तव्यय करी,
त्वदाज्ञेनें सोशी अमित विपदा कष्टहि वरी;
त्वदाज्ञा भंगाया नच विबुधही लोकिं धजती,
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असमी तूं बलवती ! २

असे स्नानीं, दानीं, शयनिं, वसनीं, ध्यानिं, पठनीं,
तुझी थोर क्षुत्तृट्प्रशमनिं, तशी कार्यकरणीं;
व्रतीं वा संस्कारीं तुजसि जन सारे प्रणमती,
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असमी तूं बलवती ! ३

कसें वस्त्रा ल्यावें ? कच शिरिं असावे किति ? कसे ?
टिळा कैसा ? जोडा कवण ? कुडत्याला किति कसे ?
कसें पागोटें तें ? वदुं अतुल सत्ता तव किती ?
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असमी तूं बलवती. ४

महानाम्नीत्यादिव्रतसमुदयारंभसमयीं
असावी चित्ताची स्थिति, तशि गृहाची, शुचिमयी;
अशा कालीं द्वारीं, अहह ! गणिका नाच करती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असमी तूं बलवती ! ५

नसे ब्राह्मोद्वाहीं विहित वरहुंडा ऋषिजनीं,
नसे त्यांच्या ग्रथीं विहिणकरणी मानधरणी;
परी पारंपर्यापुढति ऋषिवाक्या विसरती,
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असमी तूं बलवती ! ६

खऱ्या कर्मा फांटा, कधिंहि नच तोटा अविहितीं,
भिकाऱ्याला सोटा, परि विनय मोठा धनयुतीं;
द्विजा पैसा खोटा, गणपतिस रोठा वितरिती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असमी तूं बलवती ! ७

वधू नेणे कांहीं, वरिवरि 'अगाई !' म्हणतसे,
बळें नेतां शाळे पुसि रडत डोळे कण्हतसे;
तयातोंडीं धर्माचरणशपथांतें करविती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असमी तूं बलवती ! ८

पिता पापी शुल्कग्रहण दुहिता वोपुनि करी
तसा तोही शुल्का वितरुनि वधू जो वर हरी;
श्रुतिस्मृत्युक्ता या बहुमत निषेधा न गणिती,
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असती तूं बलवती ! ९

जरी आपत्कालीं विहित दुसरें दारकरण,
परी न स्वेच्छेनें नवनवकलत्रोपयमन.
नसोनी आपत्ति स्मृतिपथ परी लंघिति किती ?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असती तूं बलवती ! १०

कधींही एकांतीं न जरि पतिची गांठ पडली
अकालीं त्या येतां मरण, विधवा खास ठरली !
मुकोनी संसारा रडति झुरती आणि मरती !
नमस्तुभ्यं, रूढे ! खचित असती तूं बलवती ! ११

स्त्रियांना मुंडावें पतिनिधनिं ऐसा जर विधी
मरे पत्नी तेव्हां न नर करि संन्यासहि कधीं !
असा लोकीं केला विधुरविधवाभेदहि किती ?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असती तूं बलवती ! १२

स्त्रियांचे चित्तीं कां भवभयमुमुक्षा न वसते ?
तशी ज्ञानप्राप्तीविषयिं दृढ इच्छाच नसते ?
न कां त्यांना वेदाध्ययन लिपिशिक्षा वितरिती ?
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असती तूं बलवती ! १३

मनःपावित्र्याची च्युति नचि घडावी म्हणउनी
असे स्पर्शास्पर्शादिक नियम केला ऋषिजनीं;
मनीं पापा ध्याती परि जन विटाळासि जपती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असती तूं बलवती ? १४

द्विजांचें तें इज्याध्ययन तप सर्वस्व सुटलें,
क्षमेचें सत्याचें किमपि धृतिचें नांव नुरलें,
सदाचारा ऐशा त्यजुनि वितथाचार वरिती !
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असती तूं बलवती ! १५

जरी शूद्रस्पर्शें समुचित सदाचार बुडतो,
सदाचारा त्या कां न कधिं यवनीसंग नडतो ?
न पापाची बुद्धि त्यजिति, न मना शुद्ध करिती.
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १६

जलीं वस्त्रीं देहीं शुचि अशुचि आचार उरला !
विटाळाचा चित्तीं उमज नुरला, शब्द ठरला !
अशा मिथ्याचारीं द्विज रमति ! हे तों तव कृती.
नमस्तुभ्यं रूढे ! खचित असशी तूं बलवती ! १७

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या स्वागतार्थ पद्यें

गोपाळा येइ ! येईं ! जनहितविजयी ! स्वागता अल्प घेई
प्रेमा या भूमि-ठाईं प्रभुजनविषयीं चेतवीला उपायीं ।
ही मोठी कारवाई स्मरुं किति हृदयीं काय वानूं बढाई
तूं येण्याची अवाई परिसुनि समयीं पातले देशभाई ॥ १ ॥

स्वदेशाची बाजी धरिशि बहु गाजी उचलुनी ।
म्हणोनी त्या काजीं स्वजन तुज योजी प्रभुजनीं,
विदेशीयांमाजी स्वमत सहजीं सिद्ध करिशी
यशःश्री नीराजी, प्रतिनिधिसमाजीं विलसशी ॥ २ ॥

तूं **गोखल्यां**चा कुलदीप तैसा
झालासि या भारतभूस भूषा ।
वाग्देवता त्वद्वदनांत नाचे
कवीहि डोले परिसूनि वाचे ॥ ३ ॥

द्वापारीं प्रियतमभक्त पांडवांची
शिष्टाई नयपदवीसमर्थनाची
केली ती सकलजनीं असे प्रतीत
गोपाळा अभिमत नीतिपक्षपात ॥ ४ ॥

श्रुत जनिं इतिहासीं नाम तें **गोखल्यांचें**
अझुनि चमकतें तें तेज त्यांच्या कुलीचें ।
समरतळिं हवें जें धैर्य शत्रू वधाया
नृपसमितिपुढेंही तें यश आहराया ॥ ५ ॥

बघत असती स्वर्गींहूनी तुझ्या चरिताकडे
पितर तव ते आनंदानें तसे गुरु **रानडे**
उदरभरणीं सामान्यत्वें निमग्न असे जन
विरल करि तो देशासाठीं निजायु समर्पण ॥ ६ ॥

वक्ता समाधीट कोणा नयो वीट वाका असा नीट तूं मांडिशी
भाषा बहू गोड देशीहुनि तोड आंग्लांतही जोड थोडी असे ।
अत्यंत सौजन्य दाऊनियां धन्य आंग्लांसही मान्य विद्वद्वरा
हा **रानड्यांनीं** दिला पारखूनी खरा भारतीयांसि वाटे हिरा ॥ ७ ॥

पाहूनिया इंदु उल्हासती सिंधु आनंदकंदूच ते भासतीं
आलासि तूं बंधु येती तुला वंदुं हर्षाश्रुबिंदु हे गाळिती ।
स्वदेशा ऋणी करी सन्मणी जो तयाची धणी सत्कृतीमाजि राहो
तुला ईश पावो शतायुष्य देवो तुझी राष्ट्रसेवा तया मान्य होवो ॥ ८ ॥

बालगीत

सकल मिळुनि बालगीत मधुर गाउं या ।
तदनुरूप वागुनि कृतकृत्य होउं या ॥ धृ० ॥

वर, वर, वर, कीर्तिशिखर चढुनि जाउं या ।
भरतभूमिवृत्तपात्रिं नांव राखुं या ॥
सुविहित जें तेंचि करुनि धन्य होउं या ।
त्या काजीं यश, अपयश, सुखचि मानुं या ॥ १ ॥

खोल, खोल ज्ञानखनीमाजि खांदुं या ।
धरणीगत-सृष्ट-विभव खणुनि काढूं या ।

गुरुमुखिंचा ज्ञानकोश हरुनि घेउं या ।
रत्नें नृपदुर्लभ जीं तींच मिळवुं या ॥ २ ॥

पुढतिं, पुढतिं, धर्मपथीं पाय टाकुं या ।
सद्वर्तन हेंचि परम सौख्य भोगुं या ।
उत्कर्षाचे रूप खरें लोकिं मिरवुं या ।
हें जग चिच्छक्तिबलें स्वर्ग बनवुं या ॥ ३ ॥

निकट, निकट प्रेमभरें स्नेह जोडुं या ।
तन, मन, धन, अन्योन्यासाठिं वेंचुं या ।
स्वगृहांतचि ऐहिक सुख श्रेष्ठ सेवुं या ।
त्या सौख्यास्तव नलगे दूर जावया ॥ ४ ॥

मुलांस उपदेश

दुष्कर्मे आचराल सत्पथ बाळपणीं जरि त्यजाल हो ।
फळें पुढें भोगाल तयाची खचित शेवटीं फसाल हो ॥ धृ० ॥

ज्वानीचा भर भरला अंगीं सावध जरिं नच रहाल हो ।
क्षणिक सुखाला भुलुनि विवेका लेश मात्र विसराल हो ।
असार सेवुनि तुम्ही बाप हो शाश्वत सौख्या मुकाल हो ।
अविचारानें वागुनि नाहक पश्चात्तापीं बुडाल हो ॥ १ ॥

सुखामागुती दुःख, अवनती उन्नति मागें घडेल हो ।
प्रकाश सरतां त्याचे ठायीं अंधकार तो पडेल हो ।
मूर्खपणा मागुती फजीती, पापा दंड न चुकेल हो ।
ईश्वरनियमा या लंघाया बघाल तरि निस्तराल हो ॥ २ ॥

* * *

संस्कृत-विभाग

भारतीयं प्रज्ञाराज्यम् ।

प्रस्तावः ।

अद्य मया किं वक्तव्यमित्येव न जानामि । अध्यक्षपदसम्मानस्य अल्पेनापि अंशेन मम पात्रता नास्ति । आङ्लभाषाया अध्ययने अध्यापने च मयाऽद्य-यावद् आयुः क्षपितम् । भ्रमरो यथापुष्पात्पुष्पं परिभ्रमति तथा मया यथानुसरं संस्कृतवागटवीषु परिभ्रान्तुं किन्तु संस्कृतवाग्व्यवहारस्य न कदापि प्रसंगः नापि अभ्यासः । एतत्सर्वं मया कार्यकारिभ्यः पूर्वमेव सूचितम् । तथापि तैर्भूयान् निर्बन्धः कृतः । शिष्टैः कृतस्य सम्मानस्य स्वीकरणमेव प्रत्युपकरणमितिभावनया मयेदं बहुमानपदं अनिच्छतापि स्वीकृतम् । स्वीकरणसूचनासमय एव संस्कृत-वाण्या भाषणं कर्तुं न समर्थोऽस्मि अतः मयाभिप्रेतं पत्रारोपितं कृत्वा वाच-यिष्यामीति मया कथितम् । तच्च तैरभ्युपेतम् । अतो भवतामनुज्ञया मम लेखं वाचयामि ।

क्व च संस्कृतवाग्विमर्शिनी
परिषत्पण्डितमण्डलाश्रिता ।
क्व च शिष्यसमोप्ययं जनः
सदसोध्यक्षपदे निवेशितः ॥

* * *

अयि पुण्यपत्तनमण्डनायमानाः पण्डितप्रवराः । कोऽहं वराको भवादृशां संस्कृतवाङ्महोदधिमनिशमवगाहमानानामनवरतशास्त्रार्थपरिचिन्तननिरतानां पुरतो गीर्वाणवाणीमाश्रित्य द्वित्राण्यप्यक्षराणि वक्तुम्? मया हि

न चर्वितं व्याकरणं, न लीढं न्यायद्वयं नैव च योगशास्त्रम् ।
मीमांसयोर्नैव ममास्ति गन्धो गीर्वाणवाण्यां मम कोऽधिकारः ॥

तथापि यथार्थनाम्नां श्रीमतां श्रीधरशास्त्रिपाठकाह्वयानां प्रेरणया नानलेति-स्वोपाभिधानेनैव स्वाश्रयार्हतां प्रख्यापयद्भिर्भिषग्वरैः प्रोत्साहितेन मया यथा-कथंचिद् भाषणधाष्टर्यं क्रियते, तद्भवद्भिर्गुणपक्षपातिभिः कृपया क्षन्तव्यमिति सम्प्रार्थ्य ममाभिप्रेतं व्याख्यानविषयमुपक्रमे ।

विषयारम्भात्प्रागेव मयैकोर्थः सूचयितव्यः । आङ्ग्लसंस्कृतग्रन्थपठनावसरे काले काले मया यानि टिप्पनानि कृतानि तान्येव संकलय्य मयेयं निबन्ध-कन्था स्यूता । नात्र प्रायो ममैव किमप्यपूर्वकल्पना-सामर्थ्यं इति सार्जवं कृतज्ञतया च मया अभ्युपगम्यते ।

पुरा किल भारतीयानां तदानीं ज्ञातेष्वखिलभूभागेषु प्रज्ञाराज्यमप्रतिहतमासीदिति सर्वत्र श्रुतमभ्युपेतं च । अस्य प्रज्ञराज्यस्यादिमं साधनं गीर्वाणवाग्विस्तार एव आसीदित्यत्र न कोपि सन्देहः।उपनिषत्कालादारभ्य खिस्ताब्दस्य षोडशशतकपर्यन्तं संस्कृतग्रन्थसम्पद् वावृध्यामानेव दृश्यते। " ऋग्वेदं भगवोध्येमि यजुर्वेदं सामवेदमाथर्वणं चतुर्थमितिहासपुराणं पञ्चमं वेदानां वेदं पित्र्यं राशिं दैवं निधिं वाकोवाक्यमेकायनं देवविद्यां ब्रह्मविद्यां भूतविद्यां क्षत्रविद्यां नक्षत्रविद्यां सर्पदैवजनविद्यामेतद्भगवोध्येमि " इति सनत्कुमारं प्रति नारदस्योक्तिश्छान्दोग्ये। (ख० ७ पृ. ३६३) कालक्रमेणेदमाद्यमेव परिगणनं विद्यास्थानानां प्रतिभाति। विष्णुपुराणे तु अष्टादशविद्यास्थानानि संख्यातानि। तान्येव प्रायश्चित्ततत्त्वे समुदाहृतानि यथा

अङ्गानि वेदाश्चत्वारो मीमांसा न्यायविस्तरः ।
धर्मशास्त्रं पुराणं च विद्या ह्येताश्चतुर्दश ॥
आयुर्वेदो धनुर्वेदो गान्धर्वश्चेति ते त्रयः ।
अर्थशास्त्रं चतुर्थं च विद्या अष्टादशैव ताः॥

गच्छति काले नवा नवाः शास्त्रविषया नवा नवाश्च कला वागास्पदं प्रापितास्तेन शास्त्रेषु च कलासु च दिने दिनेऽधिकतरा प्रगतिर्जाता । अतश्च कादम्बर्यां चन्द्रापीडस्याध्ययनाविषयान् वर्णयता भट्टबाणेन शास्त्र-काव्यादि-सामान्यशिक्षा-परिपाटी-बाह्यानामासन्नत्रिंशद्विविधकलानामभ्यसनमपि राजकार्योचितमित्यध्ययनक्रमे समाविष्टम्। दशकुमारचरितकारेण तु राजवाहनस्य शिक्षाक्रमे मणिमन्त्रौषधिमायाप्रकचचञ्चुत्वं चौर्यदुरोदरादिकपटकलाप्रौढत्वं तत्तदाचार्येभ्यः सम्यग्लब्धमिति वर्णितम्। खिस्तशकस्य त्रयोदशशतकान्ते राजशेखरनाम्ना प्रबन्धकोशकारेण कान्यकुब्जाधिपयशोधरपुत्रस्याऽऽनाम्नो राजकुमारस्य स्वाध्याये सप्ततिसंख्याका विषया वर्णिताः। तेषु च खन्यवादः, विषवादः, खेचरीकला, अमरीकला, पातालसिद्धिः, कृत्रिममणिकर्म, सर्वकरणी,

वश्यकर्म, पणकर्म, काष्ठघटनम्, पाषाणकर्म, लेपकर्म, चर्मकर्म, यन्त्रकरसवती, धातुकर्म, प्रयोगोपायः, केवली-विधिरित्यप्रसिद्धानि विद्याङ्गान्यन्तर्भावितानि। अस्य तु संस्कृतग्रन्थभाण्डारस्य विश्वप्रपञ्चावगाहित्वस्य च प्रपञ्चमग्रे प्रत्येकाङ्गस्य विवेचने करिष्यामि। आदौ तस्य विस्तारस्य अल्पमपि द्योतकमिति मयैकमेव प्रमाणं दर्श्यते। "आफ्रेख्ट्" इति नाम्ना प्रख्यातेन शार्मण्यपण्डितेन त्रिंशद्वर्षेभ्यः प्राक् समुपलब्धानां संस्कृतग्रन्थानामेका सूची मुद्रिता। तस्यां चत्वारिंशत्सहस्रपरिमितानि ग्रन्थनामानि पठितानि। तदनन्तरमतीतेषु त्रिंशत्स्वब्देषु कियन्तो ग्रन्था विस्मृतिगर्तायाः समुद्धृत्य प्राकाश्यं नीता इति परिगणनाभावान् निर्देष्टुं न शक्यते। अद्ययावत् सैबीरीया-चीन-जपान-कोरिया-तिबेट-जावा-इत्यादिदूरस्थदेशेषु प्राचीनसंस्कृतग्रन्थाः संशोधकैः समुपलभ्यन्ते। श्रीमदाङ्ग्लप्रभोरुदारराजनीत्या प्रवर्तितशोधनकार्यं प्रचलति, प्रचलिष्यति च। भविष्यति काले च इतोप्यधिकतरा ग्रन्थसम्पद् अस्माकं हस्तगता भवेदित्यत्र न कोपि सन्देहः।

संस्कृतवाग्देव्याः सार्वलौकिकप्रभुत्वस्य तद्ग्रन्थवैपुल्यमेव केवलमेकं प्रमाणं न विद्यते। इयं गीर्वाणवाणी सर्वासामार्यसंज्ञकानां भारतीनामखिलानां च देशीय-विदेशीय-व्यावहारिकभाषाणामपि जननी तथा च नानाविधधर्माणामपि प्रत्यक्षतः परम्परया वोपकर्त्रीति विदेशीयपण्डितवरैरपि सम्प्रत्यभ्युपेतम्। इमं सुमहान्तं ग्रन्थविस्तारमिमां चानन्यसदृशीं व्यावहारिकीं पारलौकिकीं च कार्यक्षमतां समालोच्य पञ्चदशवर्षेभ्यः प्राक् तन्तुपुरस्य श्रीशंकराचार्यसंस्कृतपाठशालायाः सांवत्सरिकपारितोषिकप्रदानप्रसङ्गमभिनन्दनयता मयोक्तम्।

क्व तेऽस्मदीयाः पितरः पुरा यैर्विनिर्मितं वाङ्मयमुत्तमं तत्
क्वास्मादृशो मन्दधियस्तदर्थ-ज्ञानेप्यशक्ताः परमार्थमूढाः॥

अस्य वाङ्मयस्य वैविध्यं विशेषतश्च वैज्ञानिकत्वं प्रायो विस्मृतिपथं गतमित्यालोच्य संस्कृतवाङ्मयस्य विविधाङ्गानि पार्थक्येन किन्तु संक्षेपेण पर्यालोचयामि।

धर्मार्थकाममोक्षाश्चत्वारः पुरुषार्था इति तु सर्वश्रुतमेव। एतेषु धर्मार्थकामास्त्रयोऽर्था व्यावहारिकाः। धर्मविषये त्वनेके ग्रन्थाः सन्ति तेषां परिगणनमनावश्यकम्। अर्थशास्त्रे तु बहवो ग्रन्थाः पूर्वाचार्यैर्विरचिताः। तेषु च

शुक्राङ्गिरसविशालाक्षबाहुदन्तिपुत्रपराशराश्च प्रामुख्येन वर्णिताः । किन्तु विष्णुगुप्तापरनाम्ना चाणक्येन प्रणीतमर्थशास्त्रं पूर्वग्रन्थानतिशय्य सर्वेषां तद्विषयप्रतिपादकानां ग्रन्थानां मूर्ध्नि वर्तते । तत्र च दण्डनीतिविवेचनं सूक्ष्मतया च विस्तरेण च कृतं विलोक्य पाश्चात्या राजनीतिकुशला अपि जना विस्मयवशा जायन्ते । दण्डनीतेश्च षोडशाङ्गानि तथा प्रपञ्चितानि यथा पाश्चात्यार्थशास्त्रग्रन्थेषु विषयनावीन्यं प्रायो दुरासदमेव जातम् । शार्मण्यैरिदानीं प्रयुक्तो विषमयो वायुरपि तत्रवर्णितः । अस्यात्युत्तमग्रन्थस्य आचार्यचाणक्यशिष्येणैकेन कामन्दकीयनीतिसारनाम्ना संक्षेपतः सारं वर्णितम् । चाणक्यदण्डनीतेराङ्ग्लभाषयानुवादो जातः । स च यूरोपखण्डे भरतवर्षे च पण्डितैः साभिमानं प्रशस्यते पठ्यते च ।

गृहकार्यनिर्वाहविषये कोऽपि स्वतन्त्रो ग्रन्थोऽद्ययावन्नोपलब्धः। तथापि वात्स्यायनसूत्रे भार्याधिकरणे धान्यादिसामग्री, भृत्यनियमनं, पाकशालावेक्षा, शाकशाकटरोपणमित्यादीनि गृहिणीकार्याणि सविस्तरं वर्णितानि । कृषिविषये उद्यानविद्यायां च केचिन्निबन्धा वर्तन्ते । वराहमिहिरस्य बृहत्संहितानाम्नि विश्वकोशसदृशे ग्रन्थे अनयोर्व्यवहाराङ्गयोः पृथक् पृथक् अध्यायाः सन्ति । धर्मशास्त्रग्रन्थेषु प्रसङ्गतः क्वचित् क्वचित् एतद्विषयकग्रन्थसूचकप्रमाणान्युपलभ्यन्ते । किन्तु एते ग्रन्था नाद्यापि हस्तगताः सन्ति । पाशुपाल्ये कोऽपि स्वतन्त्रो ग्रन्थो नाद्याप्युपलब्धस्तथापि हस्तिशास्त्रं, अश्वशास्त्रं च उपलब्धं मुद्रितं चास्ति । कादम्बर्यां हस्तिशिक्षा, तुरङ्गवयोज्ञानं स्वतन्त्रविषयरूपेणोपन्यस्तौ । पाकसिद्धौ च केचन ग्रन्था उपलब्धा येषु न केवलं धान्यशाकादीनामपि तु नानाविधमांसप्रकाराणां गुणावगुणाः पाकरीतिश्च सविस्तरं वर्णिताः सन्ति ।

भौतिकशास्त्राणि ।

सर्वेषामितरराष्ट्राणामपेक्षया पूर्वतरमेव भारतीयैः गणितविषये नैपुण्यं समासादितमासीत् । अङ्कगणिते दशमांशपद्धतिः, बीजगणिते वर्गसमीकरणोपपत्तिः, त्रिकोणामित्यां च कोणमापनमित्यादि गणितभागेषु तैः परमोत्कर्षः प्राप्त आसीत् । यज्ञकुण्डविधाने, प्राचीसाधने चैतद् ज्ञानमतीवावश्यकमासीत् । तथा च यज्ञार्हकालनिश्चयार्थं तैः ज्योतिःशास्त्रेऽपि प्रगतिः कृताऽऽसीत् । "सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्चे" ति श्रुतिवाक्ये यत्सृष्टिगुह्यं प्रतिपादितं तद् आधुनिक-

युरोपीयशास्त्रविद्भिरपि सत्यापितमस्ति । पृथिव्या दैनंदिनी गतिः तस्याः गोलाकारः तस्या आकर्षणशक्तिरित्यादि तत्त्वनिर्णयः प्रथमं भारतवर्षीयैरेव कृत इत्यपि इदानीं पाश्चात्यशास्त्रज्ञैरङ्गीकृतम् । ग्रहवेधार्थं सूक्ष्माणि यन्त्रादि-साधनान्यपि तैः स्वबुद्धिसामर्थ्येन परिकल्पितानि । एतस्य ज्योतिःप्रावीण्यस्य यन्त्रसाधनस्य प्रत्यापयिका उज्जयिन्यां प्राचीनवेधशाला वर्तत एव ।

वैद्यशास्त्रे तु भारतीयैः परोत्कर्षः खिस्तशकाब्देः प्रागेव संपादित आसीत् । अत्यन्तशोधकबुद्ध्या सुमहता प्रयत्नेन च तैरधिगतं ओषधिविज्ञानं अतीव विस्मयावहमस्ति । हिमाचलस्यात्यन्तदुर्गमस्थलेषु लभ्यमानानामोषधीनां गुणा-वगुणास्तैश्चिकित्सिताः । तासां च भैषज्यार्थमुपयोगः समादिष्टः । रोगोपशमार्थं कतिनाम सृष्टद्रव्याणि तैः परीक्ष्य भस्म-गुटिका-तैल-घृत-लेपादिनानाविधोप-चारास्तैः परिकल्पिताः । शस्त्रक्रियाऽपि तेषां नाविदितासीत् । शस्त्रक्रियायां उपयुक्तानि नानाविधानि शस्त्राण्यपि तैर्नियोजितानि । खिस्ताब्दाद्वर्षसहस्रा-त्प्रागेव अस्थिशिरादि शरीरघटकानां यथार्थज्ञानं तैः समासादितमासीत् ! बालानां, वृद्धानां च विशेषतो गर्भिणीनां रोगाणां निदानं चिकित्सा च वैद्यक-ग्रन्थेषु सविस्तरं तैर्निरूपिता । अर्वाचीनकाले तु भैषज्यार्थे नानाविधधातू-नामपि शोधनं तैः कृतम् । श्रीमता प्रफुल्लचन्द्ररायाभिधानेन सुप्रसिद्धेन रसायनशास्त्राध्यापकेन प्रायोगिकरसायनशास्त्रे प्राचीनभारतवर्षे कियती प्रगतिः कृतासीदिति स्वरचितग्रन्थेषु सविस्तरं वर्णितमस्ति । नातिचिरात्प्राक् पुण्य-पत्तनं स्वागमनेन धन्यं कृतवताऽपरेण वङ्गीयेन शास्त्रसंशोधकेन श्रीमता जगदीशचन्द्रबोसेति नाम्ना महापण्डितेन " सर्वभूतेषु येनैकभावमव्ययमीक्षते । अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धिसात्त्विकमिति " श्रीभगवद्गीतावचनस्य सत्यार्थता सप्रयोगं स्थापिताऽस्ति । तस्य विवेचनपद्धतिश्च निरपवादेति पाश्चात्य-पण्डितानामपि सम्मतम् । वैशेषिकाणां परमाणुवाद आधुनिकशास्त्रज्ञैरपि बहुमतः कथंकथंचित्स्वीकृतश्च । प्रयागक्षेत्रे विद्यमाने पाणिनिमुद्रणालये प्रका-शिते " पाझिटिव्ह् ब्याक्ग्रौंड आफ् इण्डियन् फिलासफि " नामके पुस्तके श्रीमद्भिः श्रीशरच्चन्द्रबसु-वामनदासबसु-व्रजेन्द्रनाथसीलनामभिः शास्त्रकोविदैः प्राचीनभारतीयानां भौतिकशास्त्रेष्वपि नैपुण्यं सप्रमाणं स्थापितमस्ति ।

यन्त्ररचनायामपि प्राचीनभारतवर्षे अतुलं बुद्धिसामर्थ्यं प्रकटीकृतमासीत् । एतद्विषये महामहोपाध्यायपण्डित-हरप्रसादशास्त्रिभिः बौद्धवाङ्मयाद् द्वे अद्-

भुते च प्रायः अश्रुतपूर्वे च कथे उदाहृते स्तः। आर्यदेवनाम्ना केनचिद् ग्रन्थ-कारेण खिस्ताब्दस्य षष्ठे शतके चतुःषाष्टिका नामको ग्रन्थो विरचितः। तस्य ग्रन्थस्य चन्द्रकीर्तिनाम्ना ग्रन्थकारेण खिस्ताब्दस्य षष्ठे शतके टीका विरचिता। तस्यां टीकायां ते द्वे कथे निरूपिते।

अस्ति कोऽपि पराशरो यन्त्रतक्षा यन्त्रकारो वा। कश्चिद् भिक्षुः वर्षागमे निवासार्थं तस्य गृहं आससाद। पराशरेण तत्प्रार्थनामनुमत्य स्वगृहस्य प्रथमा भूमिः तस्य निवासार्थं वियोजिता। चातुर्मास्यान्ते भिक्षुर्यदा संचारार्थं प्रातिष्ठत तदा पराशरस्तस्मै भिक्षवे वेतनं दातुमैच्छत्। तदा भिक्षुणोक्तम्। न मया किमपि कर्म काऽपि सेवा वा कृता। तत्किमर्थं मे वेतनं दातुमिच्छसि? पराशरे-णोक्तम्। अत्र भवान् उपरितन्यां भूमाववात्सीत्। गृहतले तु नानाविधानि यन्त्राण्यासन्। निषीदता, स्वपता, उत्तिष्ठता, चलता वाऽत्रभवता यो भार उपरितन्यां भूमौ निहितः तेन मम यन्त्राणि प्रचलितान्यासन् अत्रभवतो निवासकाले मम यन्त्रेभ्योः विपुलं फलं मयाऽवाप्तम्। अतश्च किमपि वेतनं स्वीकर्तुमत्रभवान् अर्हतीति।

कश्चिद् भिक्षुः संसारक्रमेण काम्बोजान् गत्वा तत्र च कस्याचित्पराशरस्य गृहे न्युवास। अपरेद्युः प्रातरेव स भिक्षुः भिक्षार्थं गृहान्निर्गतः। तदानीं पराशरेण तं प्रति उक्तम्। काम्बोजेषु भिक्षवो निकृष्टा मन्यन्ते। अतस्तूष्णीं स्वमार्गमाक्राम। तथादिष्टः स भिक्षुर्मुख्यं राजमार्गं तूष्णीमेवाक्रान्तवान्। तस्मिन् ग्रामे केचिदन्येपि पराशरा आसन्। ते चास्य पराशरस्य प्रतिस्पर्धिन आसन्। यदा तैरयं तूष्णीं मार्गं क्रममाणो भिक्षुर्दृष्टस्तदा तैश्चिन्तितम्। इदं किंचिन्नवीनं यन्त्रमनेन पराश-रेणोपकल्पितम्। वयमपि ईदृशं यन्त्रं निर्मास्यामः। इति संकल्प्याचिरादेव तैः किञ्चित् पुरुषाकारं यन्त्रं निरमीयत। मायामयः स पुरुषश्चलितुं हस्तं प्रसारयितुं नेत्रनिमेषं पक्ष्मसंकोचादिकमपि कर्तुं शक्त आसीत्। अयं मायापुरुषः तैरस्य पराशरस्य कार्यालयसन्निधिं प्रापितः। पराशरेण तेषां मनोरथमाकलय्य तेषां पाटवं स्तुतं उक्तं च। मदीयं यन्त्रं वक्तुं शक्नोति न तथा युष्म-दीयमिति। इत्युक्त्वा च किंचिद्वक्तुं भिक्षुरादिष्टः। भिक्षुणा च तत्क्षण-मेवाशीर्वचनं प्रोक्तम्। तदा ते पराशरा लज्जिताः स्वगृहं निववृतिरे इति।

एतादृशीभ्यः कथाभ्य एतदनुमानमपरिहार्यम्। "नामूल्यं लिख्यते किञ्चि-दि"ति प्राचीनः शिष्टसम्प्रदायः। एवं चेद्यस्मिन् काले एतादृश्यः कथा लिखिताः

तस्मिन् काले यन्त्रशास्त्रे परोत्कर्षो भारतीयैर्लब्ध आसीदित्यनुमानं निरपवादं भाति ।

अष्टादशसु विद्यास्थानेषु धनुर्वेदस्यान्तर्भावः प्राचीनैः कृत इत्येतत्पूर्वमेव कथितम् । धनुर्वेदस्य मूलं तु अथर्ववेदे दृश्यते । तस्य वेदस्य विंशतितमं काण्डं शस्त्रकाण्डेत्यभिधया प्रसिद्धम् । तद्वेदस्य चतुर्थकाण्डे द्वादशे सूक्ते चतुर्थ्यामृचि चर्मपाशः अङ्कुशश्च तत्तन्नाम्ना शस्त्रार्थे च अभिहितौ । विंशे काण्डे पंचनवतितमे सूक्ते नवम्यामृचि तथा च तृतीयकाण्डे त्रयोविंशे सूक्ते द्वितीयायामृचि बाणः स्मृतः । तथा च इषु शब्द एकोनविंशे काण्डे त्रयोदशे चतुर्दशे च सूक्त दृश्यते । पाशशब्दोऽपि शस्त्रार्थे चतुर्थे नवमे च काण्डे उपलभ्यते । तस्यैव वेदस्य अनुक्रमेण द्वितीये षष्ठे च काण्डे ' शतवधा ', ' शतशल्या ' इात शस्त्रनामनी उपलभ्येते । शतसंख्याकानि शल्यानि अयोमयानि तीक्ष्णानि प्रोतानि यस्यामिति भाष्यकारेण महीधरेण शतशल्या व्याख्यानं कृतम् । नैतदतीवाश्चर्यावहं किं यत्खिस्ताब्दापेक्षया कतिचिद् वर्षसहस्रेभ्यः प्रागेव शतवधेत्यद्भुतानि शस्त्राणि भारतीयैरुपकल्पितानि ? ऋग्वेदेऽपि धनुः बाण इत्यादयः शब्दा दृश्यन्ते । श्रीमद्रामायणे बालकाण्डे सप्तविंशे सर्गे विश्वामित्रेण कृतः शस्त्रास्त्रोपदेशो वर्णितः । तास्मन् दण्डचक्रादीनि पंच चक्राणि, धर्मादयस्त्रयः पाशाः शुष्कार्द्रे नाम द्वे अशनी, द्वे शक्ती, त्रयस्त्रिंशदस्त्राणि च नामतः अभिहितानि । युक्तिकल्पतरौ तु अस्त्राणां द्वौ प्रकारौ वर्णितौ यथा—

अस्त्रं तु द्विविधं प्रोक्तं निर्मायं मायिकं तथा ।
खड्गादिकं तु निर्मायं मायिकं दहनादिकम् ॥

आयुधानां पुनः चत्वारो भेदाः वार्णताः । ते यथा—

(१) क्षेपणी चापयन्त्राद्यैर्यन्त्रमुक्तम् ।
(२) शिलातोमरयन्त्राद्यं पाणिमुक्तम् ।
(३) मुक्तामुक्तम्–भल्लत्रिशूल इत्यादि ।
(४) अमुक्तम्–खड्गादिम् ।

अग्निपुराणे धनुर्वेदविषये चत्वारोऽध्यायाः सन्ति । शिवकवचनाम्नि स्तोत्रे तु खट्वाङ्ग-खड्ग-चर्म-पाशाङ्कुश-डमरुचापबाणगदाशक्तिभिंदिपालतोमर-मुसलमुद्गलपाशपरिघभुशुंडीशतघ्नीचक्राद्यायुधभीषणकर इति शिवस्य विशेषणं

पठ्यते । धनुर्वेदस्य संक्षेपतः सारं मधुसूदनसरस्वतीभिः महिम्नस्तोत्रटीकायां कथितमस्ति । ततश्च मधुसूदनसरस्वतीकालपर्यन्तं धनुर्वेदग्रन्था उपलब्धा आसन्नित्यनुमीयते । मयास्य विषयस्य एतावान् विस्तरः बुद्धिपुरःसरमेव कृतः । अनतिचिरान्महाष्ट्रमासिकेषु कैश्चिन्मान्यवरैः पण्डितैः काचिन्नवीना एव विचारसरणिरवलम्बिता मया दृष्टा। तैरुच्यते त्रेतायां परशुरामः शस्त्रास्त्रविद्यागुरुरासीत् । द्वापरे पुनः द्रोणाचार्यः कौरवाणां पाण्डवानां च शस्त्रास्त्राविद्यागुरुरासीत् । भार्गवो द्रोणश्च उभावपि ब्राह्मणौ । अतः धनुर्वेदस्य आचार्यत्वं ब्राह्मणानामेवासीत् । तैश्चैतत्स्वकर्तव्यं परित्यक्तम् । ततश्च स्वराज्यहानिर्जातेति तैरनुमानं कृतम् । तत्साधु असाधु वा भवादृशैः पण्डितवरैरेव निर्णेतव्यम् । अत्रेदमेवोच्यते । न केवलं धनुर्वेदस्य किं तु गाधर्ववेदस्य, बहूनां व्यावहारिकीणां संस्कृतग्रन्थेषु प्रतिपादितानां कलानां चाप्यध्यनं ब्राह्मणवर्गे लुतम् । अस्य अध्ययनलोपस्य सर्वथा ब्राह्मणवर्गे एव दोष आसज्यते किम् ? न तत्रान्यानि समवाय्यसमवायिकारणानि किमिति प्रतिप्रश्नो नासमञ्जस इति मे भाति ।

कलानां तु चतुःषष्ठिसंख्या प्रायः परिगणितास्ति किन्तु तासां नामावल्यां ऐकमत्यं न दृश्यते । प्रबन्धकोशस्य कर्त्रा राजशेखरेण उदाहृताः " आप च शैवतन्त्रोक्ताः । वात्स्यायनप्रोक्ताश्च " कलाः क्वचित् क्वचिद् भिन्ना दृश्यन्ते । तासां प्रकाराश्च भिन्ना एव वर्ण्यन्ते । काश्चित्पञ्चालिक्य इति वर्ण्यन्ते । अन्यास्तु औपयिक्यः । एकेन टीकाकारेण तु अष्टादशाधिकपञ्चशतसंख्याकाः कला इति कथ्यते । औपयिकी चतुःषष्ठिकला अधिकृत्य ग्रन्था उपलभ्यन्ते । तासु च संगीतविषये बहवो ग्रन्था दृश्यन्ते । कविकण्ठाभरणेन भुवनानन्दनाम्ना वङ्गीयपण्डितेन विश्वकोशसदृश एको महान् ग्रन्थः खिस्ताब्दस्य आसन्नषोडशशतसंवत्सरावसाने अष्टादशविद्यास्थानविषयको विरचितः । तस्मिन्ग्रन्थे संगीतविषयक एकोध्यायो वर्तते । तन्मिन्नध्याये च बहूनां संगीतग्रन्थकाराणां नामान्युदाहृतानि । नाट्यविषये कोहलेनैको व्यापको ग्रन्थो विरचितस्तस्मिन्करणानामङ्गहाराणां नृत्तस्य च भेदः सूक्ष्मतया वर्णितः दशरूपके च नृत्तस्य च नृत्यस्य च भेदो दर्शितोस्ति । कोहलस्य मते नाट्यं नृत्तात्प्रागेव समुद्भूतम् । कोहलस्तु खिस्तशकात्प्राग् द्वितीयशतके समभवत् इति महामहोपाध्यायपण्डितहरप्रसादशास्त्रिणां मतम् । नाट्यविषये बहवो प्राचीना ग्रन्थकाराः कोहलेनोदाहृताः । तद्ग्रन्थे

नाट्यस्य सर्वाण्यङ्गानि विविधानां नाट्यागाराणां रचनाप्रकाराः परिमाणानि च वर्णितानि सन्ति ।

चित्रकलाविषये कोऽपि ग्रन्थो नाद्ययावदुपलब्धः । तथापि खिस्तशकप्राक्कालिकानि आलेख्यानि कानिचिदुपलब्धानि सन्ति । षष्ठशतकादारभ्य दशमशतकपर्यन्तं मन्दिरेषु चैत्येषु विहारेषु आलिखितान्यनुत्तमानि चित्राणि दरीदृश्यन्ते । भारतीयानां मूर्तिशिल्पकौशल्यं तु अखिलस्य जगतो विस्मयं जनयति । तच्च गौतमबुद्धकालिकं वर्तते । वास्तुवद्यायां च परमोत्कर्षो भारतीयैरवाप्त इत्यत्रापि न कश्चित्सन्देहः । हर्म्यप्रासादनगररचनाविषयेऽपि सूक्ष्माण्यनुशासनानि वास्तुग्रन्थेषु दृश्यन्ते । औपयिकीषु कलासु दशनवसनाङ्गरागाः, नेपथ्यप्रयोगाः कर्णपत्रभङ्गः, गन्धयुक्तिः, पानक-रस-रागासवयोजनम्, सूचीवानकर्माणि, पट्टिकावेत्रवानाविकल्पाः, तक्षकर्माणि, रूप्यरत्नपरीक्षा, धातुवादः, मणिरागाकरज्ञानं, वृक्षायुर्वेदयोगाः, इत्यादि कलाविषयग्रन्थाश्च स्मर्तव्यशेषा इदानीं जाताः । अतश्च प्राग्निर्दिष्टे प्रसङ्गे मयोक्तम्—

क्व शिल्पकौशल्यमहो पितॄणां येभ्यो विदेशीयजनैः प्रयत्नात्
कलानिपीतास्तमसेव सोमाद् अद्यापि तद्विस्मयमातनोति ॥

इतिहासः ।

सत्यप्यनेकेषु विद्याङ्गेषु ग्रन्थसंग्रहे केवलमितिहासविषय एव भारतीयानां अचिन्त्यहेतुकं वैगुण्यं दृश्यते । इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् । बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरेदिति याज्ञवल्क्येनोक्तं अन्यत्रापि स्मर्यते । ऐतरेयतैत्तिरीयकाठकादिशाखासूक्तानि हरिश्चन्द्रनाचिकेताद्युपाख्यानानि धर्मप्रबोधोपयुक्तानि तेषु तेष्वितिहासग्रन्थेषु स्पष्टीकृतानि । उपनिषदुक्ताः सृष्टिस्थितिलयादयो ब्राह्मपाद्मवैष्णवादिपुराणेषु स्पष्टीकृताः । सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च । वंशानुचरितं चेति पुराणं पञ्चलक्षणम् । इति सृष्ट्यादेः पुराणप्रतिपाद्यत्वावगमनादिति सायणाचार्येणोक्तं ऋग्वेदभाष्यभूमिकायाम् । धर्मावबोधसाधनत्वेन अन्यत्र बृहदारण्यकादौ स्मृतेऽपि इतिहासविषये कथं प्राचीनै उदासितमिति तु अचिन्तनीयम् । खिस्ताब्दस्य सप्तमशतकादूर्ध्वं तत्तत्कालिकैः पण्डितैर्विरचिता नवसाहसाङ्कचरितं नवविक्रमाङ्कचरितमित्यादय इतिहासग्रन्थाः समुपलभ्यन्ते । क्वचिद् द्व्याश्रय-

काव्यरामचरितादयो द्व्यर्था ग्रन्थाः क्वचिच्च गौडवहो इत्यादि राजप्रशस्तिग्रन्थाः क्वचिच्च पृथ्वीराजचरितं, राजतरङ्गिणी इत्यादयो याथापूर्व्येण विरचिताश्च ग्रन्था दृश्यन्ते। तथा च श्रीशङ्करविजयः श्रीमध्वविजयः इत्यादयश्चरितग्रन्था अपि उपलभ्यन्ते।

पण्डितहरप्रसादशास्त्रिभिरेकं ग्रन्थकुतूहलं वर्णितमस्ति। वर्षशतत्रयात्पूर्वं केनचित्क्षत्रियसामन्तभूपालाश्रितेन जगन्मोहननाम्ना पण्डितेन भरतवर्षस्य वर्णनात्मकः कोशो विरचितोऽस्ति। अस्मिन् ग्रन्थे तादृशानां प्राचीनतराणामन्यग्रन्थानामपि उल्लेखः कृतोऽस्ति। ब्रह्मखण्डं नाम भविष्यपुराणभागस्तादृश एवास्ति।

